

परमहंस संत
श्री शंकरबाबा महाराज
श्रीक्षेत्र पिंपळखुटा, जि. अमरावती.

# चरणामृत

(ओवीबद्ध ग्रंथ)

* लेखक *

बाबाराव गेडाम

(संतदास)



परमहंस संत

# श्री शंकरबाबा महाराज

श्रीक्षेत्र पिंपलखुटा, जि. अमरावती

# चरणामृत

(ओवीबद्ध ग्रंथ)


लेखक

बाबाराव गेडाम

(संतदास)

# चरणामृत (ओवीबद्ध ग्रंथ)

लेखक : बाबाराव गेडाम (संतदास)
मोबाइल : ८४११०८२२५०

■

© प्रकाशकाधीन

■

प्रकाशक :
श्री संत शंकर महाराज आश्रम
श्री क्षेत्र पिंपळखुटा, ता. धामणगाव
जि. अमरावती (महाराष्ट्र)

■

प्रकाशन तिथी : १० एप्रिल २०२२
श्रीराम नवमी जन्मोत्सव
श्री क्षेत्र पिंपळखुटा, ता. धामणगाव

■

मुद्रित शोधन:
विजय जोशी
मोबाइल - ९८८१०९८०४५

■

मुद्रक :
सौ. चेतना विकास वडके
शब्दमाधुरी , पुणे
मोबाइल - ९८९०९८४९२७

■

सहयोग राशी : २५१/- रुपये

---

# प्रस्तावना

माझ्या उतार वयातील स्नेही, शीघ्र कवी, उत्तम वक्ता व गुरुबंधू ह.भ.प. श्री. बाबारावजी गेडाम (संतदास) यांनी श्री संत शंकरबाबा महाराज चणामृत हा ३१ अध्यायांचा व प्रत्येक अध्यायात १३१ ओव्यांचा ओवीबद्ध ग्रंथ लिहून पूर्ण केला आहे, ही माझ्यासाठी खूप आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. ह.भ.प. श्री.बाबारावजी गेडाम यांनी हे उपेक्षीत राहिलेले व त्यासाठी कोणीही पुढाकार न घेतलेले श्री सद्गुरू शंकरबाबा महाराजांचे सेवाकार्य हातात घेऊन पूर्ण केले आहे. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन! शेगावीचे श्री संत गजानन बाबा यांचे ओवीबद्ध चरित्रग्रंथ लिहिणारे श्री संत दासगणू महाराजांचा मागोवा घेत श्री. बाबाराव गेडाम यांनी श्री संत शंकरबाबा महाराज चरणामृत ह्या ग्रंथाचा पाया रचून श्री संत शंकरबाबा महाराजांची उत्तम व अभिनंदनीय सेवा केली आहे.

जगा सारखे वर्तावे । आपले अंतरिचे कळू न द्यावे
जनी असोनी जनार्दन व्हावे । येणे रीती राहता ॥ *(-अनुभव ब्रह्म)*

अमरावती जिल्ह्यातील पिंपळखुटा या खेड्यात महान तपस्वी व शंकर भगवंताचे भाविक भक्त श्री. बुधाजी नागपुरे आणि त्यांच्या धर्मपत्नी सौ. भागिरथाबाई यांच्या पोटी अत्यंत दारिद्र्यात सातव्या पुत्राच्या रूपाने श्री शंकर बाबा अवतरले. चवथ्या वर्गातून शिक्षणाला रामराम ठोकला व कुटुंबातील ज्येष्ठपुत्र म्हणून वयाच्या १७ व्या वर्षापर्यंत शेतमजुरी करून कुटुंबासाठी अर्थार्जन केले. सोबतच ध्यान व योगाभ्यासही सुरू ठेवला.

१९५७ ला श्री समर्थ सद्गुरू लहानुजी नाथांनी अनुग्रह केला व १२ वर्षाच्या उपवासाचा व मौनाचा आदेश दिला. त्यानंतर श्री शंकरबाबा महाराज पूर्णपर्ण एकांतात गेले होते. श्री संत सत्यदेव बाबांनी त्यांच्यावर कृपा करून त्यांना मौन, उपवास व एकांतातून बाहेर काढले व जनतेमध्ये फिरण्याचा आदेश दिला. तेव्हापासून श्री शंकरबाबा महाराज भक्तांशी एकरूप झाले.

आत्मसाक्षात्कारानंतर १९६८ मध्ये त्यांना पंढरपूर येथे भगवान श्री. पांडुरंग व रुक्मिणी माता यांनी दृष्टांत दिला आणि ''आम्ही सांगतो तेच लिहावे, आम्ही तुझ्याच जवळ आहे.'' असा संकेत दिला.

त्यानंतर आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी संजीवन समाधीतून दृष्टांत दिला आणि ''आम्ही सांगतो तेच लिहावे, आम्ही तुझ्याच जवळ आहो'' असा चैतन्य स्वरूपाच्या प्रकाशात संकेत दिला.

वरील प्रवास पूर्ण करून ते त्यांचे इष्ट दैवत श्री संत लहानुजी महाराजांच्या दर्शनासाठी टाकरखेड येथे गेले तेव्हा त्यांचे दर्शन घेताना श्री लहानुजी महाराज म्हणाले, ''लहान्या, डोळे मिटून बसू नको, काहीतर लिहीत जा. पंढरपूरला गेला तरी तुले समजले नाही का? तोच हा डोळा, घे । मी देतो ।'' अशा शब्दात त्यांना लिहिण्याची आज्ञा केली.

आश्रमात परतल्यावर त्यांना श्री लहानुजी महाराजांची तीच स्फूर्ती जागवू लागली. तेव्हापासून ते भावावस्थेत गेले. त्या अवस्थेत ते किती दिवस गेले याचे त्यांना भान उरले नव्हते. त्या भावावस्थेत त्यांच्या ६ ु ६ च्या पडवीत समोरच्च्या भिंतीवर प्रकाश दिसत होता व त्यामध्ये अक्षरे दिसत होती. चवथ्या वर्गापर्यंत शिकलेल्या श्री शंकरबाबांनी भिंतीवर दिसणारी ती अक्षरे जशीच्या तशी लिहून काढली. त्याची जुळवणी व संकलन केले. अशा प्रकारे १९७० मध्ये

भगवान श्री पांडुरंग व रुक्मिणी मातेच्या तसेच चैतन्य स्वरूप श्री ज्ञानेश्वर माउलींच्या व श्री समर्थ सद्गुरू श्री लहानुजी महाराजांच्या प्रेरणास्फूर्तीने २९६ पानांचा हा ग्रंथ पूर्ण झाला. धामणगाव येथील श्री मारोतराव नथ्थुजी कठाणे यांनी २९ सप्टेंबर १९७१ साली ह्या ग्रंथाच्या प्रथम आवृत्तीचे प्रकाशन केले. त्या वेळी ह्या ग्रंथाचे नाव 'सार्थ मराठी गीता ज्ञानामृत' होते व त्याची किंमत केवळ पाच रुपये होती.

पुढे १९७४ मध्ये 'सद्गुरू दर्शन' व १९७९ ला सद्गुरू महिमामृत ग्रंथ साकारास आला. पुढे २८ मार्च, १९९६ ला अनुभव ब्रह्म हा योगावरील ग्रंथ प्रकाशित झाला.

१९७३ पर्यंत श्री शंकरबाबा श्री. माणिकराव हारगोडे यांच्या घराच्या पडवीत राहत होते. त्याच पडवीत श्री शंकरबाबांना सदगुरू श्री लहानुजी बाबांच्या कृपेने आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर त्यांनी स्वस्वरूपाच्या स्वानुभूतीतून 'स्वानुभूतीचा अमृत प्रसाद' वाटप सुरू केला. जगत प्रबोधनाच्या कार्याचा प्रारंभ केला.

सद्गुरू श्री लहानुजी महाराजांच्या आज्ञेवरून १९७४ ला नवीन शेतात आश्रमाची स्थापना केली आणि तिथे ही श्री सद्गुरू कृपेने आत्मानुभवाचा कृपा प्रसाद वाटप सुरू ठेवला. त्याला लाईनवर बसणे म्हणतात. १९९५ मध्ये विश्वमंदिर भक्तिधामाची स्थापना करून अखंडवीणा व अखंडदीप सुरू केला आणि श्री समर्थ सत्यदेव बाबांच्या आदेशावरून श्री रामनवमी महोत्सव सुरू केला. आज त्या महोत्सवाला 'स्वर्णमहोत्सवी' महोत्सवाची किनार लाभली आहे.

श्री शंकरबाबा महाराजांचा बुवाबाजी, अंधश्रद्धा, चमत्कारावर विश्वास नाही. अशा चमत्कृतिपूर्ण घटनांचे श्रेय

त्यांच्या सद्गुरू कृपेला देतात. त्यांच्या भक्तांच्या जीवनातील अनेक घटना चमत्कारपूर्ण आहेत व त्या घटनांमध्ये श्री शंकर बाबांनी भक्तांना सांगितले तेच अनुभव आले आहेत पण श्री बाबांनी त्याप्रसंगाचे श्रेय सद्गुरूलाच दिले आहे.

मला महत्त्वाच्या तीन घटना आठवतात,

घटना पहिली १९९२ –१९९३ मध्ये श्री शंकरबाबा भक्त मंडळीसह त्यांच्या आईसह श्री क्षेत्र तिरुपती बालाजीला व दक्षिण भारत दर्शनासाठी गेले होते. तिथे मंदिरातून त्यांच्या आई श्रीमती भागीरथा माता अचानक हरवली. शोध घेऊनही ती सापडली नाही. तेव्हा श्री बाबा सोबतच्या भक्तांना म्हणाले होते  ती परत येते. त्यामुळे आश्रमाची गाडी भक्त मंडळीसह पंढरपूरला परत गेली. त्यानंतर मातोश्री भागीरथी माता तिरुपती बालाजी येथून अमरावती येथे कोणत्याही आधाराशिवाय अंदाजे एक महिन्यानंतर परत आली होती. तिरुपती बालाजी येथून अमरावतीपर्यंतचा प्रवास तिने कसा पूर्ण केला असेल हे सांगता येत नाही. श्री बाबानीही सांगितले नाही. तिच्या परत येण्याचे श्रेय श्री बाबा पांडुरंगास देतात.

दुसरी घटना २००१ मधील आहे. शंकर नन्नावरे ह्या अंध व्यक्तीने आश्रमातील वसतिगृहातील मंगेश मनोहर फेंडर या विद्यार्थ्याला वृंदावन येथे पळवून नेले होते. तो वृंदावन येथे आहे असे श्री बाबांनी सांगितल्यानंतर शोधणाऱ्या मंडळींना तो विद्यार्थी वृंदावन येथे सापडला. त्याही घटनेचे श्रेय श्री बाबांनी त्यांच्या गुरुदेवांनाच दिले आहे.

तिसरी घटना ७ ऑगस्ट २०१६ ची आहे. वेळ सकाळी ८.१० वाजताची आहे. प्रथमेश अवधूत सगणे हा ११ वर्षाचा विद्यार्थी वसतिगृहात राहत होता. सुरेंद्र मराठे नावाच्या कर्मचाऱ्याने त्याचा ब्लेडने गळा कापला. त्यात त्याची

अन्ननलिका, श्वासनलीका, वाचानलिका सह गळा कापला गेला होता. डॉक्टरांच्या मतानुसार हा मुलगा वाचणे १०० टक्के अशक्य होते. पण श्री बाबा म्हणाले, वाचतो ! लवकर दवाखानयात न्या आणि पुढे तो वाचला. अशा गंभीर घटनेबाबत श्री बाबा म्हणतात आमच्या श्री गुरुदेवने त्याला वाचवले.

श्री शंकरबाबा महाराजांचे पंचमहाभूतांवर ताबा असलेले अनेक अनुभव भक्तांनी श्री बाबारावजी गेडाम यांचेकडे नोंदविले आहेत. परंतु श्री शंकर बाबा महाराजांनी त्यांपैकी कोणत्याही घटनेचे श्रेय स्वतःकडे घेतलेले दिसत नाही.

ज्ञानयोग, राजयोग, भक्तियोगासोबतच कर्मयोगी म्हणून शिक्षण, कृषी, पर्यावरण संवर्धन व समाज प्रबोधनाचे क्षेत्रात श्री शंकरबाबा महाराज राष्ट्रीय कार्यात योगदान देत आहेत. हेच त्यांचे चरणामृत आहे!

इथेच थांबतो । शेष मंगल । ग्रंथाला शुभेच्छा ।।

श्री बाबारावजी गेडाम यांचे अभिनंदन!

*– भास्कर मोहोड*

श्री क्षेत्र पिपळखुटा, *अमरावती*

*मो.९६६५०९९९८८*

# शुभकामना

श्री विठ्ठल प्रसन्न

धन्य ते संसारी । दयावंत जे अंतरी ।।१।।
येथे उपकारासाठी । आले घरज्या वैकुंठी ।।२।।
लटिके वचन । नाही देही उदासीन ।।३।।
मधुरा वाणी ओठी । तुका म्हणे वाव पोटी ।।४।।

परमपूज्य आदरणीय शिवरूप असणारे परमहंस श्री समर्थ शंकर महाराजजी यांचे विषयी चार शब्द लिहिणे हे माझे परम भाग्य समजतो. यद्यपि मला त्यांचे काही सुद्धा वर्णन करण्याचा माझ्यांत अधिकार नाही. जसे 'मज पामरासी काय थोरपण । पायीची वहाण पायी बरी ।।' असा असमर्थ असणारा मी एवढ्या मोठ्या महात्म्यांचे कार्य वर्णन करणार? तरीपण काही व्यक्तींनी मला सूचित केल्यामुळे मी थोडे लिहिण्याचे (महाराजांविषयी) धाडस करीत आहे. – अस्तु.

गुरुवर्य समर्थ श्री शंकर महाराज खरोखर दयावान, आशुषोष शंकराप्रमाणेच आहेत, यांत अतिशयोक्ती होणार नाही, अशी माझी खात्री आहे. महाराज अतिशय दयावंत आहेत. तुलसी वचनाप्रमाणे 'दया धर्म का मूल है।' महाराजांच्या

दयेने कितीतरी परिवार सुखी झाले. कित्येक लोकांचे कॅन्सरसारखे रोग दूर झाले. मला स्वत:ला अतिशय अमांष हा त्रास होता. तो महाराजांच्या दयादृष्टीने दूर झाला. दुसरे असे, अॅपेंडिक्सच्या माझ्या त्रासाचे त्यांचेच कृपेने ऑपरेशन सुखरूप झाले. 'हर्नियाचे' ऑपरेशन वेळी मला मी वाचेन अशी शक्यता नव्हती पण महाराजांच्या नावाचे स्मरणाने तेही दु:ख दूर झाले. हार्ट ऑपरेशन (एंजोप्लॅस्टी) त्यांच्याच स्मरणाने व्यवस्थित झाली. त्यातून मी वाचलो. या प्रमाणे हे माझे अनुभव जे आहे ते मी अनुभवून लिहीत आहे. माझ्या प्रपंच्याच्या आर्थिक दैन्यावस्थेला त्यांनी मला अमाप साह्य दिले त्यांचे ऋणातून मी ऋणमुक्त होऊ शकत नाही.

दुसरे असे, महाराज नेहमी परमार्थ विषयक मार्गदर्शन करतात मुमुक्षू अवस्थेपासून तर जीवन्मुक्त अवस्थेविषयी त्यांचे भक्तजनांना ते मार्गदर्शन करीत राहतात.

श्री ज्ञानेश उक्तीप्रमाणे श्रवणबोध देते वेळी ते श्रोत्यांना खऱ्या ब्राह्मी स्थितीचे श्रवणाद्वारे अवलोकन करण्याकरिता लावतात. महाराज म्हणजे मुमुक्षूच्या दृष्टीने तीर्थच आहेत की काय? असा श्रोत्यांना अनुभव येतो.

जयाचे नाव तीर्थरावो । दर्शने प्रशस्तीची ठावो ।
जयाचेनि संगे ब्रह्मभावो । भ्रांतासही ॥ ज्ञा. श्लो. ९ ओ. १०२ अ.६ वा.

वरील ओवीप्रमाणे श्रोत्यांना असे वाटते की महाराजांच्या आशीर्वादरूपी श्रवण सान्निध्यात असताना आपण खरोखरच कधी ना कधी आपण ब्रह्मरूप अशा सम–शीव–अद्वैत–व्यापक स्थितीला प्राप्त होऊ. याप्रमाणे महाराजांचे श्रोत्यांवर अनंत उपकार आहेत. माझ्यावर असणाऱ्या उपकाराची माझ्याने कोणत्याच जन्मात परतफेड होऊ शकत

नाही, असे अनंत उपकार आहेत. याप्रमाणे महाराजांचे अनेक दृष्टीने शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, तात्त्विक, आध्यात्मिक व व्यावहारिक चिंता दूर करण्याचे त्यांचे जीवनांत ते सतत–कार्यरत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

अशा महान व्यक्तिमत्त्व असणाऱ्या विभूतीचे कार्य सतत चालत असल्यामुळे त्यांचे शरीर चंदनाप्रमाणे ते झिजवीत आहेत.

भगवान श्री पंढरीनाथ त्यांच्या यशाची धवलकीर्ती पताका 'यावत्‌चंद्रदिवाकरौ' म्हणजे चंद्र–सूर्य असेपर्यंत त्यांचे यश कीर्तिमान होवो अशी ईश्वर चरणी सविनम्र विनंती सादर करीत ही लेखणी येथे थांबवितो.

'इति राम' संतचरणानुरज

*– सोपान कुचे*
*रुक्मिणीनगर अमरावती*

# शुभकामना

श्री संत शंकर महाराजांचे 'चरणामृत' संत सेवक श्री. बाबाराव गेडाम यांनी अनेक ठिकाणी संत, महाम्त्यांना व तसेच श्री संत शंकर बाबांच्या श्रीक्षेत्र पिंपळखुटा जन्मभूमीतील तसेच विदर्भ, पुणे, मुंबई येथील भक्त मंडळींना विचारून व आपल्या जीवभावना ओतून तयार केले आहे. शंकर बाबांचा ओवीबद्ध 'ज्ञानेश्वरी –ग्रामगीता' ग्रंथाप्रमाणे ग्रंथ असावा अशी संकल्पना पुणेकर भक्त मंडळींनी गेल्या चार–पाच वर्षांपासून माझ्याजवळ मांडली. परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे काही गोष्टी दुरापास्त, असे असतानाही प्रयत्न यशदायी ठरला आणि संत तुकाराम महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे –

'तुका म्हणे न, करावी तातडी । प्राप्त काळ घडी, आल्याविना ॥'

त्यानुसार वेळ येताच प्रस्तुत ग्रंथ निर्माण झाला. ग्रंथास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

*– श्री. रा. मो. बेलूरकर*
*आद्य ग्रामगीताचार्य*
*श्रीक्षेत्र वरखेड,*

# शुभकामना

श्री संत शंकराबाबा यांच्या चरणामृत या ग्रंथाविषयी मी दोन शब्द लिहावे असे आदणीय श्री. बाबाराव दादा गेडाम यांनी मला असा आग्रह केला. कारण तुम्ही लिहिलं तर मला समाधान वाटेल, असे ते म्हणाले, म्हणून मी हे दोन शब्द लिहीत आहे. श्री संत शंकर महाराज हे परमहंस लहानुजी महाराज यांचे कृपांकित आहेत. त्यामुळे त्यांचे भक्तमंडळीला अनुभव आहे. मला काही तेवढा अनुभव नाही, परंतु मला नेहमी रघुपतराव देशमुख हे लहानुजी महाराजांचे सेवक होते, त्यांना त्यांचा अनुभव आहे. लहानुजी महाराजांनी आमच्या समोर संत शंकर बाबाना प्रसाद दिला. ही घटना खोडकेदादा लहानुजी संस्थानचे अध्यक्ष हे मला नेहमी सांगत होते. त्यामुळे माझी श्रद्धा श्री संत शंकरबाबावर होती आणि श्री. गेडमदादांनी आपल्या मानवविकास ज्ञानसाधना आश्रममध्ये ग्रामगीतेचा व लीलामृत ग्रंथाचा सखोल अभ्यास केला. या ग्रंथामध्ये कोणतीही अंधश्रद्धा नसून श्री शंकरबाबांच्या भक्ताचे अनुभव त्यांनी गोळा करून खूप मेहनत घेतली आणि शंकर बाबांचे चरणामृत ग्रंथ सुंदर झाला. श्री संत शंकर बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी बाबा, संत सत्यदेव बाबा, लहानुजी बाबा यांच्या कृपेने आज ते सर्व जनतेची सेवा करीत आहेत म्हणून जनता त्यांच्या पाठीमागे आहे. मला काही प्रस्तावना देण्याची गरज नाही. संत शंकरबाबा लहानुजी बाबांचे प्रासादिक आहेत. परंतु प्रेमाच्या पोटी मी हे दोन शब्द लिहीत आहे. हा ग्रंथ सर्वांना प्रेरणादायी होवो, अशी मी गुरुप्रार्थना करतो.

---

आदरणीय गेडामदादाजी या हा ग्रंथ लिहिला हे फार मोठे काम केले. हे शिवधनुष्य पेलण्यासारखे काम गेडाम दादा यांनी केले त्यामुळे शंकरबाबा त्यांच्या पाठीशी आहे, हे निश्चितच. हा ग्रंथ सर्वांना प्रेरक ठरो, ही सदिच्छा!

*श्री. अत्रे महाराज*

# शुभकामना

व्यक्ती ज्या भावनेच्या योगाने परमेश्वराला शरण जाते, ती भावना म्हणजे भक्ती होय. श्रद्धेय बाबारावजी गेडामदादा 'प. पु. श्री संत शंकर महाराज चरणामृत ग्रंथ' हा लिहीत आहेत हे ऐकून आनंद झाला.

आदिनाथापासून उगम पावलेल्या संत गंगेच्या प्रवाहाचे दर्शन श्री संत शंकरबाबाचे दर्शन संत अच्युतबाबाच्यामुळे झाले. ही माझ्या जीवनातील परमेश्वराची असीम कृपा होय.

अमरावती जिल्ह्यातील माधानचे संत श्री गुलाबराव महाराज यांनी ''जे न दिसे न विकासे । तेजे करूनी कदा महारवीच्या ।। ते ब्रह्मच दाखविती । वंदु त्या मायबाई आरवीच्या ।।'' अशा सार्थ शब्दात उल्लेखलेले वर्धा जिल्ह्याचे आर्वी हे गाव. प. पू. शंकरबाबांचे गुरुपीठ. नाथ परंपरेतील वं. राष्ट्रसंतानी सुंदर वर्णन केले आहे. ''मायबाई का पूरा पसारा। एक पलक में आडकू तारा ।। जिसे जगविच नाम उधारा। खुला ब्रह्मनगर दरबारा । मुक्त होकर जगत् तरायी । धन्य आर्वी मी मायबाई ।।''

आर्वीच्या संत मायबाई संत आडकुजी महाराज वरखेड यांच्या गुरू. संत आडकुजी महाराज वं. संत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वं. संत लहानुजी महाराज, वं. संत सत्यदेवबाबा यांचे गुरू व लहानुजी महाराज, वं. सत्यदेवबाबा प. पु. संत शंकरबाबा यांचे गुरू.

प. पू. श्री संत शंकरबाबांचे श्री संत मायबाई देवस्थानमध्ये येथे चालणाऱ्या दैनिक उपासना व मंदिरी होणाऱ्या

वार्षिक उत्सवाकडे प्रेमपूर्व लक्ष असून येथे होणाऱ्या वार्षिक उत्सवामध्ये हजर असतात.

संतांनी आपल्या तपश्चर्येने व भक्तीने युगानुयुगे उभे करून ठेवले त्यामुळे संत परमेश्वरापेक्षाही श्रेष्ठ ठरतात. प. पू. शंकरबाबांनी विश्वमंदिर भक्तिधामची निर्मिती केली. आश्रम येथे अति भव्य प्रमाणात रामनवमी उत्सव, गुरू परंपरेतील संतांचे पुण्यतिथी उत्सव व प्रगट दिन उत्सव साजरे करण्यात येतात. श्री संत मायबाई पादुका पालखी ही श्री संत शंकर महाराज आश्रम पिंपळखुटा येथे जात असते. प. पू. बाबांनी 'ज्ञानामृत ज्ञानेश्वरी प्रसाद' ग्रंथाची निर्मिती केली असून इंटरनेटवर उपलब्ध आहे. प. पू. बाबांनी शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण क्षेत्रात आणून जनता जनार्दनास अर्पण केली.

आश्रमांतर्गत श्री संत शंकर महाराज विद्या मंदिर, कनिष्ठ महाविद्यालय, कला व वाणिज्य महाविद्यालय, श्री संत शंकर महाराज कृषी महाविद्यालय, मागासवर्गीय मुलामुलींचे वसतिगृह, गोशाळा, श्री संत बुधाजी महाराज ग्रामीण रुग्णालय पिंपळखुटा इ.ची स्थारपना केली.

प. पू. श्री संत शंकरबाबा महाराजांना दीर्घ आयुरारोग्य लाभावे, ही गुरुमाऊली समर्थ मायबाई चरणी प्रार्थना.

*– कृष्णा हनुमंतराव गिरधर (महाराज)*
*श्री संत मायबाई देवस्थान*
*आर्वी जि. वर्धा*

# शुभकामना

श्री संत परमहंस सद्‌गुरू शंकर बाबा हे आत्मसाक्षात्कारी जीवन्मुक्त महापुरुष आहेत. खरे तर संत हे संताला अथवा देवाला कळत असतात पण माझ्यासारख्या सामान्य बालकाला 'दर्शनी प्रशस्ती पुण्यपुरुष' या भगवान श्री ज्ञानेशोक्तीने बाबा जीवन्मुक्त महात्मा आहेत, हे अनुभवाला आले. तेव्हा अशा महापुरुषांची भेट व दर्शन जन्मोजन्मीच्या निष्काम पुण्याईने होत असते. पण ते पुण्यही माझ्याकडे नाही. भगवान श्री विश्वमाऊली व बाबांच्याच निर्निमित्त अहेतुकी परमकृपेनेच बाबांचे दर्शन झाले. दर्शन घडविण्याचे निमित्त मात्र माझे परमस्नेही गुरुबंधू बालमित्र विठ्ठल महाराज गव्हाणे, परम आदरणीय पितृवत् निष्काम प्रेमवर्षाव करणारे श्री. ह.भ.प. दादासाहेब चव्हाण, श्री. प्रेममूर्ती, सेवामूर्ती श्री. नंदूशेठ कोकरे व नंदूशेठ चव्हाण हे होत.

सद्‌गुरू श्री शंकर बाबांच्या ठिकाणी सर्व दैवी संपत्ती विश्रांतीला आली आहे. त्यांच्या रूपाने मूर्तिमंत तप, ज्ञान, वैराग्य, भक्ती, दया, क्षमा, शांती, समाज कल्याणाची तळमळ; आदि दैवी संपत्तीचे सद्‌गुण प्रगट झाले आहेत. नांदत आहेत. प्रथमदर्शनी हे महापुरुष आहेत अशी माझी प्रगाढ श्रद्धा बसली. पण प्रगटदिनानिमित्त जेव्हा बाबांचे समाजसेवाचे प्रवचन ऐकले. ते प्रवचन म्हणजे अनुभूतीने ओथंबलेले शब्दामृतच होते. मूर्तिमंत वेद, उपनिषद व माउलींचा अमृतानुभव मुखकमलातून बाहेर पडत होता. न्यायघटीत वेदान्त चिंतन लोकांना समजत जरी नसले तरी पण ते शब्द केवळ पांडित्यातूनच स्फुरण पावलेले नसून त्यामागे स्वात्मानुभव असलेले ते शब्द भक्तगणांच्या हृदयाचा ठाव घेत होते.

जिथे वास्तव निःस्पृहता, अमानित्व व केवळ लोककल्याणाची तीव्र इच्छा आहे, तिथेच खऱ्या अर्थाने सर्व भौतिक वैभव, लोकसंग्रह, विश्वमान्यता, पूज्यता व लोकोद्धार आहे.

जो आशेचा दास तो जगाचा दास व ज्यांची आशा दासी आहे सर्व जग त्याचा दास होते, हा सिद्धांत मला बाबांच्या ठिकाणी प्रगटरूपाने अनुभवाला आला.

शेवटी प्रभुचरणी एवढीच विनम्र प्रार्थना, करुणा मागतो की या जीवन्मुक्त महापुरुषाचा दर्शनाचा जो भोग झाला त्याचा क्षेम व्हावा. बाबांचे प्रेमरूपी कृपाधन अखंड पाठीशी असावे.

''या संताशी निरवी हेची मज देई ।
आणिक तुज काही न मागो देवा ।।''

*– माधव ठाकणे*
*श्रीक्षेत्र आळंदी*

# शुभकामना

परमहंस श्री समर्थ सद्गुरू लहानुजी महाराज, श्री क्षेत्र टाकरखेड ता आर्वी, जि. वर्धा यांच्या कुटीयात गुरुवार दिनांक १२.०४.२०१८ रोजी दुपारी १ वा गुरुबंधू संत श्री. शंकर महाराज, श्री क्षेत्र पिंपळखुटा, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती यांचे परमहंस संत श्री. शंकर महाराज चरित्रामृत ग्रंथाचे एकूण २१ अध्याय लिहिण्याचे काम श्री. बाबाराव गेडाम (संतदास), राळेगांव, जि. यवतमाळ यांनी पूर्ण केल्याचे सांगितले.

या ग्रंथातील प्रथम अध्यायाचे वाचन कुटीयात करण्यात आले. त्या वेळी श्री. बाळासाहेब पावडे, अध्यक्ष, परमहंस श्री समर्थ सद्गुरू लहानुजी महाराज संस्थान टाकरदवडे यांचे बंधू श्री. अशोकराव पावडे आर्वी, श्री बाबादावजी शंकर पुजारी टाकरखेड, श्री. प्रभाकरराव देशमुख सचिव, श्री समर्थ अंबादास महाराज आश्रम, श्री क्षेत्र कान्होली ता. दर्यापूर, जि. अमरावती, श्री. नंदूशेठ कोकरे पुणे व विविध भक्तगण उपस्थित होते. या ग्रंथाचे अवलोकन केले असता आदिनाथापासून आजपर्यंतचे गुरू मालिकेचे गुरू परंपरेचे सुंदर वर्णन केलेले आहे.

संत कृपेनेच ग्रंथ लिखाण शक्य आहे. हे सर्व कार्य परमहंस श्री समर्थ सद्गुरू लहानुजी महाराज घडवून घेतात. कार्य करणारे निमित्त आहेत. हाच गीतासार भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला जनकल्याणासाठी सांगितला.

या ग्रंथास हार्दिक शुभेच्छा! श्री सद्गुरूनाथ महाराज की जय

*– श्री संत अंबादास महाराज*

*श्री क्षेत्र कानोली*

# शुभकामना

आपण साहित्य क्षेत्रात फार पूर्वीच पदापर्ण केले आहे. परमहंस श्रीसंत शंकर महाराज आश्रम पिंपळखुटा ता. धामणगाव, जि. अमरावती या परमपवित्र आश्रमाचे संस्थापक व नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे उपासक सिद्ध पुरुष शिरीवरदाई परमेश्वरस्वरूप श्री संत शंकर महाराज, यांचे चरित्र लीलामृत, ओवीबद्ध ग्रंथ रूपात लिहिले आहे, त्याचा प्रथम अध्याय, प्रकाशनापूर्वी मी, श्री क्षेत्र वरखेडल माझे निवासस्थानी श्रीमान नंदूशेठ कोकरेदादा, पुणे यांचे समक्ष वाचला. आपल्या ओवीबद्ध लिखाणावर 'ग्रामगीता या वंदनीय राष्ट्रसंत लिखित ग्रंथाचा खूप प्रभाव मला जाणवला.

आपण श्री संत शंकर बाबा यांचे 'वास्तववादी जीवन लीलामृतात घेतले. याचा मला अनुभव आला. आपणास त्यांचेच आशीर्वाद आहेत. त्यांच्याच कृपेने आपण हे महान कार्य करीत आहात, याचाही अनुभव आला. श्री सद्‌गुरू आडकुजी महाराज संस्थान श्री क्षेत्र वरखेडच्या विश्वस्त मंडळाचा मी एक विश्वस्त म्हणून आपणास या लिखाणाबद्दल धन्यवाद देतो व संस्थान सचिव सौ. शोभा विजय देशमुख यांच्याही शुभेच्छा त्यांनी येथेच समक्ष दिल्याने त्यांचीही स्वाक्षरी घेऊन हे मनोगत संपवितो, धन्यवाद!

*विजय रा. देशमुख*

*– सौ. शोभा वि. देशमुख*

*परमहंस श्री सद्‌गुरू आडकुजी महाराज संस्थान*

# अभिप्राय

इ. स. १९९० च्या दशकात कॅप्टन दळवी साहेब व त्यांचं कालावधीत अमरावतीचे आर.टी.ओ.चे अधिकारी श्री. विकास पांडकर हे त्यांच्या पूर्व संचितानुसार श्री संत शंकर महाराजांच्या आश्रमात आले. महाराजांशी जसा काही जन्मोजन्मीचा संबंध असावा असेच ते होते. मग हे लोक म्हणजे कॅप्टन दळवी वगैरे एस.आर.पी. एका तुकडीचे प्रमुख होते. ते अमरावतीच्या विभागात होते. जवळच असल्यामुळे त्यांचं येणं जाणं नित्य झालं. प्रसंगी त्यांनी आश्रमातल्या जागेच्या काही समाजकंटकांनी केलेल्या अतिक्रमणाच्या प्रसंगी प्रशासकीय मदत करून त्यात सहकार्य केलं. पुढे दळवी साहेबांच्या मुलीच्या विवाहप्रसंगी त्यांनी श्री गुरू शंकर बाबांना निमंत्रित करून पुण्याला बोलावलं आणि योगायोगाने श्री. शंकरराव जाधव, श्री. नंदूशेठ कोकरे यांना महाराजांचा दर्शनलाभ झाला. त्यांच्याकडून पुण्यातील श्री. नंदूशेठ चव्हाण यांना गुरुदेवांबद्दल कळलं आणि पाहता पाहता पुण्यातील श्रद्धावान मंडळी गुरुदेवांच्या चरणी समर्पित झाली. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात सहकार्य झालं आणि आश्रमाची भरभराट होऊ लागली. साधारण इ. स. २०१५ पर्यंत आश्रमाच्या पिंपळखुट्या व्यतिरिक्त पुणे येथे श्री संत शंकर महाराज आश्रमाची उभारणी झाली. पुण्यातील भक्तमंडळींनी पुण्यात नऱ्हे गावच्या हद्दीत सुंदर आश्रम उभा केला. यानंतर पंढरपूर व भंडारा जिल्ह्यात सावरी (जवाहरनगर) येथेही आश्रम उभा राहिला. पिंपळखुटा आश्रमात गोशाळा, मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, हायस्कूल, कला व वाणिज्य विद्यालये सुरू झाली. तदनंतर श्री संत शंकर महाराज कृषी महाविद्यालयाची

स्थापना झाली. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरूनही येथे विद्यार्थी येऊ लागले. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था असल्याने सर्व काही व्यवस्थित चालले होते आणि नियतीचं एक भयानक वादळ आश्रमावरून वाहू लागलं. अचानक एके दिवशी इ. स. २०.... च्या ...... महिन्यात..... तारखेला रविवारी सकाळी एक भयंकर घटना घडली. कृषी महाविद्यालयातील मेसमध्ये काम करणाऱ्या मराठे नावाच्या स्वयंपाक्याने त्याच्या दोन साथीदारांना घेऊन वसतिगृहातील दहा–बारा वर्षे वयाच्या एका निरपराध अशा प्रथमेश नावाच्या मुलाला जीवे मारण्याचा विकृत असा खेळ खेळला. कुठल्यातरी तांत्रिक पुस्तकातून त्याने हे कृत्य केलं. सूर्योदयाचे वेळी बारा वर्षापर्यंतच्या मुलाचा गळा चिरून त्याच्या रक्ताने हात माखले की अलौकिक शक्ती प्राप्त होते असं काही वाचन करून त्या नराधमाने रविवारच्या सकाळी सुट्टीच्या दिवशी हे कोवळं सावज हेरलं. आईचा फोन आहे असं आमिष दाखवून त्या लहान लेकराला शाळेच्या नवीन बांधकामाच्या दुसऱ्या मजल्यावर नेलं. दोघांनी त्या लहानग्याला घट्ट पकडून नराधम मराठेने त्या बाळाचा गळा कापला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. रक्ताने हात माखून रक्ताच्या चिळकांड्या आपल्या अंगावर येऊ नयेत म्हणून स्वत:च्या खिशातील रुमालाने त्याचा गळा बांधला आणि प्रथमेशला तडफडत टाकून हे पळाले. पण सुदैवाने आश्रमाच्या गोशाळेतील एका गुराख्याने यांना पळताना पाहिले. ईश्वरकृपेने गळा बांधल्यानंतर हे पराधम पळाले तेव्हा प्रथमेश कसाबसा चालत इमारतीच्या जिन्यावरून खाली आला आणि शाळेसमोरच कोसळला. इतर मुलांनी हे पाहून वसतिगृहाच्या प्रमुखांना कळवलं. लगेचच ताबडतोब मुलाला अमरावतीच्या सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. त्यानंतर प्राथमिक उपचार करून नागपूरला चांगल्या हॉस्पिटलमध्ये मुलावर उपचार केला गेला. आश्रमात हे घडलेलं समजलं तेव्हा लगेचच शंकर बाबांना, कळविण्यात आलं होतं. त्यांनी खात्रीने सांगितलं की काळजी करू

नका, ईश्वर कृपेने मुलगा सुखरूप राहील, दवाखान्यात घेऊन जा. नागपुरापर्यंत जाईपर्यंतच्या गोंधळात वसतिगृह प्रमुखाकडून परिसरातील पोलीस स्टेशनला कळवायचं राहून गेलं. त्याला बराच उशीर झाला आणि नेहमीप्रमाणे पोलिसांनी या गोष्टीला आश्रमातील माणसेच जबाबदार आहेत असं म्हणत वसतिगृह अधीक्षक व इतर कर्मचाऱ्यांना पोलीस कोठडी दाखवून बेदम मारहाण केली. आरोपी खुलेआम आश्रमात फिरत होते. नागपूरचे काही भक्त अशा प्रसंगामुळे आश्रमात पोचले. राजू भोगे व सौ. जावकर ताई याप्रसंगी आश्रमात पोहचल्या. त्यांनी बारीक शोध घेऊन सर्वांची चौकशी केली तेव्हा गोशाळेच्या गुराख्याकडून महत्त्वाचा धागा मिळविला आणि चार दिवसांनंतर खरे आरोपी आश्रमातच आहेत असं मंगरूळ पोलीस स्टेशनला कळविलं. तेथील प्रमुख शेळके साहेब तपास करत होते. उशिरा घटनेची माहिती दिल्याने आणि काही विरोधक वृत्तीच्या लोकांनी बेनामी फोन करून आश्रमावरच कारवाई करा म्हणून सांगितल्याने शेळके साहेबांनी मूर्खपणा करून आरोपींना तासाभरात सोडून दिलं. यानंतर घटनेला वेगळं स्वरूप आलं. आश्रमातील काही पदाधिकारी किंवा विश्वस्तांच्या थोड्याशा चुकीच्या निर्णयामुळे किंवा चुकीच्या नियोजनामुळे घटनेत आणखी भर पडली आणि याचाच गैरफायदा घेऊन लोकमत पेपरचे अमरावती विभागाचे जबाबदार पत्रकार गणेश देशमुख या हलकटाने लोकमत पेपरमध्ये 'शंकर महाराजांनी आश्रमात नरबळी देण्याचा प्रयत्न केला' अशा खोट्या बातम्या छापायला सुरुवात केली. पाहता पाहता महाराष्ट्रभर वार्ता पसरली. गणेश देशमुखला काही भक्तांनी विनंती केली. पण तो हट्टाने अजून विक्षिप्तपणे शंकर महाराजांच्या विरोधात बातम्या छापू लागला. या परिस्थितीत अत्यंत शांतपणे आश्रमाचे विश्वस्त श्री. राजेश मिंडे (ॲडव्होकेट) यांनी अमरावती विभागाचे पोलीस खात्याचे प्रमुख यांची भेट घेऊन सविस्तर माहिती दिली आणि योग्य तपास करून मोकाट आरोपींना लवकर जेरबंद

करावे अशी विनंती केली. वरिष्ठ आधिकारी लोकांनी यावर गंभीर दखल घेऊन डी.वाय.एस.पी. घाडगे साहेबांना पुन्हा तपास करण्याचे आदेश दिले. दोन दिवसांच्या तपासात मूळ आरोपी मराठे व त्याचे दोन साथीदार पोलिसांच्या ताब्यात आले. त्यांच्यावर पंचनामा व गुन्हा दाखल झाला. मात्र यानंतर सतत चार महिने गणेश देशमुख (लोकमत पेपर) महाराजांच्या विरोधात बातम्या देत राहिला. त्याचा उद्देश आश्रमास ब्लॅकमेल करून लाखो रुपये उकळायचे होते. काही भक्तांकडे त्याने सत्तर लाखांची मागणी केल्याचे निष्पन्न झालं. केवळ पैशासाठी या हलकट वार्ताहराने एका तपस्वी महात्म्याची बदनामी करण्याचा भयंकर खटाटोप केला, पण त्याला त्यात यश आलेच नाही. मात्र एका संत महात्म्याला कलंक लावला गेला. त्यातच भर म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्या काही तथाकथित समाजकंटकांनी चुकीचे अंदाज लावले. श्याम मानवसारखेही स्वत:चं महत्त्व सिद्ध करण्यासाठी महाराजांनी लिहिलेल्या 'अनुभव ब्रह्म' ग्रंथावर टीका करू लागले. सनातन धर्माच्या अद्वैत ज्ञानाचा वारसा असलेला हा ध्यान साधनेवर आधारित ग्रंथ वाचकांनी जरूर वाचावा म्हणजे श्याम मानव म्हणजे अगदी आदिमानवंच आहे, हे सिद्ध होईल. पुढे प्रथमेशची प्रकृती चांगली झाली. पुढे प्रथमेशला बोलताही येऊ लागलं. या प्रसंगामुळे केवळ काही समाजकंटकांनी श्री संत शंकर बाबांना विनाकारण बदनाम करण्याच प्रयत्न केला. मात्र संत सूर्यासारखे असतात. मूर्खांच्या धूळफेकीने त्यांना झाकता येत नाही. अशा संत पुरुषाचं कार्य श्री बाबाराव गेडाम ऊर्फ संतदास यांनी अनेक दिवसांच्या परिश्रमातून लेखणीबद्ध केलेलं आहे. अनेक भक्तांचे अनुभव आणि गुरुदेवांचे अवतार चरित्र वाचकांपर्यंत पोचण्याचं मोठं कार्य झालेलं आहे. मी देवेंद्र वाल्हेकर श्री. गेडाम यांच्या या कार्यासाठी त्यांना अनेक अनेक शुभेच्छा आणि धन्यवाद देतो.

*– श्री. देवेंद्र वाल्हेकर*

# शुभकामना


संताची, सद्‌गुरूची संगत करावी व निष्काम भक्तीने त्यांची सेवा करावी. मनुष्याचे प्रारब्ध चांगल असेल तरच संतांचा, सद्‌गुरूंच्या दर्शनाचा योग येतो.

गेल्या ३० वर्षापासून मी सद्‌गुरू श्री संत शंकर बाबांच्या सहवासात आहे. जीवनाचे कल्याण झाले असे मला वाटते. लोखंडाचे सोने बनविण्याची ताकद फक्त संत महापुरुषांमध्येच असते, असा दृढविश्वास निर्माण झाला. आजच्या परिस्थितीमध्ये सद्‌गुरू श्री संत शंकर बाबांचा फार मोठा अधिकार आहे. अशा सिद्ध संताचे जीवनचरित्र लोकांमध्ये जावे, जेणे करून अखिल मानव समाजाला एक वेगळी दिशा मिळेल, यात संशय नाही. कारण संत हे जगाच्या कल्याणाकरिता अवतरित होत असतात. श्री. बाबाराव गेडाम (संतदास) यांनी सद्‌गुरू श्रीसंत शंकर महाराज यांच्या जीवनावर आधारित 'चरणामृत' हा एकतीस अध्यायांचा ग्रंथ लिहिला. हे त्यांनी अतिशय मोलाचे काम केले. सर्वसामान्य वाचकांना समजणारी साधी-सोपी भाषा, ओव्यांची उत्कृष्ट मांडणी, त्यातही प्रत्येक अध्यायात कमीत कमी ओवी संख्या यामुळे वाचकाला देखील वाचताना कंटाळा येणार नाही. अशा प्रकारे सर्व प्रकारे ध्यान देऊन त्यांनी ह्या ग्रंथाची निर्मिती केली, ते धन्यवादास पात्र आहेत. वाचकांनासुद्धा ग्रंथ नक्कीच आवडेल, यात शंका नाही.

शेवटी प्रस्तुत ग्रंथास माझ्या हार्दिक शुभकामना.

*बाबू नामदेवराव कुंभारे*
*अमरावती*

# लेखकाचे मनोगत


बाबाराव गेडाम (संतदास)

स्व. ग्रामगीताचार्य श्री. रामकृष्ण दादा बेलरकर तसेच स्व. ग्रामगीतादास आचार्य अत्रे महाराज यांच्या आशीर्वादाने मला परमहंस श्री संत शंकर महाराज श्री क्षेत्र पिंपळखुटा यांचा ओवीबद्ध चरित्र ग्रंथ लिहिण्याची सुवर्ण संधी मिळाली. एरवी मला कोण विचारतो. याचे मूळ कारण माझा परखड स्वभाव, दुसर माझ्या भोवती कोणतेही राजकीय किंवा विद्वान मंडळींचे वलय नाही. स्वार्थासाठी स्वत:चा स्वाभिमान गहाण ठेवणे मला मुळीच आवडत नाही. या ग्रंथाचे लेखन ग्रामगीताचार्य श्री. बेलूरकर दादांनी करावे अशा प्रकारचे सुरवातीला प्रयत्न झाले. परंतु त्या वेळी बेलूरकर दादा वयोमानामुळे लिहिण्याच्या अवस्थेमध्ये नव्हते. त्यांनी या कार्याकरिता पिंपळखुटा येथील प्रमुख भक्तांना माझ नाव सुचवले. त्याप्रमाणे हे कार्य माझ्याकडे आले. अल्पकाळ का होईना स्व. बेलूरकर दादा व स्व. अत्रे महाराज ह्या दोघांचाही मला सहवास लाभला. त्यामुळे मी ओवीबद्ध ग्रंथ निश्चितच लिहू शकतो, हा माझ्याविषयी त्यांना विश्वास होता. याच कारणामुळे त्यांनी माझे नाव सुचवले. यात शंका नाही. काही लोकांकडून माझी अवहेलनाही झाली. चांगले कार्य करताना त्रास होतो हे मला पूर्वीच माहीत होते. त्यामुळे मी त्याकडे दुर्लक्ष करून

पुढे वाटचाल करीत होतो. हेच क्षुल्लक कारण पुढे सदरहू ग्रंथाच्या विलंबनास महाकारण ठरले. तब्बल १३ वर्षे या ग्रंथाच्या प्रकाशनास लागले. अनेक वेळा तडजोड करावी लागली. त्यामध्ये बराच वेळ निरर्थक वाया गेला.

ज्याप्रमाणे माउली ज्ञानेश्वर महराजांनी रेड्याच्या मुखाद्वारे वेद वदवून घेतले नेमका तोच चमत्कार परमहंस संत शंकर बाबांनी प्रत्यक्ष घडवून आणला. माझ्यासारख्या क्षुल्लक लेखकाकडून त्यांचा ओवीबद्ध चरित्रग्रंथ लिहून घेतला. 'कुछ नही मेरा, सब कुछ तेरा' ह्या वचनानुसार परमहंस श्री संत शंकर बाबाच हे अवघड कार्य माझ्याकडून करून घेत आहेत, मी निमित्तमात्र आहे. मी केल्याचा स्पर्शही मनाच्या आत शिरू दिला नाही. खरे तर लोखंडालाही सुवर्ण बनविण्याचा अधिकार संताच्या ठायी असतो. हे परमहंस श्री संत शंकर महाराजांनी सिद्ध करून दाखवले यात तिळमात्रही शंका नाही.

नेमका हाच विचार डोक्यात घेऊन ह्या ग्रंथातील प्रत्येक अध्यायात एकशे तेरा ओव्या लिहिण्याचा निश्चय केला. प्रस्तुत ग्रंथामध्ये एकूण एकतीस अध्याय आहेत. एकतीस या अंकाला उलटे केल्यास तेरा हा अंक बनतो. संपूर्ण अध्यायाची एकूण ओवीसंख्या तीन हजार पाचशे पाच ह्या चारही अंकाची सरळ अथवा उलट बेरीज तेराच होते. ग्रंथ लिहून पूर्ण करण्याकरिता व त्याच्या प्रकाशनालाही तेराच वर्ष लागली. आणि योगायोग असा की, प्रस्तुत ग्रंथाच्या अध्यायाची पृष्ठसंख्यासुद्धा ३८२ झाली. याची बेरीजसुद्धा तेराच येते. थोडक्यात तेरा ह्या अंकाचे मर्म व तेरा हा अंक मी का निवडला हे आपणास निश्चितच कळेल. सारांश कुछ नही मेरा, सबकुछ तेरा...

विशेष म्हणजे प्रस्तुत ग्रंथ वाचकाला त्यांच्या दैनंदिन वाचनाकरिता सुलभ व्हावे ह्याकरिता ग्रंथाच्या अध्यायात कमीत कमी ओवीसंख्या असावी हा उद्देश ध्यानात घेऊन ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायात समान ओवीसंख्या घेण्यात

आल्या, हे विशेष. पर्यायाने पारायण कर्त्यांनासुद्धा याचा निश्चितच लाभ होईल, यात शंका नाही. प्रस्तुत ग्रंथाची शब्दरचना कनिष्ठ असू शकते, परंतु ती क्लिष्ट मात्र नाही, हे वाचकांना आवर्जून सांगावेसे वाटते. प्रत्येक ओवीच्या यमकाकडे विशेष लक्ष दिल गेले. कारण...

मी ग्रंथकर्ता नव्हे विद्वान । मुळातची अल्पज्ञ मतिहीन ।
परी याची असोनी जाण । प्रयत्न केला साहसे ॥

आज सध्याच्या परिस्थितीमध्ये विद्वानाच्या हातून घडलेली चूक, चूक समजली जात नाही. लोक सहजपणे त्या विद्वान व्यक्तीला माफ करतात. त्याला लोकांची माफी मागण्याची आवश्यकता पडत नाही. सर्वसाधारण माणसाचे तसे नाही, याउलट त्याची टिंगल उडवली जाते. जे मी अनुभवले ते परखडपणे आपल्यासमोर व्यक्त केले. त्यामुळे अतिशय काळजीपूर्वक मी या ग्रंथाचे लेखन केले. काही त्रुटी निश्चित असतीलच. त्या सर्व त्रुटी माझ्या मला परत कराव्या. प्रस्तुत ग्रंथाचे 'चरणामृत' हे नामकरण माझे गुरुवर्य, मार्गदर्शक स्व. रामकृष्ण दादा अत्रे महाराज यांनी केले. ह्या ग्रंथाच्या चरित्र नायकाला साजेल असे ह्या ग्रंथाच नाव आहे, यात मुळीच शंका नाही.

प्रस्तुत ग्रंथाचे संपूर्ण एकवीसही अध्याय छपाईला देण्यापूर्वी ते सर्व अध्याय सुंदर अक्षरामध्ये लिहिण्यासाठी माझी कन्या कु. वर्षा गेडाम, एम.ए., पीएच.डी. हिने मला भरपूर मदत केली. तिचे या ठिकाणी आभार व्यक्त करणे अयोग्य होणार नाही. परमहंस श्री संत शंकर महाराज यांच्या जीवनावर आधारित ओवीबद्ध ग्रंथ निर्माण व्हावा अशा प्रकारची ज्यांना अंत:करणापासून तलमळ होती असे पुण्याचे बाबांचे परमभक्त सर्वश्री नंदूशेठ चव्हाण, मिंडे साहेब, संतोष भाऊ

पोकळे, पांडकर साहेब, वाल्हेकर साहेब, नंदूसेठ कोकरे तसेच बराटे साहेब, विदर्भातले बाबांचे परमभक्त, सर्वश्री गोपालसेठ अटारा, वासुदेवराव देशमुख तसेच राजू भाऊ भोगे इत्यादी सर्व मान्यवर भक्तांनी प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीकरिता आपले भरपूर योगदान दिले. त्या सर्व मान्यवर भक्तांचे मी याठिकाणी मन:पूर्वक आभार मानतो. प्रस्तुत ग्रंथाच्या छपाईकरिता लागणारा संपूर्ण खर्च पुण्याचे बाबांचे परभक्त दानशूर श्री. नंदूसेठ चव्हाण यांनी केला. त्यांचे या ठिकाणी पुनश्च आभार व्यक्त करतो.

बाबांच्या या भक्तांनी प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीकरिता मला साहित्य पुरविले तसेच ज्यांनी ह्या ग्रंथाला आपल्या प्रस्तावना, शुभेच्छा दिल्या त्या सर्वांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो. प्रस्तुत ग्रंथाच्या छपाईची संपूर्ण जबाबदारी पुणे येथील बाबाचे परमभक्त तसेच समाजसेवक आदरणीय श्री. मंदार शहाणे यांनी यशस्वीपणे पार पाडली. सौ. चेतना वडके पुणे यांनी ग्रंथाचे उत्कृष्ठ मुद्रण केले, तसेच या ग्रंथाचे मुद्रितशोधन, व्याकरण श्री. विजय जोशी यांनी केले, या सर्वांचे मी या ठिकाणी आभार व्यक्त करतो. शेवटी इथेच मी माझ्या मनोगताच्या शब्दाला पूर्ण विराम देतो.

या चरित्र ग्रंथाचा करिता अभ्यास । माणूसपण येईल अंगास ।
याची ग्वाही देतो संतदास । वाचक मित्रहो आपणास ।।

*– लेखक*

*बाबाराव गेडाम (संतदास)*

*राळेगाव*

# आभार

श्री क्षेत्र पिंपळखुटा, ता. धामणगाव, जि. अमरावती (विदर्भ) येथील परमहंस संत श्री शंकर महाराज यांच्या जीवनावर आधारित 'चरणामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ भक्तांच्या हातामध्ये पडला. अतिशय आनंद झाला. श्री संत शंकर महाराज हे अधिकारसंपन्न संत आहेत. त्यांचे जीवनचरित्र जनतेमध्ये पोचविण्याची आज नितांत गरज होती. हे अपूर्ण कार्य बाबांच्या आशीर्वादाने आज पूर्ण झाले. ग्रंथाचे लेखक श्री. बाबाराव गेडाम (संतदास) यांनी अतिशय परिश्रम घेऊन ते लिहून काढले. सर्वप्रथम मी त्यांचे मनापासून आभार मानतो. बाबांचे परमभक्त श्री. नंदूसेठ चव्हाण, पुणे यांनी या ग्रंथाच्या छपाईकरिता लागणारा संपूर्ण खर्च केला. त्यांचेही याठिकाणी आभार व्यक्त करणे आवश्यक आहे. तसेच लेखकाच्या मानधनासाठी ज्यांनी ज्यांनी आर्थिक सहकार्य केले त्या सर्वांचे सुद्धा मी याठिकाणी आभार मानतो.

पुणे येथील श्री. मंदार शहाणे, सौ. चेतना वडके, श्री. विजय जोशी, प्रिंटिंग प्रेसचे सर्व सहकारी यांनी अतिशय परिश्रम घेऊन प्रस्तुत ग्रंथाचे निर्माण कार्य केले त्यांचेही याठिकाणी कौतुक करणे तेवढेच गरजेचे आहे, असे मी समजतो.

अंधेरा है वहाँ जहाँ आदित्य नही । मुर्दा घर है वह, जहाँ संतसाहित्य नही ॥

*आपलाच स्नेही,*
*नंदूसेठ कोकरे, पुणे*

---

# अनुक्रम


अध्याय पहिला ............................ १-१३

अध्याय दुसरा .......................... १४-२५

अध्याय तिसरा .......................... २६-३७

अध्याय चौथा .......................... ३८-४९

अध्याय पाचवा ......................... ५०-६१

अध्याय सहावा.......................... ६२-७३

अध्याय सातवा ......................... ७४-८५

अध्याय आठवा ......................... ८६-९७

अध्याय नववा.......................... ९८-१०९

अध्याय दहावा ...................... ११०-१२१

अध्याय अकरावा .................. १२२-१३३

अध्याय बारावा ..................... १३४-१४६

अध्याय तेरावा ...................... १४७-१५८

अध्याय चौदावा .................... १५९-१७०

अध्याय पंधरावा ..................... १७१-१८२
अध्याय सोळावा ................... १८३-१९५
अध्याय सतरावा ..................... १९६-२०८
अध्याय आठरावा ................... २०९-२२०
अध्याय एकोणीस .................. २२१-२३२
अध्याय विसावा ..................... २३३-२४४
अध्याय एकविसावा ................ २४५-२५७
अध्याय बाविसावा ................. २५८-२७०
अध्याय तेविसावा .................. २७१-२८२
अध्याय चोविसावा ................. २८३-२९५
अध्याय पंचविसावा ................ २९६-३०७
अध्याय सव्विसावा ................ ३०८-३१९
अध्याय सत्ताविसावा .............. ३२०-३३१
अध्याय अठ्ठाविसावा ............... ३३२-३४३
अध्याय एकोणतिसावा ............ ३४४-३५६
अध्याय तिसावा .................... ३५७-३६९
अध्याय एकतिसावा ................ ३७०-३८२
आरती ................................. ३८३-३८४

# अध्याय पहिला

॥ श्री गुरुदेवाय नम:॥

ओम नमोजी विश्वचालका । सकल ब्रह्मांड नायका । रिद्धी, सिद्धी, बुद्धी दायका । सत्यस्वरूपा दयाघना॥१॥ चैतन्यस्वरूपा परमानंदा । पूर्णकलात्मक आत्मचंद्रा । ज्योती स्वरूपा ज्ञानसमुद्रा । सर्वज्ञा आदिपुरुषा॥२॥ देवाधिदेवा श्री गुरुदेवा । कृपासिंधू दीनदयाळा । निजभक्तांचा जिव्हाळा । तुझ्या ठायी॥३॥ तू अक्षय अविनाशी । भवतारक विघ्नविनाशी । करुणाकर वैकुंठनिवासी । दयासागरा विश्वंभरा॥४॥ अवघे व्यापुनी चराचर । भरोनी उरला महिवर । ऐसा तू व्यापक सर्वेश्वर । एकची या जगी॥५॥ निर्गुण निराकार ब्रह्मस्वरूपा । सकल विश्व मायबापा । अखंड प्रेम-शांती रूपा । सत्यज्ञानानंद निष्कामा॥६॥ तू या विश्वाचा आधार । म्हणती तुजला धराधर । अणूरेणूतही तुझाची संचार । अदृश्यरूपा अनंता॥७॥ तू या विश्वाचे

अधिष्ठान । तूची केले विश्वनिर्माण । ब्रह्मा-विष्णू-शिव-त्रिगुण । दाखवी निमित्तासी॥८॥ तू या विश्वाचा सूत्रधार । तुझा न कळे अंतपार । वेदही वदे सत्वर । नेती नेती म्हणून ...॥९॥ जगत्पती जगदीश्वरा । पुरुषोत्तमा हरिहरा । पतित पावन श्री गुरुवरा । स्वर्ग मुनिंद्रा कल्पवृक्षा॥१०॥ जगत्जीवना राधारमणा । सीतापती रघुनंदना । संकटमोचना नारायणा । सद्गुरुनाथा अनंता॥११॥ जरी तुझे नाव अनेक । परी तू आहेस एक । जल, नीर, उदक । भिन्न नव्हे पाहता॥१२॥ नदी, नहर, विहीर । गंगा, सिंधू, सरोवर । अथवा असो महासागर । एकची रूप तुझे॥१३॥ आता दोन्ही कर जोडून । मी नमितो तुजलागून । आशीर्वाद द्यावा मनोमन । ग्रंथ लिहावयास॥१४॥ मी अज्ञानी हीन दीन । ग्रंथकर्ता नव्हे विद्वान । परी अल्पसा केला प्रयत्न । आपल्यापरीने॥१५॥ अनेक साधूसंत बोलले । ते मी श्रवणी ऐकले । साध्या भोळ्यासही तू उद्धरले । आपला समजून॥१६॥ तुझ्या ठायी नाही भेद । तुझ्या ठायी नाही क्रोध । ऐसा तू आहेस स्वयम सिद्ध । निर्विकारी निर्विकल्प॥१७॥ जनीसवे दळिले

दळण । केली सावताच्या मळ्याची राखण । माती तुडविली आनंदानं । संत गोरोबासवे।।१८।। संत चोखोबा बरोबर । ओढली मृत जनावर । हे मी ऐकले वारंवार । तुझ्या नामसंकीर्तनात।।१९।। कबिराचे विणले शेले । तुकोबाचे अभंग रक्षिले । पुंडलिकासाठी स्वयंम् अवतरले । चंद्रभागेच्या तीरावर।।२०।। नामदेवाचा पुरविला हेत । नैवेद्य सेविला साक्षात । उल्हासे नाचला कीर्तनात । भक्तप्रेमा खातिर।।२१।। भक्त मीराबाईच्या संकटात । धावुनी आला तू त्वरित । केले द्रौपदीला भयमुक्त । आपल्या लीलाप्रतापे।।२२।। अहिल्येचा केला उद्धार । भक्त प्रल्हाद जाहला थोर । ध्रुवबाळा देऊनि अभयवर । अढळपदा बैसविले।।२३।। शबरीला दर्शन देऊन । तिजसी केले पावन । ऐसे कित्येक भक्त महान । जाहले या जगी।।२४।। तुझ्या कीर्तिचे करिता गुणगान । वेदानेही पाळले मौन । तेथे मी अज्ञानी मतिहीन । व्यर्थची जाणा।।२५।। आता वंदितो संत सज्जन । तयांनी आळविला जनी जनार्दन । लोकांस दाखविला सन्मार्ग पूर्ण । सद्भक्त बनावया।।२६।। संस्कृताचे करुनी प्राकृत । ग्रंथ दिले बहुजनाच्या

हातात । ते ज्ञानराज संतमालिकेत । आहेत अग्रस्थानी।।२७।। साहिले असंख्य अन्याय । वाढविला वारकरी संप्रदाय । समाज घडविला विठ्ठलमय । धन्य उपकार तयाचे।।२८।। वेदशास्त्राचे उच्चारण । करू नये बहुजनानं । यापरी होते बंधन । त्या काळात।।२९।। ते अनिष्ट बंधन । तोडले बघा ज्ञानदेवानं । क्रांती केली चहुबाजून । धार्मिक क्षेत्रात।।३०।। पवित्र ज्ञानगंगा प्रवाही । गोठली होती एकाठायी । वाट केली सुखदायी । सर्व सामान्यांसाठी।।३१।। विदर्भात क्षेत्र आर्वी । तिथे जाहली संत मायबाई । सर्व संतांची ती आई । यापरी ख्याती तिची।।३२।। थोर तिचा अधिकार । वेदशास्त्रांचे अक्षर । सदा नांदे जिव्हेवर । अहोरात्र तियेच्या।।३३।। रिद्धी, सिद्धी दासी होऊन । चरणी घालती लोटांगण । लोक देती मानसन्मान । आपल्यापरी श्रद्धेने।।३४।। अनेकासी संस्कार देऊन । उद्धरले तयांचे जीवन । कोणास देऊनी अभयदान । बैसविले निवांत।।३५।। तिचे अनंत उपकार । आहेत या जगावर । जीव जरी अर्पिला पायावर । तरी ते फिटेना।।३६।। संत आडकुजी वरखेडचे । परम्‌शिष्य ते मायबाईचे । साक्षात

अवतार श्रीगणेशाचे । जाहले या भूमीवर।।३७।। वं. राष्ट्रसंत तुकडोजीनं । आपल्या बहुत भजनांमधून । केला उल्लेख आवर्जून । या विषयाचा।।३८।। दिसे बाहेरी पिसेपणा । परी अंतरी शहाणा । अनुभव दाखविले भक्तांना । नानापरी।।३९।। तयाचे केल्यासी वर्णन । ग्रंथांचे होईल विस्तारण । संत आडकुजी म्हणजे दिव्यखाण । ज्ञानरूपी रत्नाची।।४०।। ते रत्न गवसले मायबाईस । शिष्याला बसविले परमपदास । तोही सांगतो इतिहास । मित्रहो, आपणांस।।४१।। बघा जन्म आणि निर्वाण । दिवस, तिथी, तारीख, समान । शत वर्षं आयुष्य पूर्ण । भोगले ह्या युग पुरुषानं।।४२।। ऐसा दुर्मीळ संत । मिळणे कठीण ह्या युगात । हे शब्द ठेवा ध्यानात । श्रोते-वाचक मित्रहो।।४३।। गरजेपेक्षा जास्त न घ्यावे । उरलेले परत करून द्यावे । कणभर ही संग्रही न ठेवावे । स्वत:जवळ।।४४।। याचे मर्म घ्यावे समजून । अति मोह वर्जावा माणसानं । तरीच सुख होईल निर्माण । या भूमीवर।।४५।। तिकडे आम्ही दुर्लक्ष केले । पाया पडण्यासची कर्तव्य मानले । सुखाऐवजी दु:खची पडले । आमच्या पदरात।।४६।।

संताच्या पाया पडूच नये । ऐसे कोणी समजू नये । परी क्रमाक्रमाने पुढे जावे । आपल्या प्रयत्नाने।।४७।। मित्रहो मी भावनेत बोललो । मुख्य विषयाला विसरलो । स्मरण येताच परतलो । आपल्या मूळ स्थानी।।४८।। आता तुकडोजीचे जीवन । अल्पसे करतो कथन । निवांत करावे श्रवण । चित्त देऊनिया।।४९।। श्री क्षेत्र गुरुकुंजात । जाहला अवतार अद्भुत । माता मंजुळेचा सुत । राष्ट्रसंत तुकडोजी।।५०।। संत आडकोजीच्या निर्वाणानंतर । तुकडोजी जाहले निराधार । सोडले वरखेड, घरदार । निघाले आपल्या प्रवासाला।।५१।। कधी घनदाट अरण्यात । निर्भय हिंडावे मनसोक्त । कधी बसावे चिंतनात । सद्गुरू आडकोजीच्या।।५२।। आष्टी चिमूर भागात । माणिकदेव म्हणून प्रख्यात । तिथले लोक होते ओळखत । या बालकास।।५३।। पुढे सद्गुरूचे जाहले दर्शन । त्यांचीच आज्ञा मानून । स्वगृही आले परतून । क्षेत्र वरखेडास।।५४।। तयाने खंजरीच्या नादान । जागृत केले जनमन । देशकार्यास दिले लावून । नरनारी सान-थोर।।५५।। माझा देशची माझे घर । यापरी सुवर्ण अक्षर । ग्रामगीता ग्रंथाच्या पानावर ।

लिहून ठेविली तयानी।।५६।। ऐसा संत महान । मिळणे आहे कठीण । आता पायलीचे छप्पन । मिळतात बाजारात।।५७।। कुठे मिळे मानसन्मान । कुठे होई अवमान । हे सारे पचवून । संतवृत्ती जोपासली।।५८।। भजने गाऊनी आयुष्यभर । केला मानवधर्माचा प्रचार । विश्रांती नाही क्षणभर । घेतली कधी काळी।।५९।। केले देशी-विदेशी भ्रमण । विभिन्न संस्कृतीचे अवलोकन । बघितले उद्योगादी साधन । नाना तऱ्हेने।।६०।। आपदा आली असता देशावर । धावुनी गेले सीमेवर । त्यासाठी सैनिकासमोर । गायिली शौर्यगीते।।६१।। तयांना केले मार्गदर्शन । तुम्ही भारताचे शूर जवान । शत्रू तुम्हाला बघून । पळतील सैरावरा।।६२।। पुढे भारताशी युद्ध जुंपले । शत्रू राष्ट्र नाही टिकले । जे वदले ते सत्य झाले । या महात्म्याचे।।६३।। सालबर्डीचा महायज्ञ । न भूतो ना भविष्यती जाण । कीर्ती पसरली चहूबाजूनं । जिकडे तिकडे।।६४।। पवित्र कमल पुष्पा समान । जगला उभय जीवन । केला देह-देश पावन । आपल्या स्वकर्तृत्वाने।।६५।। श्री संत लहानुजीनाथ । शिव अवतार साक्षात । जाहले टाकरखेड क्षेत्रात । वरदा

तीरावर।।६६।। अग्नीसम तेज नेत्रात । परमसिद्धता वाणीत । दया-करुणा हृदयात । संत लहानुजी बाबाच्या।।६७।। नित्य भिंतीकडे बघून । करीत होते संभाषण । इकडे दर्शनार्थी ऐके निरूपण । आपल्या समस्येचे।।६८।। भुवयात लेका डोळा । हे शब्द उच्चारी वेळोवेळा । समजू न शके साधाभोळा । याचा अर्थ कल्पांती।।६९।। संत लहानुजी नव्हे व्यक्ती । लहानुजी नव्हे आसक्ती । लहानुजी ही दिव्य शक्ती । आहे या विश्वाची।।७०।। अपार कष्ट साहून । अंगी बाणले संतपण । लहानुजी सारखा तपस्वी महान । विरळाच या जगी।।७१।। वशिष्ठा नदीला येता महापूर । बाबा थाप मारताच भूमीवर । माय घेई माघार । प्रत्यक्षदर्शी सांगती।।७२।। आकाशी ढगाळ वातावरण । उपस्थितांना घडविले सूर्यदर्शन । प्रत्यक्ष सेवा करी देवकीनंदन । समर्थ लहानुजी बाबांची।।७३।। एवढा असोनी महान । लहानु देवासी मागे वरदान । म्हणे मजसी द्यावे लहानपण । केवढे आश्चर्य हे।।७४।। दीन-दलितांना सांभाळले । कित्येकांना सन्मार्गी लावले । पीडितांना जीवनदान दिले । कायमस्वरूपी।।७५।। तुझा महिमा

अपार थोर। तू या विश्वाचा आधार। तुझ्या कीर्तिचा जयजयकार। होतो सदासर्वकाळ।।७६।। सत्यदेव संत थोर। कलियुगी ब्रह्मावतार। अद्‌भुत तयांचा व्यवहार। भासे जनलोकांस।।७७।। सद्‌गुरू आडकुजी बाबानं। आपले उच्छिष्ठ भोजन। दिले अति प्रेमान। माता तुळसाआईस।।७८।। ते उच्छिष्ठ भोजन। तुळसाआईने केले सेवन। उदरी जन्मले नारायण। सत्यदेवाच्या रूपाने।।७९।। पंधरा वर्षं होता मुका। आडकुजी म्हणे बोल लेका। तेव्हापासूनी ऐका। सत्यदेव बोलू लागले।।८०।। ओम सोहम्‌ आडकुजी। एवढेच शब्द सत्यदेवजी। आळवीत होते मुखामाजी। क्षणोक्षणी भक्तीने।।८१।। ते-जे अल्पसे बोलत। त्यापरीच घडत होते निश्चित। म्हणून सत्यदेव नाव लोकात। रूढ झाले।।८२।। बघा ह्या सत्यदेवबाबाचे। चंपत नाव होते पूर्वीचे। सत्यदेव हे नाव आवडीचे। जनता जनार्दनाच्या।।८३।। सत्यदेव म्हणजे सत्यज्ञान। सत्यदेव म्हणजे अखंड ध्यान। सत्यदेव म्हणजे शुद्ध साधन। जीवन जगण्याचे।।८४।। ज्ञानेश्वर, मायबाई,

आडकुजी । सत्यदेवबाबा, तुकडोजी । टाकरखेडचे लहानुजी । वंदिले या ठायी।।८५।। सहा भुजा दत्त अवतार । सहा शास्त्र जगी थोर । सहाची हे संतवर । श्रेष्ठ या मालिकेत।।८६।। ही संतमालिका कोण्यापरी । पोहोचली आहे इथवरी । जाणुनी घ्यावे सत्वरी । वाचक मित्रहो।।८७।। प्रथम होय आदिनाथ । तयांचा शिष्य मच्छिंद्रनाथ । गोरक्ष तयांचे कृपांकित । गहनीनाथ प्रसाद त्यांचा।।८८।। गहनी प्रसादे निवृत्ती जाहले । ब्रह्मावतार ख्याती पावले । तयांनी ज्ञानदेवा घडविले । दिव्यज्ञानी।।८९।। पुढे हैबतीनाथांनी । मंत्र घेतला समाधीमधुनी । वंशवेल वाढवुनी । कृपा केली मायबाईवर।।९०।। मायबाईचे शिष्य आडकुजी । तयांचे शिष्य तुकडोजी । गुरुबंधू तयांचे लहानुजी । सत्यदेवा समवेत।।९१।। ब्रह्मा जाणावे सत्यदेवास । विष्णू अवतार तुकडोजीस । शिव म्हणुनी पुजावे लहानुजीस । अति आदराने।।९२।। तीन महासंत एका ठायी । उदया आले एका समयी । ऐसा योगायोग कोठेही । नाही ऐकला अजुनी।।९३।। पुढे ह्या वंशाची ज्योत । जागवली शंकरबाबाचे हृदयात । ती अजूनही

आहे तेवत । पिंपळखुटा क्षेत्रासी।।९४।। समर्थ लहानुजीच्या दयेस । पात्र ठरले शंकरदास । संत म्हणुनी नांवरूपास । आले लोकामाजी।।९५।। तुम्ही ग्रंथाचे चरित्र नायक । मी तुमचा पाईक । दयेची मागतो भीक । आपणासी सद्भावे।।९६।। मी आहे बालक । तुम्ही भक्तपालक । माझी ऐकावी हाक । धावोनी यावे तत्क्षणी।।९७।। लेकरापरी करावा सांभाळ । माझी पुरवावी आळ । पूर्ण करावा ग्रंथ सकळ । निर्विघ्ने माझ्या हातूनी।।९८।। या जगामाजी नाही । अशक्य तुम्हास काही । मुकाही बोलका होई । आपल्या आशीर्वादाने।।९९।। अंधासी देई दृष्टिदान । पांगळ्या करवी पर्वतारोहण । ऐसे तुम्ही सामर्थ्यवान । आहे या जगी।।१००।। म्हणुनिया चरणावर । ठेवितो मस्तक वारंवार । ग्रंथास करावे मधुर । चहुबाजूनी परिपूर्ण।।१०१।। मी यापूर्वीच बोललो । मी ग्रंथकर्ता नव्हेची म्हणालो । सर्व दोषातून मुक्त झालो । आपल्या न्यायालयातून।।१०२।। हे सर्वची करणे तुमचे । मी निमित्य केवळ याचे । आपणची साक्षी सर्वांचे । आहात एकमेव।।१०३।। आपल्या कृपेविना । काहीच करता येईना ।

त्यासाठी करितो याचना । आपल्या चरणी॥१०४॥ रामकृष्ण दादा ग्रामगीताचार्य । तसेच अत्रे महाराज आचार्य। दोघेही माझे गुरुवर्य। आहेत थोर व्यक्तिमत्त्वाचे॥१०५॥ तयांच्या आज्ञेवरून । मी या ग्रंथाचे लेखन । करीत आहे श्रद्धाभावानं । आपल्या परीने॥१०६॥ तयांना साष्टांग दंडवत । पूर्ण करावे मनोरथ । आशीर्वाद द्या शुभकार्यात । जीवन लावा सार्थकी॥१०७॥ याविण काही आणिक । न हवे मज अधिक । आपला समजोनी बालक । मायमाउली परी सांभाळा॥१०८॥ जसी दुधामजी साखर । जिभेला वाटते चवदार । यापरी या ग्रंथाचा शब्दसार । करावा गोड रसाळ॥१०९॥ आता नमितो जनता जनार्दनासी। सान-थोर सकलांसी । आशीर्वाद द्यावा सेवकासी । या मंगलकार्यास॥११०॥ आपल्या श्रद्धा-भावनेविण । कोणासही ना लाभले थोरपण । यासाठी जनतेसी जनार्दन । संबोधिले साधूसंतांनी॥१११॥ हे कार्य नव्हे माझे एकट्याचे । हे कार्य आहे सर्वांचे । राव रंक सान-थोरांचे । सत्य सांगतो॥११२॥ इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत

शंकरबाबा चरणी समर्पित । पहिला अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय दुसरा

श्री गुरुदेवाय नम:

संत परंपरेचा वारसा । येथवरी आला कैसा । या विषयाचा खुलासा । केला प्रथम अध्यायी॥१॥ आता या अध्यायी वर्णन । संत शंकर बाबांचे जीवन । ऐकावे चित्त देऊन । भाविक सज्जनहो॥२॥ संत चरित्राचे वाचन । म्हणजे साक्षात गंगास्नान । षड्विकारांचे दमन । होई त्यायोगे॥३॥ मन जाहल्यासी उदास । संत चरित्राचा करावा अभ्यास । विघ्नाचा होतो नाश । सर्वतोपरी॥४॥ ऐसा याचा प्रभाव । अनेकांसी येती अनुभव । परी विश्वास पाहिजे एकमेव । यासाठी गडे हो॥५॥ गंगा जरी वाहे समोरून । तिला पाहता न घडे स्नान। यासाठी करावा लागेल प्रयत्न। उदकामाजी शिरण्याचा॥६॥ हेच सांगावयासी संत । जाहलेत या जगात । सुसंकल्प जागविण्या मनात । जनता जनार्दनाच्या॥७॥ शांती नांदावी भूमीवर । सुखी राहावे सान-थोर ।

यासाठी झटले आयुष्यभर । संत महात्मे या जगी।।८।। संत जाणावा परीस । स्पर्श करताची लोहास । सुवर्ण बनवी त्यास । ऐसा अधिकार तयांचा।।९।। असो रंक अथवा राव । तया नाही भेदभाव । ऐसा संताचा स्वभाव । अव्यक्त, अलौकिक।।१०।। बघा शंकर बाबाचे जीवन। कैसे लाभले कृपादान। लोह चुंबकाचे आकर्षण। कैसे जाहले।।११।। श्री बुधाजी नागपुरे । पिंपळखुट्याचे राहणारे । भार्या भागीरथी भरे । साथ गृहस्थाश्रमी।।१२।। दारिद्र्याचे तमांधारे । जीवन कंठी नागपुरे । परंतु हृदयी त्या कोठारे । होती इमानदारीची।।१३।। नावाप्रमाणे उभयता । ठेवी संसारी योग्यता । सहज टाकरखेडी येता । संत प्रसाद लाभला।।१४।। पुढे प्रसवले पुत्ररत्न । पंचेचाळीस साली काजळती दिन । करी कहार कुळ पावन । नाम धरूनी शंकर।।१५।। शंकर शैशवी काळात । राही एकटा गेहात । कोण्यातरी तंद्रित । दूरगामी असायचा।।१६।। भजनी, पूजनी रमावे । देऊळी मठी बसावे । सत्कार्यी भागी व्हावे । त्यामुळे प्रतारणाही।।१७।। चारतसे गुरे, गाई । शेतीकामाला जाई । आई सोबत राही । मागे मागे सदैव।।१८।।

एकदा मालकाचे शेतात । विळा घेऊनी हातात । बाळ शंकर निघाला त्वरित । ज्वारी सोंगण्यास॥१९॥ चालता चालता मार्गात । विचार आला मनात । आधी बसावे ध्यानात । मगची काम करावे॥२०॥ शेताशेजारी वृक्ष बघून । शंकर बैसला ध्यान लावून । अस्त पावला सूर्यनारायण । याचेही भान ना तयास॥२१॥ अचानकची ध्यानामधून । जागा झाला योगायोगानं । शंकर बघतो नेत्र उघडून । दिसे अंधकार सर्वत्र॥२२॥ आपण आलो कामास । शेतातील ज्वारी सोंगण्यास । काय सांगावे मालकास । ते रागावतील नक्कीच॥२३॥ याची भीती मनात । त्वरेची गेला शेतात । शंकर जाहला आश्चर्य चकित । दृश्य पाहुनी तिथले॥२४॥ त्या शेतातील संपूर्ण । ज्वारी होती सोंगून । तैसाची आला परतून । आपल्या घरास॥२५॥ दुसऱ्या दिवशी सहकाऱ्यास । करू लागला विसारपूस । सर्वांनी नकार दिला तयास । आम्ही नव्हे म्हणून॥२६॥ शंकराने जाणले क्षणात । तेव्हापासुनी सतत । राहत होता चिंतनात । रात्रंदिवस श्रद्धेने॥२७॥ मुलाचे पाय पाळण्यात । थोर म्हणती दिसतात । शंकर रमे

रानावनात । शाळेत कमी जातसे।।२८।। बारा वर्षांचे वयात । टाकरखेडी ओढ उपजत । प्रथम दर्शनी समर्पित । झाला असे गुरुपदी।।२९।। त्याक्षणी गुरुराया । बोलले बाळासी या । भुवयात केला डोया । चार वर्षे।।३०।। हा जिज्ञासू शंकर । करी त्याचा विचार । पुढे चार वर्षानंतर । बुद्धी येईल आपणा।।३१।। शंकर नामासम भोळा । त्याला लागलासे लळा । बघाया वर्धातीरीचा डोळा । अवकळा मिटवाया।।३२।। एकदा श्रीचे समोर । प्रसाद ठेवी करी नमस्कार । बाबा करती स्वीकार । म्हणे घे लेका डोया।।३३।। या परी गुरुदेव वदले । परत कलिंगड दिले । तेव्हापासुनी पाहिले । आत्म सूर्यप्रकाशा।।३४।। एकदा वर्धा तीरावर । बसला गुरुध्यानी शंकर । रात्री दोनचा प्रहर । ध्वनी कर्णी येतसे।।३५।। लहानू नामाचे स्मरण । चालू ठेवी रात्रंदिन । ते नाम करील कल्याण । तो आहे स्मृती गामी।।३६।। शंकराची प्रज्ञा जागृत । झाली असे त्वरित । तिथेच करी प्रणिपात । गुरुदेवा स्मरूनी।।३७।। उठले, निघाले वाटेनं । घ्याया बाबाचे दर्शन । पुढे होते लांडगे दोन । मार्ग रोखुनी बैसलेले।।३८।। शंकराने त्यांना बघून । केले समर्थ

स्मरण । तैसा आला एक तरुण । हाकून दिले तयांना दूर।।३९।। दुसरे दिनी घेता दर्शन । शंकरासी म्हणे जगज्जीवन । कैसे होते लांडगे दोन । काल रात्री बसलेले।।४०।। समर्थ करती रक्षण। वेळी-अवेळी धावून। दासाचे विघ्न निवारण। ध्रुव, प्रल्हादासमान।।४१।। बाळ शंकराचे जीवन । श्रम, संकटाचे मीलन । परी गुरूकृपेचे सुदर्शन । वाचवी क्षणोक्षणी।।४२।। दिवस- रात्र न पाही । मनात येई तेव्हा जाई । निघावे एकटेच पायी । गुरुदर्शनासी।।४३।। शंकरासी स्वप्न दृष्टांत । देती श्रीगुरू निद्रेत । उपवास मौनादी व्रत । सांगती योग साधना।।४४।। गुरुनी जे काही सांगावे । ते यांनी आचरावे । त्या शब्दावरी ठेवावे । लक्ष काळजीपूर्वक।।४५।। एके दिनी घेऊनी दर्शन। अर्पिले श्रीफळ, सुमन। बारा वर्षे निश्चित जाण। गोऱ्ह्याचा बैल व्हावया।।४६।। ऐकुनी ह्या वचना । बारा वर्षे केली साधना । ते तप-तपश्चर्या जाणा । या तपस्व्याची।।४७।। शंकराने नित्य यावे । दर्शन घ्यावे जवळी बसावे । बाबानी प्रसाद द्यावे । अति आदराने।।४८।। व्यास-वाल्मीकाचा गुण । जाय केला घेऊन । समर्थ करी

कृपादान । आपल्या शिष्यास।।४९।। एके दिनी शंकराला । हर्षभरे प्रसाद दिला । म्हणे मोठा व्यापारी आला । ने लेका पाहिजे ते।।५०।। बाबा म्हणे साधकाने । नित्याभ्यास करणे । आपण आपणासी पाहणे । विसरू नये।।५१।। सद्गुरूचा प्रभाव । लोकांना येई अनुभव । पुजू लागले रंकराव । शंकर बाबाला।।५२।। पुण्याई लाखो जन्माची । संग्रहित केली एकाची । पदवी लाभे संत पदाची । शंकर बाबास।।५३।। ती नाही मिळाली फुकट । त्यासाठी भोगावे लागले कष्ट । सोडुनी घरादाराची वाट । इष्टमित्रासहित।।५४।। तया मनी एकची ध्यास । कधी पाहीन आत्मज्योतीस । कधी पावेल परमपदास । मी या जन्मी।।५५।। कधी प्राप्त होईल ज्ञान । कधी मिटतील विकार संपूर्ण । कधी दूर होतील विघ्न । माझ्या मार्गाची।।५६।। कधी तुटेल मायाबंधन । यासी काय करावे साधन । यापरी अनेक प्रश्न । शंकर बाबाच्या मनात।।५७।। कितीही दु:खे अपार । मी भोगावया सत्वर । सदैवची आहो तयार । यासाठी निश्चित।।५८।। तू दयेचा महासागर । करू नको माझा अव्हेर । या दासाचा करावा उद्धार । याच जन्मी।।५९।। पाहू नको माझा

अंत । धावुन येई त्वरित । बैसला आहो मार्गात । दृढ निश्चयाने।।६०।। इंद्रिय सुखाचे आकर्षण । ना भुलवी माझे मन । ऐसी अवस्था निर्माण । होऊ दे माझी।।६१।। मी इंद्रियाचा दास । ना होवो, हाची दे अभ्यास । निद्रेतही त्याचा आभास । न व्हावा मज।।६२।। कोणी केलिया विरोध । याचा येऊ नये मला क्रोध । तुटू नये सयंमाचा बंध । माझ्या हातून।।६३।। आदर अथवा अनादर । दोन्ही मला बरोबर । विचलित ना होवो तिळभर । माझे मन कधीही।।६४।। यापरी स्थितप्रज्ञता । अंगी यावी तत्त्वता । जळो भेदाभेद सर्वथा । कायम स्वरूपी।।६५।। इच्छा, वासना, अहंकार । तपोबलाने केले दूर । मार्ग जाहला सोयिस्कर । पुढे शंकर बाबाचा।।६६।। लहानुजी कृपेचा हा अंकुर । प्रयत्ने जाहला वृक्ष थोर । बहरला फलाफुलांनी भरपूर । शंकर बाबाच्या रूपात।।६७।। गुळाचा भेला । तो कुठेही ठेवला । परी मुंग्या शोधती त्याला । आपल्या गुणस्वभावे।।६८।। त्यापरीच संताचे आणि भक्ताचे । नाते आहे जवळचे । आकर्षण जणू लोहचुंबकाचे । एकमेकांचे ठायी।।६९।। जेव्हा घरगृहस्थीच्या ओझ्यानं । जीव जातो गोंधळून । परी

संताचे घेताची दर्शन । शांती क्षणात लाभते।।७०।। ऐसा अनुभव अनेकांचा । हा विषय आहे श्रद्धेचा । आपापल्या पात्रतेचा । भाविक वृंदहो।।७१।। यापरी संत शंकर बाबाचे । वारे पसरले कीर्तिचे । जत्थेच्या जत्थे भक्तांचे । येऊ लागले दर्शनास।।७२।। माणिकराव हरगोडेच्या घरात। एका लहानशा खोलीत। बाबा होते राहत। गावामध्ये पूर्वकाळी।।७३।। गाव सोडुनी अरण्यात । निघुनी जावे निवांत । ऐसा विचार होता घोळत । शंकर बाबाच्या मनात।।७४।। काही भक्तमंडळीला हे कळले । तयांनी बाबाला विनविले । गावामध्येच राहा म्हणाले । आम्हा जवळी।।७५।। जरी होत असेल त्रास । गावामध्ये आपणास। तरी गावाच्या आसपास। देऊ आश्रम बांधून।।७६।। यावर शंकरबाबा म्हणाले। तुमचे बोल मी ऐकले। परी आधी पाहिजे विचारले। लहानुजी बाबास।।७७।। त्यांनी मज आज्ञा करून । त्यापरीच मी वागीन । गुरू आज्ञा म्हणून पाळीन । आदेश तयांचा।।७८।। पुढे गुरुपौर्णिमेच्या दिवशी । लहानुजीच्या दर्शनासी । शंकरबाबा गेले टाकरखेड्यासी । भक्तमंडळी समवेत।।७९।। पाहता क्षणीच लहानुजी

वदले । इकडे तिकडे फिरावे कायले । राहावे आपल्या जुन्याच गावाले । थेच बरे हाये ना।।८०।। प्रसाद देऊनी हातावर । जवळ बसविले क्षणभर । आता जा म्हणाले सत्वर । लागा पुढच्या कामी।।८१।। पुढे पुंडलिकराव रुद्रकार । यांचे शेत दोन एकर । ते होते आईच्या नावावर । दान मिळाले आश्रमास।।८२।। पुंडलिकरावासम संत भक्त । आजही दुर्मीळ या जगात । त्यांना माझा साष्टांग दंडवत । या ठायी श्रद्धेने।।८३।। या आश्रमाचे भूमिपूजन । केले सत्यदेव बाबानं । वर्गणी दिली रुपये दोन । या सत्कार्यास।।८४।। या दोन रुपयांच्या आत । काय दडल होते गुपित । ते सत्यदेवबाबा व्यतिरिक्त । माहीत नव्हते कोणासही।।८५।। या आश्रमाचे वैभव सारे । दोन रुपयांवर खरे । निर्माण झाले ऐका रे । सांगतात शंकरबाबा।।८६।। केले गुरुआज्ञेचे पालन । गांव बनविले तीर्थस्थान । कुळ केले पावन । शंकर बाबाने।।८७।। आता एका ठायी बसून । आपल्या कृपेचे दान । वाटतो हा दयाघन । सर्व लोकांस।।८८।। शंकरबाबा संत आत्मज्ञानी । कोण कैसा घेती जाणुनी । त्यापरीच त्यास देऊनी । करतात तृप्त।।८९।। कोणीही या दरबारातून । नाही

जात निराश होऊन । शंकर बाबा झोळी भरून । देतो प्रत्येकाची।।९०।। यापरी इथला अनुभव । लोक ऐकून घेती धाव । क्षेत्र पिंपळखुट्याचे नाव । पोहचले घराघरात।।९१।। कोणास केले व्याधीतुनी । कोणास व्यसनापासुनी । कित्येकासी बोधामृत पाजुनी। लावले सन्मार्गास।।९२।। दीन दुबळ्यांचा दातार । रंजल्या गांजल्याचा आधार । करुणा दयेचा अवतार । शंकरबाबा साक्षात।।९३।। कोणी म्हणती विघ्न टाळले । आम्हाला जीवनदान दिले । लेकरापरी सांभाळले । शंकर बाबानी।।९४।। पुढे ओघ सुरू झाला दानाचा । दानशूर भक्तमंडळीचा । विकास करावया आश्रमाचा । सर्वतोपरी।।९५।। निर्माण केले विश्वमंदिर । त्यात देवीदेवता संतवर । तयांच्या मूर्ती स्थापिल्या सुंदर । अति आकर्षक।।९६।। जयपूर, राजस्थानी कारागिर । होते या कामावर । स्वयम शंकरबाबा पुरेपूर । लक्ष ठेवी सतत।।९७।। या मंदिराची मूळ कल्पना । सत्यदेवबाबाची जाणा । ती पूर्ण केली गुरुआज्ञा । शंकरबाबाने।।९८।। बघा त्या सत्यदेव बाबानं । ‘आमाले इथे बसबजा कान’ । आधीच ठेवले होते सांगून । शंकर बाबास।।९९।। हेच ते

विश्वमंदिर होय। येथे सर्व साधुसंत देव। पाहावया मिळतात एकमेव। सर्व लोकांस।।१००।। गोसेवेच महत्त्व जाणून। आश्रमात उघडले गोरक्षण। दही-दुधाची सोय करून। ठेविली मुबलक।।१०१।। दूरदृष्टीचा हा संत। तयाचा कोण पाहील अंत। जनकल्याणासाठी आहे झटत। अहोरात्र निश्चित।।१०२।। जन्मदात्याचे मंदिर बांधून। तयाचेही फेडले ऋण। संत मातापिता म्हणून। लोक पूजती तयांना।।१०३।। आपल्या गुरुस्थानास। श्रीक्षेत्र टाकरखेड्यास। सुंदर बांधले महाद्वारास। गुरुदक्षिणा समजून।।१०४।। सत्यदेव बाबाच्या मंदिरास। योगदान दिले भरघोस। तुकडोजीच्याही कार्यास। लावतात हातभार।।१०५।। पिंपळखुटा दुर्गम गाव। तिथे नाही शिक्षणाची सोय। त्यासाठी शाळा, महाविद्यालय। उघडली त्या ठायी।।१०६।। धार्मिक, आध्यात्मिक समाजसेवा। हा त्रिवेणीसंगम जाणावा। या तीनही कार्याचा लळा। लागला शंकरबाबास।।१०७।। शंकरबाबा म्हणजे संयम। शंकर बाबा म्हणजे नियम। शंकर बाबा म्हणजे आनंद परम। जीवनाचा निश्चित।।१०८।। रंजल्या गांजल्याचा

कैवारी । उभा वरदा तीरावरी । घेऊन कृपादानाची शिदोरी । आपल्या भक्तासाठी॥१०९॥ हा कल्पवृक्ष साक्षात। पुरवितो भक्तांचे मनोरथ। अनाथाचा हा नाथ। भागीरथीनंदन॥११०॥ मनोभावे करता चिंतन । प्रत्यक्ष येतो धावून । संकटाचे करतो निवारण । तो आपल्या भक्ताचे॥१११॥ म्हणून सांगतो नमुनी । ही वेळ गमावू नका कोणी । मन लावा सद्गुरू चरणी । संत शंकर बाबाच्या॥११२॥ इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। दुसरा अध्याय समाप्त॥११३॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय॥

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय तिसरा

श्री गुरुदेवाय नम:

संत शंकर बाबाचा अवतार। जाहला या भूमीवर। तारावया दीन-पामर। या जगीचे।।१।। म्हणोनी याहो सकलजन। जाहो तयाशी शरण। जीवन करा पावन। या योगे आपले।।२।। पुन्हा न येईल ऐसी घडी। यासाठी करा तातडी। अनुभवा संत कृपेची गोडी। भक्तमंडळी तात्काळ।।३।। कित्येक भक्त सानथोर। तृप्त जाहले आजवर। परमदयेचा महासागर। शंकर बाबा साक्षात।।४।। असो रंक अथवा राव। सर्वाठायी समभाव। सुख:दुखाचा सोबती एकमेव। नांदतो पिंपळखुट्यास।।५।। प्रत्यक्ष माउली ज्ञानेश्वर। प्रकटली विदर्भ भूमीवर। नाम धरियले शंकर। मानवरूपी देहाचे।।६।। एकदा श्रीक्षेत्र आळंदीस। उटी लावतांना समाधीस। शंकरबाबा बोलले भक्तास। हे आम्हीच आहोत।।७।। हे शब्द अधिकाराविना। कोणीही बोलू शकेना। भक्तांनी ओळखले

तत्क्षणा। बाबाच्या अधिकारास।। ८।। वेदशास्त्रांची अक्षर। नित्य घोळवी जिव्हेवर। हा बघुनी चमत्कार। आश्चर्य वाटे लोकांस।।९।। आज ऐसा संत महान। मिळणे आहे कठीण। गमावू नका हा क्षण। सांगतो वारंवार।।१०।। असेल जर पूर्व संचित । तरीच पावेल संताची संगत। हे जाणावे निश्चित। संतकृपे भक्तहो।।११।। शंकर बाबा आत्मज्ञानी। कोण कैसा घेती जाणुनी। त्यापरिच तया लागुनी। देती कृपादान।।१२।। बघा या दरबारातून। कोणीही निराश होऊन। जात नाही परतून। कदापिही निश्चित।।१३।। शंकर बाबाची दूरवर। कीर्ती पसरली घरोघर। गर्दी वाढली भरपूर। भक्तमंडळी बाबांची।।१४।। पिंपळखुट्याचेही नाव। परिचित झाले एकमेव। भक्तांनी घेतली धाव। बाबाच्या दर्शनासी।।१५।। शंकरबाबाच्या पदस्पर्शानं। इथली भूमी झाली पावन। पिंपळखुटा बनले तीर्थस्थान। अधिष्ठान भाविकांचे।।१६।। इथल्या मातीचेही कण। भाळी लावता श्रद्धेन । जीवनाच होते सोन। भाविक सज्जन हो।।१७।। 'जया गावी वसती संत। तेथे पुण्य करील पापाचा अंत'। यापरी लिहले आहे ग्रामगीतेत।

राष्ट्रसंत तुकडोजीन।।१८।। या शब्दाचा अर्थ आवर्जून। मित्रहो घ्यावा समजून। जीवनाचे होईल कल्याण। निश्चितची आपल्या।।१९।। संत शंकरबाबाचे जीवन। आहे वृक्षा समान। अपार कष्ट सोसून। सन्मार्गी लावले लोकास।।२०।। अहो तयांचा अधिकार। या जगी आहे थोर। तो या चर्मचक्षूंनी वरवर। पाहता न कळेल।।२१।। यासाठी भक्त पाहिजे जिज्ञासू। अथवा ज्ञानपिपासू। श्रद्धावंत विश्वासू। अभ्यासूही परिपूर्ण।।२२।। 'मिलना कठिन है संत का'। तुकडोजीचे वचन ऐका। यासी कधी विसरू नका। आयुष्यात भक्त हो।।२३।। आम्ही आहोत भाग्यवान। संत शंकर बाबाच्या रूपानं। स्वयम पंढरीच्या पांडुरंगानं। जन्म घेतला या ठायी।।२४।। धन्य तयाचे उपकार। ठायीच वसविले पंढरपूर। मायवरदेच्या तीरावर। भक्तांसाठी निश्चित।।२५।। गोरगरिबांची काशी। निर्मिली पिंपळखुट्याशी। तिथे हा ब्रह्मर्षी। उभा आहे साक्षात।।२६।। पतितासी करण्या पावन। सज्जनाचे करावया रक्षण। प्रकट जाहले नारायण। ब्रीद रक्षावया आपले।।२७।। हा योगीराज निवांत। वेगळ्याच तंद्रीत।

राहतो सदा चिंतनात । आपल्या स्थानी सदैव।। २८।। वृत्ती अति निर्मळ। वाणी मधूर रसाळ। वागणे सदा सर्वकाळ। अवघ्यांशी प्रेमाचे।।२९।। राहणीमान टापटिपीचे। शुभ्र वस्त्र आवडीचे। सदैव ध्यान स्वच्छतेचे। आश्रमात चहूकडे।।३०।। आपल्या निवासस्थानात। प्रत्येक वस्तू शिस्तीत। बाबा स्वयंम् ठेवतात। आपल्याच परीने।।३१।। हा आदर्श शंकर बाबानं। घेतला गुरूकडून। गुरूच्या आदर्शाचे पालन। नित्य करिती भक्तीने।।३२।। स्वच्छता, शांतता, शिस्त, नियम। पाचवा तो संयम। शंकरबाबा म्हणजे शुद्ध प्रेम। निश्चित जाणा भक्तहो।।३३।। या आदर्शाचे आचरण। जो करिल तयाचे जीवन। संपूर्ण जाईल बदलून। बाबाच्या कृपाप्रसादे।।३४।। परी कृपा न होई आपोआप। त्यासाठी करावा लागतो खटाटोप। कर्महीं पाहिजे निकोप। कृपापात्र व्हावयासी।। ३५।। येरवी संतानी सांगावे। सर्वांशी प्रेमान वागावे। परी आम्ही क्रोधशी न सोडवे। आयुष्यभर दुर्दैवे।। ३६।। हा संताचा घोर अपमान। कैसे मिळेल कृपादान। यात स्वयम् दोषी आपण। पूर्णपणे जाणावे।।३७।। आपला संत काय करतो। कैसा

बोलतो, कैसा वागतो। त्यापरिच स्वयंम् वागतो। तोच खरा संतभक्त।।३८।। शंकरबाबाचे जीवन। म्हणजे आपत्तीचे संमेलन। एक जाताची निघोन। दुजी उभी त्याठायी।।३९।। प्रारंभी बाबा आश्रमात। लहानशा कौलारू झोपडीत। राहत होते निवांत। काही सेवकासह।।४०।। कोणी भोजन आणून द्यावे। बाबाने ते सेवन करावे। अन्यथा उपाशीच राहावे। दिवसभर आनंदे।।४१।। कधी शिळ्या तुकड्यावर। भूक भागवी त्यावर। हा हरिचंद्र योगीवर। सद्‌गुरू प्रसाद समजून।।४२।। गावातील काही दुर्जन। त्रास देती विनाकारण। द्यावे गावाबाहेर हाकलून। प्रयत्न होता तयांचा।।४३।। एका मांत्रिकासी आणून। जीवे मारण्याचा प्रयत्न। केला या दुर्जन मंडळीन। शंकर बाबास।।४४।। एका महिलेस हाती धरून। बाबाला बदनाम करू म्हणून। गाव गुंडाने केला प्रयत्न। परी जाहला असफल।।४५।। जणू प्रखर उन्हात। आग लागली अकस्मात। वाराही सोसाट्याचा जोरात। यापरी जाहले।।४७।। या सर्व संकटांतून। बाहेर काढले गुरुदेवानं। समर्थ लहानुजी बाबान। शिष्योत्तमास आपुल्या।।४८।। जैसे

अग्नीमाजी तापविल्याविना। चमक चढेना सुवर्णा । त्यापरीच कष्ट भोगल्याविना। संतत्व अंगी येईना।।४९।। जैसी सरिता मार्गात। कठीण खडकासी फोडित। जाऊन मिळते सागरास। त्यापरि आहे संताचे।।५०।। संत शंकरबाबानं । अति वाईट प्रसंगातून। मार्ग काढला संयमानं। धन्य लीला तयांची।।५१।। शंकर बाबा नव्हे साधारण। ती आहे विभूती महान। सोडू नका तयाचे चरण। धरियले एकदाचे।।५२।। ते चरण आहेत पावन। स्पर्शता लाभते समाधान। त्यात लोहचुंबकाचे आकर्षण। आहे सर्वथा तयात।।५३।। त्या कोमल चरणावर। मस्तक ठेविता क्षणभर। दु:खाचा पडतो विसर। सत्य सांगतो भक्तहो।।५४।। हे चरण जयासी लाभले। तयांचे भाग्यची पालटले। यापरी अनेक दाखले। उपलब्ध असती आजही।।५५।। संत शंकर बाबानं। कित्येकांसी व्यसनातून । मुक्त केले निज कृपेनं । सुखी केले जीवन।।५६।। ते बाबाचे भक्त । अति आनंदे नांदतात । सहकुटुंब दर्शनासी येतात । नित्यनेमे बाबाच्या।।५७।। संत शंकरबाबाचे कृपेने । हजारो भक्त श्रद्धेने । भक्ती करिती नेमाने । गावोगावी अखंड।।५८।। पुणे, मुंबई शहरात । भंडारा,

नागपूर, अमरावतीत । बाबाचे भक्त निष्ठावंत। आहे चहुबाजून।।५९।। बाबाच्या प्रत्येक उत्सवास। श्री क्षेत्र पिंपळखुट्यास। श्रद्धेने येती आश्रमास। इष्टमित्रांसहीत।।६०।। ओम प्रकाश शर्मा नावाचे। बाबाचे भक्त राजस्थानाचे। ते मूर्ती बनविण्याचे। काम करिती जयपूरला।।६१।। एकदा बाबा जयपूरला। गेले मूर्ती खरेदी करण्याला। त्या वेळी हा प्रसंग घडला। ऐका भक्तहो सविस्तर।।६२।। बाबा सर्व बाजार फिरले। अनेक मूर्तिकारांसी भेटले। परी समाधान नाही झाले। बाबाचे त्याठायी।।६३।। बाबा काही अंतर चालले। लहानसे दुकान दिसले। बाबा सत्वर थांबले। आपल्या भक्तांसहित।।६४।। बघा या मूर्तिकारानं। बाबाचे लक्षण बघून। तात्काळची केले वंदन। शंकर बाबास।।६५।। तयानी मोठ्या आदरानी। बसावया दिले आसनी। विचारपूस केली आनंदानी। बाबांची भक्तिभावाने।।६६।। आम्ही आलो बहुदिवसानं। हे आमचेच आहे दुकान। बाबाचे हे शब्द ऐकून। थक्कजाहले सर्वजण।।६७।। लहानशा दुकानावर। शंकर मूर्ती भांडार। फलक लावला होता बाहेर। ओम प्रकाशजी श्रद्धेने।।६८।। आपले

शंकर नाव बघून। बाबा बोलले असावे विनोदान। सर्व गेले समजून। अगदी अल्प वेळात।।६९।। लगेच शंकर बाबानं। ओम प्रकाशजी कडून। मूर्ती घ्याव्यात बनवून। निर्णय घेतला एकमेव।।७०।। इकडे सर्वांना आश्चर्य वाटले। बाबाने थोर मूर्तिकार बघितले। त्यात ओमजींनाच निवडले। लहानशा दुकानदारास।।७१।। बाबाने सर्वांना समजाविले। आपले म्हणणे मी ऐकले। परी उपेक्षिताशी पाहिजे उचलले। आपला आधार देवोनी।।७२।। ओम प्रकाशजी गुणवान। मूर्तिकलेचे ज्ञान परिपूर्ण। जरी असेल दुकान लहान। भेद नसावा मानवात।।७३।। पुढे काही दिवसानं। ओम प्रकाशजीनं। मूर्ती पाठविल्या बनवून। पिंपळखुटा आश्रमात।।७४।। ती कलाकृती बघून। सर्वांचे झाले समाधान। कौतुक करती मनोमन। मूर्तिकार ओमचे।।७५।। संत शंकर बाबानं। आपल्या दिव्य प्रेमानं। भक्त जोडला निष्ठावान। जयपूर राजस्थानात।।७६।। आजही बाबाच्या निरोपानं। उपस्थित होतो आनंदानं। सेवा करितो रात्रंदिन। बाबाच्या इच्छेनुसार।।७७।। प्रेमाने जग जिंकता येते। विश्वासाने वाटेल ते होते। बाबाने दाखवून दिले इथे। सर्वांना

प्रत्यक्षात।।७८।। ऐसे अनेक भक्त उपेक्षित। बाबाने जोडले सोबत। साधले तयाचे हित। आपला समजोनी।।७९।। ओम नमोजी शंकरनाथा। तव चरणी ठेवितो माथा। तुझ्या चरित्राची ही गाथा। सफल करावी माझ्या हाते।।८०।। तू साक्षात कल्पतरू। अनाथाचा आधारू। दीन जनांचा कैवारू। परम सद्गुरूनाथा।।८१।। माझे चित्त निरंतर। जडो तुझ्या पायावर। आणिक काही इतर। नको दूजे मजलागी।।८२।। तुझ्या पायाची धूळ। भाळी लावता सर्वकाळ। जन्मजन्मांतरीचा मळ। निघुनी जातो तत्क्षणी।।८३।। ऐसा तू आहेस सामर्थ्यवान। तुझा अंत पाहील कोण। मी अल्पज्ञ लेकरासमान। सांभाळी मायबापा।।८४।। जयजयाजी भागीरथी नंदना। बुधाजीसुता करुणाधन। भक्तप्रतीपालका जनार्दना। जगज्जीवना नारायणा।।८५।। पिंपळखुटा निवासी परमानंदा। परमदयाळू ज्ञानसमुद्रा। विघ्नहारक सुखकंदा। दीनबंधू भवतारका।।८६।। समर्थ लहानुजीची छत्रछाया। सत्यदेवाची दिव्यमाया। तुकडोजीची परम् दया। तुझ्या शिरी सर्वदा।।८७।। तुझ्या कीर्तिचा जयजयकार। लोक गाती

घरोघर। भक्त निर्मिले चौफेर। चहुबाजूनी भक्तिभावे।।८८।। संकट आलिया भक्तावर। स्वयम झेलतो त्याचा वार। ऐसा हा योगीवर। विघ्नहर्ता, भवतारक।।८९।। साधावया विश्वकल्याण। स्वयम् अवतरले भगवान। दूर सारावया अज्ञान। जगती या सर्वांचे।।९०।। तव स्वरूपाचे ध्यान। श्रद्धेने करिता रात्रंदिन। पापाचे होईल उच्चाटन। कायमस्वरूपी।।९१।। तुझ्या वाणीचे श्रवण। जणू साक्षात गंगास्नान। ऐकताना मिळेल समाधान। प्रत्येकासी निश्चित।।९२।। तुझी कृपा दृष्टी भक्तावर। पडताची क्षणभर। विघ्ने पळतात दूर। ऐसा अनुभव अनेकांचा।।९३।। तू साक्षात करुणाकर। दिव्यज्ञानाचे भांडार। पंच महाभूतांवर। तुझीच सत्ता एकमेव।।९४।। तुझ्या ठायी अखंड जिव्हाळा। तू क्षमा शांतीचा पुतळा। ज्यासी तुझा लागला लळा। समजावा तो भाग्यवान।।९५।। अशक्यासी शक्य करणं। तुम्हासी नाही कठीण। ऐसा तू सामर्थ्यवान। आहेस या जगी।।९६।। तू भवसिंधू तारक। निज भक्त प्रतिपालक। सद्बुद्धी दायक। दीनबंधू दीनानाथ।।९७।। म्हणुनी तुझ्या चरणावर। मस्तक ठेवितो वारंवार। आम्हा भक्तांचा तू

आधार। आहेस एकमेव॥९८॥ ओम नमोजी भक्तवत्सला। जरी अपराध जाहला। क्षमा करावी बालकाला। समजून आपुला॥९९॥ तुझ्या ठायी नाही भेद। तुझ्या ठायी नाही खेद। ऐसा तू आहेसी निर्विवाद। नि:सदेह निर्विकारी॥१००॥ तुझ्या ठायी आगळा वेगळा। नित्य आनंदाचा सोहळा। तो बघावया भक्त मेळा। येतो दूरवरूनी॥१०१॥ तव नामाचे करिता स्मरण। होय मनासी समाधान। दु:खाचे होई विस्मरण। मनी वाटे संतोष॥१०२॥ तुम्ही आपल्या कृपाप्रसादानं। केले कित्येक पतितासी पावन। उपेक्षितासी दिला सन्मान। उदार होऊनी॥१०३॥ तुझ्या उदारतेचे वर्णन। करणे आहे कठीण। म्हणोनी आलो तुजला शरण। विनम्र भावाने॥१०४॥ जो तुजसी आला शरण। तयाचे बदलविले जीवन। परमार्थाकडे वळविले मन। तुम्ही तात्काळ॥१०५॥ तुझ्या चिंतनी माझे मन। सदा राहे मग्न। हेची मागतो मागणं। तुजसी सर्वकाळ॥१०६॥ न हवे मज धन। चित्ती असू द्यावे समाधान। आणिक न दुजे याविण। हवे मज काही॥१०७॥ तुझ्या कृपेची शिदोरी। न सरे आयुष्यभरी। यापरी तव कृपेची थोरी। वाखणती जन॥१०८॥ तरावया भवसागर। एक तुझाची आहे आधार।

म्हणुनी प्रार्थना करतो वारंवार। तुझिया चरणाशी।।१०९।। मी आहे दीन पामर। नाही कोणाचा आधार। नका करू अव्हेर। तुम्ही या बालकाचा।।११०।। धरूनिया दृढ विश्वास। आलो तुमच्या चरणास। करू नका निराश। मज दासा लागी।।१११।। बहु भोगले आजवरी। कृपा करा आता तरी। सद्गुरू नाथा माझ्यावरी। आशीर्वाद असावा।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। तिसरा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय चौथा

श्री गुरुदेवाय नम:

माणिकराव हारगोडे नावाचे । बाल मित्र ते बाबाचे । काम करीत होते शेतीचे । दोघेही एकत्र।।१।। त्या वेळी बाबाचे वय । पंधरा वर्षे केवळ । होते अगदी कोवळं । ऐका वाचक मित्रहो।।२।। माणिकरावाचे घर । होत बाबाच्या घरासमोर । त्यामुळे एकमेकांवर । प्रेम होते जिव्हाळ्याचे।।३।। गावातील रुद्रकार । तयांच्या शेतीवर । दोघेही होते कामावर । त्याकाळी जोडीने।।४।। माणिकरावच्या घरामधली । एक रिकामी खोली । ती बाबाला आवडली । म्हणती तेथे रहावे।।५।। त्याठायी निवांत । बसुनी साधावा एकांत । ध्यानधारणाही त्यात । करावी हा उद्देश।।६।। बाबाने माणिकरावास । आपल्या जिवलग मित्रास । केली सर्व विचारपूस । या विषयी त्वरेने।।७।। माणिकरावाने तूर्तास । होकार दिला बाबास । त्या खोलीमध्ये राहण्यास ।

तात्काळ दिली संमती।।८।। शंकरबाबा तेव्हापासून । त्या खोलीमध्ये आनंदाने । राहत होते रात्रंदिन । आपल्याच तंद्रीत।।९।। सात वर्षे सतत । बाबा त्या खोलीत । राहिले एकांतवासात । अखंडपणे आनंदे।।१०।। एका वेळी अकस्मात । सायंकाळी अंगणात । बसले होते चिंतनात । एकटेच निवांत।।११।। घराशेजारच्या मार्गावरून । येणाऱ्या जाणाऱ्या कडून । राहत होते सावधान । बाबा त्या काळात।।१२।। गावातील लोकांचा आपणास । होऊ नये त्रास । हाच केवळ उद्देश । स्पष्ट होता बाबाचा।।१३।। बघा त्याच काळात । माणिकराव जाहले त्रस्त । त्यांच्या पत्नीच्या पोटात । रोग होता दुर्धर।।१४।। ती होती गरोदर । वेदना पोटात भयंकर । नाना करूनी उपचार । परी मिळेना आराम।।१५।। कोणी जादूटोण्याची भीती । दाखवली माणिकरावाप्रती । कोणी चिप जाहली म्हणती । गर्भाची पोटात।।१६।। माणिकराव गेले खचून । लोकांचे तर्क-वितर्क ऐकून । बाबासी पाहावे विचारून । अचानक आले मनात।।१७।। एके दिवशी निवांत । बाबा बसून होते अंगणात । माणिकरावाने भीत भीत । समस्या सांगितली

बाबास॥१८॥ बाबा म्हणे माणिकरावास । घाबरू नको ह्या प्रसंगास । आता मीच या रोगास । करतो ठीक याक्षणी॥१९॥ बघा त्या वेणूबाईस । माणिकरावाच्या पत्नीस । अंगारा दिला खाण्यास । बाबाने तात्काळ॥२०॥ दररोज स्नान करून । करावे लहानुजीचे स्मरण । अंगारा करावा सेवन । नियमित श्रद्धेने॥२१॥ बाबाने जे सांगितले । त्यापरिच वेणूबाईने केले । स्वस्थ वाटू लागले । वेणूबाईस तात्काळ॥२२॥ अगदी थोड्या दिवसात । वेणूबाई जाहली रोगमुक्त । गर्भाचीही तिच्या उदरात । वाढ होऊ लागली॥२३॥ वेणूबाईने तूर्तास । सांगितले आपल्या पतीस । हर्ष जाहला माणिकरावास । वेणूबाईचे ऐकून॥२४॥ आता पुढे घडलेला प्रकार । ऐकून घ्यावा सविस्तर । चवदा महिन्यानंतर । वेणूबाई जाहली प्रसूत॥२५॥ बघा कोणत्याही बालकास । आईच्या उदरातून जन्म घेण्यास । लागतात नऊ महिने नऊ दिवस । निसर्ग नियमानुसार॥२६॥ परी वेणूबाई या नियमास । अपवाद ठरली त्यास । आश्चर्य वाटले लोकास । या घटनेचे॥२७॥ या घटनेचे सूत्रधार । स्वयंभू शंकर बाबाच असणार । या

परी उमटला सूर । चर्चेतून लोकांच्या।।२८।। वेणूबाईच्या उदरास । बाळ आले जन्मास । नाव ठेविले रमेश । सर्वांनी आवडीने।।२९।। रमेश जन्मापासून । अशक्त होता प्रकृतीनं । पुढे वाचण्याचेही लक्षण । दिसत नव्हते त्याच्यात।।३०।। त्याचा उपचार करणं । होते अति कठीण । याला परिस्थिती कारण । माणिकरावाची।।३१।। पुन्हा या संकटातून । मार्ग शोधला बाबानं । या मुलास द्यावे दान । आमच्या आश्रमास।।३२।। बाबाच्या आज्ञेप्रमाणं । बघा या माणिकरावानं । आपल्या पुत्रास दान । दिले बाबाच्या आश्रमात।।३३।। रमेश तेव्हापासून । बाबाच्या कृपा प्रसादानं । राहू लागला आनंदानं । त्या ठायी निःशंक।।३४।। कालातरानं रमेशला । स्वयम् बाबाने त्याला । नोकरी दिली आश्रमाला । कायम स्वरूपी।।३५।। श्रीसंत शंकर बाबानं । मला दिले जीवनदान । रमेश सांगतो स्वाभिमानानं । आजही लोकांजवळ।।३६।। माझ्या घरी देव आला । परी मी नाही ओळखला । माझा पदर उणा पडला । ओळखण्या देवाला।।३७।। ज्या परी भगवान श्रीकृष्णानं । सुदामाला दिला सन्मान । त्यापरीच मला शंकरबाबानं ।

सांभाळले आयुष्यभर।।३८।। प्रत्येक वेळी संकटामधून । माझे केले रक्षण । तयांच्या उपकाराचे ऋण । फेडणे आहे अशक्य ।३९।। हे बोल होय माणिकरावाचे । बाबाच्या जीवलग मित्राचे । यापरी अनेक अनुभवांचे । भांडार आहे त्यांच्याजवळ।।४०।। एकदा बाबा मजुरासोबत । मेंढकी नावाच्या शेतात । पोहोचले अकस्मात । पाहण्यासाठी शेत ते।।४१।। पेरणीपूर्वीची मशागत । सुरू होती शेतात । सर्व मजूर होते राबत । आपापल्या कामात।।४२।। काही मजुरांनी । शेताच्या चारही बाजूंनी । धुरे दिले पेटवुनी। काय जाहले कळेना।।४३।। अचानक वारा वेगाने । वाहू लागला चहुबाजूने । अशक्य होत विझविणे । अग्नीला त्यावेळेस।।४४।। अग्नीचे गोळे हवेत । उडत होते बाजूच्या शेतात । तिथे कडबा-कुटार -गवत । ठेवले होते साठवून।।४५।। ते सर्व ह्या आगीत । जळून जाईल निश्चित । भीती होती मनात । काही सुचेना मजुरांना।।४६।। क्षणात बाजूच्या शेतातून । पाच-दहा माणसे मिळून । हाती काठ्या घेऊन । येत होते तात्काळ।।४७।। हा प्रसंग पाहून। मजूर गेले घाबरून। आता निश्चितची भांडण। होणार या

ठिकाणी।।४८।। कदाचित ते बाबाचा । अपमान करतील सत्पुरुषाचा । भरवसा नाही या लोकांचा । काय करावे सुचेना।।४९।। बाबा अगदी शांत । उभे होते शेतात । त्या आगीकडे बघत । टक लावून सारखे।।५०।। अद्‌भुत ऐसा चमत्कार । क्षणातची घडला शेतावर । रमेश हारगोडे साक्षीदार । आहे या प्रसंगाचा।।५१।। वारा आपल्या जागेवर । अचानक जाहला स्थिर । अग्नीने आपला रुद्रावतार । माघारी घेतला तत्काळ।।५२।। हा प्रसंग बघून । काही न बोलता मुकाट्यानं । शेजारी गेले परतून । आपापल्या शेतात।।५३।। त्या वेळी बाबाच्या शरीरामधून । तापलेल्या अग्नीसमान । वाफ निघत होती उष्ण । वाटे स्वरूप अग्नीचे।।५४।। जणू बाबाने प्रत्यक्षात । त्या अग्नीला आपल्या शरीरात । साठवून घेतले आत । आपल्या तपोबलाने।।५५।। जर बाबा प्रत्यक्षात । हजर नसते शेतात । अनर्थ घडला असता निश्चित । या ठिकाणी।।५६।। घडणाऱ्या दुर्घटनेचा वार । बाबाने झेलला स्वत:वर । धन्य बाबाचा अधिकार । आहे पंचमहाभूतांवर।।५७।। ही चर्चा त्या परिसरात । हळूहळू पसरली लोकांत । लोक येऊ लागले आश्रमात ।

बाबाच्या दर्शनास॥५८॥ महादेवराव चेट्टुले पिपळखुट्याचे । बालमित्र ते बाबाचे । दोघेही मिळून शेतीचे । काम करायचे त्या काळात॥५९॥ त्यांच्या घराजवळून बाबांचे । येणं-जाणं होत नित्याचे । अचानक महादेवरावाचे । लक्ष पडले बाबावर॥६०॥ महादेवरावाने तूर्तास । हाक दिली बाबास । विनंती केली येण्यास । आपल्या घरी श्रद्धेने॥६१॥ बाबाला आत नेऊन । बसविले अति आदरान । त्या वेळी महादेवरावाने । संतोषले मनोमनी॥६२॥ महादेवरावच्या बहिणीचे । लग्न जुळले होते तिचे । त्या लग्नाला येण्याचे । निमंत्रण दिले बाबास॥६३॥ पत्रिका पडताच हातात । बाबा म्हणे या लग्नात । विघ्न येणार आहे निश्चित । सावध राहा सांगतो॥६४॥ तुम्ही पाठीराखे असल्यावर । आम्हाला नाही फिकीर । महादेवराव बोलले सत्वर । बाबासवे तये वेळी॥६५॥ पहिल्याच दिवशी मंडपावरून । माणूस पडला पाय घसरून । महादेवराव म्हणे बाबानं । सांगितले तेच खरे॥६६॥ बघा आपल्या बालमित्रावर । बाबाचे लक्ष होते पुरेपूर । माणूस पडला जमिनीवर । परी तो होता सुखरूप॥६७॥ दुसरे

दिवशी लग्नमंडपात । नवरदेव शिरताच आत । आग लागली स्वयंपाकगृहात । न कळे कैसे जाहले।।६८।। तेथील लोकांनी मिळून । आग विझविली संपूर्ण । सुरक्षित होते सर्व सामान । स्पर्श न झाला अग्नीचा।।६९।। बघा त्या लग्न मंडपात । पाहुणे मंडळी आपसात । चर्चा होते करीत । जागोजागी त्या क्षणी।।७०।। या लग्नमंडपात । कोणीतरी अधिकारी संत । स्वयम् असावा उपस्थित । निश्चितची जाणावे।।७१।। अन्यथा या आगीत । सारा मंडप क्षणांत । राख होऊन निश्चित । झाला असता खरोखर।।७२।। आतावरी सर्व व्यवस्थित । चालू होते सुरळित । पुन्हा विघ्न आले दारात । महादेवरावाच्या।।७३।। पगंतीमध्ये भात । कमी पडणार निश्चित । त्यामुळे महादेवराव चिंतेत । होते त्या वेळी।।७४।। परिस्थिती होती गरिबीची । व्यवस्थाही नव्हती पैशांची । वेळ होती आणीबाणीची । प्रसंग अति कठीण।।७५।। एवढ्यात बाबा अकस्मात । उभे दिसले स्वयंपाकगृहात । महादेवराव जाहले चकित । ते दृश्य पाहुनी।।७६।। त्या दिवशीचा अनुभव । सांगतात महादेवराव । ऐकून घ्यावा एकमेव ।

एकाग्रतेन भक्तहो।।७७।। लग्न वऱ्हाडी समस्त। भोजन करूनी जाहले तृप्त। तरीही स्वयंपाकगृहात। भात होता शिल्लक।।७८।। या भयंकर संकटातून। बाबाने मला उचलून। घेतले लेकरासमान। धन्य उपकार तयाचे।।७९।। रंगल्या, गांजल्यांचा उद्धार। करावया भूमीवर। साक्षात जाहला अवतार। श्री संत शंकरबाबाचा।।८०।। महादेवराव अंतःकरणापासून। यापरी बाबाचे गुणगान। सांगतात आवर्जून। लोक ऐकती श्रद्धेने।।८१।। पांडुरंगजी हलमारे। पिंपळखुट्याचे राहणारे। बालपणी सोबत खेळणारे। मित्र होय बाबाचे।।८२।। एकदा माघी पौर्णिमेला। आट्या-पाट्या खेळण्याला। गेले घेऊन बाबाला। पांडुरंगजी गावा बाहेर।।८३।। रात्रीचे वाजले दोन। सर्व मित्र मैदानावरून। त्वरे आले परतून। घरोघरी आपुल्या।।८४।। बाबा पांडुरंगजी सोबत। मार्गाने होते चालत। चालता चालता अकस्मात। घटना घडली साक्षात।।८५।। एक मातीचा ढेला उचलून। मारला पांडुरंगजीला फेकून। श्री संत शंकरबाबान। अचानक तयाला।।८६।। त्वरितची पांडुरंगजीनं। बघितले मागे वळुन। सर्वत्र चिरंजीचे कण।

पडले होते जमिनीवर।।८७।। तो प्रसंग बघून । पांडुरंगजी जाहले मौन । बाबा म्हणे घे खाऊन । प्रसाद समजून त्वरित।।८८।। या घडलेल्या घटनेस । सांगू नको कोणास । बाबाने दिला आदेश । पांडुरंगजीला त्या क्षणी।।८९।। पांडुरंगजीच्या मतानुसार । बाबाचा हा प्रथम चमत्कार । याआधी असा प्रकार । पाहिला नाही कधीही।।९०।। पुढे पांडुरंगजी अकस्मात । व्याधीने जाहले त्रस्त । उपचार केले समस्त । परी आराम पडेना।।९१।। असह्य वेदना दातात । होत होत्या आत । प्राण त्यागण्याचा मनात । विचार केला एकमेव।।९२।। निघून जावे घराबाहेर । अथवा पाहावी नदी, विहीर । यापरी अनेक विचार । येत होते मनात।।९३।। अचानक एक दिवस । पांडुरंगजीच्या आईस । बाबाने केली विचारपूस । पांडुरंगजीच्या प्रकृतीची।।९४।। पांडुरंगजी घरात । पडून होते अंथरुणात । वेदनांनी होते विव्हळत । काय करावे न कळे।।९५।। बाबाने आत जाऊन। काय झाले म्हणून। हात फिरविला अंगावरून। पांडुरंगजीच्या तात्काळ।।९६।। तो हात होता मायेचा । करुणा, दया, शांतीचा । भक्त, वत्सल शंकर

बाबाचा । प्रेमस्वरूप साक्षात।।९७।। ज्यापरी बालकाचे अंगावरून । हात फिरविताच मातेनं । विसरून आपले रोदन । बाळ क्षणात हासते।।९८।। त्यापरीच चमत्कार जाहला । त्वरितची पांडुरंगजीला । हळूहळू आराम वाटू लागला । वेदनांपासून।।९९।। पुढे त्या वेदनांचा । नायनाट जाहला कायमचा । जीव वाचला लाखमोलाचा । बाबाच्या कृपेने।।१००।। बाबाचे अनंत उपकार । आहेत बघा माझ्यावर । ते मी नाही विसरणार । जन्मोजन्मी निश्चित।।१०१।। एवढ्या भयंकर व्याधीतून । मुक्त केले बाबानं । मला दिले जीवनदान । देवस्वरूपे आपुल्या।।१०२।। उत्तमराव गायकी पिंपळखुट्याचे । त्यांच्याकडे बाबाने सालदारीचे । काम केले शेतीवाडीचे । भूमातेची जणु सेवा।।१०३।। नुकताच उत्तमरावचा । विवाह जाहला होता त्यांचा । त्या वेळी घडलेल्या प्रसंगाचा । वृत्तांत सांगतो तुम्हास।।१०४।। बाबा सहज एक दिवस । बोलले उत्तमरावास । पहिला मुलगा आपणास । होणार आहे निश्चित।।१०५।। पुढे नवमासानंतर । बाबाची भविष्यवाणी खरोखर । सत्य जाहली बरोबर । तयेवेळी पूर्णपणे।।१०६।। त्यानंतर बाबानं । उत्तमरावाच्या आईचा मृत्युदिन । आधीच दिला सांगून । उत्तमरावास

तेधवा।।१०७।। २९-५-१९७९। निश्चित सांगितलेल्या दिवशी। आई जाहली स्वर्गवासी। उत्तमरावाची त्याक्षणी।।१०८।। बाबाने केले भाकित। त्यापरीच घडले प्रत्यक्षात। उत्तमराव जाहले चकित। विचार करते जाहले।।१०९।। आपल्या घरी साक्षात। देव राहिले सदोदित। परी आपण होतो अंधारात। आजवरी न कळे।।११०।। यासी मुख्य कारण। आपले आहे अज्ञान। आतातरी यापुढे सावधान। राहावे भविष्यात।।१११।। उत्तमरावांची त्यानंतर। श्रद्धा जडली अपार। श्री संत शंकर बाबावर। आयुष्यभर कायमची।।११२।। इतिश्री चरणामृतग्रंथ। सतंदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। चौथा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय पाचवा

पुंडलिकराव रुद्रकार । पिंपखुट्याचे राहणार। तयांच्या अनुभवाचा सार । ऐकावा या अध्यायात।।१।। श्री संत शंकरबाबावर । त्यांचे प्रेम होते फार । त्यांनी आपली दोन एकर । शेती दान दिली आश्रमास।।२।। वृत्तीने सरळ सात्त्विक । मूळचे ते धार्मिक । तीर्थयात्रा केल्या अनेक । बाबा समवेत तयांनी।।३।। एकदा ते प्रयागला । बाबा सोबत तीर्थयात्रेला । काही भक्तमंडळी सोबतीला । होती पिंपळखुट्यावरून।।४।। त्या ठिकाणी घडलेला । प्रसंग सांगतो तुम्हाला । चित्त देवोनी ऐकावा भला । श्रोते भक्तजन हो।।५।। या प्रसंगाचे साक्षीदार । स्वयम् पुंडलिकराव रुद्राकार। ते प्रामुख्याने हजर । होते त्याठायी।।६।। चालता चालता गर्दीत । एक म्हातारी मार्गात । भटकुन गेली अकस्मात । आपल्या मेळातून।।७।। सर्वांनी मिळून तिला । शोधण्याचा प्रयत्न केला । परी तिचा नाही मिळाला । थांगपत्ता कुठेही।।८।। तिला शोधावयासी संपूर्ण । रात्र गेली

निघून। अवघे गेले थकून । तरीही शोध न लागला।।९।। त्याच घाई गडबडीत । प्रवासी गाडी रेतीत । बंद पडली नदी पात्रात । न कळे काय जाहले।।१०।। तिला चालू करावयास । प्रयत्न केले भरघोस । परी नाही आले यश । प्रयत्नांना काहीच।।११।। शेवटी टॅक्ट्रर आणूनी । काढावे बाहेर ओढूनी। विचार केला सर्वांनी । त्या वेळेस त्वरेने।।१२।। तेही प्रयत्न करून । गाडी हलेना जाग्यावरून। गाडी होती फसून । रेतीमध्ये नदीत।।१३।। सर्व प्रवासी त्या वेळेस । जाहले होते निराश । बाबा या प्रसंगास । पाहत होते दुरून।।१४।। आता म्हातारी बिगर । गाडी सुरू नाही होणार । बाबा सर्वांसमोर । बोलले सहज।।१५।। दुसऱ्या दिवशी लगबगीन । म्हातारी आली स्वत:हून । तिला बघून सारेजण । आनंदित जाहले।।१६।। सर्वांचे चेहरे आनंदानं । गेले होते फुलून । बाबाच्या भविष्यवाणीचे स्मरण । जाहले सर्वांस।।१७।। पुढे सर्वांनी आनंदानं । घेतले देवदर्शन। यथेच्छ केले भोजन । निःशंकपणे त्या स्थळी।।१८।। सर्व सामान एकत्र करून। व्यवस्थित दिले ठेवून। सर्व प्रवासी जाऊन। बसले

गाडीत॥१९॥ बाबा बोलले जे वचन । सर्वांना होते त्याचे स्मरण। पुढे काय होणार म्हणून । आतुरता होती सर्वांस॥२०॥ गाडीचालक स्थानावर। बसला येऊनी सत्वर । बटण दाबल्याबरोबर। सुरू झाली त्वरित॥२१॥ सर्वांनी बाबाच्या नावाचा। जयजयकार केला तयांचा । पिंपळखुट्याच्या दयाधीशाचा । भक्तिभावे तात्काळ॥२२॥ नदीच्या पात्रातून बाहेर । गाडी येताच मार्गावर । पाऊस आला मुसळधार । कोणास काही कळे ना॥२३॥ सर्व प्रवासी गाडीत । बोलत होते आपसात । शंकरबाबा सम संत । नाही आपल्या परिसरात॥२४॥ म्हातारी स्वत:हून । कशी आली परतून। बंद गाडी झटकन । सुरू झाली आपोआप॥२५॥ यापरी आश्चर्य अजून । नाही बघितले आपण । हे समजणे आहे कठीण । आपल्यासाठी॥२६॥ बाबा आहेत महान । आपण अगदी सान । बाबाची संगती मिळणं । हेच महाभाग्य आपुले॥२७॥ आता ही संगती आपण। आयुष्यभर ठेवावी टिकवून। निश्चितची होईल कल्याण। आपल्या जीवाचे॥२८॥ शंकरराव दिवे नावाचे । राहणारे तळेगावचे । परमभक्त ते बाबाचे ।

ऋणानुबंध पूर्वीचे।।२९।। घरची परिस्थिती सधन । समाजामध्ये मानसन्मान । मिळत होता लोकांकडून । भक्तिभाव मनामनात।।३०।। अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे । उपाध्यक्ष होते संस्थेचे । येणे जाणे होते नित्याचे । त्यांचे पिंपळखुट्यास।।३१।। त्याच कालावधीत । संबंध जुळले बाबा सोबत । शंकरराव जाहले समर्पित । बाबाच्या चरणी तत्काळ।।३२।। त्यांनी आपल्या शेतात । माता पित्याच्या स्मरणार्थ । सुंदर वास्तू बांधली त्यात । शांतीधाम नावाची।।३३।। त्याठायी दर वर्षीला । बोलावुनी साधूसंताला । नियमित करतात उत्सवाला । शंकरराव अजूनही।।३४।। भजन, कीर्तन, प्रवचन । इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन। सात दिवस सातत्यानं। होते त्या स्थळावर।।३५।। जन्मदात्याचे ऋण । याच जन्मी टाकावे फेडून । ह्या पवित्र उद्देशानं । शंकरराव करिताती।।३६।। दोन वर्षे सतत । बाबा या उत्सवात । स्वत: होते उपस्थित । भक्त मंडळी सोबत।।३७।। तिसऱ्या वर्षी अकस्मात । नापिकी जाहली शेतात। शंकरराव पडले विचारात । काय करावं म्हणून।।३८।। या वर्षीच्या उत्सवा । कोण्यापरी करावा ।

चिंता पडली शंकररावा । रात्रंदिवस चिंतेत।।३९।। एका रात्रीला अकस्मात । बाबा आले स्वप्नात । या वर्षीच्या उत्सवात । मी येणार आहे जरूर।।४०।। रात्रीच्या स्वप्नाचा दृष्टांत। सकाळी उठताच त्वरित। शंकररावाने भीत भीत। सांगितला परिवारास ।।४१।। सर्व परिवाराची बाबावर । श्रद्धा आहे भरपूर । सर्वांनी दिला धीर । शंकररावास त्या वेळी।।४२।। हा बाबाने निश्चित । दिला आहे शुभ संकेत । तुमच्या येऊन स्वप्नात । प्रत्यक्षात बोलिले।।४३।। बाबा आजवरी जे बोलले । ते सत्यची जाहले । अनेकांशी तारिले । संकटातून बाबानी।।४४।। आपली श्रद्धा बाबावर । बाबाचेही प्रेम आपल्यावर । बाबा नक्कीच धावून येणार । आपल्या संकटात।।४५।। यापरी सर्व कुटुंबानं । चर्चा केली मोकळ्या मनानं । हे सर्व ऐकून । मौन जाहले शंकरराव।।४६।। दुसऱ्या दिवसापासून । मदत येऊ लागली चहुबाजूनं । इष्ट मित्र सहकाऱ्यांकडून । उत्सवासाठी त्वरेने।।४७।। हा चमत्कार बघून । आश्चर्य वाटले मनोमन । अश्रू वाहू लागले नेत्रातून । शंकररावाच्या श्रद्धेने।।४८।। बाबा परमदयेचा

सागर । करुणेचे भंडार । बाबा साक्षात ईश्वरीय अवतार । आहे या काळात।।४९।। आता या उत्सवाचे निमंत्रण। बाबास द्यावयासी आपण। लवकर जावे निघून। पिंपळखुट्यास सत्वर।।५०।। थोडी विश्रांती घेऊन । बाबाचे घेतले दर्शन । बाबा बोलले स्वत:हून। शंकररावास मायेने ।।५१।। आम्ही तुमच्या गावास। येणार आहो उत्सवास। आश्चर्य वाटले शंकररावास। अचानक त्या वेळी।।५२।। आपण तर बाबाला। आलो निमंत्रण द्यायला। हेतू आपल्या मनातला। आधीच जाणला बाबाने।।५३।। भूत, भविष्य, वर्तमान । याचे बाबाला आहे ज्ञान । कोण कैसा घेतात जाणून । प्रत्येकासी मनोमनी।।५४।। शंकरराव दर्शन घेऊन । बसले बाजूला जाऊन । करीत होते चिंतन। घडलेल्या प्रसंगाचे।।५५।। एवढ्यात माणिकराराव हारगोडेनं। शंकररावला बाहेर बोलावून । सत्य परिस्थिती केली कथन । बाबा विषयी।।५६।। बाबा जाणार पुण्याला। दीर्घकाळ मुक्कमाला। येणार नाहीत उत्सवाला। आपल्या गावा निश्चित।।५७।। शंकरराव जाहले निराश। परत आले गावास। घरी सुरुवात झाली

उत्सवास । ठरल्याप्रमाणे।।५८।। उत्सवाच्या समाप्तीस । शिल्लक होते तीन दिवस । त्या वेळी घडलेल्या घटनेस । घ्यावे ऐकुनी श्रद्धेने।।५९।। दोन दिवस सतत । एक पुरुष साधू वेषात । उभा राहुनी दारात । हाक देई शंकररावास।।६०।। त्या वेळी घरच्या लोकांनी । अनोळखी समजुनी । दुर्लक्ष केले सर्वांनी । त्याकडे तेधवा।।६१।। शंकररावास जाहले स्मरण । बाबाचे ते वचन । उत्सवाला येतो म्हणून । तुमच्या गावी निश्चित।।६२।। परी बाबा आहेत पुण्याला । कोण्यापरी येतील उत्सावाला । गोंधळ निर्माण झाला । शंकररावांच्या मनात।।६३।। उत्सवाच्या अंतिम दिनास । काल्याच्या कीर्तनास । लोक आले ऐकण्यास । गावोगावीचे भक्तीने।।६४।। कीर्तन आले रंगात । श्रोते मंडळी आनंदात । ऐकत होते निवांत । चित्त देऊनिया।।६५।। हरी नामाच्या गजरानं । सर्वत्र चहुबाजूनं । प्रसन्न होते वातावरण । कार्यक्रमाच्या स्थळावर।।६६।। या कार्यात एकमेव । बाबांची होती उणीव । त्यामुळे शंकरराव । व्याकूळ होते मनोमनी।।६७।। त्याचा ते वारंवार । करीत होते विचार । जाहला साक्षात्कार । शंकररावास

तत्क्षणी।।६८।। बघा व्यासपीठावर साक्षात । बाबा होते उपस्थित । शंकरराव जाहले आश्चर्यचकित । बाबांना पाहुनी।।६९।। यापरी चमत्कार बघून। शंकराराव गेले गोंधळून। बाबा असावे किंवा दुजे कोण । संशय जाहला मनात।।७०।। परी बाबाने तूर्तास । सांगितले होते आपणास । येतो म्हणून उत्सवास । निश्चितची प्रेमाने।।७१।। बाबा आहेत थोर संत । लीला दाखविती अनंत । न पाहावा तयांचा अंत । आपण कधीही।।७२।। बाबाने दिले जे वचन। ते पाळले यथार्थ पूर्ण । मज पामरासी दिले दर्शन । धन्य लीला तयाची।।७३।। या घटनेपासून । भक्त शंकररावानं । घट्ट धरिले चरण । सद्‌गुरू शंकर बाबाचे।।७४।। आता शक्तिमती कमलाआजीचा । दु:ख, संकट, संघर्षाचा। वृत्तांत ऐकावा जीवनाचा। या ठायी सावकाश।।७५।। नेरपरसोपंत यवतमाळ जिल्ह्यात। त्याठायी इंगोले परिवारात। सुखी, संपन्न घरात । जन्मं जाहला तिचा।।७६।। वऱ्हयाच्या गायकवाड परिवारात । ती जाहली विवाहित । राहत होती आनंदात । त्या ठायी।।७७।। पती वासुदेवराव । त्यांचा शांत स्वभाव। त्यामुळे लोकांचा

प्रेमवर्षाव । होता त्यांचेवर।।७८।। पुढे तयांना दोन । मुले जाहली छान । त्यानंतर मात्र नशिबानं । दिली नाही साथ।।७९।। दोन्ही मुले अल्पवयात । मृत्यू पावली अकस्मात । संघर्षाला जाहली सुरुवात । कमला आजीच्या जीवनात।।८०।। लगेच काही दिवसानं । वासुदेवरावांचेही जाहले निधन। कमला आजी गेली खचून । पूर्णतः तये वेळी।।८१।। तिला त्या वेळी चहुबाजूनं । घेरले होते संकटानं। प्रसंग होता अति कठीण । तिच्यावर तये वेळी।।८२।। जैसा भूकंप आल्यावर । प्रलय व्हावा भूमीवर । त्यापरीच घडले सत्वर । कमला आजीच्या जीवनी।।८३।। ती जाहली निराधार । नव्हते कोणी द्यावया धीर । याचा ती विचार । करीत होती मनोमनी।।८४।। जोवरी वृक्ष हिरवागार । तोवरी पक्षी त्यावर । वृक्ष सुकलिया सत्वर । निघून जाती तात्काळ।।८५।। त्यापरीच आहे मानवाचे । इष्ट, मित्र सारे सुखाचे । सोबती नाही दु:खाचे । कोणीही या जगात।।८६।। गावातील पुतणे आजीस। नेहमी देऊ लागले त्रास । दारू पिऊन मारावयास । धावून येती अंगावर।।८७।। कमला आजीच्या संपत्तीवर । पुतण्यांची होती नजर । त्याचसाठी

तिच्यावर। अत्याचार होते करीत॥८८॥ ते तिला कायमची। जिवानिशी ठार मारण्याची। धमकी देत होते नित्याची। सुरा घेऊन हातात॥८९॥ आपल्या पुतण्यांच्या अत्याचारानं। कमला आजी गेली घाबरून। अन्न, पाणीही जहरा समान। भीती वाटे सर्वथा॥९०॥ आता या संकटातून। मला वाचवील कोण। याचा ती सातत्याने। करीत होती विचार॥९१॥ आता एका परमेश्वरावाचून। दूजा नाही येणार धावून। मला या संकटातून। मुक्त करावयासी॥९२॥ रंगल्या गांजल्याचा कैवारी। विघ्न विनाशक, दु:खनिवारी। यापरी वर्णिली आहे थोरी। त्याची या जगात॥९३॥ तो माझ्या संकटात। धावून येईल निश्चित। विश्वास होता मनात। कमला आजीच्या॥९४॥ बघा त्या गावात। गोपाल बाबा नावाचे प्रख्यात। साधू पुरुष होते राहत। पूर्वी पासून तेथेची॥९५॥ त्या गोपाल बाबावर। आजीची श्रद्धा अपार। तयाचांच एकमेव आधार। होता कमला आजीस॥९६॥ सत्यदेव, बाबा भारवाडीचे। अधिकारी संत त्या काळाचे। नित्य भेटीस यायचे। गोपाळ बाबाच्या॥९७॥ एकदा भर उन्हात। दोघेही

सतपुरुष अकस्मात । कमला आजीच्या दारात । पोहोचले तात्काळ।।९८।। सत्यदेव बाबाने तूर्तास । हाक दिली कमला आजीस । धोका आहे तुझ्या जिवास । याठायी निश्चित।।९९।। सत्यदेव बाबाच्या आज्ञेवरून । तयारी केली कमला आजीनं। आली पिंपळखुट्याला निघून । सत्यदेव बाबा सोबत।।१००।। बघा सत्यदेव बाबानी। आपल्या शब्द संकेतानी । घटना सांगितली समजूनी । संत शंकर बाबास।।१०१।। दोन-दोन घोट । दोन-दोन घास । करून देत जाईन । ती आपल्याले।।१०२।। कमला आजी तेव्हापासून । अगदी निर्भय होऊन । राहू लागली आनंदानं । पिंपळखुट्याच्या आश्रमात।।१०३।। आश्रमातील दैनंदिन । सर्व कार्य सांभाळून । दर्शनार्थ्यांशीही ती प्रेमानं । वागायची प्रत्यक्षात।।१०४।। सर्व सान थोर । तिला देऊ लागले आदर । पूर्वीच्या दु:खाचा विसर । पडला आपोआप।।१०५।। मध्यंतरी तिला । पोटामध्ये अल्सर झाला । उपचारासाठी अमरावतीला । पाठविले बाबानी।।१०६।। अल्सरचा फोड आत । फुटला होता पोटात । रंद जाहला होता शरीरात । सर्वत्र कमला आजीच्या।।१०७।। डॉक्टरांनी आजीस । नकार दिला उपचारास । हे कळले बाबास । तात्काळ तये

वेळी।।१०८।। तयांनी एका सेवकास। अंगारा द्यावया आजीस। पाठविले अमरावतीस। बरे वाटले त्वरीत।।१०९।। दोन-तीन दिवस सतत। अंगारा घेतला पोटात। कमलाआजी व्याधीमुक्त। जाहली तात्काळ।।११०।। दवासे दुवा महान। हे कमला आजीचे वचन। मला दिले जीवनदान। शंकरबाबाने प्रत्यक्षात।।१११।। श्री क्षेत्र पिंपळखुट्याात। शंकर बाबाचे आश्रमात। सेवा केली अविश्रांत। कमला आजीने आयुष्यभर।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। पाचवा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय सहावा

बबनराव जबंजाळ अमरावतीचे। एकनिष्ठ भक्त ते बाबांचे। साधू संताच्या भेटीचे । वेड होते तयांना।।१।। शेती-वाडी भरपूर । त्यामुळे गावातही होता आदर । आई-वडिलांचेही सुसंस्कार । होते तयांवरी।।२।। जिल्हा परिषदेच्या अंतर्गत । समाज कल्याण विभागात । विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत । होते पूर्वकाळी।।।३।। नोकरी पेशा सांभाळून । कठीण होईल शेती करणं। असे वाटे मनोमन । बबनरावाच्या वडिलांस।।४।। त्यापेक्षा सर्व शेती विकून । जावे शहरात निघून । तेथे राहावे आनंदानं । भविष्यात आपुल्या।।५।। एके दिवशी अकस्मात । काही भक्त मंडळी समवेत । शंकर बाबा आले गावात । घरी बबनरावाच्या।।६।। अति हर्ष उल्हासानं । सर्व कुटुंबाच्या सद्स्यानं ।केले शंकरबाबाचे पूजन। भक्तिभावे तयेवेळी।।७।। बाबाला शांत बघून । बबनरावांच्या वडिलानं ।आपल्या मनातील बोलून । दाखविले बाबाजवळ।।८।। वडिलांचे म्हणणे

ऐकून । बाबा बोलले हसून ।शेतीची चिंता द्या सोडून । तुम्ही कायमची।।९।। ते आम्ही पाहतो सारं । हा शेती नाही विकणार । नोकरी, शेती दोन्ही सांभाळणार । एकाच वेळी।।१०।। बाबांच्या शब्दापुढं । कशाला जावे आड । बंद करावी आपली बडबड । वाटले वडिलास।।११।। बघा तेव्हापासून । बबनरावाच्या वडिलानं ।आपला हट्ट दिला सोडून । शेती विकण्याचा।।१२।। पुढे बबनरावानं । आपली नोकरी सांभाळून ।शेती केली निर्विघ्न । बाबांच्या कृपेनी।।१३।। उत्पन्न होई भरघोस । आधार मिळाला परिस्थितीस । संपन्नता आली घरादारास । सर्व बाजूंनी।।१४।। शेतात नसता रखवालदार । चोरी ना जाई कणभर । हा बाबांचा महान साक्षात्कार । सांगतात बबनराव।।१५।। ऐसा संतसंगाचा प्रभाव । अनेकांसी येती अनुभव । परि श्रद्धा पाहिजे एकमेव । यासाठी मनोमनी।।१६।। जो संतासी आला शरण । तोची ठरला भाग्यवान। तयासीच लाभे सुखसमाधान । या जगी निश्चित।।१७।। बबनराव पिंपळखुट्यास । शंकरबाबाच्या आश्रमास । येत होते दर्शनास । अधूनमधून।।१८।। शंकरबाबा त्या काळात । लहानशा

झोपडीत । आनंदाने होते राहत । ऋषीमुनीं सारखे।।१९।। आश्रमाच्या परिसरात । गोरगरिबांची मुले शाळेत । बहुसंख्येन होती शिकत । त्या वेळी तेथे।।२०।। तेथल्याच वसतिगृहात । सर्व मुलामुलींना नियमित । भोजन-निवास मोफत । होता आश्रमाच्या वतीने।।२१।। सर्व सोयीने असोनी युक्त । परी शासनाची कसलीही मदत । किंचितही नव्हती मिळत । वसतिगृहास।।२२।। या विषयीची खंत । बबनरावाच्या मनात । सातत्यान होती सलत । एकसारखी।।२३।। यासाठी काहीतरी करावे आपण । बबनरावांना वाटे मनोमन। परी आपण पडलो लहान । या कार्यासाठी।।२४।। त्यांनी मोठे अधिकारी नेऊन । तिथले वसतिगृह दिले दाखवून । मिळावया शासनाचे अनुदान । भविष्यात नेमाने।।२५।। बघा त्या बबनरावानं । फार मोठ्या आत्मीयतेनं । भेट दिली घालून । बाबा सोबत अधिकाऱ्यांची।।२६।। त्या अधिकारी महोदयानं । बाबाला दिलेले आश्वासन । केले नाही परिपूर्ण । बबनराव जाहले निराश।।२७।। बाबा लोकांना होते सांगत । हे काम बबनरावच करतात । हे ऐकुन आश्चर्यचकित । व्हायचे

बबनराव।।२८।। शासनाच्या दरबारी । मोठे मोठे अधिकारी। मी लहानसा कर्मचारी । काय करणार।।२९।। परी बाबाच्या शब्दावर । बबनरावांचा विश्वास भरपूर । त्यामुळे सोडला नाही धीर । जराभरही तयानी।।३०।। एकोणवीसशे पंच्याण्णव साली । अद्भुत घटना घडली । तीन नवीन वसतिगृहांना मिळाली। मान्यता शासनाकडून।।३१।। एके दिवशी अकस्मात । बबनरावाचे कार्यालयात । याविषयीचा आदेश प्राप्त । जाहला पुण्यावरून।।३२।। त्यात त्यांनी तीन । प्रस्ताव मागितले नवीन । समाजकल्याण विभागाकडून । मंजुरीसाठी त्वरित।।३३।। अवघे तीनची प्रस्ताव केवळ । होते कार्यालयाजवळ। ते घेऊन सरळ । बबनराव गेले पुण्यास।।३४।। त्यात पिंपळखुट्याचा समावेश । हा योगायोगची विशेष । बबनरावाचा हर्ष । मावेना गगनात।।३५।। त्याच दिवशी त्वरित । मंजुरी मिळाली हातोहात । ती घेऊनी परत । आले अमरावतीस।।३६।। बाबा दहा वर्षांपूर्वी जे बोलले । ते आज सत्य ठरले। रात्रभर चिंतन केले । बबनरावाने बाबाचे।।३७।। एवढं काम कठीण । माझ्यासारख्या लहान माणसाकडून । शंकर बाबानं

घेतलं करवून । धन्य लीला तयाची।।३८।। या जगी संता समान । कोणीच नाही महान । ज्यासी लाभले संतचरण । भाग्यवान म्हणावे त्यास।।३९।। या देहाचे जरी झाले तुकडे । तरी न पहावे मागेपुढे । त्याविना संत सेवा ना घडे । कदापिही जीवनात।।४०।। संत साक्षात मायबाप। हरवती भवताप। तयाच्या कृपेचे मोजमाप। करणे आहे कठीण ।।४१।। ज्यासी संतकृपा लाभली । त्याची अवदशाच पळाली । फुला-फळांनी बहरली । जीवनवेल तयाची।।४२।। जया हृदयी संताचा निवास । सुख दु:ख समान त्यास । तयाचा स्पर्शही मनास । न लागू देई।।४३।। यापरी बबनरावानं । रात्र काढली जागून । सकाळी पहाटे उठून । आले पिंपळखुट्यास।।४४।। घेतले बाबाचे दर्शन । वार्ता कळविली आनंदानं । बाबा बोलले हसून । ठीक झाले म्हणोनी।।४५।। त्या सालापासून । बबनरावांच्या प्रयत्नानं । मिळत आहे अनुदान । वसतिगृहास आजही।।४६।। शंकर बाबाच्या भक्तीची ज्योत। बबनरावाच्या हृदयमंदिरात। अजूनही आहे तेवत। सातत्याने श्रद्धेने।।४७।। काशीनाथजी काळे अमरावतीचे । अनुभव सांगती स्वत:चे ।

श्री संत शंकर बाबाचे । घडलेल्या प्रसंगाचे।।४८।। एकदा मध्यरात्रीस । अचानक काशीनाथजीस । होऊ लागला त्रास । दुखू लागले छातीत।।४९।। आग पेटली सर्वांगात । असह्य होता त्रास । त्यामुळे जाहले बेहोश । काशीनाथजी त्या वेळी।।५०।। थोड्या वेळानंतर । काशिनाथजी आले शुद्धीवर । पुढे घडलेला प्रकार । सविस्तर घ्यावा ऐकून।।५१।। काशिनाथजीने आपल्या मुलास । हाक मारली तूर्तास । घेवोनी यावे अंगाऱ्यास । संत शंकर बाबाच्या।।५२।। काशीनाथजीच्या मुलानी । अंगारा दिला आणुनी । तो अंगारा काशिनाथजीनी । लावला आपल्या अंगाला।।५३।। अंगारा लावताच अंगास । वेदनांचा जाहला नाश । चेतना आली शरीरास । तात्काळ बरे वाटले।।५४।। काशिनथजींच्या मुलाने सत्वर । बसवोनी आपल्या गाडीवर । करावया उपचार । नेले रुग्णालयात।।५५।। तेथे बड्या डॉक्टरांनी । शरीराची केली तपासणी । हा 'झटका' होता म्हणुनी । सांगितले मुलास।।५६।। एवढ्या तीव्र झटक्यातून । अशक्य आहे जगणं । याचे काय असावे कारण । सांगणे कठीण आम्हासी।।५७।। जिथे विज्ञानाचा

होतो अस्त । तिथुनची अध्यात्माची सुरुवात । ऐसा निर्विवाद सिद्धांत । सांगितला विचारवंतानी॥५८॥ एखाद्या संतमहापुरुषानं । आपल्या तपोबलानं । हे सर्व आणलं घडवून । आपल्या भक्तासाठी॥५९॥ यापरी ऐकुनी संभाषण । दोन्ही नेत्र आले भरून । शंकर बाबा आले धावून । निश्चितची माझ्या संकटास॥६०॥ माझे वाचविले प्राण । मला दिले जीवनदान । कोण्यापरी त्यांचे ऋण । फेडू मी या जन्मी॥६१॥ शंकरबाबा दयेचे सागर । भक्तांचा करावया उद्धार । या जगी तयांचा अवतार । जाहला साक्षातची॥६२॥ काशिनाथजी रुग्णालयातून । घरी आले परतून । पुढे दोन-तीन दिवसानं । आले पिंपळखुट्यास॥६३॥ बाबाचे घेतले दर्शन । वार्ता केली कथन । अश्रुधारा नेत्रातून । वाहू लागल्या झरझर॥६४॥ अंगारा जाहला संजीवन । मला मिळाले जीवनदान । बाबा तुमच्या कृपेनं । धन्य तुमची लीला॥६५॥ बाबाने डोळे मिटून । सर्व घेतले ऐकून । म्हणाले डॉ. सुभेदाराकडून । उपचार घ्यावा यापुढे॥६६॥ बाबाच्या आज्ञेनुसार । काशिनाथजीने घेतला उपचार । आता त्यांची प्रकृती स्थिर । आहे पूर्वीसारखी॥६७॥

डॉ. सुभेदारांची दवा। संत शंकरबाबाची दुवा। जन्म जाहला नवा। काशिनाथजीचा।।६८।। नामदेवराव रोहणकर नावाचे। एकनिष्ठ भक्त बाबाचे। राहणारे ते राळेगावचे। यवतमाळ जिल्ह्यात।।६९।। नामदेवरावाचा परिवार। कैसा जुळला बाबा बरोबर। ऐकुनी घ्यावे सविस्तर। श्रोते सज्जन हो।।७०।। विश्वनाथजी ठाकरे धामणगावाचे। दिवाणजी टोपणनावाचे। ते भक्त होते शंकरबाबांचे। पूर्वीपासून एकनिष्ठ।।७१।। ते मावसे नामदेवरावाचे। नाते होते एकमेकांचे। त्यामुळे सर्व परिवाराचे। येणे-जाणे होते पिंपळखुट्यास।।७२।। नामदेवराव मूळचे धार्मिक। स्वभावाने सात्त्विक। सर्वाठायी प्रेमाची वागणूक। सदासर्वदा तयांची।।७३।। संत दर्शनाचा लळा। छंद नामदेवरावाचा वेगळा। न पाही दिवस, वेळा। त्यासाठी ते।।७४।। दर्शन घ्यावे, शांत बसावे। उगीच काहीच ना विचारावे। आज्ञा घेऊन परत यावे। हा नियम नामदेवरावांचा।।७५।। वर्तमान अथवा पूर्वजन्माचा। संचय असेल पुण्यकर्माचा। न मागताही मिळेल त्याचा। लाभ आपणास।।७६।। ऐसा सत्य सिद्धांत। नामदेवरावाने

जीवनात। रुजविला प्रत्यक्षात । एकमेव नेमाने।।७७।। एकदा तरी बाबास । आणावे आपल्या स्वगृहास । ऐसे वाटे नामदेवरावास । क्षणोक्षणी।।७८।। शंकरबाबा अंतर्ज्ञानी । भक्ताची इच्छा घेती जाणुनी । योग्य काळ-वेळ पाहुनी । पूर्ण करिती मनोरथ।।७९।। २००४ सालास । बाबाने स्वयम् नामदेवरावास । आम्ही आपल्या घरी राळेगावास । येतो म्हणून कळविले।।८०।। यापरी शुभवार्ता ऐकून । आनंद जाहला मनोमन । त्या आनंदाचे वर्णन । करणे आहे कठीण।।८१।। बाबाचे होताची आगमन । आसनावरी बसविले आदरानं। मनोभावे केले पूजन। सर्व परिवारानी मिळून।।८२।। बाबा आले कळल्यावर। लोक जमा झाले भराभर। गर्दी जाहली फार। नामदेवरावाच्या घरी।।८३।। प्रत्येक दर्शनार्थीस । दर्शन दिले सावकाश । शंकरबाबाने त्या वेळेस । अति प्रसन्न होऊन।।८४।। बघा परतीच्या वेळेस । शंकर बाबाने नामदेवरावास । सूचना केली तूर्तास । करावया वरचे बांधकाम।।८५।। पुढे लोकांची भारी । गर्दी होईल घरी । जागा पडेल अपुरी । आमच्यासाठी।।८६।। हा बाबाचा पूर्वसंकेत । सत्य ठरला भविष्यात । पुढे सात वर्ष सतत । बाबा आले राळेगावी।।८७।। बाबाच्या प्रेमाचे वर्णन । करावे कोणत्या

शब्दानं । हृदय येते भरून । सांगताना नामदेवरावाचे।।८८।। नामदेवरावाच्या मुलीचे लग्न । कैसे जाहले निर्विघ्न । सविस्तर घ्यावे ऐकून । या अध्यायी।।८९।। त्या दिवशी सतत । मुसळधार पाऊस सर्वत्र । एकसारखा होता पडत । धो-धो करून।।९०।। वराकडील मंडळी समस्त । पावसामुळे जाहले त्रस्त । कसे तरी झाले उपस्थित । वधुमंडपी राळेगावी।।९१।। राळेगावांत पोहचता क्षणी । चकित जाहले पाहुनी । इथे एकही थेंब पाणी । नव्हते त्या वेळी।।९२।। वधु-वराकडील मंडळीत । चर्चा रंगली आपसात । कोण्यातरी संताचा वरदहस्त । असावा वधू पित्यावर।।९३।। ते होय संत शंकर महाराज । पिंपळखुट्याचे राजाधिराज । तयाची दृष्टी फिरता सहज । विघ्ने पळतात दूर ।।९४।। राळेगावच्या आजुबाजूस । भरपूर येईल पाऊस । परी त्याचा तुम्हाला त्रास । नाही होणार किंचितही।।९५।। ऐसी भविष्यवाणी । श्री संत शंकर बाबानी । दिली होती सांगुनी । आधीच नामदेवरावास।।९६।। बाबा जे काही बोलले । त्यापरीच सर्व घडले । निर्विघ्न पार पडले । लग्न मुलीचे।।९७।। आमच्या संपूर्ण परिवारावर । बाबाचे अंनत उपकार । आमच्या जीवनाचा आधार । बाबाच असत

एकमेव।।९८।। हे सर्व नामदेवराव। आपल्या बाबाचा गुणगौरव। सांगतात लोकांजवळ। निर्भय होऊन।।९९।। एकदा संदीप रोहणकरचा। नामदेवरावाच्या पुतण्याचा। अपघात जाहला त्याचा। अकस्मात नकळे।।१००।। जहागीरपूर वरून। तो येत होता वाहनानं। आपला परिवार घेऊन। राळेगावास त्या वेळी।।१०१।। अगदी राळेगावजवळ। वाहन पलटी झाले तात्काळ। इजा जाहली किरकोळ। संदीपच्या डोक्यास।।१०२।। वाहनामध्ये अगदी कोवळं। सहा महिन्याचे होते बाळ। केवढे भारी आश्चर्य। ते होत सुरक्षित।।१०३।। संदीपला नेऊन त्वरित। भरती केले यवतमाळात। उपचाराकरिता रुग्णालयात। घरच्या लोकांनी।।१०४।। उपचार घेऊन घरी परतला। काही दिवस बरा राहिला। पुढे अचानक झटका आला। अर्धांगवायूचा।।१०५।। या वेळी संदीपला। उपचाराकरिता नेले नागपुरला। दोन लाख रुपये सांगितला। खर्च शस्त्रक्रिये करिता।।१०६।। तडजोड केली पैशांची। तारीख ठरविली शस्त्रक्रियेची। भेट घेतली बाबाची। पिंपळखुट्यास जाऊन ।।१०७।। नामदेवरावास बघून। समस्या घेतली जाणून। अंगारा दिला बांधून। बाबाने संदीपसाठी।।१०८।। तो अंगारा

नामदेवरावानी। बाबाचा प्रसाद समजुनी। खावयास दिला प्रेमानी। संदीपला त्वरित॥१०९॥ रात्रीतून घडला चमत्कार। आश्चर्य करू लागले डॉक्टर। शस्त्रक्रियेविणा जाहली दूर। व्याधी या रुग्णाची॥११०॥ बघा बाबाच्या अंगाऱ्यानं। संदीपला मिळाले जीवनदान। खर्चही वाचला संपूर्ण। दोन लोख रुपयाचा॥१११॥ बघा नामदेवराव रोहणकरांची। त्यांच्या संपूर्ण परिवाराची। आजही श्रद्धा आहे कायमची। श्री संत शंकर बाबावर॥११२॥ इतिश्री संत शंकरबाबा चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। श्री संत शंकरबाबा चरणी समर्पित। सहावा अध्याय समाप्त॥११३॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय॥

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय सातवा

भास्करराव मोहोड परतवाड्याचे । सरळ सात्त्विक प्रवृत्तीचे । तयांना वेड अध्यात्माचे । होते पूर्वीपासून॥१॥ गायत्री परिवार हरिद्वारचे । ते सक्रिय सदस्य त्या संस्थेचे । नाते होते अगदी जवळचे । भास्कररावांचे त्या ठायी॥२॥ ते अमरावती जिल्ह्यात । तळेगाव मोहना गावांत । गुणवंत बाबा कनिष्ठ महाविद्यालयात । होते प्राचार्यपदावर॥३॥ मोहोड सरांनी त्या स्थळावर । आपल्या गुरूच्या आदेशानुसार । आयोजन केले सुंदर । पंचकुंडी गायत्री यज्ञाचे॥४॥ बघा त्या यज्ञात । श्री संत शंकरबाबा अकस्मात । सौ. वसुधाताई समवेत । आले त्या ठायी॥५॥ मोहोड सर सांगतात । या आधी बाबा सोबत । एकमेकांचा आपसात । परिचय नव्हता मुळीच॥६॥ त्या कार्यक्रमा दरम्यान । सौ. वसुधाताईनं । परिचय दिला करून । मोहोड सरांचा बाबासोबत॥७॥ भिकाऱ्यासी प्राप्त व्हावे धन । अथवा भुकेल्यासी मिष्टान्न

भोजन। यापरी वाटे तो क्षण । मोहोड सरास।।८।। आंधळ्याला दृष्टिदान । बुडत्याला नवजीवन । आनंदाश्रू नेत्रातून । वाहू लागले सरांच्या।।९।। मोहोड सरांचे अंत:करण । बाबाने घेतले जाणून। जवळ बसविले आदरानं। आपल्या भक्तास।।१०।। बाबा म्हणाले सराला । तुमची शाळा आवडली आम्हाला। अशीच शाळा पिंपळखुट्याला । काढून द्यावी आपण।।११।। तुमच्या हातून गुरुदेवाची । सेवा घडू द्या कायमची । आम्ही काळजी घेतो तुमची । भविष्यात निश्चये।।१२।। उद्या यावे आश्रमात । चर्चा करावया आपसात । यापरी बोलुनी त्वरित । बाबा निघाले परत।।१३।। ठरल्याप्रमाणे मोहोडसर । दुसरे दिवशी वेळेवर । आश्रमात पोहोचले सत्वर । पिंपळखुट्यास।।१४।। रांगेत उभे राहून। बाबाचे घेतले दर्शन । मोहोड सरांनी आनंदानं । त्या वेळी श्रद्धेने।।१५।। सरांकडे बघून । बाबा बोलले हसून । आले काय म्हणून । विचारिले आदराने।।१६।। वारी करावी लागते । सारे बरोबर जमते । बाबा स्वत: सांगत होते । मोहोड सरांस।।१७।। बाबाच्या बोलण्याचा उद्देश। कळला नाही सरांस। क्रमाक्रमाने आले अनुभवास। मर्म त्या

शब्दांचे॥१८॥ बाबाने करावे मार्गदर्शन। ती गुरुआज्ञा समजून। पूर्ण करावी इमानदारीनं। मोहोड सरानी॥१९॥ बाबांच्या कृपेचे फळ। सुरू केले विद्यालय। शिक्षणाची झाली सोय। गोरगरिबांसाठी॥२०॥ चार वर्षांनंतर। बाबांचे ते शब्दाक्षर। सत्य जाहले सत्वर। निर्विवाद त्या वेळी॥२१॥ सिद्ध महापुरुषाचे बोल। ते जाणावे अनमोल। तया चरणी टेकावी भाल। आदराने, श्रद्धेने॥२२॥ शंकर बाबा अधिकारी संत। लीला दाखविल्या अनंत। तारले अनेक निजभक्त। तयांनी संकटातून॥२३॥ पुढे संस्थेच्या उपाध्यक्षपदाची। जबाबदारी महत्त्वाची। आज्ञा केली सांभाळण्याची। बाबाने मोहोड सरांस॥२४॥ यापरी विविध पदे देऊन। सेवा घेतली करवून। मोहोड सरांकडून। संत शंकर बाबानी॥२५॥ पुढे आदर्श शिक्षक म्हणून। गौरविले देशाच्या राष्ट्रपतीनं। कौतुक केले मित्र परिवारानं। मोहोड सरांचे त्या वेळी॥२६॥ सेवारूपी बीजास। अंकुर येतो योग्य वेळेस। अनुभव आला भास्कररावास। ह्या गोष्टीचा॥२७॥ सेवा कर्म जराही। वाया न जाय कदापीही। यासी आहे ग्वाही। थोर

महापुरुषांची।।२८।। जगी जे थोर झाले । ते सेवा केल्यानेच जाहले । बाकी लोभी, लबाड ठरले । सेवेविना ते।।२९।। ऐका सेवेचे मर्म । सेवा म्हणजे निष्काम कर्म। सेवा जाणावा परमधर्म। अखिल मानवाचा।।३०।। यापरी सेवेची महती। सांगितली आपणाप्रती। सेवेने शुद्ध होते मती । निश्चितची मित्रहो।।३१।। चि. स्वप्नील नावाचा । पुत्र मोहोडसरांचा । एकनिष्ठ भक्त तो बाबांचा । बालवयापासून।।३२।। परतवाड्याच्या शाळेत । इंग्रजी सातव्या इयत्तेत। स्वप्नील होता शिकत । त्या वेळी आनंदे।।३३।। एकदा तो सायकलवरून । खाली पडला घसरून । हात मोडला मध्यातून । अकस्मात कळे ना।।३४।। शेजाऱ्यांनी केली मदत । अमरावतीच्या रुग्णालयात । भरती केले त्वरित । डॉ. देशमुखांकडे।।३५।। मोडलेल्या हाडावर । बांधले पक्के प्लॅस्टर । सुटी दिली सत्वर । घरी परत जाण्यासी।।३६।। श्री संत शंकर बाबावर । स्वप्नीलची श्रद्धा अपार । तो हट्ट करीत होता फार । शंकरबाबाचे दर्शनाचा।।३७।। त्याचा आग्रह पाहून । तयारी केली मोहोड सरांनं । घ्यावया बाबाचे दर्शन । आले पिंपळखुट्यास।।३८।। बाबाच्या

पायावर । डोके टेकवता बरोबर । बाबा बोलले सत्वर । स्वप्नीलला उद्देशून॥३९॥ अमरावतीचे लाहोटी डॉक्टर । ते हात बांधतात सुंदर । एवढेच सहज उद्‌गार । निघाले बाबाच्या श्रीमुखातून॥४०॥ बाबाच्या बोलण्याचे गुपित । भास्करराव होते जाणत । त्यांनी दिला संकेत । स्वप्नीलला लगेच ।॥४१॥ स्वप्नील तुझा हात । पुन्हा तुटणार भविष्यात । भरती होशील रुग्णालयात । डॉ. लाहोटींच्या॥४२॥ मी जरी त्या वेळेस । हजर नसेल घरास । दाखवू नको इतरांस । डॉ. लाहोटी व्यतिरिक्त॥४३॥ लगेच काही दिवसांनंतर । बाबाच्या भविष्यवाणी नुसार । अपघात जाहला खेड्यावर । पूर्वीसारखाच स्वप्नीलचा॥४४॥ पुन्हा त्याच हातावर। खाली पडला जमिनीवर । हात झाला फ्रॅक्चर । दोन जागी॥४५॥ खेड्यातल्या नातेवाइकांनी । अमरावतीला नेऊनी। भर्ती केले लगबगीनी। डॉ. लाहोटीच्या रुग्णालयात॥४६॥ थोड्या विश्रांतीनंतर । प्रकृतीमध्ये जाहला सुधार । करू लागला विचार । स्वप्नील आपल्या मनात॥४७॥ आता जावे पिंपळखुट्यास । शंकर बाबांच्या दर्शनास । विचार सांगितला आपल्या पित्यास ।

स्वप्नीलने मोहीड सरास॥४८॥ संतप्रेमी मोहोडसर। सत्कार्याला न लावी उशीर। पिंपळखुट्यास ते माहेरघर। समजतात अजूनही॥४९॥ जोवरी आहे श्वासोच्छ्वास। तोवरी शंकरबाबास। विसरणार नाही मी तयास। संकल्प आहे सरांचा॥५०॥ ऐकुनी पुत्राचा विचार। त्वरित दिला होकार। निघाले मोटर सायकलवर। पितापुत्र दोघेही॥५१॥ पिता, पुत्र दोघांस। लागला होता एकची ध्यास। कधी पाहतो श्रीमुखास। संत शंकर बाबाच्या॥५२॥ दोघांसही पाहताच समोर। बाबा बोलले सत्वर। कसा बांधला हात सुंदर। डॉ. लाहोटी साहेबानी॥५३॥ आता यानंतर कधीही। तुझा हात तुटणार नाही। अप्रत्यक्ष रूपाने दोघांसही। संकेत दिला बाबानी॥५४॥ पुढे रांगेत उभे राहून। दोघांनीही घेतले दर्शन। प्रसाद दिला आनंदान। बाबाने स्वप्नीलच्या हातात॥५५॥ कसा जाहला अपघात। उपचार कोणत्या रुग्णालयात। बाबा होते विचारीत। माहिती स्वप्नील कडून॥५६॥ माहिती विचारताक्षणी। अचानक आदेश दिला बाबांनी। आताच्या आता जा निघुनी। तुम्ही दोघेही परतवाड्यास॥५७॥ यापरी आदेश ऐकून। मोहोड सर गेले

गोंधळून । प्रसंगाचे करू लागले चिंतन । आपल्या मनामध्ये।।५८।। नेहमी चहा, दूध, महाप्रसादास। बाबा विचारतात आपणास । आज का बोलतात असं । कळे ना मोहोड सरास।।५९।। यापरी वेगवेगळे । विचार येऊ लागले नवेनवे । यासाठी काय करावे । या प्रसंगी।।६०।। काळेकुट्ट ढग आकाशात । जमले होते निवांत । थेंब थेंब पाऊसही पडत । होता बाहेर।।६१।। मोहोडसर विचारी बाबास । बाहेर येत आहे पाऊस । कसे पोहोचू परतवाड्यास । आम्ही दोघेही।।६२।। सुमारे शंभर किलोमीटर । परतवाडा आहे दूर । प्रवास मोटरसायकलवर । कठीण वाटते आम्हास।।६३।। जरी येत असेल पाऊस । तरी तो तुम्हास । देणार नाही त्रास । बाबा म्हणाले भास्कररावास।।६४।। आज्ञा होताच बाबाची। वाट धरली परतवाड्याची। पुढे घडलेल्या प्रसंगाची। वार्ता ऐकावी सावकाश।।६५।। समोर पडत होता पाऊस । मागाहून सुरू होता प्रवास । आश्चर्य वाटे पिता-पुत्रांस । या गोष्टीचे।।६६।। पिता-पुत्र दोघेही जण । बाबाचे करीत होते स्मरण । बाबाच करित आहे रक्षण । सांगत होते एकमेकांस।।६७।। सडकेच्या दोन्ही बाजूंस ।

पावसाचे पाणी नालीतून । वाहत होते तुडुंब भरून । त्या वेळी।।६८।। पिंपळखुटा ते परतवाड्याचा । प्रवास झाला तीन तासांचा । परी किंचितही पावसाचा । त्रास नाही जाहला।।६९।। अंगावरचे कपडे । भिजले नाही थोडे । अगदीच होते कोरडे । पूर्वीसारखे दोघांचे।।७०।। घरात पोहोचता क्षणी । पाऊस बरसला जोरानी । पाणीच पाणी चहुबाजूंनी । जाहले सर्वत्र ।।७१।। बघा त्या पंचमहाभूतांवर । बाबाचा आहे अधिकार । प्रत्यक्ष घडविला साक्षात्कार । मोहोड सरांस।।७२।। बाबाचे शब्दरूपी कवच । रक्षण करीत होते आमचं । नाहीतर संकट होतं मरणाचं । कायमच दोघांसही।।७३।। अजूनही त्या प्रसंगाचं । ध्यानी स्मरण येताच । पाणी होत काळजाचं । सांगतात भास्करराव।।७४।। पुढे प्राचार्याच्या पदावरून । निवृत्त जाहले सेवेतून । पैसा मिळाला फंडातून । मोहोड सरांस त्या वेळी।।७५।। त्या मिळालेल्या पैशातून । पत्नीला दागिने घ्यावे बनवून । विचार केला भास्कररावानं । आपल्या मनात।।७६।। एक लाख किमतीचे। दागिने बनविले सुवर्णाचे । पत्नी सौ. शालिनीताईचे । तात्काळ भास्कररावांनी।।७७।। शालीनीताईने

आजवर । एवढे किमती अलंकार । घातले नव्हते अंगावर । या आधी कधीही।।७८।। बघा त्या शालिनीताईला । अति हर्ष जाहला । दाखवू लागली दागिन्याला । शेजारच्या आयाबायांस।।७९।। एके दिवशी अकस्मात । दागिने नव्हते आलमारीत । सारे पडले चिंतेत । शालिनीताई सहित।।८०।। दागिन्या व्यतिरिक्त । सर्व वस्तू होत्या सुरक्षित। बघा त्या आलमारीत । त्या वेळी।।८१।। प्रत्येक वस्तू काळजीनं । घेतली तपासून । परी दागिने मात्र डोळ्यानं । दिसले नाही त्यात ते।।८२।। कोण आले असावे घरात । कोणी केला असेल घात । यापरी अनेक विचार मनात । आले शालिनीताईच्या।।८३।। कोणाचा घ्यावा संशय । तोही आहे अन्याय । विनाकारणची वैरभाव । होईल निर्माण।।८४।। त्यापेक्षा जावे पिंपळखुट्यास । वार्ता कळवावी बाबास । ते सांगतील त्या उपायास । मान्य करावे ते।।८५।। सर्वांची श्रद्धा बाबावर । त्यामुळे सर्वांना हा विचार । क्षणातची पटला सत्वर। निर्विवाद सर्वांसी।।८६।। लगेच दुसऱ्या दिवशी। सर्व आले पिंपळखुट्याशी । सांगू लागले बाबासी । वार्ता घडलेल्या घटनेची।।८७।। थोडा वेळ स्तब्ध राहून । बाबाने विचारले अनेक प्रश्न । दागिने मिळतील संपूर्ण । तीन मासाने

तुम्हास।।८८।। बाबाच्या प्रत्येक शब्दावर । मोहोड परिवाराचा जबर । विश्वास आहे भरपूर । पूर्वीपासून।।८९।। आता निश्चितपणे जा गावास। बाबा बोलले भास्कररावास । होऊ नका निराश । किंचितही सर्वांनी।।९०।। परत आल्यावर गावास । सांगू लागले मित्रमंडळीस। आमचे दागिने आम्हास। मिळणार परत तीन मासांनी।।९१।। शेजाऱ्यास, नातेवाइकांस । हीच गोष्ट प्रत्येकास । सांगत होते सर्रास । मोहोड सर कुटुंबीय।।९२।। ऐसी चर्चा ऐकून । म्हणती मित्रमंडळी आप्तजन। हे निव्वळ वेडेपणाचे लक्षण । आहे मोहोड परिवाराचे।।९३।। या कलियुगात आज । एवढ्या किमतीचा ऐवज। परत करणे सहज । अशक्यची आहे।।९४।। सारे आपापल्या परीनं । बोलत होते टोचून । ते सर्व घेतले पचवून । मोहोड परिवाराने।।९५।। त्यांचा विश्वास बाबावर। होता बाबाच्या शब्दावर। मग बाबाच देतील उत्तर। ह्या सर्व प्रश्नांचे।।९६।। यापरी सहज बोलून। मानत होते समाधान। उपायची नव्हता त्याविण । मोहोड परिवारास।।९७।। पुढे एका नियोजित कार्यक्रमास । साईबाबांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेस । बाबा आले परतपाड्यास । योगा-योगाने।।९८।। भास्कररावही

त्या कार्यक्रमात । पत्नी शालिनीताई सोबत। प्रामुख्याने होते उपस्थित । त्या वेळी तेथेची।।९९।। कार्यक्रम आटोपल्यावर । विश्रांती घ्यावया क्षणभर। बाबा आपल्या भक्ताबरोबर। आले भास्कररावाच्या घरी।।१००।। बाबाचे होताच आगमन । स्वागत केले उत्साहानं। घरच्या सर्व मंडळीनं । भास्कररावांच्या।।१०१।। बाबासाठी स्वतंत्र आसन । तयार केले सजवून। त्याठायी दिले बसवून । बाबाला सरांनी।।१०२।। साधुसंत येती घरा । तोची दिवाळी दसरा। याचा प्रत्यक्ष अनुभव सारा । आला भास्कररावास।।१०३।। बघा मोठ्या आदरानं । पती पत्नी दोघांनी मिळून। धुतले बाबाचे चरण । शुद्ध जलाद्वारे।।१०४।। चरण पुसण्यास नवीन। टॉवेल आणला शालिनीताईनं। आलमारीमधून काढून । त्वरितची।।१०५।। टावेल झटकता बरोबर । सर्व दागिने भराभर। खाली पडले चरणावर। संत शंकर बाबाच्या।।१०६।। शालिनीताईकडे बघून । बाबा बोलले हसून। तुमचे दागिने घ्या तपासून । आताच या क्षणी।।१०७।। या प्रसंगाचे वर्णन । नाही होणार शब्दानं । अनन्यभावे शरण । जावे शंकर बाबास।।१०८।। जे त्या ठायी होते उपस्थित । पाहुनी जाहले आश्चर्यचकित।

ऐसा प्रसंग आयुष्यात । नाही देखिला कधीही।।१०९।। जे अनाठायी बोलले । ते अज्ञानी ठरले । विश्वासू मात्र तरले । अनुभव आला भास्कररावास।।११०।। सौ. शालिनीताईनं । घट्ट धरले बाबाचे चरण । आनंदाश्रू नयनातून । वाहत होते झरझर।।१११।। बाबांचे अनंत उपकार । आहेत माझ्या कुटुंबावर । आवर्जून सांगतात मोहोड सर । आजही निर्भयपणे ।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। सातवा अध्याय समाप्त ।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय आठवा

श्रीराम पाटील नावाचे । राहणारे कावलीवसाडचे। बाबासाहेब म्हणून ओळखायचे । लोक त्यांना।।१।। गावाला होती जमीनदारी । संपन्नता होती घरी । परिसरामध्ये दरारा भारी । होता त्यांचा।।२।। ते संत शंकरबाबाचे । एकनिष्ठ भक्त पूर्वीचे । घरदार सोडून गावाचे । राहत होते आश्रमात।।३।। त्यांना साधुसंतांच्या सेवेची । आवड होती कायमची । त्याची पूर्णता करण्याची । संधी लाभली या ठायी।।४।। ही संधी कोणासही । सहजासहजी लाभत नाही। यालाही पूर्वजन्मीचे काही । पाहिजे संचित।।५।। कावलीवसाड गाव मुळात । शंकरबाबाच्या होते विरोधात । परी पाटलापुढे हिंमत । न होई कोणाचीही।।६।। आश्रमात राहून बाबाची। सेवा करावी त्यांची। व्यवस्था करावी दौऱ्याची । ठरल्याप्रमाणे।।७।। त्याकाळी मोटारगाडीची । व्यवस्था नव्हती प्रवासाची । पायदळ वा बैलगाडीची । होती पद्धत सर्वांची।।८।। आपल्या बैलगाडीत बसवून ।

बाबाला द्यावं पोहोचवून। ठरलेल्या स्थळी पाटलानं । त्या वेळी त्वरित।।९।। ही सेवा आयुष्यभर । केली पाटलानं खरोखर। अनेक आहेत साक्षिदार । या गोष्टीचे गावात।।१०।। बघा श्रीराम पाटलानं । माझी सेवा इमानदारीनं । केली हनुमंतासमान । आजही बाबा सांगतात।।११।। परिस लोहासी स्पर्शताच । सुवर्ण होई लोहाचं । त्यापरी श्रीराम पाटलाचं । जीवन घडवले बाबाने।। १२।। सेवा कर्म कधीही । व्यर्थ वाया जात नाही । त्याचा लाभ योग्यवेळी । मिळतो निश्चितची।। १३।। एके दिवशी अकस्मातची । हर्षल नावाच्या नातवाची । वार्ता ऐकली अपघाताची । श्रीराम पाटलाने।।१४।। या अपघातामधून । तो जगणे आहे कठीण । ते दु:ख पचवणं । असह्य झाले पाटलास।।१५।। त्याच दिवशी मध्यरात्रीला । श्रीराम पाटलाला । हृदयविकाराचा झटका आला । तात्काळ मृत्यू पावले।।१६।। पाटलाच्या जीवनाचा अध्याय। समाप्त झाला एकमेव । सर्वांना आला प्रत्यय । बाबाच्या बोलण्याचा।।१७।। त्याच दिवशी रात्रीला । बाबा म्हणाले होते सर्वाला । एक प्रवासी आपल्या मधला । गळणार आहे

नक्कीच॥१८॥ रात्रीचा बाबाचा संकेत । सत्य ठरला तंतोतंत। चर्चा जाहली लोकांत । एकमात्र॥१९॥ शंकरबाबा अधिकारी संत । कळेना तयाचा अंत । अनेकांची मिटवली भ्रांत । आपल्या सामर्थ्याने॥२०॥ रामकृष्ण शेंडे नावाचे । ते बाबाच्या गाडीचे । चालक होते पूर्वीचे । सुरुवातीच्या काळात॥२१॥ ज्या परी भगवान श्रीकृष्णानी । अर्जुनाचा सारथी बनूनी । रथ हाकला आनंदानी । त्यापरीच हा रामकृष्ण जाणावा॥२२॥ सरकारी नोकरी सोडून । धरिले संताचे चरण । जीवन केले पावन । कायम स्वरूपी॥२३॥ काही दिवस सत्यदेव बाबाची । गाडी चालविली त्यांची । त्यानंतर शंकर बाबाची । सेवा केली आयुष्यभर॥२४॥ बघा ह्या रामकृष्णाजवळ । शंकर बाबाचे एकमेव । आहेत शेकडो अनुभव । तारखे सहित॥२५॥ १८-११-१९७६ । दिवस होता शुक्रवार । त्या दिवशीचा प्रकार । सांगतो रामकृष्ण॥२६॥ बाबाने रामकृष्णास । आश्रमाच्या बांधकामास । सांगितले विटा आणण्यास । वाढोण्या वरून॥२७॥ बाबाची आज्ञा घेऊन । भाड्याचे वाहन करून। बघा हा रामकृष्ण । निघाला पिंपळखुट्यावरून॥२८॥ सोबत श्रीराम

पाटील। दुजे ते गांवडे पाटील। सेवक मंडळी आश्रमातील। बापूजी वंजारी सहित॥२९॥ वाढोण्यास विटा भट्टीवर। पोहोचताच सत्वर। भट्टी मालकाने दिला नकार। विटा देण्यासी॥३०॥ म्हणे या विटाच्या आत। मला मोठा साप आहे त्यात। मजूरही खूप भितात। त्यातल्या विटा काढण्यास॥३१॥ तुम्ही तुमच्या जबाबदारीवर। विटा नेत असाल तर। मनाई नाही तिळभर। तुम्हा लोकास॥३२॥ यापरी स्पष्ट दिले सांगून। रामकृष्णास विटा मालकानं। काय करायंच ते आपण। ठरवावे तुमच्यापरी॥३३॥ रामकृष्ण आपल्या सोबत्यास। म्हणे बाबाने आपणास। पाठविले विटा आणण्यास। या स्थळावरून॥३४॥ सापाचे निमित्त करून। आपण जावे परतून। हा होईल अवमान। आपल्या हातून बाबाचा॥३५॥ बाबाला साक्षी ठेवून। आपण सर्व मिळून। विटा नेऊ भरून। पिंपळखुट्यास॥३६॥ आपण सेवक बाबाचे। कामही करीत आहोत तयांचे। मग येथे भिण्याचे। नाही कारण॥३७॥ या प्रसंगी कदाचित। आपली परीक्षा प्रत्यक्षात। घ्यावयाची असेल मनात। शंकर

बाबाच्या।।३८।। यापरी सहकाऱ्यां समवेत । चर्चा केली आपसात। त्वरितची केली सुरुवात । विटा काढावयासी।।३९।। बघा त्या विटाच्या ढिगाऱ्यातून । एक एक वीट मोजून । काढत होता हा रामकृष्ण । एकटाच भराभर।।४०।। केवळ दहा विटा अधिक। काढावयाच्या होत्या शिल्लक । नागराजाने अचानक । फुंकार मारली जोरात ।।४१।। रामकृष्ण म्हणे सहकाऱ्यास । हा बाबाचा आपणास । संकेत आहे परत येण्यास । पिंपळखुट्याला।।४२।। भरलेल्या विटा घेऊन । आश्रमात आले परतून । घटना केली कथन । बाबाजवळ सर्वांनी।।४३।। बाबा म्हणे समर्थ लहानुजीनं । तुम्हासी दिले दर्शन । तुम्ही सर्व भाग्यवान । आहात खरोखर।।४४।। लगेच बाबा म्हणे रामकृष्णास । उद्या ही गाडी चालवू नकोस। सांगून दे मालकास । गाडी नाही चालविणार।।४५।। उद्या ह्या गाडीचा अपघात। होणार आहे निश्चित। पाच माणस त्यात। मृत्यू पावतील।।४६।। रामकृष्णाने त्वरित जाऊन । सांगितले तूर्तास । बाबाच्या पूर्वसूचनेस । गाडी मालकास।।४७।। दिलीप डहाणे अडगावचा । मालक होता गाडीचा । त्याला

आपल्या श्रीमंतीचा । होता अहंकार॥४८॥ माझा ह्या गोष्टीवर । विश्वास नाही तिळभर । जर बाबा असेल खरोखर । करून दाखवावा अपघात॥४९॥ यापरी बेताल होऊन । डहाणे आपल्या मुखातून । सोडू लागला शब्दबाण । वाटेल तैसे॥५०॥ दुसऱ्या दिवशी सकाळीस । डहाणे म्हणाले रामकृष्णास। जाणे आहे अमरावतीस । किराणा आणावयासी॥५१॥ रामकृष्णा बोलला सत्वर । बाबाच्या आज्ञेनुसार । मी गाडी नाही चालवणार । आज मुळीचही॥५२॥ डहाणेच्या आतला रावण । त्याला पडू देईना चैन । रामकृष्णाचे वळविले मन । डहाणेनी तात्काळ॥५३॥ डहाणे म्हणे रामकृष्णास । तू भीत आहे मरणास । मी चालवितो गाडीस । तू बसावे माझ्याजवळ॥५४॥ रामकृष्णाने दिला होकार । गाडी काढली आश्रमाबाहेर। त्वरितची गाठले शहर । अमरावती सत्वर॥५५॥ ठरल्याप्रमाणे गाडीत। किराणा भरला आत। पाच प्रवासीही त्यात। घेतले बसवून॥५६॥ परत येताना अमरावतीवरून । गाडी धावत होती मार्गानं । नियंत्रण सुटले गाडीवरून । डहाणेचे अचानक॥५७॥ पाहता पाहता क्षणात । गाडीला जाहला

अपघात । पाचही प्रवासी त्यात । जागीच ठार जाहले।।५८।। गाडी जाहली चकनाचूर । हडाणेसही लागला मार। रामकृष्णासी मात्र जराभर। इजा नव्हती किंचितही।।५९।। या रामकृष्णाच्या शिरावर । कोणाचा तरी कृपा कर । नक्कीच असावा खरोखर । चर्चा रंगली घटनास्थळी।।६०।। एवढ्या भारी अपघामधून । रामकृष्णाचे जगणं। अत्यंत होत कठीण। शंभर टक्के पूर्णत:।।६१।। पुढे पोलीस कारवाईत । डहाणे अडकला कैचीत । उद्ध्वस्त झाला कोर्ट कचेरीत । एका अहंकारामुळे।।६२।। बघा ह्या रामकृष्णास । डहाणेनेही पोलीस केस । आपल्या नावे करण्यास । घातली होती गळ।।६३।। त्यासाठी डहाणेनं। दोन लाख रुपयाच प्रलोभन। कबूल केल स्वत:हून। रामकृष्णास तेथेची।।६४।। रामकृष्णा म्हणे डहाणेस। ही गोष्ट मी बाबास। विचारून सांगतो तुम्हास । मग निर्णय करू या।।६५।। बाबा बोलले रामकृष्णास। डहाणेच्या प्रलोभनास । तू बळी पडू नकोस । कदापिही।।६६।। एकाने केले पालन । दुसऱ्याने केले उल्लंघन । एकास मिळाले जीवनदान । पतन जाहले दुसऱ्याचे।।६७।। अहंकार हे विनाशाचे मूळ ।

डहाणेला त्याचे फळ। मिळाले बघा तात्काळ। एका क्षणात॥६८॥ आदर करणे साधूसंताचा। स्वभाव होता रामकृष्णाचा। म्हणूनच जीव वाचला त्याचा। एवढ्या भारी संकटातून॥६९॥ रामकृष्णही सांगतो आवर्जून। एवढ्या भीषण अपघातातून। मला मिळाले नवजीवन। बाबाच्या कृपेमुळे॥७०॥ एकदा मंदिराच्या भूमिपूजनास। सत्यदेव बाबाच्या भारवाडीस। संत शंकर बाबास। जाणे होते जरूर।॥७१॥ काही भक्त मंडळी बाबासोबत। बसली होती गाडीत। चालता-चालता मार्गात। गाडी अडविली सापाने॥७२॥ साप होता भयंकर। पाहताना भीती वाटे फार। फणा काढून गाडीसमोर। उभा झाला एकाएकी॥७३॥ बघा ह्या रामकृष्णानं। गाडी दिली बंद करून। एकटाच बाहेर येऊन। पाहू लागला सापास॥७४॥ गाडीमधली माणसं। भीतीने रामकृष्णास। लवकर ये म्हणती वापस। आतमध्ये गाडीच्या॥७५॥ बाबा म्हणे भक्तमंडळीस। पूर्ण होऊ द्या त्याची हौस। हा साप त्यास। काहीच नाही करणार॥७६॥ बराच वेळा गेला निघून। तरीही तो साप स्वत:हून। हलत नव्हता जागेवरून। काही केल्या त्या वेळी॥७७॥ एवढ्यात बाबाने लावले ध्यान। साप

मोठ्या कौतुकानं । बघत होता फणा काढून । एकसारखा बाबाकडे।।७८।। एकमेकांचे दृष्टी मीलन । जाहले मनोमन । नागराज गेले निघून । त्या स्थळावरून तात्काळ।।७९।। रामकृष्णाने बाबास । विचारिले सावकाश । या घटने विषयी आम्हास । सांगाव काहीतरी।।८०।। बाबा म्हणे रामकृष्णास । सत्यदेव बाबाने आपणास । दर्शन दिले सर्वांस । सापाच्या रूपात।।८१।। सत्यदेव बाबाच्या गावांत । भव्य मंदिर होणार भविष्यात । हा आहे शुभसंकेत। सत्यदेव बाबाचा।।८२।। शंकर बाबाची ही भविष्यवाणी । खरी ठरली सर्व बाजूंनी । आज भारवडीत देखणी । वास्तू उभी मंदिराची।।८३।। बघा ह्या रामकृष्णावर । शंकर बाबाचे प्रेम अपार । कायम आहे आजवर । कृष्ण सुदामा परी।।८४।। हा निरक्षर रामकृष्ण । शंकर बाबाच्या कृपेनं। भागवत कीर्तन, प्रवचन । करतो सुंदर।।८५।। ओंकारराव देशमुखांचा । बाबासोबत त्यांचा । संबंध आहे जिव्हाळ्याचा । फार पूर्वीपासून।।८६।। ते राहणारे शिराळ्याचे । साध्या, सरळ स्वभावाचे । तयांना वेड संतसंगाचे । आहे एकमेव।।८७।। संत वसंतदास लोणीचे । ते स्नेही शंकरबाबाचे । येणे जाणे तयांचे । होते पिंपळखुट्यास।।८८।।

दोघांचही एकमेकांवर । प्रेम होते अपार । याचे स्वयम् साक्षीदार । आहेत ओंकारराव॥८९॥ श्री क्षेत्र पिंपळखुट्यास । रामनवमीच्या उत्सवास। श्री संत वसंतदास । येत होते अगत्याने॥९०॥ या संताचे एक होणं । जणू गंगा-यमुनेच मीलन । ऐसा वाटे तो क्षण । आगळा वेगळा॥९१॥ हा आनंद सोहळा । प्रत्यक्ष आपुलिया डोळा । पाहिला मी अनेक वेळा । सांगतात ओंकारराव॥९२॥ एकदा ह्या संतानं। एकाच आसनावर बसून । केले भारत भ्रमण । अति आनंदात॥९३॥ जैसे संत नामदेव, ज्ञानेश्वरान । केले एकत्र। तैसेची जाणावे आपण । आम्हा दोघांसही॥९४॥ शंकर बाबाच्या मुखातून । यापरी शब्द ऐकून । अचंबित जाहले मनोमन । ओंकारराव निश्तित॥९५॥ ऐसेची एकदा आळंदीस । उटी लावतांना समाधीस । बाबा बोलले भक्तमंडळीस । हे आम्हीच आहो म्हणून॥९६॥ यावरून बााबाचा अधिकार । केवढा असावा थोर । ओळखून घ्यावा सत्वर । भाविक सज्जनहो॥९७॥ बघा केदारनाथाच्या मार्गात । संत वसंतदासाच्या छातीत । श्वास भरला अकस्मात । पायदळ चालता-चालता॥९८॥ त्या वेळी शंकरबाबानं । खेचरावरती बसून । प्रवास केला निर्विघ्न । संत

वसंतदासा समवेत॥९९॥ बघा ह्या संत द्वयानं । अनेक धर्मक्षेत्र तीर्थस्थान । बघितली एकत्र मिळून । मोठ्या उल्हासात॥१००॥ पुढे संत वसंतदास । आजारी पडले गावास । उपचारासाठी अमरावतीस । भरती केले रुग्णालयी॥१०१॥ संत शंकरबाबा तूर्तास । गेले भेटावयासी तयास । रुग्णालयी अमरावतीस । तात्काळ त्याा वेळी॥१०२॥ बघा ह्या संत द्वयानं । आपसात केलं संभाषण । ते समजणे होत कठीण । इतरास॥१०३॥ पुढे काही दिवसांत । संत वसंतदासाचे जाहले निर्वाण । एक मणी माळेतून । हरवला अकस्मात॥१०४॥ दोन संतांचा मेळ । हा योग जाणावा दुर्मीळ। आज तर एक साधू दुसऱ्याजवळ । तयार नाही बसावयास।।१०५॥ हा भेद शंकर बाबानं । एकमेव टाकला मिटवून। आयोजित करतात संतसंमेलन। रामनवमीच्या उत्सवास॥१०६॥ लहानुजीची तपोसाधना । तुकडोजीची सा. प्रार्थना । सत्यदेवाची नामोपासना । एका ठायी आणल्या॥१०७॥ माउलीची 'ज्ञान सरिता'। तुकोबाची अभंग गाथा। तुकडोजीची ग्रामगीता । याचा साधला समन्वय॥१०८॥ श्री क्षेत्र लोणीस । समाधी दिली संत वसंतदासास । त्या अंतिम क्षणास । शंकर बाबा उपस्थित॥१०९॥ शंकर

बाबाच्या उपस्थितीत । मूर्तीची स्थापना मंदिरात । संपन्न जाहली उल्हासात । लोणी क्षेत्रास।।११०।। त्या प्रसंगाचे वर्णन । सांगताना हृदय येते भरून । साक्षात मूर्तीच्याही नेत्रातून । अश्रू वाहू लागले तात्काळ।।१११।। श्रीसंत शंकरबाबानं। आपल्या तपोबलानं। चमत्कार दिला दाखवून । उपस्थितांस।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । आठवा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय नववा

अरुणभाऊ देशमुख अमरावतीचे । ते निष्ठावंत भक्त बाबाचे । १९८७ सालापासून त्याचे । संबंध बाबा सोबत॥१॥ त्यांनी आपल्या शेतात । संत्रा लावला त्यात । परी निराशा आली हातात । शेवटच्या क्षणी॥२॥ बगीचा झाला तीन वर्षांचा । दुष्काळ पडला पाण्याचा । भरोसा नव्हता जगण्याचा । शेतामधल्या बगीच्याचा॥३॥ पूर्वी जवळच्या नदीवरून । ओलित करीत होते छान । आता दुष्काळाच्या भीतीनं । चिंता वाढली तयांची॥४॥ काही गावातील शहाणे । देऊ लागले टोमणे । ते वाटे लाजिरवाणे । अरुण भाऊस॥५॥ अरुणभाऊने केला विचार । शेतामध्ये खोदावी विहीर। समस्या होईल दूर । नाहीतर कलमा होईल नष्ट॥६॥ अरुण भाऊने तात्काळ । समस्या सांगितली बाबाजवळ । बाबाने सांगितली तारीख वेळ । गावी शेतात येण्याची॥७॥ नियोजित ठरल्याप्रमाणे बाबा । शेतामध्ये आले बघा । हिंडले संपूर्ण

परिसर अवघा। अनवाणी पायाने।।८।। हिंडता-हिंडता अचानक। बाबा थांबले एकाएक । येथे पूजा करा सर्व लोक । जलदेवतेची।।९।। येथे खोदावी विहीर । पाणी आहे भरपूर। उणीव नाही पडणार । कधीही भविष्यात।।१०।। बाबा जे काही बोलले । त्यापरीच सर्व घडले । मनोरथ पूर्ण केले । अरुणभाऊचे बाबानी।।११।। आज त्या शेतात । संत्रा उभा आहे डौलात । भरपूर पाणी आहे विहिरीत । बाबाच्या कृपेने।। १२।। एकदा चांदूर रेल्वेवरून । अमरावतीला होत जाण । अरुण भाऊ निघाले जीप घेऊन । शासकीय कामानिमित्य।।१३।। अरुणभाऊ ड्रायव्हर शेजारी । बसले होते आसनावरी । अपघात घडला भारी । गाडीला मार्गात।।१४।। ड्रायव्हरच्या निष्काळजीपणानं । चिरोडी गावी गतिरोधकावरून । गाडी आदळली जोरानं । अरुणभाऊ पडले गाडीबाहेर।।१५।। कमरेला लागला मार । उठता येईना बरोबर । उचलून नेले गाडीवर । उपचार करावया अमरावतीस।।१६।। अमरावतीला डॉ. पुंडकर । नागपूरला डॉ. बाभुळकर । दोघांकडूनही केला उपचार । अरुणभाऊने त्या वेळी।।१७।। मोटारसायकल चालविण्यास । मनाई

केली काही दिवस । डॉक्टरांनी अरुण भाऊस । तात्काळ तेथे सांगितले॥१८॥ दोन महिने सर्रास। विश्रांती घेतली सावकाश। बाबा आले अमरावतीस। घरी अचानक॥१९॥ त्यांनी अंगारा दिला खाण्यास । सूचना केली अरुण भाऊस। उद्या यावे पिंपळखुट्यास । आश्रमात सत्वर॥२०॥ बाबाच्या आज्ञेनुसार । अरुण भाऊ आश्रमावर । राहिले एक महिनाभर । बाबाच्या सहवासात॥२१॥ ठीक झाला कमरेचा त्रास । सुरू केला मोटरसायकलचाही प्रवास। व्यत्यय नाही आजमितीस। बाबाच्या आशीर्वादाने॥२२॥ बघा आज त्यांची बाबावर । श्रद्धा आहे भरपूर। सेवेत नाही कसूर । कोणत्याही परिस्थितीत॥२३॥ ईश्वरसिंह ऊर्फ पेंटर । कंझस गावाचे राहणार । तालुका नांदगाव खंडेश्वर। अमरावती जिल्ह्यात॥२४॥ बघा तयांच्या वडिलांस । लकवा मारला शरीरास। प्रकृती जाहली सिरियस । एकाएकी॥२५॥ अन्न, पाणी झाले बंद । मुखावाटे निघेना शब्द । पडून होते बेशुद्ध । वडील खाटेवर॥२६॥ नातेवाईक येती पाहावयास । राहावे की परत जावे गावास । विचार न सुचे कोणास । काय करावे॥२७॥

वडिलांची अवस्था पाहून । ईश्वरसिंह आला धावून । शंकरबाबाचे घ्यावया दर्शन । पिंपळखुट्यास तेधवा॥२८॥ बाबा आश्रमाच्या परिसरात । बसले होते खुर्चीत । काही भक्त मंडळी समवेत । त्या वेळी॥२९॥ बाबाचे घेतले दर्शन । बसले सर्वांच्या शेवटी जाऊन । बाबा करी संभाषण । इतर भक्त मंडळी सोबत॥३०॥ या पेंटरच्या वडिलाचे । खाणे, पिणे, बंद झाले कायमचे । परी त्याचे तीन वर्षांचे । आयुष्य आहे शिल्लक॥३१॥ पेंटर बाबाला म्हणाले । माझे वडील मरणाला टेकले । कोण्यापरी वाचतील भले । तीन वर्षे अजून॥३२॥ बघा बाबाने पेंटरला । आपल्या जवळचा अंगारा दिला । औषधामध्ये मिसळून त्याला । सांगितले द्यावया वडिलांस॥३३॥ पेंटर सांगतात । दोन महिने सतत। अंगारा, औषध पोटात । दिला वडिलांस॥३४॥ हळूहळू प्रकृतीत । सुधार जाहला निश्चित । केवढे सामर्थ्य अंगाऱ्यात । आहे बाबाच्या॥३५॥ पुढे चार-पाच महिन्यांनं। वडिलांना आले घेऊन। घ्यावया बाबाचे दर्शन। पुत्र पेंटर आश्रमात॥३६॥ त्या वेळी पेंटर पुत्रानं । महाप्रसादाचे केले आयोजन। उपस्थितांना

दिले भोजन । क्षेत्र पिंपळखुट्यास।।३७।। पुढे तीन वर्षानं । वडिलांचे झाले निधन। सत्य जाहले वचन । संत शंकर बाबाचे।।३८।। ऐका अंगाऱ्याचे महिमान । ते मानावे संजीवन । अनेकांशी मिळाले जीवनदान । सेवन करिता तात्काळ।।३९।। सारंगधर वाढोणकर। राहणारे आमला विश्वेश्वर। तयाचा सर्व परिवार। आहे धार्मिक पूर्वीपासून।।४०।। वडील गणपतराव वाढोणकर । तयांना संतसहवास थोर । लाभला आयुष्यभर । अनेक संत महात्म्यांचा ।।४१।। श्रीक्षेत्र गुरुकुंजास । पं. तुकडोजीच्या पुण्यतिथीस । राखत होते चपला, जोड्यास । गणपतराव निःशुल्क।।४२।। ही परंपरा गाडगेबाबांची । सेवा आहे अति मोलाची । गणपतरावाला त्याची । लागली आवड आपोआप।।४३।। पुढे तयांचा पुत्र सारंगधर । पित्याचा वारसा समोर । चालवीत आहे निरंतर। क्षेत्र पिंपळखुट्यास।।४४।। दर वर्षी रामनवमीच्या उत्सवास। श्रीक्षेत्र पिंपळखुट्यास। संपूर्ण सातही दिवस । सेवा देतात सारंगधर।।४५।। आज कनिष्ठ काम करण्याची। तयारी नाही कोणाची। सेवा नीव आहे परमार्थाची। असू द्यावे

ध्यानात।।४६।। सेवा जगी श्रेष्ठ कला । त्याविना महत्त्व नाही मानवाला । कोण पुसतो तुमच्या धनाला । एवढे महत्त्व सेवेचे।।४७।। आता श्री. राजेंद्र सुळे यांचे । अनुभव ऐकावे महत्त्वाचे । ते संत शंकर बाबाचे । आहेत परम भक्त।।४८।। १९८८ सालापासून । बाबाचे लाभले चरण । ते ठेवले कोरून । सुळेनी आपल्या हृदयात।।४९।। एकदा बाबाचे प्रवचन । ऐकुनी झाले परिवर्तन । मनी जाहले आकर्षण । बाबाच्या विषयी।।५०।। एका मुलीचा अपघात । जाहला नागपुरात । मैत्रीण होती सोबत । मागे वाहनावर।।५१।। गाडीचा तोल जाऊन। दोघीही पडल्या बाजूनं । वार्ता कळली फोनवरून । मित्रा करवी घरास।।५२।। बघा मुलगी रुग्णालयात । होती बेशुद्ध अवस्थेत । सुळे बाबाचा धावा करीत । होते त्या वेळी।।५३।। मुलीच्या मैत्रिणीस । किरकोळ जखम शरीरास । ती म्हणाली सुळेस । काका घाबरू नका हो।।५४।। अचानक थोड्या वेळानं । डोळे उघडले मुलीनं । सर्वांचे झाले समाधान । विघ्न टळले म्हणून।।५५।। आई, बाबा, काका, मावशी । ती बोलली सर्वांशी । कोणीतरी माझ्या डोक्याशी । हळूच ठेवले

जमिनीवर।।५६।। सुळेने ओळखले मनात । ते होय शंकरबाबा साक्षात । आले धावुनी संकटात । धन्य लीला तयांची।।५७।। डॉक्टरानेही सांगितले आवर्जून । आता चिंतेचे नाही कारण । ठीक होईल काही दिवस । अल्पशा उपचाराने।।५८।। सुळे म्हणतात माझे गुरुदेव । लाखात आहे एकमेव । पदोपदी येतात अनुभव । मजला तयाचे।।५९।। एकदा सावरी भंडाऱ्यास । शंकरबाबा आले कार्यक्रमास । हनुमान जयंतीच्या उत्सवास । पिंपळखुट्यावरून।।६०।। बघा त्या उत्सवात । गोपीचंदजी होते उपस्थित। अन्य भक्ता समवेत । त्या ठायी श्रद्धेने।।६१।। शंकर बाबाला पाहुन । मनी जाहले आकर्षण । एकदा तरी यावे भेटुन । प्रत्यक्ष पिंपळखुट्यास।।६२।। पुढे रामनवमीच्या उत्सवास । गोपीचंदजी आले पिंपळखुट्यास। मुक्काम केला सातही दिवस। त्या समयी आश्रमात।।६३।। पाहुनी बाबाचा भक्तपरिवार। म्हणे बाबा आहेत संत थोर। आपणही करावा प्रचार। तयांचा आपल्या परिसरात।।६४।। त्यासाठी आपल्या गावात । आश्रम बांधावा हा बेत । गोपीचंदजीच्या मनात । सारखा होता घोळत।।६५।। एके दिवशी गोपीचंदजीनं । नेमका प्रसंग पाहून। आपले मनोगत बोलून । दाखविले मित्रमंडळी

समोर।।६६।। सर्वांचा मिळाला होकार । परी आधी बाबाचा घ्यावा विचार । आले बाबाजवळ सत्वर । पिंपळखुट्यास।।६७।। बाबाने दिली संमती । कार्याला मिळाली गती । उत्साह वाढला दानाप्रती । चहुबाजूनं।।६८।। कोणी दिली जागा घेऊन । कोणी दिली बोअर खोदून। कोणी दिली मोटर बसवून । त्याठायी निश्चित।।६९।। विठ्ठल वंजारी, राजेंद्र सुळे । जयरामजी ढोमणे, संतोष पोकळे । गोपाळ सेठ, शरदजी इंगळे । मिंडे साहेबा सहित।।७०।। वाल्हेकर साहेब पुण्याचे । डोंगरदाराजी राठी भंडाऱ्याचे । या सर्व दानदात्यांचे । योगदान मिळाले आश्रमास।।७१।। जवळपास एक एकर । जागा घेतली मोक्यावर । आश्रम बांधावया सुंदर । शंकर बाबाचा त्याठायी।।७२।। पुण्याचे नंदूसेठ चव्हाण । तयांनी संपूर्ण खर्च देऊन । आश्रम दिला बांधून । स्वत:च्या उपस्थितीत।।७३।। अवघ्या दीड महिन्यात । अति अल्प अवधीत । उभी केली इमारत । नंदूसेठने त्वरित।।७४।। ऐसा भक्त निष्ठावंत । मिळणे कठीण या काळात । कौतुक करावे कोण्या शब्दात । सुचेना काही एक।।७५।। प्रत्येक वर्षी महाशिवरात्रीला । गोरगरीब येतात उत्सवाला । सहकार्य करतात या कार्याला । सर्व आपल्या परीने।।७६।। श्री संत

शंकर बाबावर । इथल्या लोकांची श्रद्धा भरपूर । ते बाबाला आपला परमेश्वर । मानतात एकमेव।।७७।। जयरामजी ढोमणे सावरीचे । तयांना वेड संतसंगाचे । धरिले चरण शंकर बाबाचे । जयरामजीने।।७८।। तयांचे नित्य राहावे स्मरण । त्यासाठी जयरामजीनं । आश्रमाचे केले नवनिर्माण । आपल्या गावी सावरीस।।७९।। तेथे बाबा दरवर्षीला । येतात महाशिवरात्रीला । लाभ मिळतो गोरगरिबांला । तयांच्या दर्शनाचा।।८०।। मला माझ्या इच्छेनुसार। बाबानं दिले भरपूर । ते मला आयुष्यभर । पुरणार निश्चित।।८१।। मला नेहमी संकटात । बाबा धीर देतात । काय मागावी धनदौलत । लाज वाटते मनास।।८२।। ऐसीच कृपादृष्टी निरंतर । राहो माझ्या शिरावर । सेवा घडो आयुष्यभर । बाबाची माझ्याकडून।।८३।। हे जयरामजीचे बोल । आहेत अनमोल। जीवन करावया सफल । आहेत उभे मार्गावर।।८४।। सौ. पूनम निवार्ते। ती भोजापूरला राहते । हृदय भरून येते । तिचे अनुभव ऐकता।।८५।। तिला यम यातनेतून । सोडविले बाबानं । ती सांगते कळवळून । अनुभव सर्वांसी।।८६।। तिचा पती व्यसनाधीन । त्यामुळे तिचे जीवन । जाहले होते स्मशान । होती मनामधे खंत।।८७।। काय करावे सुचेना तिला।

कोण्यापरी सांभाळावे प्रपंचाला । मुलामुलीचे शिक्षणाला । प्रसंग होता कठीण।।८८।। पती टेकला मरणास । अनेक रोग जडले तयास । नेवुनी केले उपचारास । परी ते जाहले व्यर्थ।।८९।। पूनम जाहली हताश । परी सोडले ना धीरास । दृढ होता विश्वास । तिच्या मनी निश्चित।।९०।। अचानक नातेवाइकानं । तिला पत्ता दिला लिहून । म्हणे एकदा ये भेटून । पिंपळखुट्याचे संताला।।९१।। तो आहे दयावान । लोक येतात दुरून । झोळी देतो भरून । आपल्या भक्ताची तो।।९२।। यापरी तयाची ख्याती । पसरली आहे दूरवरती । दीन दु:खितांचा सांगाती । आहे तो एकमेव।।९३।। लगेच दुसऱ्या दिवशी । पूनम आली पिंपळखुट्याशी । भेट नाही झाली बाबाशी । काही कारणास्तव।।९४।। दोन-चार वेळा पूनमला । परत जावे लागले गावाला । परी तिने नाही सोडला । निश्चय आपलाची।।९५।। कदाचित या प्रसंगाला । बाबा आपल्या कसोटीला । पाहत असावे, विचार केला । तिने आपल्या मनात।।९६।। मग आपण का सोडावे प्रयत्नास । तिच्या मनी एकची ध्यास । एकदा बघावे शंकर बाबास । आपल्या नेत्रांनी।।९७।। एके दिवशी अकस्मात । पूनम आली आश्रमात । बाबा होते उपस्थित । योगायोगाने।।९८।। रांगेत

उभी राहून । बाबाचे घेतले दर्शन । समस्या केली कथन । तिने बाबाजवळ।।९९।। बाबा मला संकटातून। मुक्त करा आपण। विनंती करिते जीव तोडून। आपल्या चरणी।।१००।। असह्य झाले जगणं । म्हणुनी आले मी तुम्हा शरण । मजला द्यावे जीवनदान । वाचवा या संकटातून।।१०१।। बाबाने शांत चित्तानं । सर्व घेतले ऐकून । तू जा गावी परतून । ठीक होईल सर्व काही।।१०२।। त्याच दिवशी रात्रीला । अचानक चमत्कार घडला। अजूनही कळले नाही कोणाला। धन्य लीला बाबाची।।१०३।। अवघ्या एका रात्रीतून । श्री संत शंकरबाबानं । कसे वळविले असेल मन । पूनमच्या पतीचे।।१०४।। बाबाने माझ्या पतीदेवाला । वाल्याचा वाल्मीक बनविला । पूनम सांगते सर्व लोकाला । आत्मविश्वासाने।।१०५।। बाबाच्या आशीर्वादान । दोन्ही मुलींचे लग्न । केली अति थाटान । सुखी संपन्न घरात।।१०६।। माझ्या कठीण काळात । बाबाने मला दिली साथ । नाहीतर धोका होता निश्चित । माझ्या मार्गात।।१०७।। बाबाचे उपकार या जन्मात । कोण्यापरी करू परत । याचा विचार सतत । करिते भक्त पूनम।।१०८।। बाबासारखा अधिकारी संत। दुर्मीळ या कलियुगात। रंजल्या गांजल्याचे दैवत।

म्हणावे तयास॥१०९॥ असो श्रीमंत अथवा भिकारी । भेद नाही तया अंतरी । वागणूक समान बरोबरी। देतो दोघांसही॥११०॥ यासाठी विश्वास पाहिजे अटळ । तरीच लाभते त्याचे फळ । एरव्ही कितीही केली धावपळ । तरी ती व्यर्थची जाणा॥१११॥ मी बाबाचे उपकार। विसरणार नाही आयुष्यभर । बाबा म्हणजे विशाल महासागर । हे शब्दालंकार होय पूनमचे॥११२॥ इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । नववा अध्याय समाप्त॥११३॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय॥

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय दहावा

श्री. उत्तमराव बेनोडकर । अमरावतीचे राहणार । त्यांची संत लहानुजीवर । श्रद्धा आहे जिवापाड।।१।। तयांचा एकची ध्यास। प्रत्येक गुरुवारी टाकरखेड्यास। संत लहानुजीच्या दर्शनास । यावे अमरावतीहून।।२।। आपल्या देवासाठी भोजन । तयांनी आणावे नित्यनेमानं । ते भोजन अति आदरानं । सेवन करावे बाबानी।।३।। असो ऊन, वारा, पाऊस। त्याची चिंता नाही तयास। चुकू न द्यावे वारीस। कोणत्याही परिस्थितीत।।४।। आजही थकल्या वयात । उत्तमरावाचे हे व्रत। चालू आहे सतत । नित्यनियमाने।।५।। घरात श्रीमंती भरपूर । दानधर्मात अग्रेसर।बेनोडकरांचा सर्व परिवार । आहे सर्वांना परिचित।।६।। एकदा श्रीक्षेत्र टाकरखेड्यास । उत्तमराव गेले दर्शनास । नित्याप्रमाणे ठेविले नैवद्यास । बाबा समोर तयांनी।।७।। तेवढ्यात संत लहानुजी वदले । इथे एक योगीपुरुष आहे आले। त्याचे पूजन करावे लागते तुले । गंध टिळा

लावुनी।।८।। आपल्या बोटाच्या संकेतानं। तो योगीपुरुष दिला दाखवून। समर्थ लहानुजी बाबाने। उत्तमरावास त्या क्षणी।।९।। उत्तमराव त्या गर्दीमधून। पोहोचले त्याठायी त्वरेनं। वंदिले तयांचे चरण। माथा ठेवुनिया।।१०।। कपाळी टिळा लावून। मनोभावे केले पूजन। तो प्रसंग होता महान। सांगतात उत्तमराव।।११।। बघा संत लहानुजी बाबानं। या योग्याला बोलावून। बसावया दिले आसन। आपल्या शेजारी।।१२।। शंकरबाबाला राजयोगी म्हणून। संबोधिले संत लहानुजीनं। आशीर्वाद दिला भरभरून। आपल्या शिष्यास।। १३।। क्षेत्र पिंपळखुट्याच्या आसनी। हा राजयोगी बसुनी। राजवैभव भोगील जिवंतपणी। ही भविष्यवाणी गुरुदेवाची।।१४।। हे योगी नव्हते दुजे कोणी। ते होय वाल्मीक मुनी। संत लहानुजीचे शिष्य अग्रणी। श्री संत शंकरबाबा।।१५।। उत्तमराव सांगतात। या योगीया सोबत। माझा परिचय नव्हता किंचित। या आधी कधीही।।१६।। मी आहे अति भाग्यवान। माझ्या हस्ते प्रथम पूजन। जाहले बघा योगायोगानं। या सत्पुरुषाचे।।१७।। तेव्हापासून उत्तमराव।

शंकरबाबाला आपला देव। मानू लागले एकमेव । आपल्या हृदयस्थानी।।१८।। त्या वेळी शंकरबाबाचे वय। अंदाजे अठ्ठावीस असावं। यापरी सांगतात उत्तमराव। सद्भक्त बाबाचे।।१९।। एकदा उत्तमराव कामानिमित्त। करडे नावाच्या मित्रासोबत। गेले होते वाशिम जिल्ह्यात । प्रसंग ऐकावा सविस्तर।।२०।। बघा चिखली नावाच्या गावात । तिथे संत झोलेबाबा होते राहत । अधिकारी संत म्हणोनी प्रख्यात । होते त्या परिसरात।।२१।। उत्तमरावाच्या कानावर। ही वार्ता पडल्यावर। मन जाहले अधिर। तयांच्या दर्शनासी।।२२।। पूर्वीच उत्तमरावास । संत दर्शनाचा होता ध्यास । ते बोलले आपल्या मित्रास । आपले मनोगत।।२३।। प्रथम जाऊ संत दर्शनास । नंतर आपल्या कामास । उत्तमरावाच्या ह्या वचनास। होकार दिला मित्राने।।२४।। मित्राला सोबत घेऊन। उत्तमराव निघाले मार्गानं । झोलेबाबा होते बसून । एकाठायी निवांत।।२५।। दोन-चार कुत्री बाजूला। नित्य राहत होती संगतीला। संत झोलेबाबाची लीला। अवर्णनीय म्हणावी।।२६।। करडे दर्शन घेऊनी । उभे राहिले बाजूंनी । नंतर उत्तमरावाने जाऊनी ।

दर्शन घेतले बाबाचे।।२७।। दर्शन घेता बरोबर। झोलेबाबा वदले सत्वर। म्हणे पिंपळखुटा क्षेत्रावर। झेंडा फडकविला एकाने।।२८।। या माळेतला एक मणी। गेला स्वगृही निघुनी। तयाने उत्तराधिकारी म्हणुनी। नेमणूक केली तयाची।।२९।। आता हा परिवार। सांभाळिल हा योगीवर। काहीच कमी नाही पडणार। त्यासाठी तयाला भविष्यात।।३०।। बघा तयाच्या सद्गुरूनं। तयाला सर्वस्व केले अर्पण। तो दुनिया टाकील बदलून। एवढे सामर्थ्य तयाचे।।३१।। संत झोलेबाबाचे शब्द ऐकून। भक्त उत्तमराव जाहले सुन्न। म्हणे एवढ्या लांब अंतरावरून। कैसे कळले असेल।।३२।। खरे संत आत्मज्ञानी। कुठे काय चालले घेती जाणुनी। तयापुढे दूरदर्शन, आकाशवाणी। व्यर्थची जाणावे।।३३।। संत झोलेबाबा जे बोलले। ते उत्तमरावांना समजले। म्हणे लहानुजी स्वगृही गेले। शंकरबाबा आहे पिंपळखुट्यास।।३४।। दर्शन घेऊनी परतले। मनी विचार करू लागले। शंकरबाबा संत मिळाले। आपण आहोत भाग्यवान।।३५।। बघा १९७४ साली। एक अद्भुत घटना घडली। ती ऐकावी भली। चित्त देवोनी।।३६।।

उत्तमराव बेनोडकरांची। इच्छा जाहली दर्शनाची। तयारी केली पिंपळखुट्याची। अमरावतीहून त्या वेळी।।३७।। तेव्हा सत्यदेव बाबा अमरावतीस। उत्तमरावच्या घरी मुक्कामास। होते तीन-चार दिवस। नेहमी प्रमाणे।।३८।। सत्यदेव बाबाला घेऊन। घ्यावे शंकर बाबाचे दर्शन। म्हणून निघाले त्वरेनं। पिंपळखुट्यास तये वेळी।।३९।। सोबतीला घेतले मित्र दोन। रावसाहेब देशमुख। आणि दुसरे सराफ। दर्शनाच्या ओढीने।।४०।। जागा नव्हती गाडीत। आत्मारामजी करडे नावाचा भक्त। त्याला पाठविले एसटीत। आधीच पिंपळखुट्यास।।४१।। मागाहून निघाले उत्तमराव। पिंपळखुटा आले गाव। घटना घडली अभिनव। त्याठायी ती ऐका।।४२।। सत्यदेव बाबा म्हणे सर्वांस। करा शंकरबाबाचा जयघोष। गाडी निघेल सावकाश। या नाली मधून।।४३।। सत्यदेव बाबा बोलले। त्यापरीच तेथे घडले। संताचे महत्त्व कळले। गाडीमधल्या सर्वांस।।४४।। इकडे शंकरबाबा आश्रमात। आपल्या बंद खोलीत। बसले होते ध्यानात। त्या वेळी निःशब्द।।४५।। एवढ्यात अकस्मात। बाबाने करडेला

बोलाविले आत । म्हणाले मालक येत आहेत । आपल्या आश्रमात।।४६।। करडे त्वरितची उठले । दाराजवळ जाऊनी पोचले । साक्षात सत्यदेवासी बघितले। इतरांसह त्याठायी।।४७।। करडेला आश्चर्य वाटले । म्हणे बाबाला हे कसे कळले । तेव्हापासून घट्ट धरले । बाबाचे चरण तयांनी।।४८।। या घडलेल्या वृत्तांतास । करडेनी सांगितला सर्वांस। शंकरबाबाचे घेऊनी आशिष । परतले अमरावतीला।।४९।। एकदा वरखेडच्या कार्यक्रमाला । न्यायचे ठरले शंकरबाबाला । बेनोडकर होते व्यवस्थेला । सत्यदेव बाबाच्या आज्ञेनुसार।।५०।। उत्तमराव आले पिंपळखुट्याला । बाबा बसले होते ध्यानाला। तयाना विचार पडला । काय करावे म्हणून।।५१।। ध्यानामध्ये द्यावी हाक । याचाही वाटे धाक । यापरी विचार अनेक । येत होते मनात।।५२।। आता आपण स्वस्थ बसावे। काय होईल ते बघुनी घ्यावे। यापरी ठरविले मनोभावे। भक्त बेनोडकरानी।।५३।। एवढ्यात बाबाने अचानक । ध्यानातची दिली हाक । 'हो येतो मालक' । म्हणोनी साद घातली।।५४।। हे ऐकले बेनोडकरानी । आश्चर्य वाटले तया

मनी । हा काय प्रकार म्हणुनी । करू लागले विचार।।५५।। शंकर बाबा ध्यानामधून । लगेच आले उठून । आम्हाला जाव लागते म्हणून । सांगितले बेनोडकरास।।५६।। बघा त्या भक्त बेनोडकरानं । शंकर बाबाला गाडीत बसवून । नेले वरखेडला लगबगीनं । कार्यक्रमस्थळी।।५७।। हा संवाद अनेकांनी । ऐकला ध्यान देऊनी । संताची महिमा संतची जाणी । जन बोलती एकमेकास।।५८।। आम्ही तुमची टकटक । वाट बघत आहो इथं । लोकांना वाटे कौतुक । सत्यदेव बाबाचे।।५९।। हा बिनतारी संदेश । कसा कळला एकमेकांस । हे येथे आहे विशेष । भक्तजन मित्रहो।।६०।। हा प्रसंग आहे एकदाचा । भक्त उत्तमरावाच्या घरचा। सत्यदेव आणि शंकरबाबाचा । ऐकवितो तुम्हास।।६१।। हे द्वय संत येता घरी । उत्तमरावाने केली सेवा चाकरी। सत्यदेव बोलले सत्वरी । आम्ही इथे बसतो आता।।६२।। आता हे आमच्यानंतर । इथे येणार जाणार । आमचे सर्व पाहणार । पुढे भविष्यात।।६३।। हा संकेत शंकरबाबास। आपल्या परम शिष्यास। तसेच भक्त बेनोडकरास । दिला सत्यदेव बाबाने।।६४।। सत्यदेवाचे शब्द ऐकून । उत्तमराव जाहले

खिन्न । आता सत्यदेवबाबा सोडून । जाणार आपल्यास।।६५।। पुढे काही दिवसानं । सत्यदेवाचे जाहले निर्वाण । मूर्ती केली स्थापन । उत्तमरावने घरामधे।।६६।। लहानुजी आणि सत्यदेव। उत्तमरावाचे हे हृदय। आता शंकर बाबाचे पाय। घट्ट धरले तयानी।।६७।। पुढे शंकरबाबा अमरावतीस । लहानुजी, सत्यदेवाच्या उत्सवास । येऊ लागले हमखास । उत्तमरावाचे घरी।।६८।। हिरामणजी नानोटकर । मोर्शीचे राहणार । तयांना घडला साक्षात्कार । शंकरबाबाचा प्रत्यक्षची।।६९।। तयाना सतत तीन दिवस । एक शुभ्रवस्त्रधारी पुरुष । पडला असे दृष्टीस । तयाच्या देवघरात।।७०।। तयानी केला विचार । हा पुरुष कोण असणार । याचे उत्तर कोण देणार । प्रश्न पडला तयाना।।७१।। अचानक एके दिवशी । नानोटकर आले अमरावतीसी । भेटले उत्तमरावासी । तया गृही जाऊन।।७२।। पूर्वीचा होता परिचय । उत्तमरावांनी केली सोय । चहा, पाणी फराळ । देऊनी तयाची।।७३।। सांगा कसे येणे झाले । उत्तमरावानी विचारले । नानोटकरानी सांगितले। वर्णन घडलेल्या घटनेचे।।७४।। म्हणे माझ्या देवघरात। शुभ्रवस्त्रधारी सत्पुरुष । दिसत आहे सतत । तीन दिवसांपासून।।७५।। हे कोण असावे । वाटे तुम्हा

विचारावे । म्हणोनी आलो जीवेभावे । तुम्हापासी सत्वर।।७६।। तुमच्या घरी संताचा ठाव । संतचरणी तुमचा भाव । मी आहो अज्ञानी जीव । सांगा मज समजोनी।।७७।। उत्तमराव बोलले नानोटकरास । आपण जाऊ सालबर्डीस । घेऊन येऊ दर्शनास । महादेवाच्या।।७८।। दोघेही संतभक्त । लगेच निघाले त्वरित । पोहोचले सालबर्डीत । अति हर्ष मनोमनी ।।७९।। त्या आधी सालबर्डीस । आधीच होते मुक्कामास । सवे घेऊनी शंकरबाबास । सत्यदेव बाबा।।८०।। हिरामणजी नानोटकर । तसेच उत्तमराव बेनोडकर । दोघेही गेले मुक्कामावर । बाबा सत्यदेवाच्या।।८१।। तिथे हे दोघेही संत । बसुनी होते निवांत । कोण जाणील तयांचा अंत । तेची जाणे।।८२।। शंकरबाबाकडे बघून । नानोटकर म्हणे हेच होते नं । माझ्या घरी दिवस तीन । दिसले मला देवघरात।।८३।। केला साष्टांग नमस्कार । म्हणे कृपा करा आम्हावर । चला आमच्या गावी क्षणभर । नानोटकर बोलले।।८४।। भक्ताच्या आग्रहावरून । होकार दिला शंकरबाबानं । निघाले बघा सालबर्डी वरून । नानाटेकराचे घरी।।८५।। तिथे मुक्काम केला रात्रभर । सकाळी आरती नंतर । निघून गेले सत्वर । श्री संत शंकर बाबा।।८६।।

तेव्हापासून नानोटकर । बाबाचे भक्त बनले कट्टर । ते टिकून आहे आजवर । कृपाप्रसादे बाबाच्या।।८७।। शंकरराव राऊत नावाचे । राहणारे वसाडचे । ता. धामणगांव, जि. अमरावतीचे । विदर्भात राहती।।८८।। पूर्वीपासून भूमिहीन । त्यामुळे रोजमजुरी करून । जगत होते जीवन । हलाकीचे नित्य ते।।८९।। तयांना जाहला कुष्ठरोग । भोगण्या आला कर्मभोग । वाटे जगणे वैताग । शंकररावास।।९०।। एकदा बाबा वसाडला । आले होते कार्यक्रमाला। शंकरराव गेले दर्शनाला । त्याठायी बाबाच्या।।९१।। दया आली बाबाला । म्हणाले चालता काय पिंपळखुट्याला। तिथे आमच्या आश्रमाला । गुरे राखण्यास।।९२।। शंकररावने दिला होकार । बाबा घेऊन आले सत्वर। पिंपळखुट्याच्या आश्रमावर। शंकररावास।।९३।। तेव्हापासून आश्रमाचे । गुरेढोरे चारण्याचे । कार्य चालू आहे शंकररावाचे । इमानदारीने।।९४।। गुरे राखली श्रीकृष्णाने । त्यापरिच लहानुजी बाबाने । वैराग्य मूर्ती गाडगेबाबाने । कधी काळी।।९५।। सुमारे तीस वर्षांपासून। शंकरराव दैनंदिन । गुरे राखतात आनंदानं । बाबाच्या आश्रमात।।९६।। संत शंकर बाबाच्या कृपेन । कृष्ठरोगाचे जाहले निर्मूलन।

सांगतात शंकरराव आवर्जून । अनेक लोकांशी।।९७।। गोसेवेचे लाभले फळ । आश्रमाचा महाप्रसाद दुर्मीळ । सतत खाऊनी निघाला मळ । कृष्ठरोगाचा।।९८।। नाही घेतली दवा। ही होय शंकरबाबाची दुवा। मज मिळाला जन्म नवा । हे शब्द शंकररावाचे।।९९।। सर्वांनी केला तिरस्कार । झालो होतो निराधार । बाबानी दिला आधार । म्हणुनी आहे जिवंत।।१००।। देवरावजी डोळस टाकरखेडचे । ते भक्त लहानुजीचे । येथे त्यांच्या अनुभवांचे । ऐकावे वर्णन।।१०१।। शंकरबाबा पूर्वीस । आपल्या गुरूंच्या भेटीस । जात होते टाकरखेड्यास । अधून मधून।।१०२।। दर्शन घेतल्यानंतर । बाबा बसायचे दुकानावर । डोळसाच्या शेजारी दूर । आपल्या तंद्रीत।।१०३।। एकदा देविदास डोळसानां । विनंती केली कर जोडून । माझा डबा आला घरून । भोजन करावे आपण।।१०४।। शंकरबाबा म्हणाले डोळसाला । मालकाचा आदेश नाही आम्हाला । यापरी काही वेळा घडला । अनुभव डोळसांना।।१०५।। पुढे काही दिवसानं । शंकरबाबा पूर्वीप्रमाणं । दुकानावर बसले येऊन । डोळसाच्या नित्याने।।१०६।। तेव्हा बाबा स्वत:हून । बोलले डोळसाला आवर्जून। तुमच्या घरी

जाऊ आपण । आश्चर्य वाटले डोळसाना।।१०७।। हा कोणीतरी सत्पुरुष । असावा वाटले डोळसास । घरी नेऊन दिले फराळास । आदरान तयाने।।१०८।। एके दिवशी घटना घडली । ती डोळसाने बघितली । ती ऐकावी भली । चित्त देऊनिया।।१०९।। लहानुजीने आवाज दिला । है क्या कोयी लेनेवाला । कोणीही नाही उठला । शंकरबाबा व्यतिरिक्त।।११०।। प्रत्यक्ष लहानुजीबाबानं । शंकर बाबाला नेऊन । नारळ, दुपट्टा देऊन । सत्कार केला तयांचा।।१११।। आज मला लहानुजी बाबानं । प्रसाद दिला म्हणून । सांगू लागले श्रद्धा भावानं । डोळसांना त्या वेळी।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। दहावा अध्याय समाप्त।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय अकरावा

श्री नंदूसेठ चव्हाण पुण्याचे । एकनिष्ठ भक्त बाबांचे । त्यांच्याकडे बाबांच्या अनुभवांचे । भांडार आहे भरून॥१॥ त्यांच्या अनुभवांचे केल्याशी वर्णन । स्वतंत्र ग्रंथची होईल निर्माण । म्हणून थोडक्यात करतो कथन । त्यांचे अनुभव या ठायी॥२॥ परमार्थाचे बीजारोपण । आधीच होते करून । नंदूसेठच्या मातापित्याकडून । त्यांच्या घराण्यात॥३॥ त्यामुळे नंदूसेठला प्रामुख्यानं । देवधर्माविषयीचे आकर्षण । मुळातची होते बालपणापासून । श्रोते जनहो॥४॥ एकोणवीसशे चव्ऱ्याण्णवला । संत शंकरबाबा पुण्याला । दळवी साहेबांच्या घराला । होते मुक्कामास॥५॥ शंकरराव जाधव पुण्याचे । ते मित्र नंदूसेठ चव्हाणाचे । त्यांनी नंदूसेठला दर्शनाचे । कळविले फोनवरून॥६॥ नंदूसेठने त्वरित जाऊन । घेतले बाबांचे दर्शन । दुसऱ्या दिवशी घरी आणून । केले पूजन श्रद्धेने॥७॥ नंदूसेठला तेव्हापासून । बाबा विषयी आकर्षण । जाणवू लागले

प्रकर्षानं। आकस्मिक निश्चित।।८।। आजही बाबाचे होताची स्मरण। सर्व कामे बाजूला सारून। त्वरित येतात पुण्यावरून। पिंपळखुट्याला दर्शनास।।९।। बघा मनोज नावाचा। धाकटा पुत्र नंदूसेठचा। नेहमी हट्ट करायचा। बाबाच्या फोटो विषयी।।१०।। नंदूसेठच्या घरात। दोन वेगवेगळ्या वेषात। फोटो ठेवलेले आहेत। संत शंकर बाबांचे।।११।। एक फोटो पूजेत। दुसरा एका खोलीत। जेथे बाबा मुक्कामाला असतात। पुण्याला आल्यावर।।१२।। त्या खोलीमधल्या फोटोबाबत। बाळ मनोजच्या मनात। वेगळीच शंका होती घोळत। कोण जाणे।।१३।। मनोज आपल्या आईबाबास। सांगत होता रात्रंदिवस। खोलीतला फोटो बदलण्यास। वारंवार तये वेळी।।१४।। हा फोटो शंकरबाबांचा। मुळीच नव्हे म्हणायचा। आईबाबाला त्याच्या बोलण्याचा। अर्थची कळेना।।१५।। आई-वडिलांनी त्याच्या बोलण्यावर। दुर्लक्ष केले क्षणभर। हा बालहट्टाचा प्रकार। आहे म्हणती।।१६।। लगेच काही दिवसांनंतर। वेगळाच घडला चमत्कार। मनोज कापू लागला थरथर। अचानकची घरात।।१७।।

यापरी बघुनी प्रकार। नंदू सेठचा संपूर्ण परिवार। घाबरून होता फार। त्या वेळेस।।१८।। लगेच थोड्या वेळानंतर। मनोज आला शुद्धीवर। सांगू लागला सविस्तर। वर्णन घडलेल्या प्रसंगाचे।।१९।। म्हणे मी खोली उघडता क्षणी। बाबा होते आत बैसुनी। माझे नेत्र गेले दिपवुनी। त्यांना पाहिल्यावर।।२०।। बाबाने साक्षात येऊन। मला घडविले दर्शन। भ्रांती दिली मिटवून। माझ्या मनातील।।२१।। आता यापुढे मी कधीही। खोलीमधल्या फोटोविषयी। उच्चारणार नाही शब्दही। आयुष्यात केव्हाही।।२२।। मनोज त्या प्रसंगापासून। त्या खोलीमधल्या फोटोचे पूजन। स्वयंमची करतो दैनंदिन। अति श्रद्धा भावाने।।२३।। शेकडो मैलांवरून। आपल्या निजभक्तांचे मन। तात्काळ घेतले जाणून। संत शंकरबाबाने।।२४।। मनोज होता पुण्यात। शंकर बाबा पिंपळखुट्यात। कोण्यापरी हे गुपित। जाणले बाबाने।।२५।। संत शंकरबाबांचा अधिकार। नंदूसेठ जाणत होते थोडेफार। या घटनेमुळे त्यांची बाबावर। श्रद्धा जाहली बळकट।।२६।। तुम्ही मागच्या जन्माचे। सौगंडी होते आमचे। यापरी बोलणे बाबांचे।

नंदूसेठने ऐकले अनेकदा॥२७॥ बाबांचा अधिकार ओळखून। नंदूसेठ तेव्हापासून। बाबासवे अति आदरानं। आजही वागतात सांभाळून॥२८॥ तब्बल सहा वर्षेपर्यंत। मला बाबा कळलेच नाहीत। यापरी ते सांगतात। नंदूसेठ आजही॥२९॥ नियमितपणे पिंपळखुट्यास। प्रत्येक वर्षी रामनवमीस। विसरत नव्हते येण्यास। त्या काळातही॥३०॥ बाबांनी जेवढे विचारावे। मोजक तेच सांगावे। त्यापेक्षा अधिक न बोलावे। बाबासवे नंदूसेठने॥३१॥ कधी बाबांची मुद्रा बघून। काय बोलावे म्हणून। शब्दही फुटेना मुखातून। कित्येक वेळा॥३२॥ नंदूसेठचा अवघा परिवार। अपार प्रेम करतो बाबावर। शंकरबाबाही त्याच्या परिवारावर। लक्ष ठेवतात सातत्याने॥३३॥ पुढे नंदूसेठच्या मेहुण्याचा। अपघात जाहला गाडीचा। त्यामध्ये त्यांचा जगण्याचा। भरोसा नव्हता किंचितही॥३४॥ त्यांना उपचारासाठी त्वरित। भरती केले रुग्णालयात। व्यवस्था केली पैशासहित। ऑपरेशन करावया॥३५॥ नंदूसेठ त्या वेळेस। पुण्यावरून पिंपळखुट्यास। शंकर बाबांच्या भेटीस। लगेच आले

निघून।।३६।। वार्ता सांगितली बाबास । बाबाने अंगारा दिला रुग्णास । नंदूसेठ आले पुण्यास । परतुनी त्वरेने।।३७।। नंदूसेठने रुग्णास । अंगारा दिला खावयास । रुग्णाच्या उपचारास । नंतर झाली सुरुवात।।३८।। रुग्णाची अवस्था बघून । तेथील डॉक्टर मंडळीनं । शंका दिली सांगून । रुग्णाला वाचविण्याची।।३९।। रुग्णाचा संपूर्ण परिवार । जाहला होता चिंतातूर । नंदूसेठ मात्र स्थिर । होते त्या वेळी।।४०।। लगेच श्री. नंदूसेठनं । संत शंकर बाबांचे स्मरण । सुरू केले मनोमन । रुग्णालयात श्रद्धेने ।।४१।। शस्त्रक्रिया संपल्यावर । रुग्णासी काढले बाहेर । आणून ठेविले बेडवर । विश्रांती घ्यावयास।।४२।। थोड्या अवधीनंतर । रुग्ण आला शुद्धीवर । उठून गेला बाहेर। बहिर्दिशेसाठी एकटा।।४३।। नंदूसेठ त्वरितची बोलले । म्हणे आता विघ्न टळले । शंकर बाबाने दिले । जीवनदान रुग्णास।।४४।। शंकर बाबा योगेश्वर । आहे दयेचा सागर । निज भक्तांचा आधार । या जगामाजी।।४५।। जयाने तयासी ओळखले । तयाचे भाग्यची फळा आले। अनेकांशी अनुभव आले । मनी भक्ती म्हणोनी।।४६।। ऐशा

महासंताशी शरण । जावे अभिमान सोडून। तरीच होईल कल्याण । या नर जन्माचे।।४७।। भक्तांची ऐकताच हाक । धावुनी जातो हा जगन्नायक । किती सांगावे कौतुक । ह्या माय माउलीचे।।४८।। रुग्णास देऊनी जीवनदान । मुक्त केले संकटातून । नंदूसेठ तेव्हापासून । समर्पित बाबा ठायी।।४९।। संत शंकरबाबा एकमेव । नंदूसेठचे श्रीगुरुदेव । त्याविणा अन्य दुजे नाव । नाही त्यांच्या मुखात।।५०।। बघा नंदूसेठच्या मनात । सारखा विचार होता घोळत। पिंपळखुटा आहे विदर्भात। दूर पुण्यापासुनी।।५१।। शंकर बाबांच्या दर्शनास । पुण्यातील भक्तांस । बराच लांब प्रवास । करावयास लागतो।।५२।। त्याकरिता आपण पुण्यात । एखाद्या लहानशा घरात । सत्संग केंद्र करावे स्थापित । शंकर बाबांच्या स्मरणार्थ।।५३।। सान-थोर पुण्यातील । त्या ठायी येतील। त्यानिमित्ताने होईल । प्रचारही शंकर बाबांचा।।५४।। नंदूसेठने एकेदिवशी । ही कल्पना पानकर साहेबांशी। बोलून दाखविली जशी । निर्भयपणे भक्तीने।।५५।। पानकर साहेबांनी त्यावर । विचार मांडला सुंदर । बाबांचे बांधूया मंदिर। कायमस्वरूपी

पुण्यामध्ये।।५६।। लगेच श्री नंदूसेठनं । अकरा गुंठे जमीन । मंदिरा करिता दान । कबूल केली त्वरित।।५७।। त्या वेळी नंदूसेठच्या मुलाचा । प्रसंग होता विवाहाचा । त्यामुळे शंकर बाबांचा । मुक्काम होता पुण्यामध्ये।।५८।। पुण्यातील भक्त जमवून । बाबांच्या हस्ते भूमिपूजन । नंदूसेठने घेतले आटोपून। त्या वेळी आनंदे।।५९।। हाती काठी घेऊन । शंकरबाबा फिरले चहूबाजूनं । एके ठिकाणी थांबून । येथेच बांधा मंदिर।।६०।। बाबांच्या आज्ञेनुसार । मंदिराचा नकाशा केला तयार । कामासी लागले कारागीर । अति वेगाने।।६१।। बांधकाम येता जमिनीवर । मंदिराच्या समोर। जागा नाही उरणार । लक्षात आले त्या वेळी।।६२।। नंदूसेठला पडला विचार । आता या अपुऱ्या जागेवर । मंदिर नाही होणार । निश्चितची।।६३।। पिंपळखुट्याला येऊन । बाबाला कळविले वर्तमान । बघा त्या नंदूसेठनं । तात्काळ।।६४।। बाबाने त्वरित दिले सांगून । अवघी चिंता द्या सोडून । मंदिर अवश्य होईल निर्माण । त्याच जागेवर।।६५।। श्री क्षेत्र पिंपळखुट्याहून । नंदूसेठ आले परतून । चमत्कार घडविला बाबानं । एकाएकी

निःशंक।।६६।। श्री. पानकर साहेबानं । तीन गुंठे जमीन । दिली विकत घेऊन । मंदिराच्या समोर।।६७।। लगेच श्री. मिंडे साहेबानं । स्वत:ची दहा गुंठे जमीन । जी मंदिराला होती लागून । दिली दान करून।।६८।। आता मंदिराच्या चारही बाजूनं । प्रशस्त जागा झाली छान । सर्व चिंता गेली मिटून । अवघ्या भक्तांची।।६९।। अवघ्या चार महिन्यांत । मंदिर उभारले त्या जागेत । सारे लोक आश्चर्यचकित । जाहले बघून।।७०।। सर्वश्री नंदूसेठ चव्हाण, वाल्हेकर। भिडे, दांगट आणि पानकर। दादासाहेब चव्हाण, कोकरे गुरुबंधूवर। जाधव, भाऊ काळे सहित ।।७१।। सर्व पुण्यातील भक्त मंडळीन । आपल तन-मन-धन। अर्पण केले स्वखुशीनं । या मंदिरा करिता।।७२।। आपुल्या सद्गुरूचे ऋण । फेडले गुरुदक्षिणा देऊन । कृतार्थ केले जीवन । तयांनी आपले।।७३।। देहू, आळंदी, महातीर्था शेजारी । पुण्यवंत लोकांची नगरी। यापरी पुणे शहराची थोरी । बोलल्या जाते।।७४।। अशा या पुण्य नगरीत। ज्ञानोबा, तुकोबा, समवेत । बैसविला पिंपळखुट्याचा महासंत । पूज्य शंकर बाबा।।७५।। राजेश मिंडे नावाचे । राहणारे पुण्याचे । परमभक्त ते बाबांचे । आहेत एकमेव।।७६।। पुण्यामध्ये

पती-पत्नीचा । व्यवसाय आहे वकिलीचा । आशीर्वाद मिळाला बाबांचा । दोघासही श्रद्धेने॥७७॥ सन दोन हजार सालास । बाबा आले पुण्यास । नंदूसेठच्या घरी मुक्कामास । भक्तमंडळीस घेऊन॥७८॥ नंदूसेठने मिंडे साहेबास । शंकरबाबांच्या दर्शनास । आग्रह केला येण्यास । दूरध्वनी करून॥७९॥ त्या वेळी मिंडेसाहेब कामात्त । बसले होते कार्यालयात । तिथून निघाले त्वरित । घरी नंदूसेठच्या॥८०॥ बाबांच्या दर्शनास । बरेच भक्त त्या वेळेस । जमले होते त्या स्थळास । एकत्रित होऊनि॥८१॥ दर्शन घेताच बाबानं । तुम्ही केव्हा आलात म्हणून । विचारले अति प्रेमानं । मिंडे साहेबांसि॥८२॥ ते शब्द माझ्या अंत:करणात । ठसले जावुनी आत । तेव्हापासून मी बाबाच्या सेवेत । आहे अखंडित॥८३॥ मिंडे साहेब या शब्दात । आपला अनुभव सांगतात । अफाट सामर्थ्य आहे वाणीत । बाबांच्या म्हणून॥८४॥ त्या वाणीत आहे आकर्षण । कोमलता तिचा मुख्य गुण । म्हणून तिला अमृतवाणी म्हणून । ओळखतात सर्वत्र॥८५॥ त्या वाणीत आहे मधुरता । त्या वाणीत आहे सहिष्णुता । त्या वाणीत आहे ममता । या विश्वाची॥८६॥ त्या वाणीत आहे समता । त्या वाणीत आहे

अखंडता । गंगाजलासम पवित्रता । आहे तिच्यात।।८७।। त्या वाणीच्या प्रभावानं । कित्येकांचे जाहले कल्याण । अनेकांचे प्रारब्ध गेले बदलून । भक्तीमुळे तात्काळ।।८८।। मध्यंतरी त्यांच्या घरात । विघ्न आले होते अकस्मात । पती-पत्नीचे आपसात । नव्हते जुळत मनाने।।८९।। दोघांचाही एकमेकांपासून । दुरावा झाला होता निर्माण । त्यामध्ये बाबाने मध्यस्थी करून । दिले जुळवून।।९०।। बघा त्या प्रसंगास । बाबा बनले न्यायाधीश । निर्णय दिला वकील दांपत्यास । मार्ग दिला सुखाचा।।९१।। दुरावलेले दोन मन । एका ठायी दिले आणून । श्री संत शंकर बाबानं । आपल्या सामर्थ्याने।।९२।। आयुष्यात कठीण प्रसंगास । कोण्यापरी समोरे जावे त्यास । मार्गदर्शन केले मिंडे साहेबास । बाबाने त्या वेळी।।९३।। निराशेला दूर सारून । नवचैतन्य केले निर्माण । श्री सद्गुरू शंकर बाबानं । मिंडे साहेबांच्या जीवनात।।९४।। आज मिंडे साहेबांचे जीवन । आनंदाने गेले बहरून । शंकरबाबांच्या कृपेनं । कायमस्वरूपी निश्चित।।९५।। पुण्यामधल्या बाबांच्या आश्रमास । मिंडे साहेबाने त्यास । सहयोग दिला भरघोस । गुरूंच्या प्रेमाखातर।।९६।। बाबांचे अनंत उपकार । जाहलेत आपल्यावर । त्याकारणे

सत्वर । उपाय योजिला मनात।।९७।। बघा मिंडे साहेबानं । आपली दहा गुंठे जमीन । आश्रमाला दिली दान । तात्काळ श्रद्धेने।।९८।। मिंडे साहेब ह्या व्यतिरिक्त । बाबांच्या प्रत्येक कार्यात । आवर्जून सहयोग देतात । आपल्या स्वच्छेने।।९९।। सर्व काही सुरळित । चालू असता आनंदात । विघ्न आले अकस्मात । मिंडे साहेबांवर।।१००।। बघा आजार आणि विघ्न । तयांना नको निमंत्रण। ते येतात स्वत:हून । आपल्या दारात।।१०१।। अशातलाच प्रकार। ओढवला मिंडे साहेबावर । ऐकून घ्यावा सविस्तर । चित्त देऊनी।।१०२।। मिंडे साहेबाच्या मामे भावानं । खोटा आरोप लावून। नोटीस पाठविली कोर्टातून । मिंडे साहेबास।।१०३।। मामेभावाची जमीन । हडप केली मिंडे साहेबानं । असा आरोप होता लिहून । नोटिशीत वकिलाच्या।।१०४।। तो मजकूर वाचून । मिंडे गेले घाबरून । करू लागले चिंतन । शंकरबाबाचे त्या वेळी।।१०५।। बाबा मी आहे निर्दोष । सत्य सांगतो तुम्हास। तुम्हीच माझे न्यायाधीश । संकटातुनी सोडवा।।१०६।। त्याच दिवशी मध्यरात्रीला । स्वप्न पडले मिंडे साहेबाला । शंकरबाबा आले घराला । साक्षात दृष्टीसमोरी।।१०७।। मिंडे साहेबाने घडला प्रकार । सांगितला

बाबास सत्वर। बाबा रागावले मामेभावावर । अति जोरात सांगती।।१०८।। काय रे आमच्या साहेबावर । खोटी केस केला तू तयार। त्वरित घे माघार। तुझी केस कोर्टातून।।१०९।। तत्क्षणी मामेभावानं । होकार दिला मान हलवून । बाबा गुप्त झाले तेथून । कोठे गेले कळेन।।११०।। दुसरे दिवशी त्वरित । मामेभाऊ एका मध्यस्थी सोबत। माफी मागण्याच्या तयारीत । आला मिंडे साहेबाकडे।।१११।। मिंडे साहेब जाहले चकित । बाबा कोण म्हणावे साक्षात । ते भक्तांच्या संकटात । धावोनी येतात निरंतर।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । अकरावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय बारावा

बळीरामजी दळवी पुण्याचे । अत्यंत सात्त्विक वृत्तीचे । वागणे त्यांचे अति प्रेमाचे । इतरांच्या बरोबर।।१।। एकोणवीसशे एकोणसत्तर साली । सैन्यदलातून निवृत्ती झाली। नंतर पुण्याला नोकरी मिळाली । पोलीस दलात।।२।। तिथे काही वरिष्ठांशी । मतभेद झाला तयांशी । बदली झाली अमरावतीसी । तडकाफडकी विदर्भात।।३।। शेषराव टाके नावाचा । रहिवासी तो अमरावतीचा । ड्रायव्हर तो सत्यदेव बाबांचा । होता पूर्वीचा।।४।। तो दळवी साहेबा सोबत । नोकरीला होता पोलीस दलात । त्याचे मैत्रीचे नाते सोबत । होते दळवी साहेबांचे।।५।। एकोणवीसशे पंच्याऐंशीला । दळवी साहेबांच्या धाकट्या मुलाला। गंभीर स्वरूपाचा आजार जडला । एकाएकी न कळे।।६।। संत अंबादास बाबा नावाचे । ते शेषरावाच्या परिचयाचे। मुलाला त्या ठिकाणी नेण्याचे । ठरविले शेषरावाने।।७।। श्री शेषराव टाकेनी । अंबादास बाबांच्या

उपचारांनी । आजार बरे होतात म्हणूनी । ऐकले होते कधी - काळी।।८।। तिथे दोन-चार वेळा नेऊनही । आजार बरा झाला नाही । वाया गेले प्रयत्न सर्वही । त्या वेळी निश्चित।।९।। शेषराव टाके संतभक्त । त्यांना गावोगावीचे संत । बरेच होते माहीत । विदर्भातील सर्वही।।१०।। श्री ज्ञानेश्वर केनेच्या घरी । पिंपळखुट्याचे संत मुरारी । संत शंकर बाबांची वारी । होतसे अधून-मधून।।११।। शेषराव टाकेच्या कानावर । ही वार्ता होती थोडीफार। तयाने दळवी साहेबाबरोबर । चर्चा केली यावर।। १२।। दळवी साहेबाने त्वरित । होकार दिला क्षणात । चिरंजीव समीरला सोबत । घेऊन आले त्या ठायी।। १३।। शंकर बाबाने बघून । त्वरित दिले सांगून । ठीक होऊन जाईन । थोड्या दिवसांत।।१४।। बाबांचे शब्द ऐकून । दळवी साहेबांचे अंतःकरण । एकाएकी आले भरून । देव जणू बोलला।।१५।। कारण मुलाचा हा आजार । होता अति गंभीर । बरा होण्याची तिळमात्र । नव्हती कोणा शाश्वती।।१६।। त्यामध्ये बाबाने पाहता बरोबर । केवढा मोठा आधार । देवुनिया केले स्थिर । क्षणार्धात तयांना।।१७।। दळवी साहेबाचे

तेव्हापासून । चिरंजीव समीरच्या निमित्ताने । सुरू झालं येण-जाणं। श्री क्षेत्र पिंपळखुट्यास।।१८।। त्यात समीरच्या आजारात । सुधारणा होऊ लागली साक्षात। दळवी साहेब परमभक्त। बनले संत शंकर बाबांचे।।१९।। पुढे एकोणवीसशे सत्याऐंशीला । श्री संत शंकर बाबाला । घरी आणले पुण्याला । कार्यक्रमा निमित्ताने।।२०।। काही मित्र मंडळी बोलावून । बाबाचे केले पूजन । अनेकांना लाभले दर्शन । त्या वेळी बाबांचे।।२१।। तेथून कानिफनाथाच्या दर्शनास । न्यावयाचे ठरविले बाबास । बाबानेही त्या वेळेस । होकार दिला त्वरित।।२२।। दळवी साहेबांचा परिवार । प्रवासामध्ये बाबा बरोबर । कमलाआजी केणे, ज्ञानेश्वर। शेषराव टाळे, उत्तमराव गायकी सहित।।२३।। कानिफनाथ मंदिरी । अडवू लागला पुजारी । छायाचित्रण ना करी । दळवी साहेबांच्या मुलास।।२४।। बाबा त्या वेळी ध्यानस्थ । बैसले होते निवांत। अकस्मात झाले जागृत । ध्यानातून त्वरेने।।२५।। बाबा त्या वेळी क्रोधानं । पेटले होते अग्नीसमानं । तो मीच आहे म्हणून । बोलले पुजाऱ्यास।।२६।। बाबांची अवस्था बघून ।

माफी मागितली पुजाऱ्यानं। साष्टांग दंडवत घालून । चरण धरिले बाबाचे।।२७।। या घटनेचे वर्णन । सांगताना येते गहिवरून। दळवी साहेब अजून । प्रत्यक्षात सांगती।।२८।। यापूर्वी आम्ही बाबास । पाहिले नव्हते या अवस्थेस । अचानकची मिळाला बघावयास । तयांचा चमत्कार।।२९।। एकोणवीशसे अठ्याऐंशी सालात । दळवी साहेबाच्या गाडीचा अपघात । कसा जाहला अद्भुत । ऐका भक्तजन हो।।३०।। उन्हाळ्याच्या सुट्टीत । संपूर्ण परिवारा सहित । आपल्या मूळ गावी होते जात । दळवी साहेब पुण्याहून।।३१।। स्वत:च्या घरच्या गाडीत । सर्व होते प्रवास करीत। त्यांचा मुलगा होता चालवीत । होते सर्व आनंदी।।३२।। पुण्याहून काही अंतर। गाडीने पार केल्यावर । मुलाने हात उचलला वर । लावू म्हणाला संगीत।।३३।। त्या अपयशी प्रयत्नात । गाडीचा जाहला अपघात । गाडीसह प्रवासी खड्ड्यात। पडले जावून त्याक्षणी।।३४।। सर्वत्र झाला हाहाकार । लोक जमले अपघात स्थळावर । प्रवासी काढावया बाहेर । करू लागले प्रयत्न।।३५।। पाहा कैसा घडला चमत्कार । दैवी शक्तीचा

साक्षात्कार । नाही लागला मार । किंचितही कोणाला।।३६।। तिथे सर्व जमलेले । लोक आश्चर्यात पडले । म्हणती हे कसे काय वाचले । गाडीमधले लोक ते।।३७।। एवढ्या भीषण अपघातामधून । अशक्य आहे जगणं । येथे कोणीतरी सामर्थ्यवान । महापुरुष असावा पाठीशी।।३८।। संत शंकर महाराज पिंपळखुट्याचे । ते सद्‌गुरू आहेत आमचे । त्यांनीच आमच्या सर्वांचे । वाचविले प्राण।।३९।। त्या वेळी दळवी साहेबानं । केले बाबांचे स्मरण । आभार मानले मनोमन । सर्व परिवारासहित।।४०।। पुढे दळवी साहेबाच्या बढतीबाबत । मुंबईच्या कार्यालयात। प्रयत्न सुरू होते सतत । काही वर्षांपासून ।।४१।। कार्यालयातील काही अधिकाऱ्यानं । समस्या निर्माण करून । बढती दिली रोखून । वैयक्तिक द्वेषापायी।।४२।। त्याची शहानिशा करण्यास। दळवी साहेबांची पत्नी मुंबईस। निघून गेली तूर्तास । नातेवाइकाकडे त्वरेने।।४३।। सर्व काम आटोपून। पत्नी आशाताई चेंबूरवरून।पायीच निघाल्या सडकेनं। रेल्वे स्थानकावर।।४४।। त्या दिवशी मुंबईत । लोकल-बस सहित । वाहनांचाही संप ।

घोषित होता अकस्मात।।४५।। त्याच दिवशी मुसळधार। पाऊस पडला भरपूर। जिकडे-तिकडे मार्गावर। पाणी होते साचून।।४६।। पाण्यामधून मार्ग शोधत। आशाताई होती चालत। अचानक ती खड्ड्यात। पडली जावून न कळे।।४७।। आशाताईने बाहेर निघण्यासाठी। जिवाची केली आटापिटी। परंतु अपयश आले शेवटी। प्रयत्नास तियेच्या।।४८।। दोन्ही पाय चिखलात। फसले होते आत। भयभीत होऊन रडत। होती त्यावेळेस।।४९।। आता मृत्युव्यतिरिक्त। दुसरे काहीच नव्हते दिसत। काय करावे नव्हते सुचत। सौ. आशाताईस।।५०।। एवढ्यात त्या खड्ड्यात। लख्ख प्रकाश पडला आत। एक शुभ्रवस्त्रधारी व्यक्ती उपस्थित। जाहला तिथे।।५१।। तयाने सौ. आशाबाईस। धरूनी दोन्ही हातांस। बाहेर काढले तूर्तास। सुखरूपपणे खड्ड्यातून।।५२।। तुमच्या पायाच्या जखमेवर। घरी जाऊन त्यावर। प्रथम करावा उपचार। सांगितले आशाताईस।।५३।। अचानक एक वाहन। थांबले तेथे येऊन। त्या वाहनामध्ये बसून। निघून गेले त्वरित।।५४।। आज एकही वाहन। धावले नाही मार्गावरून। मग हे वाहन

कुठून । आले असावे न कळे॥५५॥ तो पुरुषही असावा कोण । परिचयही नाही दिला तयानं । इत्यादी अनेक प्रश्न । उपस्थित झाले मनात॥५६॥ पुण्याला घरी पोहचल्यावर । घटना सांगितली सविस्तर । दळवी साहेबांचा परिवार । जाहला होता गंभीर॥५७॥ पिंपळखुट्याच्या जगदीश्वरानं । तुला दिले जीवनदान । सांगून दिले दळवी साहेबानं । लगेच आपल्या पत्नीस॥५८॥ संत शंकरबाबांच्या नावानी । जयजयकार केला सर्वांनी। दोन्ही कर जोडूनी । केले वंदन तयासी॥५९॥ इकडे संत शंकरबाबानं । श्री क्षेत्र पिंपळखुट्यावरून । पाठविले तिघे जण । दळवी साहेबांकडे पुण्यास॥६०॥ सर्वश्री सुमंतराव, पि. यु. देशमुख । जगताप साहेब परमभक्त । शंकर बाबांचे तिघेही प्रमुख । असती भक्त मंडळीत॥६१॥ पुण्याला दळवी साहेबास । त्वरित जावे भेटावयास । अपघात घडला मुंबईस । त्यांच्या पत्नीचा॥६२॥ भक्तांचे दु:ख पाहून । संत होतात बैचेन । संत शंकर बाबाने दिले दाखवून । आपल्या भक्तास त्यावेळी॥६३॥ पुढे दळवी साहेबांच्या जीवनात । कोण्यापरी घडले विपरीत । मित्रहो

ऐकोनी घ्या निवांत । ध्यान देऊन निःशंक॥६४॥ प्रमोशनच्या क्षुल्लक कारणावरून । दळवी साहेबांच्या परिवारानं। वितंडवाद केला निर्माण । आपल्याच घरात॥६५॥ तुमचे प्रमोशन का नाही होत । म्हणून पत्नी आणि मुलासहित। सर्व परिवार गेला विरोधात । दळवी साहेबांच्या॥६६॥ तुमच्यापेक्षा कनिष्ठ असून । तयांचे झाले प्रमोशन । काय फायदा आहे सेवा करून । तुमच्या शंकर बाबांची॥६७॥ एवढी सेवा करून । काय लाभ दिला मिळवून । बंद करा उद्यापासून । पूजा वगैरे तयांची॥६८॥ त्यांचे फोटो घराबाहेर। फेकून द्या रस्त्यावर । करू नका विचार । क्षणाचाही॥६९॥ यापरी विपरीत । शब्द बोलत होते सतत । दळवी साहेब होते ऐकत । निराधार होऊन॥७०॥ एके दिवशी उदास होऊन । दळवी साहेब होते बसून । तेवढ्यात ज्ञानेश्वर केणेचा फोन । आला अमरावतीहून ।॥७१॥ दळवी साहेबांनी परिवारास । लगेच सांगितले सर्वास।उद्या बाबा येणार पुण्यास । आपल्या घरी मुक्कामी॥७२॥ त्या मुक्कामाच्या काळात । बाबांचे जंगी स्वागत । झाले पाहिजे या घरात । पूर्वीसारखे

श्रद्धेने।।७३।। जरी का या विपरीत। आपण लोक वागलेत। मी निघून जाईन आश्रमात। कायम स्वरूपी पिंपळखुट्यास।।७४।। संत शंकर बाबांचा अनादर। मी खपवून नाही घेणार। तुम्ही सारे करा विचार। या गोष्टीचा।।७५।। याप्रकारे दळवी साहेबानं। धमकी दिली बोलून। सर्व परिवार गेला घाबरून। त्यावेळी चिंतेने।।७६।। ठरल्याप्रमाणे पुण्यास। शंकरबाबा त्या तारखेस। दळवी साहेबांच्या घरी मुक्कामास। आले पिंपळखुट्यावरून।।७७।। बाबांचा आदर सत्कार। जाहला नाही इच्छेनुसार। परिवाराने बुद्धी पुरस्सर। ठेवली उणीव।।७८।। हे सर्व काही विपरीत। दळवी साहेबांच्या आले ध्यानात। परंतु त्या वेळी ते शांत। होते बघा निश्चित।।७९।। श्री संत शंकरबाबानी। आपल्या अंतर्मनानी। सर्व काही घेतले ओळखुनी। क्षणार्धात।।८०।। बाबाने दळवी साहेबास। भीमाशंकराच्या दर्शनास। जायचे आहे आम्हास। म्हणून तेव्हा सांगितले।।८१। सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाण। लगेच दळवी साहेबानं। आपल्या मुलांना बोलावून। घेतले आपल्या जवळ।।८२।। भीमाशंकराच्या दर्शनास। घेऊन

जावे बाबास । दळवी साहेबाने आपल्या मुलास । सांगितले प्रेमाने।।८३।। दोनही मुलांनी तूर्तास । नकार दिला जाण्यास । दळवी साहेब अति निराश । जाहले तये वेळी।।८४।। बाबा निघताच घराबाहेर । अकस्मात घडला चमत्कार । एकाएकी धाकटा मुलगा समीर । झाला तयार जाण्याला।।८५।। थोरला मुलगा महेश । घेऊन आपल्या कॅमेऱ्यास । बसला जावून सावकाश । गाडीत सोबत बाबाच्या।।८६।। बाबा सवे भक्तमंडळीनं । भीमाशंकराचे घेतले दर्शन । मनोभावे केले पूजन । यथायोग्य श्रद्धेने।।८७।। परत येतांना भरपूर । जाहला होता अंधार । मंदिराच्या रस्त्यावर । सायंकाळ झाल्याने।।८८।। बाबाच्या पुढे महेश - समीर । दोघेही चालत होते हळुवार । बाकी भक्त मंडळी इतर । होती बाबांच्या पाठीमागे।।८९।। पी. यु. देशमुख, सुमंतराव । जगताप साहेब ही सर्व । बाबांची भक्त मंडळी एकमेव । त्या समयास।।९०।। अंधारामुळे त्या रस्त्याने । चालता येत नव्हते नीटपणे । शंकर बाबा मुकाट्याने । पाहत होते सर्व काही।।९१।। इतक्यात समीरच्या पाठीमागून । काही प्रकाश किरण । दिसत

होते रस्त्यावरून । अचानक सर्वांना।।९२।। हा प्रकाश कुठून । येतो आहे म्हणून । समीरने मागे वळून । बघितले त्या वेळी।।९३।। त्या प्रकाशाची किरण । सरळ बाबांच्या नाभीमधून। येताना पाहिले समीरनं। प्रत्यक्षात।।९४।। समीरने हळूच महेशला। सांगितले ह्या चमत्काराला। महेश आश्चर्यचकित झाला । हा प्रकार बघून।।९५।। बघा त्या ज्योतीच्या प्रकाशात । सर्व भक्तमंडळी सुरक्षित। संत शंकरबाबा समवेत । पोहचली गाडी जवळ।।९६।। घरी परत आल्यावर । घडलेला सर्व प्रकार । सांगितला सविस्तर । मुलांनी आई-वडिलास।।९७।। हे सर्व काही ऐकून । क्षणातची जाहले परिवर्तन । मतभेद गेलेत विसरून । पूर्वाश्रमीचे सारेजण।।९८।। त्या दिवशी दळवी परिवारात । खरी शांती होती नांदत। दळवी साहेब आश्चर्यचकित । जाहले त्या क्षणास।।९९।। सायंकाळी आरती संपल्यावर । दळवी साहेबांचा परिवार। उपस्थित झाला बाबासमोर । दर्शन घेण्यासाठी।।१००।। दळवी साहेबांच्या पत्नीनं। भलताच प्रश्न विचारून। पुन्हा समस्या केली निर्माण । बाबांपुढे।।१०१।। बाबाने धरले मौन । रात्रीचे वाजले तीन।

बसली हट्ट धरून । उठेना जाग्यावरून।।१०२।। शेवटी बाबा तिला म्हणाले । आम्ही तुमचे प्राण वाचविले । ते काय कमी झाले । साहेबांच्या प्रमोशनाहून।।१०३।। प्रमोशनकडे दुर्लक्ष करून । तुम्हा लोकांना संकटामधून । वाचविण्याकडे दिले ध्यान । आम्ही अधिक।।१०४।। यापरी संत शंकर बाबानं । सर्वांना सांगितले समजावून । तेव्हा कुठे झाले समाधान । अवघ्या परिवाराचे।।१०५।। सर्वांनी मिळून त्या वेळेस । जोडुनी दोन्ही हातांस । माफी मागितली बाबास। विनम्र होऊन चरणाशी।।१०६।। थोडा वेळ थांबून। लगेच दळवी साहेबानं। बाबाजवळ दिले सांगून। गुपीत आपल्या मनातील।।१०७।। बरेच दिवसांपासून। माझ्या संपूर्ण परिवारानं। विरोध केला विनाकारण । माझा व्यर्थची।।१०८।। त्यात आपणासही ते विपरीत । शब्द बोलत होते सतत । अनादर होते करीत । वेळोवेळी ते आपला।।१०९।। यावरती बाबा हसून । म्हणाले निराशा द्या सोडून । दळवी साहेबांचे केले सांत्वन । संत शंकर बाबाने।।११०।। पाडसाने हुंदके मारल्याबिगर । गाय पान्हावत नाही जराभर। त्यापरी आम्ही संतवर।

आहोत गायीसमान।।१११।। संत शंकर बाबांच्या दयेनं । दळवी साहेबांचा परिवार संपूर्ण। नांदत आहे आनंदानं । आजही पुण्यात।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । बारावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय तेरावा

शंकरराव जाधव नावाचे । परमभक्त शंकर बाबांचे । मूळचे रहिवासी ते विदर्भाचे । गाव नांदगांव खंडेश्वर।।१।। नोकरीच्या निमित्तानं । पुण्याला होत त्याचं राहणं । धार्मिक प्रवृत्तीचे वातावरण । होते घरात तयांच्या।।२।। शेगावचे श्री संत गजानन । तयांचे दैवत प्रधान । त्याठायी सर्वस्व समर्पण । केले तयांनी श्रद्धेने।।३।। प्रमोद गायकी नावाचा । शाळा मित्र तो तयांचा । रहिवासी तो पिंपळखुट्याचा । विदर्भात राहतो।।४।। त्याने जाधवांना पत्र पाठवून । शुभसमाचार कळविला त्यामधून । विदर्भाचे एक संत महान । येणार आहेत पुण्यास।।५।। शंकर बाबा तयांचे नाव । पिंपळखुटा आहे गांव । अनेकांना त्यांचे थोर अनुभव । आले आहेत कितीक।।६।। श्री क्षेत्र टाकरखेडचे । गुरुवर्य आहेत त्यांचे । ते शिष्य आडकुजीचे । वरखेड क्षेत्राचे।।७।। संत सत्यदेव बाबा भारवाडीचे । राष्ट्रसंत तुकडोजी गुरुकुंजाचे । ते गुरुबंधू सद्गुरू लहानुजीचे । थोर अधिकारी।।८।। त्या

परंपरेचे वारसदार। तारावया दीन पामर। साक्षात ईश्वरीय अवतार। प्रगटला या भूमीवर॥९॥ तयांची कीर्ती दूरवर। जाहलीसे भरपूर। राव रंक - सान-थोर। श्रद्धेने पूजतात॥१०॥ अशा थोर महात्म्याचे। दर्शन होणे अति भाग्याचे। विसरू नका जाण्याचे। प्रमोद बोलला॥११॥ बघा प्रमोद गायकीनं। बाबांच्या मुक्कामाच ठिकाण। अचूक दिले सांगून। मित्र जाधव साहेबास॥१२॥ दळवी साहेबाकडे पुण्यास। बाबा होते मुक्कामास। जाधव साहेबाने त्या स्थळास। जाऊन घेतले दर्शन॥१३॥ बाबाला त्या वेळी बघून। जाधव साहेबांचे मन। जाहले अति प्रसन्न। एकाएकी भक्तीने॥१४॥ आपल्या घरी आणून। यथायोग्य केले पूजन। जाधव साहेब तेव्हापासून। परम भक्त बाबांचे॥१५॥ पत्नी आणि मुलासहित। सारे बाबांच्या सेवेत। रात्रंदिवस होते खपत। आपापल्या परीने॥१६॥ शंकर बाबांच्या कृपाप्रसादाने। जाधव साहेबांचा परिवार आनंदाने। राहात होता सुखासमाधानाने। पुण्यामध्ये निःशंक॥१७॥ बघा पुढे अकस्मात। जाधव साहेबाच्या जीवनात। तुफान आले जोरात। एकाएकी न कळे॥१८॥ जमिनीच्या

व्यवहारात । अपयश आले पदरात । नुकसान जाहले अतोनात । पैशा-अडक्याचे।।१९।। जाधव साहेब त्या वेळेस । जाहले अति उदास । सुचेना उपायास । काही केल्या।।२०।। आपल्या कर्माच्या भोगास । भोगावे लागणार आपणास । यापरी समजाविले स्वत:स । जाधव साहेबाने।।२१।। आपल्या भोगाला कारण । आपणची आहोत स्वत:हून। इतरावरी त्याचे दोषारोपण । करू नये कधीही।।२२।। आपल्या कर्म भोगाचा भार । टाकू नये इतरांवर । तो आज ना उद्या जरूर । भोगावा लागेल आपणासी।।२३।। जाधव साहेबांनी बाबासमोर । आपल्या दु:खाचा समाचार । सांगितला नाही तिळभर । कधीही त्या काळात।।२४।। आपल्या प्रारब्धा सोबत । जाधव साहेब त्याकाळात । संघर्ष होते करीत । दैनंदिन निष्ठेने।।२५।। त्यांचा मुलगा मनीष । त्याचा परिपूर्ण विश्वास । शंकरबाबावर होता हमखास । मनोभावे श्रद्धेने।।२६।। त्याने आपल्या पित्यास। धीर दिला त्या वेळेस । सोडू नका चरणास । शंकर बाबांच्या म्हणून।।२७।। तो दयेचा महासागर । सर्वज्ञ आहे या भूवर । जाणतो भक्तांचे अंतर । आपल्या शक्तीने।।२८।। अनेकांच्या जीवन नौकेस । तयाने

लावले तीरास । कसे काय सोडतील आपणास । मध्यंतरी संकटी।।२९।। कसोटीला उतरल्याविन । मिळत नाही कृपादान ।संत महात्म्यांची ही खूण। घ्यावी जाणून।।३०।। बघा दहा वर्षापर्यंत। जाधव साहेब सतत। राहिले सेवेपासून वंचित। शंकर बाबांच्या।।३१।। परंतु त्या काळात। पुण्याहून जे भक्त। दर्शनाशी होते जात। पिंपळखुट्यास।।३२।। त्या भक्त मंडळीकडून । शंकर बाबा आवर्जून । घेत होते जाणून । वर्तमान जाधव साहेबांचे।।३३।। मध्यंतरी श्री क्षेत्र शेगांवात । पिंपळेच्या मुलीच्या लग्नात । शंकर बाबा राहणार उपस्थित । कळले जाधव साहेबास।।३४।। त्या निमित्तानं । बाबांचेही होईल दर्शन । यापरी विचार करून । निघाले त्वरित।।३५।। तिथे पोहोचल्यानंतर । निराशा जाहली भयंकर । कारण बाबा नव्हते हजर । त्या लग्नात तयेवेळी।।३६।। अगदी दहा वर्षानंतर। अचानकची जाहला चमत्कार। स्वप्न दृष्टांत जाहला सत्वर। जाधव साहेबास।।३७।। स्वप्नामध्ये शंकर बाबानं । आपल्या बोटाच्या संकेतानं। जवळ घेतले बोलावून। जाधव साहेबास।।३८।। हा स्वप्नातील दृष्टांत। जाधवांनी आपल्या

पत्नीप्रत । सांगितला त्वरित । अति आनंदाने॥३९॥ दुसऱ्या दिवशी सकाळीच । बाळासाहेब कोकरे आणि कमलेश । घेऊनी लग्नाच्या पत्रिकेस । आले दारात॥४०॥ या लग्नामध्ये जरूर । बाबा उपस्थित राहणार । बाळासाहेबाने सत्वर । सांगितले जाधव साहेबास ।॥४१॥ बाबाने आवर्जून । सांगितले मजलागून । आपणासी पत्रिका द्या म्हणून । ह्या लग्नाची॥४२॥ जाधव साहेबांनी त्यावेळेस । ठरविले आपल्या मनास । आता काहीतरी विशेष । घडणार आहे नक्कीच॥४३॥ लग्न होते पुण्यात । जाधव आपल्या परिवारासहित । जाऊन पोहचले त्वरित । त्या ठिकाणी त्वरित॥४४॥ बाबाने पाहता क्षणी । आपल्या बोटाच्या खुणेनी ।संकेत दिला या म्हणूनी । जाधव साहेबास॥४५॥ जाधव साहेबाने जाऊन । घेतले बाबांचे दर्शन । उभे राहिले हात जोडून । बाबा समोर त्या क्षणी॥४६॥ पूर्वी तुम्ही आम्हाला सोनं। दिले मोठ्या आनंदानं । आता चांदी द्या आणून । तुम्ही आम्हास॥४७॥ बरेच दिवसांपर्यंत । बाबांच्या बोलण्याचा संकेत । मुळीच येईना ध्यानात । जाधव साहेबांच्या॥४८॥ पुढे बाबांच्या प्रकटदिनाचे

निमंत्रण । नंदूसेठ कोकरे स्वत:हून । पुन्हा आले घेऊन । जाधव साहेबाकडे।।४९।। कार्यक्रमास नक्की येतो म्हणून । कोकरेंना दिले सांगून । पुढे विपरीत झाले निर्माण । जाधव साहेबांच्या मनात।।५०।। कार्यक्रमाच्या व्यतिरिक्त । इतर कोणत्याही वेळेत । निघून गावे निवांत । बाबाच्या दर्शनास।।५१।। यापरी विचार येताच मनात । पत्नी सौ. आशाताईच्या स्वप्नात । बाबांनी येऊनी दिला संकेत । पिंपळखुट्यासी येण्याचा।।५२।। गुरू आज्ञेचे उल्लंघन । करू नये आपण । त्वरित गेले निघून । जाधव परिवारासहित।।५३।। पिंपळखुट्याचे अंतर । पुण्याहून बरेच दूर । त्यामुळे जाहला उशीर । पोहचावयास त्याठायी।।५४।। कार्यक्रम संपल्यानंतर । पोहचले त्या स्थळावर । दर्शन घेतले सत्वर । बाबांचे सर्वांनी।।५५।। पात्रे नावाच्या सेवकास । बाबांनी सांगितले त्यास । घेऊनी जावे जाधव साहेबास । दर्शनासाठी मंदिरात।।५६।। पात्रेनी जाधव साहेबास । नेले मंदिरामध्ये दर्शनास । दाखवू लागले प्रत्येक मूर्तीस । सावकाश श्रद्धेने।।५७।। पात्रेनी त्यावेळेस । एक गोष्ट विशेष । आणून दिली नजरेस । जाधव

साहेबांच्या।।५८।। सर्व मूर्तीस नीट। चढविले होते मुकुट। फक्त पाच मूर्ती होत्या शेवट। मुकुटाविना शिल्लक।।५९।। त्यात लहानुजीबाबा, सत्यदेव। समर्थ आडकुजी गुरुदेव। विठ्ठल रखुमाई सहित सर्व। मिळुनी पाच ते।।६०।। बाबा जवळ येताच परतून। बाबा बोलले वचन। पाच किलो चांदी आणून। द्यावी मंदिरात।।६१।। गुरू आज्ञा मानून। लगेच जाधव साहेबानं। चांदी दिली आणून। बाबाजवळ भक्तीने।।६२।। कारागिरास बोलावून। मुकुट तयार केले छान। जाधव साहेब अतिप्रसन्न। जाहले त्यावेळेस।।६३।। पुढे काही दिवसानं। कोकरे साहेबांना घेऊन। बाबांचे घ्यावया दर्शन। पिंपळखुट्यास जाधव साहेब।।६४।। बाबाने योग साधून। जाधव साहेबाकडून। मुकुट घेतले बसवून। मूर्तीवर।।६५।। आपण आहोत सर्वसाधारण। परी केवढा मोठा बहुमान। आपणास दिला मिळवून। संत शंकर बाबाने।।६६।। दहा वर्षांचा वनवास। शांत जाहला त्या वेळेस। जाधव साहेबांच्या जीवनास। मार्ग मिळाला सोयिस्कर।।६७।। लोखंडाचे सोने बनविणं। संताला नाही

कठीण । परी कसोटीला उतरल्याविण । अशक्य आहे सर्वची।।६८।। बघा जाधव साहेबास । पूर्णपणे होता विश्वास । एक-ना-एक दिवस । होईल भाग्योदय म्हणून।।६९।। निराशा बाजूला सारून । आशा सोबतीला घेऊन । जीवनात संघर्ष करून । प्राप्त केला विजय।।७०।। बघा जाधव साहेबांचा । जमिनीच्या खरेदी-विक्रीचा । व्यवसाय होता पूर्वीचा। पुण्यामध्ये।।७१।। चाकरची जमीन घेतल्यावर । नशिबाने घेतला फेर । प्रारब्धभोग होता समोर । उभा ठाकून।।७२।। दहा वर्षांचा वनवास । भोगावा लागला जाधव साहेबास। अतिशय जाहला त्रास । त्या वेळी गंभीर।।७३।। बघा त्या समयास । चाकरच्या त्या जमिनीस । कोणीही विकत घेण्यास । नव्हते तयार न कळे।।७४।। ठीक दहा वर्षांनंतर । अद्भुत घडला चमत्कार । त्या जमिनीचा भरपूर । मोबदला मिळाला जाधवास।।७५।। तो मोबदला खरोखर । निश्चितची होता अपेक्षे बाहेर। याचा विचार वारंवार । जाधव साहेब करिती।।७६।। ह्या संपूर्ण पैशावर । आपला मुळीच नाही अधिकार। हा बाबाने घडविलेला चमत्कार ।

आहे एकमात्र।।७७।। हा सर्व पैसा आश्रमात । शंकर बाबांच्या सेवेत । खर्च करण्याचे केले निश्चित । जाधव साहेबाने।।७८।। आपल्या संकट काळात । बाबाने प्रत्यक्षात । वेळोवेळी केली मदत । निःसंदेह आपणास।।७९।। बाबांचे हे ऋण । अशक्य आहे चुकविणं। परी का न करावा यत्न । अल्पसा आपण।।८०।। बघा जाधव साहेबानं । आश्रमाचे महाद्वार बांधून । कृतार्थ केले जीवन । आपले स्वतःचे।।८१।। जाधव साहेबांच्या हातून। अमर सेवा घेतली करून। श्री शंकर बाबानं। कायम स्वरूपी।।८२।। संत शंकर बाबांच्या दरबारात । दानशूरांच्या इतिहासात । नोंद झाली प्रत्यक्षात । जाधव साहेबांची।।८३।। जगामध्ये प्रयत्न केल्यानं । प्राप्त होते धन मान । परंतु संत संगाची भाग्याविन । प्राप्ती नव्हे कदापिही।।८४।। अमाप धन असता तिजोरीत । दानधर्म देईना तीर्थात । शेवटी कवडीही नेईना सोबत । अंतकाळी खरोखरी।।८५।। जाधव साहेबाने हे सर्व। जाणून घेतला अनुभव । परमार्थ साधला एकमेव । आपल्या जीवनात।।८६।। जयाला आवडे परमार्थ । त्यापुढे टिकेना स्वार्थ ।

धनमान सर्वची व्यर्थ । वाटे तयास॥८७॥ जयाने साधुसंताच्या सेवेस । समर्पित केले जीवनास । तयापुढे रिद्धी-सिद्धी दास । होऊनिया राहती॥८८॥ बघा शंकर बाबाच्या कृपेनं । जाधव साहेबांचे जीवन । जाहले परम पावन । या जन्मात॥८९॥ शंकर बाबांच्या स्मरणाविण । त्यांच्या जीवनाचा एकही क्षण । व्यर्थ जात नाही दैनंदिन । परिवारा सहित॥९०॥ बाबांना विचारल्याविन । कोणत्याही कार्याचे आयोजन। करीत नाहीत ते अजून । चुकूनही॥९१॥ पिंपळखुट्याचा हा जगदीश । प्रत्येक कार्यात यश । देतो आपल्या भक्तास । निश्चित॥९२॥ बाबांचे घ्यावया दर्शन । आजही ते पुण्यावरून । आपल्या परिवाराला घेऊन । येतात पिंपळखुट्यास॥९३॥ बाबाने आज्ञा दिल्याविन । कधीच माघारी परतून। येत नाहीत पिंपळखुट्यावरून। कोणत्याही परिस्थितीत॥९४॥ आजच्या विज्ञान युगात। या परी निष्ठावंत। दुर्मीळ आहेत संतभक्त। खरेची बोलतो॥९५॥ बाबा या चराचरात । सदैव वास करतात । हे अनुभवले साक्षात । जाधव परिवाराने॥९६॥ कधी स्वप्नात येऊन । येणाऱ्या संकटापासून । तात्काळ करतात

सावधान । आम्हा लोकांस।।९७।। ज्यापरी गाय आपल्या वत्सावर । प्रेम करते अपार । त्यापरी जाधव परिवारावर । प्रेम आहे बाबांचे।।९८।। त्या प्रेमरसाची गोडी । सांगावी तेवढी थोडी । भरून वाहते दुधडी । सदोदित प्रेमाने।।९९।। ते प्रेम या जगात । मिळणे आहे दुरापास्त । ते प्रेम आहे अव्यक्त । अवर्णनीय।।१००।। त्या प्रेमाचे वर्णन । करणे अति कठीण । ते प्रेम अनुभवाविन । कळणार नाही कुणासही।।१०१।। त्या प्रेमात नाही जातपात। ते प्रेम आहे भेदविरहित। परमपवित्रता आहे त्यात। अलौकिक भक्तीची।।१०२।। त्या प्रेमामध्ये गुरुत्वाकर्षण । शक्ती आहे महान । हजारो मैलाच्या अंतरावरून । घेते खेचून आपल्याकडे।।१०३।। संत शंकर बाबाच्या सेवेत । हा देह सतत । चंदना परी राहावा झिजत। अहोरात्र श्रद्धेने।।१०४।। अंतकाळी या मुखातून । माझ्या सद्‌गुरूचे स्मरण । नेत्रानी घडावे दर्शन । जाता-जाता।।१०५।। कर्ण करतील श्रवण । माझ्या सद्‌गुरूचे भजन । दोन्ही कर आनंदानं । वाजवतील टाळी।।१०६।। तयाच्या श्री चरणावर। लीन होऊनिया क्षणभर। माथा ठेवावा सत्वर। श्रद्धा भावे।।१०७।। जन्मोजन्मी या जीवास । यापरीच घडावा सहवास । आपल्या चरणाचा

दास। म्हणून ठेवावे जवळी॥१०८॥ बघा जाधव साहेबानं। शंकर बाबाच्या परमभक्तानं। यापरी मागितले दान। आपल्या गुरुमाउलीस॥१०९॥ ऐसे बोलतांना वचन। जाधव साहेबांच्या नेत्रातून। अश्रुधारा शीघ्रतेन। वाहू लागल्या श्रद्धेने॥११०॥ श्री संत शंकर बाबानं। संकटाच्या खाईमधून। कोण्यापरी बाहेर काढून। रक्षिले जाधव साहेबास॥१११॥ त्या सर्व प्रसंगाचे विवेचन। सविस्तर केले या अध्यायातून। आपण केले ते श्रवण। निवांत होऊन॥११२॥ इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। तेरावा अध्याय समाप्त॥११३॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय॥

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय चौदावा

नंदूसेठ कोकरे नावाचे । राहणारे ते पुण्याचे। परमभक्त ते शंकर बाबांचे । एकनिष्ठ।।१।। त्यांना बाबांचे साक्षात्कार । घडले आहेत वारंवार । शंकर बाबांना ते परमेश्वर । मानतात साक्षात।।२।। एकोणवीसशे चौऱ्याण्णव पासून । त्यांनी धरले बाबाचे चरण । अर्पण केले तन-मन-धन । शंकर बाबास।।३।। बघा नंदूजीचे तेव्हापासून । जीवन बनले नंदनवन । सर्व तऱ्हेने सुखसमाधान । लाभले तयांना।।४।। ते बाबा विषयी आवर्जून । सांगतात जीव ओतून। आजमितीला बाबासमान। संत मिळणे दुर्मीळ।।५।। त्यांची पूर्व परिस्थिती। अत्यंत हलाखीची होती। त्यामुळे शिक्षणामध्ये प्रगती। जाहली नाही।।६।। वडील दारूच्या नशेत। राहत होते सतत। त्यामुळे त्यांचे घरात। लक्ष नव्हते मुळीच।।७।। आईने कष्ट करून । कुटुंबाचे केले पोषण । नंदूजी होते लहान । त्या वेळी।।८।। नाशिक जिल्ह्यात येवला नावाचे । मूळ गाव नंदूसेठचे । उदरनिर्वाहाकरिता

त्यांचे । कुटुंब आले पुण्यास।।९।। रंगनाथराव बोडके नावाचे । मामा ते नंदूसेठचे । पुण्यामध्ये होते वास्तव्य त्यांचे । त्या काळात।।१०।। त्यांची आर्थिक परिस्थिती । समाधानकारक होती। व्यवसायामध्येही प्रगती । होती उत्तम।।११।। त्यांनी आपल्या बहिणीस । बोलावून घेतले पुण्यास । जागा दिली राहण्यास । आपल्या वाड्यात।। १२।। तयांनी नंदूसेठच्या वडिलास । दिवाणजी म्हणूनी तयास। काम दिले आपल्या पदरास । कृपा झाली म्हणून।।१३।। काही दिवस मामाकडे राहून । दिवस काढले कठीण । पुढे भाड्याची खोली करून । राहू लागले अलग।।१४।। भाऊ, बहिणी सारेजण । मामाकडे काम करून । आपला प्रपंच दैनंदिन । चालवीत होते नंदूसेठ।।१५।। कुटुंबामध्ये जरी ते लहान । परी बुद्धीने होते महान । नंदूसेठने दिले दाखवून । प्रत्यक्षात सर्वांना।।१६।। काही दिवस पंपावर । काम केले बाहेर । त्यानंतर मोटारसायकल रिपेअर । करू लागले निष्ठेने।।१७।। रात्रंदिवस काम करून । एकत्र केले काही धन । व्यवसाय करावा म्हणून । स्वतंत्र त्या वेळी।।१८।। नंदूसेठच्या मामाचा। म्हशीच्या खरेदी विक्रीचा । व्यवसाय

होता पूर्वीचा । पुण्यात कोठेतरी।।१९।। मामाचे मार्गदर्शन घेऊन । स्वतंत्र व्यवसायाचे नियोजन । शिस्तबद्ध केले नंदूजीनं। आपल्या बुद्धीनुसार।।२०।। पुढे वडिलांच्या मृत्यूनंतर । संपूर्ण जबाबदारी नंदूसेठवर। आली बघा सत्वर । एकाएकी।।२१।। मामा रंगनाथराव नंदूसेठचे। वारकरी होते आळंदीचे। प्रत्येक गुरुवारी ते जायचे। माउलीच्या दर्शनास।।२२।। नंदूसेठ त्यांच्या सोबत । जात होते नियमित । श्री क्षेत्र आळंदीस । अति श्रद्धेने नित्याने।।२३।। तब्बल बारा वर्षेपर्यंत । वारी केली सतत । खंड पडू दिला नाही त्यात । नंदूसेठने तिळभर।।२४।। पुढे संत गजाननाच्या सेवेत । मन वळले अकस्मात । त्यानंतर शंकर बाबांच्या दरबारात । मन जाहले स्थिर।।२५।। जाधव साहेबांच्या निमित्तानं। शंकर बाबांचे घडले दर्शन। नंदूसेठ सांगतात आवर्जून। अजूनही लोकांस।।२६।। जाधव साहेबांच्या घरी पुण्यास । शंकरबाबा होते मुक्कामास । सोबत घेऊन आपल्या पत्नीस। नंदूसेठ गेले दर्शनास।।२७।। पिंपळखुट्याच्या विश्वमंदिरात । मूर्ती करावयाच्या आहे स्थापित । संत गजाननाची मूर्ती दानात । द्यावी

आपण॥२८॥ यापरी शंकर बाबानं । नंदूसेठ सवे केले संभाषण । नंदूसेठने गुरुआज्ञा मानून । होकार दिला त्वरित॥२९॥ त्यामध्ये घडले परिवर्तन । नंदूसेठ ऐवजी जाधव साहेबानं । संत गजाननाच्या मूर्तीचे दान । दिले त्या वेळेस॥३०॥ यापरी शंकर बाबांच्या सेवेत । आपल्या संपूर्ण परिवारासहित । नंदूसेठ जुळले अखंडित । तेव्हापासून भक्तीने॥३१॥ पुढे बांधकामाचा व्यवसाय । करावयाचा घेतला निर्णय । त्यामध्ये अपयशाची माळ । पडली गळ्यात॥३२॥ ऐका मित्रहो दैवाचा खेळ । सुखदु:ख हे दैवाचे फळ । ते भोगणे आहेची अटळ । प्रत्येक जीवास॥३३॥ बघा त्या राजा हरिचंद्रास । सोडुनी आपल्या राजवैभवास । भोगावा लागला वनवास । प्रत्यक्षात खरोखरी॥३४॥ काही काळ व्यवसायात । प्रगती जाहली अतोनात । आनंदी आनंद होता नांदत । नंदूसेठच्या परिवारात॥३५॥ पुढे नंदूसेठच्या डोक्यात । वेगळेच शिरले विपरीत । नेमके तेच ठरले कारणीभूत । नंदूसेठच्या पतनास॥३६॥ पुण्यामध्ये सांगवी परिसरात । काही जमीन घेतली विकत। नंदूसेठने त्या काळात। व्यवसाय

करावया।।३७।। शंकर बाबाने त्या वेळेस । सांगितले नंदूजीस । त्या जागेवर बांधावा निवास । स्वत: करिता आपण।।३८।। बाबांच्या वचनाव्यतिरिक्त । नंदूसेठच्या मनात । वेगळेच काही होते घोळत । त्या वेळी जाणावे।।३९।। त्या जमिनीवर आपण । भव्य वास्तू बांधून । मग तिला विकून । पैसे कमावू भरपूर।।४०।। ते नियतीला नव्हते मंजूर । पुढे ऐका सविस्तर । कोण्यापरी घडला प्रकार । नंदूसेठच्या जीवनात ।।४१।। बघा त्या वेळेस । त्या इमारतीचे जवळपास । बांधकाम पूर्णत्वास । झाले होते तयेवेळी।।४२।। एके दिवशी अकस्मात । ती संपूर्ण इमारत । तिरपी झाली क्षणात । एकाएकी न कळे।।४३।। विघ्नाला घरी जाऊन । द्यावे न लागे आमंत्रण। ते स्वयंमची येते निघून । आपल्या मर्जीने।।४४।। सुदैवाने त्या ठिकाणी । कोणतीही प्राणहानी। जाहली नाही त्या क्षणी । हे मानावे विशेष।।४५।। अति अल्प वेळात । वार्ता पसरली पुण्यात । नंदूसेठ पडले काळजीत । त्या प्रसंगास।।४६।। त्या वेळी सर्वत्र हाहाकार । उफाळला होता भरपूर। काय उपाय करावा यावर । सुचेना नंदूजीस।।४७।। बांधकामापूर्वी नंदूजीनं ।

बऱ्याच ग्राहकाकडून । काही पैसे अग्रीम म्हणून । होते घेतलेले।।४८।। ते सर्व ग्राहक या वेळेस । पैसे परत मागतील आपणास । याचीही भीती होती मनास । नंदूसेठच्या।।४९।। तेथील काही सुज्ञ लोकानं । नंदूसेठला केले मार्गदर्शन । आपण त्वरित जावे निघून । इतरत्र स्थळासी।।५०।। त्या लोकांच्या सल्ल्यानुसार । नंदूसेठने पत्नीबरोबर। गाठला पिंपळखुट्याचा दरबार । रातोरात भक्तीने।।५१।। घडलेल्या घटनेचा सार । निवेदन केला बाबासमोर । बाबाने देऊनिया धीर । समाधान केले दोघांचेही।।५२।। आईने आपल्या लेकरास । धीर द्यावा त्याच्या मनास । त्यापरी बाबाने त्या वेळेस । केले सांत्वन तयाचे।।५३।। बाबाने पंधरा दिवस । पतिपत्नी दोघास । ठेवून घेतले पिंपळखुट्यास । आपल्या आश्रमात।।५४।। बघा बाबाने त्याकाळात । आपल्या काही भक्तमंडळी सोबत। भेटी करून दिल्यात । नंदूसेठच्या त्या वेळी।।५५।। आपल्या दु:खाचे स्मरण । होऊ नये म्हणून । उपाय योजिला बाबानं । एकमेव निश्चित।।५६।। काही गुरुबांधवानं । नंदूसेठला धीर देऊन । यथायोग्य केले सांत्वन । संकटकाळी

तयांचे।।५७।। काही गुरुबांधवानं । आर्थिक मदत करून । आपल्या परीने फेडले ऋण । गुरुबंधूंचे निष्ठेने।।५८।। बघा श्री संत शंकर बाबानं । आपल्या दिव्य सामर्थ्यानं। पुण्यामधले वातावरण । शांत केले त्या अवधीत।।५९।। पुढे बाबांची आज्ञा घेऊन । नंदूसेठने पिंपळखुट्यावरून। पुण्याकरिता केले प्रस्थान । आपल्या पत्नीसोबत।।६०।। पुण्याला पोहोचल्यावर। सर्व आर्थिक व्यवहार। पूर्ण केले पद्धतशीर। इमारती विषयीचे।।६१।। काही पत्रकार मंडळीकडून । त्या काळात नंदूसेठनं। खूप त्रास केला सहन । हेतू पुरस्सर दिलेला।।६२।। त्या वेळी शंकर बाबानं । परमेश्वराच्या रूपानं । मदत केली धावून । प्रत्यक्षात खरोखरी।।६३।। एवढ्या कठीण प्रसंगातून । स्वंयम कष्टी होऊन । नंदूसेठला नवजीवन । दिले प्राप्त करून।।६४।। बाबांच्या कृपेसहित । सर्व भक्तमंडळींनी त्या काळात। नंदूसेठला केली मदत। गुरुबंधू समजून।।६५।। पिंपळखुट्याच्या विश्वमंदिरात । संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ । बैसविले ज्ञानदेवा समवेत । नंदूजीने श्रद्धेने।।६६।। ज्ञानेश्वरी प्रसाद ग्रंथाच्या छपाईस। आर्थिक सहयोग देऊनी त्यास। फेडले सद्गुरूच्या ऋणास । आपल्यापरीने।।६७।। आळंदी पवित्र क्षेत्रात ।

यात्रेकरूच्या सेवेत । धर्मशाळा बांधली प्रशस्त । आपल्या पांगुळ समाजाची।।६८।। हे उर्वरित कार्य करण्यास । आपल्या सद्गुरूने त्या वेळेस। वाचविले असावे आपणास । घोर संकटामधून।।६९।। नंदूसेठ तेव्हापासून । श्वासोच्छ्वासी करती चिंतन। सद्गुरू शंकर बाबांच्या नावानं । अहोरात्र भक्तीने।।७०।। नंदूसेठच्या पत्नीस । बाबांचे अनुभव आहेत खास। तेही सांगतो आपणास । श्रोते मित्रहो ।।७१।। सौ. भारती तिचे नाव । अति उत्तम आहे स्वभाव। संत शंकर बाबांना ती देव । मानते साक्षात।।७२।। एके दिवशी पहाटेला । स्वप्न दृष्टांत जाहला तिला । उद्या तुझ्या पतीला । पाठवू नको बाहेर।।७३।। सकाळी आठ वाजता अकस्मात । भारती ताईच्या पोटात । वेदना होऊ लागल्यात । असह्य त्या वेळी।।७४।। पती नंदूसेठ देवघरात । पूजापाठ होते करीत । ते सर्व सोडून अर्ध्यात। उठले त्वरित।।७५।। दवाखान्यामध्ये उपचारास । लगेच नेले भारतीताईस । डॉक्टरने सांगितले ऑपरेशनास । नंदूसेठला त्वरेने।।७६।। भारतीताईच्या पोटात । अल्सर फुटला होता आत । त्यामुळे ऑपरेशनच्या व्यतिरिक्त । नव्हता उपाय कोणता।।७७।। सौ. भारतीबाई सहित । कोकरे परिवार समस्त । चिंतनामध्ये होता

व्यस्त । संत शंकर बाबाच्या।।७८।। ठीक चार वाजताच्या सुमारास । सौ. भारतीताईस । ऑपरेशन करावयास। त्वरित नेले खोलीत।।७९।। बघा त्या वेळेस । भारतीताईच्या दृष्टीस । एक शुभ्रवस्त्रधारी छायापुरुष । दिसला अकस्मात।।८०।। ताई मुळीच घाबरू नकोस । यापरी बोलुनी भारतीताईस। गुप्त जाहला तूर्तास । त्या ठिकाणी।।८१।। ऑपरेशन संपल्यानंतर । भारतीताई आली शुद्धीवर । विचार करू लागली सत्वर । आपल्या मनामधे।।८२।। माझ्या सद्‌गुरू माऊलीनं । मला संकेत देऊन । मुक्त केले संकटातून । कायम स्वरूपी।।८३।। पुढे दोन महिन्यांनंतर । नंदूसेठचा समस्त परिवार । दर्शनाकरिता जाहला हजर । पिंपळखुट्यास।।८४।। भारतीताई येताच बाबासमोर । बाबा तिला बोलले सत्वर। तुझा पुर्नजन्म जाहला खरोखर । या वेळेस जाण।।८५।। बाबांचे शब्द ऐकून । भारतीताई जाहली सुन्न । कोण्यापरी चुकवू मी हे ऋण । माझ्या सद्‌गुरूंचे।।८६।। माझ्या सद्‌गुरू सारखा दातार । दुजा नाही या भूमीवर । तो दयेचा महासागर । आहे या जगात।।८७।। यापरी भारतीताईनं । आपल्या अंतर्मनातून। प्रत्यक्ष शब्दसुमन । वाहिली बाबास।।८८।। पुढे भारतीताईच्या स्वप्नात येऊन । नंदूसेठच्या

आईचे मरण। तारखेसहित दिले सांगून । बाबाने साक्षात।।८९।। नेमके त्याच समयास । आपल्या अंतिम क्षणास । मोजत होती रात्रंदिवस । आई नंदूसेठची।।९०।। बरोबर त्याच तारखेवर । आईचा मृत्यू जाहला खरोखर । त्यात तिळभरही नव्हते अंतर । स्वप्न दृष्टांतानुसार।।९१।। आजपर्यंतच्या इतिहासात । नोंद नाही या जगात । साधुसंताच्या भविष्यवाणीत । असत्यता जाहली म्हणून।।९२।। भूत, भविष्य, वर्तमान । या तिन्ही काळाचे आकलन । संत जाणतात परिपूर्ण । आपल्या दिव्यत्वाने।।९३।। संत शंकर बाबान । ती पुण्याला होती म्हणून । तेही दिले सांगून । तिच्या मृत्यूनंतर।।९४।। आपल्या आईचा मृत्यूसंस्कार । पार पाडला सुंदर । दान, धर्म देऊनी सत्वर । नंदूसेठने तयेवेळी।।९५।। तिच्या प्रथम वर्षश्राद्धास । बाबा हजर होते कार्यक्रमास । आनंद जाहला सर्वास । त्या वेळी सर्वांसी।।९६।। नंदूसेठचा समस्त परिवार । अपार प्रेम करतो बाबावर। शंकर बाबांना ते परमेश्वर । मानतात साक्षात।।९७।। कमलेश, हेमंत , दोन मुल । कन्या देविका अति सुशील । बाबांच्या कृपेने कुशल । आहेत सर्व।।९८।। आई-वडिलांचे सुसंस्कार । जडले तिन्ही मुलावर । त्यामुळे त्यांचेही बाबावर । प्रेम आहे

अपार।।९९।। संत शंकर बाबांचे थोरपण । कोण्यापरी करावे वर्णन । अश्रू आले नेत्रातून । नंदूसेठ कोकरेच्या।।१००।। बाबांचे अनंत उपकार । जाहले आहेत माझ्यावर । कोण्यापरी फेडावे हा विचार । येतो मनात।।१०१।। ज्वलंत अग्निज्वालातून । मला बाहेर काढून । प्रदान केले नवजीवन । बाबाने प्रत्यक्षात।।१०२।। अनंत जन्माच्या पुण्याईन। बाबांचे जाहले दर्शन । जीवनाचे जाहले कल्याण । सांगतात नंदूसेठ।।१०३।। ज्ञानराज माउली, आणि संत गजानन । हे दोन्ही संत महान । नंदूसेठचे ते श्रद्धास्थान । आहेत पूर्वीपासुनी।।१०४।। मी तयांना दैनंदिन । बघतो आहे सातत्यानं । संत शंकर बाबांच्या रूपानं । आजही प्रत्यक्षात।।१०५।। एवढा श्रद्धावान भक्त । दुर्मीळ आहे या काळात । आज स्वार्थापुरते जवळ येतात । लोक साधू संताच्या।।१०६।। आपल्या जीवनाचा समस्त भार। टाकुनी दिला बाबावर। ठेविले त्यापरीच राहणार। ठरविले नंदुजीने।।१०७।। पूर्वी बाबांच्या म्हणण्याकडे आपण। दुर्लक्ष केले म्हणून। भोग भोगावा लागला कठीण । आपणास निश्चित।।१०८।। नंदूसेठ तेव्हापासून । पूर्वीचे स्मरण ठेवून । अतिशय वागतात जपून । आपल्या आयुष्यात।।१०९।। जीवनाचे एकमेव

धन। आपल्या सद्गुरूचे चरण। त्याठायी जावे शरण। निस्संदेह भक्तीने॥११०॥ येथेच होईल उद्धार। बाकी सारे क्षणभंगूर। नंदूसेठने केला निर्धार। आपल्या मनाचा॥१११॥ सद्गुरू शंकर बाबांच्या कृपेनं। नंदूसेठ आज आनंदानं। कंठित आहे जीवन। आपल्या परिवारासहित॥११२॥ इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। चौदावा अध्याय समाप्त॥११३॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय॥

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय पंधरावा

भाऊसाहेब काळे पुण्याचे । आहेत धार्मिक प्रवृत्तीचे । त्यांना वेड संतदर्शनाचे । आहे पूर्वीपासून ।।१।। एकोणवीसशे चौऱ्याण्णवपासून । त्यांनी शंकर बाबाचे चरण । आपल्या हृदयात बसवून । घेतले एकमेव ।।२।। दळवी साहेबांच्या घरी पुण्यास । शंकर बाबा होते मुक्कामास । त्वरित पोहोचले त्या स्थळास । दर्शनासाठी भक्तीने ।।३।। बाबाचे दर्शन घेऊन । बसले बाजूला जाऊन । बघत होते न्याहाळून । एकसारखे बाबाकडे ।।४।। विचार केला मनातच । आपले सद्‌गुरू असावेत हेच । इतरत्र भटकण्याची जरूरच । नाही आपणास ।।५।। दुसऱ्या दिवशी बाबास । जाणे होते मुंबईस । एका भक्ताच्या भेटीस । तातडीने तये वेळी ।।६।। भाऊ काळेनेही त्या वेळेस । मुंबईला जाण्यास । तयारी केली तूर्तास । सुमंतरावा सोबत ।।७।। एकाएकी अकस्मात । मुंबईच्या प्रवासात । बिघाड जाहला प्रकृतीत । भाऊ काळेच्या ।।८।। भाऊकाळेला त्या वेळेस । थरकाप

सुटला सर्वांगास । सुचेना काही उपायास । इतर सहकाऱ्यांना॥९॥ मला इथेच सोडून । आपण जावे निघून । भाऊ काळेनी दिले सांगून । सर्व सहकाऱ्यांस॥१०॥ सहकाऱ्यांनी केला विचार । यांना एकट्याला ह्या स्थळावर । सोडून देणे बरोबर । होणार नाही॥११॥ सहकाऱ्यांनी भाऊ काळेस । सांगितले नामस्मरण करण्यास । शंकरबाबांचे त्या वेळेस । उत्तम उपाय म्हणून॥ १२॥ तयांच्या विनंतीवरून । बाबांचे अखंड नामस्मरण । सुरू केले भाऊ काळेनं । पुढील प्रवासात॥ १३॥ काही अंतर गेल्यावर । अकस्मात घडला चमत्कार । लख्ख प्रकाश दिसला समोर । भाऊ काळेस॥१४॥ बघा ती प्रकाशज्योत । भाऊ काळेच्या हृदयात । प्रत्यक्ष शिरली आत । त्या वेळी समक्ष॥१५॥ काळे आपल्या सहकाऱ्यासोबत । बोलू लागले पूर्ववत । सहकारी जाहले आश्चर्यचकित । काळेला बघून॥१६॥ हा बाबांचा चमत्कार । नक्कीच आहे खरोखर । चर्चा करू लागले भरपूर । आपसात बोलून॥१७॥ त्यामध्ये काहीजण । बाबाला होते जाणून । त्यांनी हे सत्य आहे म्हणून । सांगितले सर्वांस॥१८॥ बाबा या जगात ।

उच्चकोटीचे आहेत संत । त्यांचा कळणारची नाही अंत । आपणास कधीही।।१९।। बाबांचे आपल्या भक्तावर । लक्ष असते भरपूर । धावूनी जातात सत्वर । त्यांच्या संकटात।।२०।। आपल्या भक्तांचे संकटातून । करावयासी रक्षण । अवतार केला धारण । संत शंकर बाबाने।।२१।। रस्त्यामध्ये चहापाणी घेऊन । गाठले गंतव्य स्थान । बाबा होते बसून । त्या ठिकाणी।।२२।। सर्व भक्तांनी भाऊ काळेस । आग्रह केला प्रथम जाण्यास । शंकर बाबांच्या दर्शनास । त्या वेळी त्वरेने।।२३।। दर्शन घेता वेळेस । बाबाने भाऊ काळेस । प्रकृती विषयी विचारपूस । केली आवर्जून।।२४।। आता ठीक आहे म्हणून । हात फिरविला डोक्यावरून । श्री संत शंकर बाबानं । भाऊ काळेच्या।।२५।। बघा त्या हाताचा चमत्कार । भाऊ काळेही क्षणभर । विचार करू लागले सत्वर । आपल्या मनात।।२६।। दोन दिवस मुंबईला राहून । पुढे बाबांची आज्ञा घेऊन । पुण्याला आले परतून । सुखरूप स्वस्थानी।।२७।। म्हशीच्या खरेदी - विक्रीचा । व्यवसाय होता भाऊ काळेचा । त्यामुळे योग आला जाण्याचा । धुळ्यास त्याला।।२८।। धुळेच्या बाजारात ।

आठ म्हशी घेतल्या विकत। त्या म्हशी टाकुनी गाडीत । निघाले तिथून।।२९।। गाडीमध्ये डिझेल भरतेवेळेस । गाडी झुकली एका बाजूस । वेगळीच शंका आली मनास। भाऊ काळेच्या त्या वेळी।।३०।। लघुशंकेच्या निमित्ताने । त्यांनी वाहन चालकास सांगून। गाडी घेतली थांबवून । तात्काळ तेथे बाजूसी।।३१।। लघुशंकेवरून परत आल्यावर । हातपाय धुतांना हौदावर । पाण्यामध्ये दोन गाड्याची टक्कर। दिसली भाऊ काळेस।।३२।। या घटनेचा वृत्तांत । भाऊ काळेने त्वरित । सांगितला निवांत । वाहन चालकास।।३३।। भाऊ काळेनी त्यावेळेस । गाडीमध्ये बसण्यास । त्या वाहन चालकास । नकार दिला स्पष्टपणे।।३४।। त्या वाहन चालकानं । जबरदस्ती करून। गाडीत घेतले बसवून । भाऊ काळेस।।३५।। पुढे मनमाड घाटात । गाडीचा जाहला अपघात । आठही म्हशी त्यात । मृत्यू पावल्या तात्काळ।।३६।। भाऊ काळेने घाबरून । उडी टाकली गाडीमधून । दोन्ही पाय गेले कामातून । उठता येईना तयास।।३७।। हे दृश्य बघून । वाहन चालकाने तेथून । त्वरितची केले पलायन । इतरत्र स्थळास।।३८।।

एवढ्या बिकट प्रसंगात । दुसऱ्या कोणाचीही मदत। मिळाली नाही त्या काळात । भाऊ काळेस।।३९।। एकटेच त्या स्थळावर । पडून होते निराधार । एवढ्यात दोन धनगरांचे पोर । आले त्या ठिकाणी।।४०।। त्यांनी एका गाडीला अडवून । घटना दिली पटवून । ह्या व्यक्तीला नेऊन । भरती करावे दवाखान्यात।।४१।। कोपरगावच्या दवाखान्यामधून । प्राथमिक उपचार घेऊन। पुण्याला आले निघून। आपल्या घरी।।४२।। पुण्याच्या डॉक्टर मंडळीनी । पायाचे ऑपरेशन दोन्ही । करावे लागते म्हणूनी। सांगितले तात्काळ।।४३।। ऑपरेशन करिता त्वरित । भरती केले दवाखान्यात । बाबाने दाखविली करामत । त्या स्थळास।।४४।। अचानक भाऊ काळेस । एक शुभ्रवस्त्रधारी पुरुष। त्या वेळी पडला दृष्टीस । दवाखान्यात न कळे।।४५।। आपल्या हाताच्या संकेतानं । माझ्याकडे ये म्हणून । हाक दिली जोरानं । त्यावेळी भाऊला।।४६।। बघा त्या धुंदीत । भाऊ काळे पायी चालत। सुखरूप घरी पोहोचलेत । दवाखान्यामधून।।४७।। पेशन्ट कुठे गेला म्हणून । डॉक्टर गेले घाबरून । शेवटी गाठले डेक्कन । घर भाऊ काळेने।।४८।।

भाऊ काळेला पाहून । आश्चर्य करिती सारे जन । हे कसे काय पायी चालून । आले येथवरी।।४९।। यांना तर पूर्वी व्यवस्थित । उभेही राहता नव्हते येत । ऑपरेशन शिवाय पायात । सुधार नव्हता होणार।।५०।। बघा माझ्या सद्गुरूनाथानी । माझा हात धरूनी । मला घरी दिले सोडुनी । सुखरूप मायेने।।५१।। भाऊ काळेने त्यावेळेस । घडलेला सर्व इतिहास । सांगितला सर्वास । आपल्या स्वानुभवाचा।।५२।। पुढे स्वस्थ झाल्यावर । गाठले पिंपळखुटा माहेर । मस्तक ठेविले चरणावर । सद्गुरू शंकर बाबाच्या।।५३।। आनंदाच्या भरात । भाऊ काळेने भीत भीत । आपल्या अपघाताचा वृत्तांत । सांगितला बाबास।।५४।। बाबाने डोळे मिटवून । सर्व घेतले ऐकून । आम्हाला सर्व त्रिकाल ज्ञान । दिले उत्तर त्याक्षणी।।५५।। बाबांचा आशीर्वाद घेऊन । भाऊ काळे पिंपळखुट्यावरून। पुण्याला आले परतून । भक्तिभावे सत्वर।।५६।। आपल्या पूर्व व्यवसायास। सुरुवात केली तूर्तास। बाबाने त्यामध्ये भरपूर यश। दिले मिळवून।।५७।। पूर्वी गाडीच्या अपघातात । आठ म्हशी जाहल्या होत्या मृत। हजारो

रुपयाचे त्यात । जाहल होते नुकसान।।५८।। शंकर बाबाच्या कृपेनं । अवघ्या आठ महिन्यांच्या धंद्यातून। संपूर्ण नुकसान निघाले भरून । भाऊ काळेचे।।५९।। कणभर-घ्यावे अन् मणभर द्यावं । हा संताचा आहे स्वभाव। पडू ना द्यावी उणीव । आपल्या भक्तास।।६०।। कोण्यापरी ते द्यावे । हे संताशीच आहे ठावे । भक्तांनी ते अनुभवावे। आपल्या परीने।।६१।। संत हे मनाचे उदार। म्हणूनी तयांना दातार । म्हणतात या भूमीवर । सारे मानवमात्र।।६२।। जो तयाला गेला शरण । तयांच्या जीवनाचे कल्याण। निश्चितची जाहले परिपूर्ण । या जगात।।६३।। अति अल्प काळात । भाऊ काळेची परिस्थिती पूर्ववत। जाहली समस्त व्यवस्थित। शंकर बाबाच्या कृपेने।।६४।। पिंपळखुट्याचा योगेश्वर । आपल्या जीवनाचा आधार। मानुनी चालतात सत्वर । आपल्या मार्गाने।।६५।। आता बाळासाहेब वाल्हेकरांचे । एका संतप्रेमी भक्ताचे । अनुभव ऐका तयांचे । ध्यान देऊन निःशंक।।६६।। राहणारे ते पुण्याचे । साध्या सरळ स्वभावाचे । व्यक्तिमत्त्व आहे तयांचे । प्रेमभावे सर्वांशी।।६७।। अत्यंत गरिब

परिस्थितीत । त्यांनी दिवस काढलेत। हृदय भरून येत । एकताना आजही।।६८।। त्या पूर्व परिस्थितीची जाण । विसरले नाहीत अजून । त्या परीच आहे वागणं । त्यांचे अजूनही।।६९।। सतरा वर्षांच्या वयात । भरती झाले सैन्यात। नोकरी करू लागले आनंदात। त्यावेळी जिद्दीने।।७०।। अचानक काही दिवसानं । वाल्हेकरांचे मन। अति जाहले उदासीन । कोण जाणे ।।७१।। एके दिवशी वाल्हेकर। तेथील मंदिरावर । फिरावयासी गेले सत्वर । काही मित्रांसोबत।।७२।। तिथे त्यांच्या मनास । शांती लाभली तूर्तास । पुढे या नित्यनेमास । चालविले नियमित।।७३।। वाल्हेकर लहानपणापासून । धार्मिक होते प्रवृत्तीनं । त्यामुळे वैराग्य झाले निर्माण । त्यांच्या मनामधे।।७४।। सैन्यामधून रजा घेऊन । घरी आले परतून । पुढे हिमालयात जावे निघून । तपश्चर्या करावया।।७५।। वाल्हेकरांच्या मनात । यापरी विचार होता घोळत । घराबाहेर पडले त्वरित । त्याच क्षणी सत्वर।।७६।। काही साधूसन्याशां सोबत । घरोघरी भिक्षा मागत । फिरले संपूर्ण भारत । त्या काळात।।७७।। ते अर्ध्यामध्ये सोडूनी । घरी आले परतूनी । पुढे घरच्या

लोकांनी । बांधले विवाह बंधनात।।७८।। आता वाल्हेकरांना सत्वर । पुढे खाई मागे विहीर। दिसू लागली डोळ्यासमोर । प्रत्यक्षात ना कळे।।७९।। घरची परिस्थिती गंभीर । त्यात नोकरीलाही केले दूर । सुचेना काही विचार । वाल्हेकरासी।।८०।। जीवनाच्या सर्व बाजूनं । अपयशी ठरलो आपण । आता कसे जगावे जीवन । काय होईल भविष्यात।।८१।। ह्या साऱ्या विचारानं । वाल्हेकराचे संतुलन । पूर्णपणे गेले बिघडून । त्या वेळेस।।८२।। प्रसंगाचे चटके सोसत । वाल्हेकर होते चालत । आपल्या मार्गाने सतत । रात्रंदिवस निष्ठेने।।८३।। त्या विवंचनेच्या काळात । बाळासाहेब ईश्वरीय चिंतनात। राहत होते नित्य । दैनंदिन जीवनी।।८४।। कधी आध्यात्मिक विषयावर । आपल्या घनिष्ठ मित्राबरोबर। चर्चा करायचे वाल्हेकर। त्या काळात।।८५।। अध्यात्म आणि नामस्मरण । आपले एकमेव साधन। वाल्हेकर होते जाणून । उत्तम प्रकारे।।८६।। त्यामुळे वाल्हेकरान । आपल्या आध्यात्मिक जीवन । सुरक्षित ठेवल राखुन । त्या कठीण काळातही।।८७।। पुढे एका मित्रासोबत । गगनगिरी महाराजांच्या आश्रमात ।

दर्शनाकरिता अकस्मात। गेले निघून त्वरेने॥८८॥ त्यानंतर योगा-योगानं। एका मित्राच्या सहकार्यानं। संत अनवर बाबांचे दर्शन। घडले त्या काळात॥८९॥ संत अनवर बाबानं। आशीर्वाद देऊन। नवचैतन्य केले निर्माण। वाल्हेकरांच्या जीवनात॥९०॥ अनवर बाबांच्या उपदेशावरून। मिळेल तो व्यवसाय करून। आपल्या कुटुंबाचे पोषण। करू लागले वाल्हेकर॥९१॥ संत सेवा आणि नामस्मरण। याचे कधीही विस्मरण। होऊ न दिले वाल्हेकरान। आपल्या आयुष्यात॥९२॥ वाल्हेकरांना त्या वेळेस। एकच होता ध्यास। जावून भेटावे साधूसंतास। दर्शनाच्या निमित्ताने॥९३॥ त्यांनी त्या काळात। अनेक थोर साधूसंत। पाहिलेत प्रत्यक्षात। जाऊनी त्या स्थळास॥९४॥ त्यात अनवर बाबा जळक्याचे। संतोष बाबा कुटाऱ्याचे। हे दोनही संत वाल्हेकरांचे। जाहले प्रेरणास्थळ॥९५॥ गुरुपौर्णिमेच्या पर्वास। वाल्हेकर त्या स्थळास। गुरुदक्षिणा अर्पण करण्यास। जातात दर वर्षी॥९६॥ सिद्धेश्वर चव्हाण नावाचे। राहणारे ते पुण्याचे। परममित्र ते वाल्हेकराचे। बालपणापासून॥९७॥ ते भक्त शंकर बाबांचे। दर रामनवमीला त्यांचे। जाणे-येणे होते नित्याचे। श्री क्षेत्र

पिंपळखुट्यास।।९८।। त्यांनी बाळासाहेब वाल्हेकरास । आग्रह केला येण्यास। संत शंकर बाबाच्या दर्शनास । आपल्या सोबत।।९९।। वाल्हेकराने आपल्या मित्रास । नकार दिला तूर्तास। पिंपळखुट्याला येण्यास । आर्थिक कारणास्तव।।१००।। त्याच दिवशी वाल्हेकरास । पहाटे चारच्या सुमारास। स्वप्न दृष्टांत जाहला खास। संत शंकर बाबांचा।।१०१।। स्वप्नामध्ये स्वयम वाल्हेकर । आपल्या परम मित्राबरोबर । बसले आहेत बाबासमोर । पिंपळखुट्यास प्रत्यक्ष।।१०२।। बाबाने दोघांच्याही हातावर । दोन लाडू देऊनी सत्वर । खावया सांगितले लवकर । दोघासही मायेने।।१०३।। सकाळी उठल्यावर । वाल्हेकराने आपल्या पत्नीबरोबर। चर्चा केली या विषयावर । कथन केला वृत्तांत।।१०४।। वाल्हेकरांच्या पत्नीने। आपल्या स्वच्छेने। अंगावरील सोन्याचे दागिने । दिले काढून त्वरेने।।१०५।। ते दागिने विकून । काही पैसे गोळा करून । वाल्हेकर पुण्यावरून। आले पिंपळखुट्यासी।।१०६।। वाल्हेकरासी पाहून। बाबा बोलले हसून । आज कसे काय आले म्हणून । करू लागले विचारपूस।।१०७।। आपण आदेश दिल्यावर। कोण नाही येणार। वाल्हेकरांने दिले उत्तर। नम्र होऊन

चरणावर।।१०८।। डोक्यावरून हात फिरवूनी । आशीर्वाद दिला प्रेमानी । श्री संत शंकर बाबानी । त्या वेळी वाल्हेकरास ।।१०९।। आज वाल्हेकरांचे जीवन । संत शंकरबाबाच्या कृपेन । समूळ गेले बदलून । एकाएकी श्रद्धेने।।११०।। रंकाचा राव बनविणं । संताला नाही कठीण । परी भक्त ही पाहिजे निष्ठावान । त्यासाठी निश्चित।।१११।। आपल्या निष्ठेचे फळ । वाल्हेकरांना सकळ । प्राप्त झाले तात्काळ । सद्‌गुरूच्या कृपेने।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । पंधरावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय सोळावा

सौ. सविताताई जावकर । त्या मुंबईच्या राहणार । अपार श्रद्धा त्यांची बाबावर । आहे एकमात्र॥१॥ माझी माउली सतत । असते माझ्या सोबत । यापरी त्या सांगतात । अनुभव आपुला॥२॥ अशक्य ते शक्य करूनी । दाखविले आपल्या शक्तीनी । माझ्या सद्‌गुरू माउलीनी। भक्तासाठी तात्काळ॥३॥ एकोणवीसशे सत्याण्णव सालात । संत अडाणेश्वराच्या सेवेत । सविताताई आल्यात । प्रथमच भक्तिभावाने॥४॥ काही भक्त मंडळींकडून । संत अडाणेश्वराचे गुणगान। करीत होती श्रवण। सविताताई नित्याने॥५॥ ते गुणवर्णन ऐकून। सविताताई देहभान। जात होती विसरून। भक्तीमाजी क्षणोक्षणी॥६॥ अडाणेश्वर दादाजी असते तर । त्यांची सेवा मी भरपूर। केली असती आयुष्यभर । इतरांप्रमाणे नित्याने॥७॥ या कल्पनेने सविताताईस । विचलित केले रात्रंदिवस। दुर्भागी समजत होती स्वत:स। इतरांच्या तुलनेत॥८॥ कधी

अडाणेश्वर दादाजीच्या फोटो समोर । उभी राहून सत्वर। आपल्या मनातील हा विचार । व्यक्त करती जाहली।।९।। आठवड्यातील एक दिवस। मुंबईच्या भक्त मंडळीस। आमंत्रित करावे आरतीस। संत अडाणेश्वराच्या।।१०।। त्या वेळी सविताताईनं। भोजनाचेही आयोजन। करावे अगत्यानं। त्या भक्त मंडळीस।।११।। आपल्या सद्गुरूच्या स्मरणार्थ। तीन वर्षे पर्यंत। सविताताईने चालविले सतत। उपक्रमास निष्ठेने।। १२।। पुढे काही दिवसांनंतर। सौ. सविता ताईवर। गुरूकृपा जाहली सत्वर। संत अडाणेश्वराची।।१३।। एक दिवस अकस्मात। अडाणेश्वराच्या मंदिरात। सविताताई निवांत। होती बसून चिंतनी।।१४।। अनिल जगगताप नावाचे। ते भक्त अडाणेश्वराचे। व्यवस्थापक त्या संस्थानाचे। गुरू बंधू सविताताईचे।।१५।। सविताताईला बघून। जगताप साहेबानं। पिंपळखुट्याला येता काय म्हणून। केली विचारपूस।।१६।। सविताताई त्वरित। काही भक्तमंडळी सोबत। जगताप साहेबांच्या गाडीत। आली पिंपळखुट्यास।।१७।। श्री क्षेत्र पिंपळखुट्यास। संत शंकर बाबाच्या दर्शनास।

सविताताईचा तो प्रथम दिवस। होता एकमेव॥१८॥ शुचिर्भूत होऊन। सौ. सविताताईनं। नंतर घेतले दर्शन। संत शंकर बाबांचे॥१९॥ बाबाला प्रत्यक्षात बघून। सविताताई अति प्रसन्न। जाहली असे मनोमन। तये वेळी॥२०॥ माझ्या सद्गुरुनाथानं। माझ्यावर कृपा करून। अति योग्य स्थान। दिले मजला मिळवून॥२१॥ बघा या शब्दात। सविताताईने प्रत्यक्षात। प्रार्थना केली आपल्या मनात। त्या प्रसंगास॥२२॥ सविताताई तेव्हापासून। बाबांची निस्सीम भक्त बनून। करू लागली येणं-जाणं। पिंपळखुट्यास नित्याने॥२३॥ श्री संत शंकर बाबास। आपल्या घरी मुंबईस। घेऊन जावे एखादे वेळेस। वाटे सविताताईस॥२४॥ बाबांचे पवित्र चरण। आपल्या घराला लागावे म्हणून। इच्छा होती मनोमन। सविताताईची॥२५॥ परी तिच्या मनास। बाबाला विचारण्याचे धाडस। झाले नाही बरेच दिवस। देव जाणे॥२६॥ सविताताईच्या धाकट्या मुलीने। मोठी हिंमत करून। बाबाला दिले निमंत्रण। आपल्या घरी येण्याचे॥२७॥ बघा बाबाने पल्लवीस। होकार

दिला येण्यास । तिच्या घरी मुंबईस । तात्काळ ममतेने॥२८॥ लगेच काही दिवसानं । बाबाचे जाहले आगमन। सविताताई आनंदानं । गेली फुलून॥२९॥ शंकरबाबा त्यावेळेस । सविताताईच्या घरास । केवळ दोन तास । राहिले मुक्कामी॥३०॥ पुढे बाबा नियमित । आपल्या मुंबईच्या दौऱ्यात । सविताताईकडे येतात । मुक्कामास नित्याने॥३१॥ सौ. प्रिया नावाची । मोठी मुलगी सविताताईची । रहिवासी ती सानपाड्याची । मुंबईत राहतसे॥३२॥ दोन हजार दोन वर्षाला । तिच्या घरी मुक्कामाला । बाबा होते रात्रीला । काही भक्तां सोबत॥३३॥ दुसऱ्या दिवशी बाबानं । आपल्या जवळ बोलावून । समजावून सांगितले प्रेमानं । सविताताईस तये वेळी॥३४॥ ताई तुम्ही आमच्यापासून । एकही गोष्ट लपवून । ठेवू नका आजपासून । आपल्या मनातील॥३५॥ आम्हाला आई समजून । तुम्ही वागावे लेकरासमान । आपले मन मोकळे करून । यापुढे भविष्यात॥३६॥ नाहीतर वेळ निघून गेल्यावर । उपयोग नाही होणार । उगाच करावा लागणार । पश्चात्ताप शेवटी॥३७॥ सविताताईने

खरोखर । बाबाच्या म्हणण्यास सत्वर । त्वरितची केले स्वीकार । त्यावेळेस भक्तीने।।३८।। माझ्या सद्गुरू माउलीनं । माझे अंतर्मन । अचूक घेतले जाणून । आपल्या दिव्य शक्तीने।।३९।। शब्द निघेना मुखातून । अश्रू वाहे नेत्रातून । बाबाने केले सांत्वन । सविताताईचे।।४०।। सविताताईच्या मोठ्या मुलीस । पाच वर्षं होऊन लग्नास । परी संतती सुखास । होती वंचित दुःखाने ।।४१।। सविताताईला जीवनात । ही एकमेव खंत । जाणवत होती सतत । कन्येसाठी क्षणोक्षणी।।४२।। तिला गर्भधारणा झाल्यावर । गर्भ टिकेना तीन मासाचेवर। यापरी जाहले त्रिवार । काय करावे कळेना।।४३।। लगेच सविताताईनं । विकल्प मनी ना ठेवून । ही गोष्ट दिली सांगून । बाबाजवळ त्वरेने।।४४।। बाबाने त्यावेळेस । आशीर्वाद दिला उभयतांस । जावई आणि मुलीस । सविताताईच्या।।४५।। त्याच वर्षी मुलीस । लगेच गेले दिवस । परी होताच तीन मास । घटना जाहली पूर्ववत।।४६।। तिला नेऊन त्वरित । भरती केले दवाखान्यात । निदान आले अहवालात । अति दु:खदायक।।४७।। प्रियाच्या

गर्भाशयात । गर्भाचे तुकडे जाहले आत । सर्व परिवार त्या काळात । होता उदास त्याक्षणी।।४८।। सविताताईने पिंपळखुट्यास । रामभाऊजी नावाच्या सेवकास । फोन केला तूर्तास । मुंबईवरून त्वरेने।।४९।। रामभाऊजीने बाबाजवळ । घटना सांगितली सकळ । बाबाने त्यावर तात्काळ । दिला निर्णय योग्य तो।।५०।। आहे त्या परिस्थितीत । प्रियाला घरी आणावे त्वरित । ठेवू नका दवाखान्यात । क्षणभरही तियेला।।५१।। दोन दिवसांनंतर । शोधावा दुसरा डॉक्टर । तिचा करावा उपचार । मुंबईस निश्चित।।५२।। बाबाच्या इच्छेप्रमाण । सविताताईने दवाखान्यातून । प्रियाला अगदी तातडीनं । आणले घरास।।५३।। प्रियाच्या आत पोटात । खूप होते दुखत । त्यामुळे ती अति त्रस्त । होती त्या वेळेस।।५४।। सविताताईने मुलीस । बाबाचे स्मरण करण्यास । आवर्जून सांगितले त्या वेळेस । अति श्रद्धेने।।५५।। त्याच दिवशी रात्रीस । दृष्टांत जाहला प्रियास । तिने प्रत्यक्ष पाहिले बाबास । आपल्या घरी दारात।।५६।। प्रियाने आपल्या आईस । सांगितले ह्या घटनेस । सविताताई समजली मनास । धोका

टळला म्हणून।।५७।। लगेच दोन दिवसानं । एका महिला डॉक्टरकडून। उपचार करावा म्हणून । नेले प्रियाला सत्वर।।५८।। त्या महिला डॉक्टरानं । पूर्वीचा रिपोर्ट बघून । मूल गेले आहे म्हणून । सांगितले सविताताईस।।५९।। गर्भाची पिशवी साफ करून । घ्यावी लागते तातडीनं । प्रिया गेली घाबरून । त्या वेळेस ना कळे।।६०।। सविताताईने महिला डॉक्टरास। सांगितले आपल्या निर्णयास। पुन्हा सोनोग्राफी करण्यास। आपल्या मुलीची।।६१।। त्या महिला डॉक्टरानं। सविताताईला मूर्ख समजून। सोनोग्राफी घेतली करून । अविश्वासाने तात्काळ।।६२।। सोनोग्राफीचा रिपोर्ट बघून । डॉ. सध्यापुरी जाहली सुन्न । आता काय सांगावे म्हणून । सविताताईस।।६३।। बघा प्रियाच्या उदरात । तीन महिन्यांचे बाळ आत। वाढत होते गर्भात। एकमेव आश्चर्य।।६४।। डॉक्टने सविताताईला बोलावून । हा अद्‌भुत चमत्कार आहे म्हणून । कबूल केले मनोमन । त्या वेळी श्रद्धेने।।६५।। येथे कोण्यातरी महात्म्यानं। आपल्या दिव्य शक्तीनं। चमत्कार घडविला अद्‌भुतपूर्ण । नक्की आपण जाणावे।।६६।। त्या वेळी सविताताईनं । आपल्या

गुरुमाऊलीचे थोरपण। व्यक्त केले श्रद्धेन। डॉ. संध्यापुरीजवळ॥६७॥ पुढे सविताताईचे पतिदेव। नाव तयांचे प्रमोदराव। त्यांच्या जीवनात घडला अनुभव। सांगतो आपणास॥६८॥ बघा पल्लवी नावाची। धाकटी कन्या सविताताईची। परमभक्त आहे ती शंकरबाबाची। बालवयापासून॥६९॥ ती आपल्या पतीसोबत। सध्या राहते विदेशात। कधीकधी येते ती भारतात। आई वडिलांच्या भेटीस॥७०॥ दोन हजार सहा सालास। पल्लवी आली भेटीस। ठरल्याप्रमाणे मुंबईस। परिवारासहित॥७१॥ तिथून ती पिंपळखुट्यास। शंकर बाबाच्या दर्शनास। सोबत आपल्या आईस। आली घेऊन॥७२॥ इकडे पती प्रमोदरावाच्या प्रकृतीत। बिघाड पडला अकस्मात। त्यांचा डावा पाय आणि हात। जाहला होता निष्क्रिय॥७३॥ तो अर्धांगवायूचा प्रकार। सांगत होते डॉक्टर। त्वरित नेऊन केला उपचार। मुलाने त्या वेळेस॥७४॥ प्रमोदरावांची बाबावर। निष्ठा आहे पुरेपूर। बाबांना ते परमेश्वर। मानतात साक्षात॥७५॥ ते नित्य दैनंदिन। शंकर बाबाचे नामस्मरण। करतात अति

श्रद्धेन । न चुके नेम कधीही।।७६।। दरवर्षी रामनवमीस । संत शंकर बाबाच्या दर्शनास । प्रमोदराव पिंपळखुट्यास । येतात आवर्जून।।७७।। बघा त्या प्रमोदरावास । पूर्वीचा अनुभव होता गाठीस । बाबांच्या अंगाऱ्याने हमखास । आराम होतो म्हणून।।७८।। त्यांनी आपल्या मुलास । डाव्या बाजूच्या हातपायास। अंगारा सांगितला लावण्यास । संत शंकर बाबाचा।।७९।। पितृआज्ञा समजुनी । चिरंजीव अभिषेकनी । पूजेमधला अंगारा आणुनी । लावून दिला त्वरित।।८०।। धनामाजी श्रेष्ठ धन । श्रद्धा आहे महत्त्वपूर्ण । श्रद्धा नसेल तो प्राणी निर्धन । समजावा एकमेव।।८१।। बघा त्या एकलव्यानं । आपल्या गुरुला साक्षी ठेवून । धनुर्विद्या केली ग्रहण । एका श्रद्धेठायी।।८२।। प्रल्हादाच्या श्रद्धेकारण । देवाला अवतार घेऊन । प्रगट व्हावे खांबामधून । भक्तासाठी तात्काळ।।८३।। पाषाणाच्या मूर्तिमधून । स्वयम प्रगट होऊन । नैवेद्य करावा लागला सेवन । संत नामदेवांचा।।८४।। केवळ श्रद्धा घेऊनी मनात । शबरी बैसली होती मार्गात । राम भेटीच्या प्रतीक्षेत । दीर्घकाळ

वनामधे।।८५।। ज्यापरी स्त्रीचे जीवन । पती विना आहे अपूर्ण । त्यापरी श्रद्धा ही महत्त्वपूर्ण। आहे मानवजीवनात।।८६।। बघा अंगारा लावताच हातापायास । आराम जाहला प्रमोदरावास। चेतना आली सर्वांगास । दुःख निवारण जाहले।।८७।। लगेच पायी चालत । आपल्या मुलासोबत। प्रमोदराव गेले दवाखान्यात। त्या वेळी आनंदे।।८८।। संपूर्ण तपासणी केल्यावर । डॉक्टरांनी सांगितले सत्वर । आपणास उपचाराची जरूर । नाही मुळीच।।८९।। इकडे सविताताईच्या मुलीनं । वार्ता कळविली फोनवरून। प्रकृती बिघडली होती म्हणून । प्रमोदरावांची।।९०।। सविताताई त्या वेळेस । मुक्कामी होती पिंपळखुट्यास । लगेच जाहली उदास । समाचार ऐकून।।९१।। सविताताईने या घटनेस । सांगितले शंकर बाबास । बाबाने धीर दिला मनास । सविताताईच्या।।९२।। आम्ही आमच्या गुरुदेवास । सांगितले ठीक करण्यास । काहीच होणार नाही प्रमोदरावास । घ्यावे ऐकून।।९३।। थोर महात्म्याचे बोल। असतात अनमोल। याला कारण त्यांचे तपोबल। आहे

एकमेव।।९४।। बाबाचे म्हणणे ऐकून । गुरुभक्त सवितातार्इनं । सर्व चिंता केली अर्पण । सद्गुरूंच्या चरणावर।।९५।। आम्ही आई आहोत म्हणून। बाबाचे ते वचन। सवितातार्इला जाहले स्मरण । तये वेळी सत्वर।।९६।। आपली लेक समजून । माझ्या सद्गुरू माउलीनं । माझ्या कुटुंबाचे केले रक्षण । अनुभवले प्रत्यक्ष।।९७।। मुलीला संतती सुख देऊन । मातृत्व केले प्रदान । पतीला वाचविले आजारातून । दूर केले दुःखासी।।९८।। माझ्या गुरुमाउलीचे माझ्यावर। अनंत आहेत उपकार। ते जन्मोजन्मी नाही फिटणार । काही केल्या।।९९।। माझ्या गुरुमाउलीचे अंतकरण । मऊ आहे मेणाहून। करुणा वाहते त्यामधून। सदोदित प्रेमाची।।१००।। ते स्फटिकासम आहे निर्मळ। त्यामध्ये थोडाही नाही खळमळ। राव-रंक आदी सकळ। समान आहे त्याठायी।।१०१।। बाबाची परवानगी घेऊन। सवितातार्इ पिंपळखुट्यावरून। मुंबईला आली परतून। आपल्या मुली सोबत।।१०२।। इकडे प्रमोदराव अगदी स्वस्थ। बसून होते आरामात। आपल्या मुलासोबत। होते चर्चा

करीत।।१०३।। आपल्या पतीला स्वस्थ पाहून । सविताताईला आले गहिवरून। लगेच तिने डोळे मिटून । केले स्मरण बाबांचे।।१०४।। प्रमोदराव म्हणे बाबानं । मला दिले जीवनदान । नुसता अंगारा लावल्यानं । मी स्वस्थ जाहलो।।१०५।। बघा बाबाच्या अंगाऱ्यात । केवढी शक्ती आहे अद्‌भुत। डॉक्टरही जाहले चकित । सांगू लागले प्रमोदराव।।१०६।। उपचाराविना आजार । कसा काय झाला दूर । सारे करू लागले विचार । आपल्या परीने।।१०७।। पुन्हा दवाखान्यात नेऊन । संपूर्ण चाचण्या घेतल्या करून । संशय काढला मनातून । झाले निःशंक मनोमनी।।१०८।। आजाराचे कोणतेही लक्षण। आढळले नाही शोधून। सर्व व्यवस्थित आहे म्हणून। सांगितले डॉक्टरांनी।।१०९।। पूर्व प्रारब्धाविन । संत कृपेने दान । प्राप्त होणे अति कठीण । आहे एकमात्र।।११०।। संत अडाणेश्वराच्या स्वरूपात । संत शंकरबाबा साक्षात । सद्‌गुरू मिळाले जीवनात । सविताताईस।।१११।। आज शंकर बाबाच्या कृपेनं । परम आनंदाचे क्षण । भोगत आहे दैनंदिन । सविताताई साक्षात।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ ।

---

संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । सोळावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय सतरावा

विलासराव कदम मुंबईचे । बाबावर अलोट प्रेम तयांचे । त्यांचेकडे बाबाच्या अनुभवाचे । सागर आहे भरपूर।।१।। बाबाच्या अनुमती शिवाय । ते कोणताही निर्णय । घेत नाही, निःसंशय । आदरभाव बाबाप्रती।।२।। बाबाने सांगावे । त्यापरीच वागावे । त्यापलीकडे न जावे । गुरू आज्ञा समजून।।३।। यापरी वागण्यानं । होत असेल कल्याण । मग का करावा अवमान । आपल्या सद्गुरूचा।।४।। श्रद्धेने सर्व काही होते । श्रद्धा नसता वाया जाते । कदम साहेब सांगतात येथे । आपला अनुभव।।५।। अभिषेक नावाचा । मोठा मुलगा कदम साहेबांचा । त्याला इंजिनीअर बनविण्याचा । विचार होता सर्वांचा।।६।। अर्ज भरला प्रवेशाचा । आधी विचार घ्यावा गुरुदेवांचा । त्या वेळी मुक्काम होता बाबाचा । ठाणे मुंबईत।।७।। सोबत पत्नीला घेऊन । कदम भेटले जाऊन । बाबाचे घेतले दर्शन । वार्ता कळविली तात्काळ।।८।। बाबा म्हणाले अभिषेकला ।

डॉक्टर बनवायचे त्याला । आश्चर्य वाटले कदम साहेबाला । थोड्या वेळासाठी।।९।। कदम साहेब म्हणाले बाबाला । मेडिकलमध्ये प्रवेश घेण्याला। थोडे फार तयाला । गुण कमी पडतात।।१०।। तुम्ही आधी घ्या प्रवेश । पुढचे आम्ही बघू सावकाश। बाबा बोलले कदम साहेबास। जाणोनिया तात्काळ।।११।। बाबाच्या आज्ञेनुसार । मेडिकलसाठी अर्ज केला सादर । अचानक जाहला चमत्कार । नीट घ्यावा ऐकून।।१२।। त्यावर्षी संपूर्ण राज्यात। प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात। शिकावू विद्यार्थ्यांच्या जागेत। वाढ जाहली अचानक।। १३।। त्याचा फायदा अभिषेकला। अचानकची मिळाला । इंजिनीअरचा डॉक्टर झाला । ऐका श्रोते सत्य हे।।१४।। संत शंकर बाबांची भविष्यवाणी । सत्य ठरली सर्व बाजूनी । संत शंकर बाबा अगाध ज्ञानी । सर्व जाणती साक्षात।।१५।। एकदा बाबा मुंबईला । होते बघा मुक्कामाला । तेव्हा हा प्रसंग घडला । कदम साहेबाच्या घरी।।१६।। प्रसंग आहे थोर। ऐकून घ्यावा सविस्तर। विश्वमंदिराच्या संकल्प दौऱ्यावर। बाबा होते त्या काळी।।१७।। एके दिवशी

संध्याकाळी । पंधरा-वीस भक्त मंडळी । बसून होती बाबाजवळी । बाबाच्या दर्शनासी॥१८॥ अचानक त्या समयाला । एक सद्गृहस्थ तिथे आला । परवानगी मागू लागला । बाबाला भेटावयास॥१९॥ त्या वेळी कदम साहेबानं । बाबाची परवानगी घेऊन । त्या गृहस्थाची भेट करून । दिली बाबा सोबत॥२०॥ त्या सद्गृहस्थानं । अति आदरानं । बाबाचे केले पूजन । त्या वेळी भक्तीने॥२१॥ तो गृहस्थ बोलला बाबास । आम्ही आलो भेटाया आपणास । मोठी देणगी द्यावयास । बांधावया विश्वमंदिर॥२२॥ आम्ही मोठ्या उद्योगपतीचे । सचिव आहो तयांचे । आदेश मिळाले येण्याचे । या ठायी सत्वर॥२३॥ बाबा बोलले त्या गृहस्थास । धन्यवाद देतो आपल्या सहकार्यास। विनम्र नकार दिला त्यास। सर्वांच्या समक्ष॥२४॥ आम्ही गोरगरिबांच्या वर्गणीतून। विश्वमंदिराचे निर्माण । करणार आहोत पूर्ण । गुरुदेवांच्या आशीर्वादाने॥२५॥ मित्रहो ही परंपरा नव्हे आजची । ही आहे फार पूर्वीची। गुरुनानक देव, गाडगे बाबाची । तुकडोजी लहानुजी, सत्यदेवासहित॥२६॥ ती परंपरा शंकरबाबानं । कायम ठेवली

राखून । इतिहास केला निर्माण । संत मालिकेत।।२७।। सव्वा कोटी रु. खर्चून । विश्व मंदिर झाले निर्माण । गोरगरिबांचेही योगदान । त्यात आहे भरपूर।।२८।। कुंजविहारी महाराज कामरगावचे । आहेत थोर व्यक्तिमत्त्वाचे । ते सुपरिचित सर्वांचे । आबालवृद्धा सहित।।२९।। संत शंकर बाबा विषयीचे । तयांचे अनुभव मोलाचे । या ग्रंथी लेखन करण्याचे । भाग्य लाभले योगाने।।३०।। प्रथम दर्शनी टाकरखेड्यात । अवघ्या सात वर्षांचे वयात । आले बघा वडिलासोबत । संत लहानुजीच्या दर्शनास।।३१।। त्या वेळी संत लहानुजीनी । तंबाखू दिला बटव्यातूनी । तो तंबाखू नव्हे बुटी संजीवनी । जीवनाच्या उद्धाराची।।३२।। 'लहान्याचा भेटला लहान्या । हाची तंबाखू, वाट लोकाले' । त्या वेळी संत लहानुजी बोलले । सत्य जाहले आज ते।।३३।। तेव्हापासून कुंजविहारी । झाले टाकरखेडचे वारकरी । आकर्षण जाहले लोहचुंबकापरी । एकमेकाशी निष्ठेने।।३४।। सोळा वर्षाचे वयात । संत लहरी बाबाच्या दरबारात । भागवत प्रवचनाला सुरुवात । जाहली एकमेव।।३५।। प्रथम दर्शनी टाकरखेड्यात । मिळाले

लहानुजी थोर संत । दुजे लाभले मधापुरात । लहरी बाबा।।३६।। तिजे लष्करी बाबा मुलोड्याचे । ते सद्गुरू होते मातेचे । तयाच्या चरित्र ग्रंथाचे । लेखन केले तिसऱ्यांदा।।३७।। तीन थोर संताचा समागम । जाणावा त्रिवेणी संगम । जाहला अलौकिक जन्म । कुंजबिहारी महाराजांचा।।३८।। एकदा लहानुजी बाबा बोलले । कुंजबिहारीना संकेत दिले । म्हणे जाय लेका पिंपळखुट्याले । तुले भेटते लय मोठे ।३९।। कुंजबिहारीच्या मनात । सारखा विचार होता घोळत । यावया पिंपळखुटा आश्रमात । शंकर बाबाच्या दर्शनाशी।।४०।। त्यावेळी भातुकलीत । सुरू होते भागवत । कुंजबिहारी होते व्यस्त । येथे कार्यक्रमात ।४१।। त्या भागवत सप्ताहात । शंकर बाबा अकस्मात । स्वयम जाहले उपस्थित । अवचित त्याठायी।।४२।। बाबा बोलले कुंजबिहारीला । या वर्षी रामनवमीला । आपण यावे भागवत सप्ताहाला । पिंपळखुट्यास त्वरेने।।४३।। बाबाची आज्ञा म्हणून । प्रल्हाद राऊतला घेऊन । केले पिंपळखुट्याला प्रस्थान । दर्शनाच्या ओढीने।।४४।। घेतले बाबाचे दर्शन । बाबाने

आता बोलावून । त्याच क्षणी अनुग्रह देऊन । पावन केले कुंजबिहारीस।।४५।। त्या दिवसापासून । चाळीस वर्षे जाहले पूर्ण । करित आहे भागवत प्रवचन । परप्रांतात जाऊनी।।४६।। एकदा रामनवमीच्या उत्सवाला । श्री क्षेत्र पिंपळखुट्याला । त्या वेळी घडलेल्या प्रसंगाला । ऐकावे सविस्तर।।४७।। बाबा म्हणाले कुंजबिहारीला । तुम्ही त्वरित जावे धामणगावाला । तपासून यावे प्रकृतीला । डॉ. चांडकाकडून।।४८।। कुंजबिहारी पडले विचारात । माझी प्रकृती तर ठणठणीत । बाबा स्वयम म्हणतात । म्हणुनी यावे तपासून।।४९।। डॉक्टरांनी पाहता क्षणी । आश्चर्य व्यक्त केले मनी । कसे आले पिंपळखुट्याहुनी। तुम्ही इथवरी।।५०।। आपणास हृदय विकाराचा । झटका होता तीव्रतेचा। विश्वास नव्हता जगण्याचा। बोलले डॉ. चांडक।।५१।। इकडे बाबा पिंपळखुट्यास । सांगत होते भक्त मंडळीस । बिघाड झाला एका गाडीस । दुसरी केली दुरुस्त।।५२।। बाबाचे हे बोल । अज्ञानी कसे जाणतील। त्याचा अर्थ सखोल । होता मित्रहो।।५३।। बाबाच्या बोलण्याचा अर्थ । कुंजबिहारी सांगतात। ऐकून घ्यावे समस्त ।

शांत चित्त देऊनी।।५४।। पहिली गाडी मोटरकार । दुजी स्वयम कुंजबिहारी सत्वर । तयांना देऊनी उपचार । दुरुस्त केले तात्काळ।।५५।। मला माझ्या गुरुदेवानं । श्री संत शंकर बाबानं । प्रत्यक्षात दिले जीवनदान । कुंजबिहारी सांगती।।५६।। उपचार घेऊनी त्वरित । कुंजबिहारी आले परत । दुपारी केले भागवत । पिंपळखुट्यासी।।५७।। बघा बाबाची भविष्यवाणी । अचूक ठरली त्याक्षणी । वार्ता पसरली चहुबाजूनी । जिकडे तिकडे वेगाने।।५८।। बघा संत शंकर बाबानं । आपल्या चरण पादुका देऊन । कृतार्थ केले जीवन । कुंजबिहारी महाराजांचे।।५९।। त्या चरण पादुकांचे पूजन । कुंजबिहारी नित्यनेमानं । करतात अति श्रद्धेनं । आपल्या पूजास्थळी।।६०।। पादुका म्हणजे संताचे चरण । त्याठायी जावे शरण । होय षड्विकाराचे दमन । निश्चितची सत्वर।।६१।। पुढे कुंजबिहारीच्या मातेनी । तयांचा विवाह द्यावा करूनी । यापरी आग्रह धरिला त्याक्षणी । तिने बाबाजवळ।।६२।। बाबाने समजाविले तिला । याची चिंता नको तुम्हाला । आम्ही बघू त्या प्रसंगाला । काय करायचे ते।।६३।। बघा ह्या कुंजबिहारीनं ।

बाबाच्या आज्ञेनवरून । ब्रह्मचर्य व्रताचे पालन । केले आयुष्यभर निष्ठेने।।६४।। ऐसा त्यागी भक्त । मिळणे कठीण या युगात । नाव कोरले इतिहासात । परम भक्ताच्या रूपात।।६५।। पुढे कुंजबिहारी महाराजानं । कामरगावी आश्रमाचे निर्माण । केले अति उत्साहानं । लोककल्याणा प्रीत्यर्थ।।६६।। त्यात काही समाजकंटकांनी । खोटे आरोप घेऊनी । केस दिली लावुनी । कुंजबिहारीच्या विरोधात।।६७।। त्या वेळी काही दिवस । कुंजबिहारी महाराजास । सहन करावा लागला त्रास । विरोधकाकडून नित्याचा।।६८।। पुढे बाबाच्या आशीर्वादानी । कुंजबिहारीच्या बाजूनी। निकाल दिला कोर्टानी । शांत जाहले विरोधक।।६९।। बाबाने मला वाणी भूषण । पदवी देऊन केला सन्मान । बाबा म्हणजे माझे जीवन । कुंजबिहारी सांगती।।७०।। भाऊसाहेब बराटे नगरचे । ते जिल्हा अधीक्षक कृषी खात्याचे । संदर्भ कार्यक्षेत्र तयांचे । वर्धा जिल्ह्यात। । ७१।। तयांना साधूसंताच्या दर्शनाची । आवड होती पूर्वीची। ही पुण्याई आईवडिलांची । ते सांगतात एकमेव।।७२।। प्रथम दर्शनी ते पिंपळखुट्यास। आले बाबाच्या दर्शनास। जैसे

चुंबकाचे आकर्षण लोहास । त्यापरी जाहले।।७३।। बघा हा जिज्ञासू भक्त । प्रथम दर्शनी समर्पित । जाहला तन, मन, धनासहित । संत शंकरबाबा चरणी।।७४।। तयांच्या पुतणीच्या विवाहात । वादळ सुटले अकस्मात। गोंधळ उडाला लग्नमंडपात । एकाएकी चोहिकडे।।७५।। पुढे काय होणार । याची भीती वाटे फार । बराटे साहेबही चिंतातूर । जाहले त्याप्रसंगी।।७६।। तो प्रसंग बघून । भाऊसाहेब बराटे साहेबानं । सुरू केले नामस्मरण । श्री संत शंकरबाबाचे।।७७।। बाबा तुम्ही आहात दयावान । तुमचा भक्त मी सान। संकटाचे करावे निवारण । यावे धाऊनी सत्वर।।७८।। दोन्ही कर जोडून । मी वंदितो तुमचे चरण । मजला सोडवावे या संकटातून । बालक समजोनी आपला।।७९।। अवघ्या काही क्षणात । वादळ झाले शांत । समस्त जाहले आश्चर्यचकित । त्या प्रसंगी।।८०।। एवढ्या भयंकर वादळात। सर्व काही होते सुरक्षित । लग्नमंडपही पूर्ववत । होता सर्व प्रकारे।।८१।। हे कार्य नक्कीच होय बाबाचे । हे शब्द आहे कृतज्ञेचे । परमभक्त बराटे साहेबाचे । संत शंकरबाबा विषयी।।८२।। आज बाबाने माझ्यावर । दया

दाखविली नसती तर । काहीतरी विपरीत घडणार । होते नक्कीच।।८३।। बघा त्या घटनेपासून । भाऊसाहेब बराटे साहेबानं । कायमचे धरियले चरण । सद्गुरू शंकरबाबाचे।।८४।। सौ. देविका नावाची । ती कन्या होय नंदूसेठची। परमभक्त ती बाबाची। आहे बालवयापासून।।८५।। आईवडिलांचे संस्कार । बिंबले तिच्या मनावर । आपल्या जीवनाचे पालनहार । मानते ती बाबास।।८६।। बाबाच्या दिव्य सामर्थ्याचे । कोण वर्णन करील त्याचे । यापरी अनमोल बोल देविकाचे । बाबा विषयी।।८७।। ती आपले अनुभव। सांगत आहे एकमेव। ठेवोनिया श्रद्धाभाव। ऐकूनी घ्यावे निवांत।।८८।। देविका प्रथमक्षणी गरोदर । बाबा बोलले तिला सत्वर । तुला मुलगा होणार। जाण तुवा निश्चित।।८९।। बाबाची ही भविष्यवाणी। त्या वेळी भक्तमंडळीनी। ऐकली त्या क्षणी । क्षेत्र पिंपळखुट्यासी।।९०।। पुढे देविका प्रसूत जाहली। पुत्ररत्नाची प्राप्ती झाली। भविष्यवाणी सत्य ठरली। आनंदली मनोमन।।९१।। भूत, भविष्य, वर्तमान । बाबाला तयाचे ज्ञान । शंकर बाबा संत महान ।

विरळाच या युगी।।९२।। बाबाने स्वयम त्या मुलाचे । तीर्थराज नाव ठेविले त्याचे । धन्य भाग्य देविकाचे । संतकृपा लाभली।।९३।। संतकृपा कोणासही । सहजपणे लाभत नाही । पाहिजे पूर्वजन्माची पुण्याई । यासाठी मित्रहो।।९४।। पुढे देविकाच्या उदरासी । कन्यारत्न आले जन्मासी । त्या वेळी घडलेल्या घटनेसी । ऐकावे सविस्तर।।९५।। ती सात महिन्यांची असताना । तिचा ताप काही उतरेना । उपचार केले नाना । परी ते ठरले व्यर्थची।।९६।। परभणीच्या डॉक्टर मंडळीनं । नकार दिला उपचारा दरम्यान । बाळाला जावे घेऊन । नांदेडच्या रुग्णालयात।।९७।। सर्वांसी जाहली चिंता । म्हणाले काय करावे आता। न्यावयाची केली व्यवस्था । रुग्णाला नांदेडास।।९८।। तिथल्याही डॉक्टरांनी । बाळाची अवस्था बघुनी । नकार दिला तत्क्षणी । भरती करावयासी।।९९।। त्या वेळी बाळाच्या आईवडिलांनी । डॉक्टरांना केली विनवणी। बाळाला भरती घेतले करुनी। रुग्णालयात तात्काळ।।१००।। त्या दिवशी दिवसभर। डॉक्टरांनी केले उपचार। परी सुधार नाही तिळभर। जाहला रुग्णास।।१०१।। देविका जाहली

चिंतातूर। तिने नंदूसेठला फोनवर। वार्ता कळविली सविस्तर। बाळाच्या प्रकृतीची।।१०२।। त्या वेळी योगायोगानं। नंदूसेठ पुण्याहून। घ्यावया बाबाचे दर्शन। आले होते पिंपळखुट्यास।।१०३।। तयांनी बाबाच्या कानावर। वार्ता कळविली हळुवार। बाबा बोलले सत्वर। चिंता करू नका किंचित।।१०४।। हा अंगारा घेऊन। त्वरित जावे निघून। बाळासी द्यावा लावून। ठीक होईल सर्व काही।।१०५।। अचानक त्या समयासी। ढाकणे महाराज पिंपळखुट्यासी। होते बघा मुक्कामासी। बाबाच्या आश्रमात।।१०६।। त्याच दिवशी रात्रीला। ढाकणे महाराजांना कीर्तनाला। जाणे होते नांदेडला। पिंपळखुट्यावरून।।१०७।। बाबाने दिलेल्या अंगाऱ्यास। नांदेडला पोहोचविण्यास। विनंती केली ढाकणे महाराजास। नंदूसेठने तात्काळ।।१०८।। दुसरे दिवशी देविकानं। शंकर बाबाचे स्मरण करून। अंगारा दिला लावून। बाळाच्या सर्वांगास।।१०९।। त्वरित घडला चमत्कार। ताप उतरला हळुवार। आश्चर्य करिती डॉक्टर। आपल्या मनात।।११०।। बाबानी दिलेल्या अंगाऱ्यानं। वाचले माझ्या बाळाचे

प्राण । देविका सांगते गर्वानं । आजही लोकांजवळ।।१११।। देविका ह्या प्रसंगापासून । बाबाला प्रत्यक्ष पांडुरंग समजून । नित्य करते पूजन । श्री संत शंकर बाबाचे।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । सतरावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय अठरावा

प्रल्हादराव राऊत नावाचे । परमभक्त ते बाबाचे । निवासी अमरावतीचे । विदर्भात राहती।।१।। ते शंकरबाबाच्या संस्थेत । पिंपळखुट्यांच्या शाळेत । शिक्षक पदावर कार्यरत । होते नोकरीस।।२।। एकोणवीसशे बहात्तरचा । अनुभव ऐकावा त्यांचा । कायदा आला सिलिंगचा। त्यांच्या जमिनीवर।।३।। बघा त्या प्रसंगास । प्रल्हादरावांच्या आईबाबास । भयंकर जाहला त्रास । या कायद्याचा।।४।। आता या संकटातून । आपणास कोण । वाचवील या चिंतेनं । चिंताग्रस्त होते सर्व।।५।। तयाची शंकर बाबावर । श्रद्धा होती फार । तयांना भेटण्याचा विचार । आला सर्वांच्या मनात।।६।। दुसरे दिवशी पिंपळखुटच्यास । आले बाबाच्या दर्शनास । घटनेचा संपूर्ण इतिहास । सांगितला बाबास।।७।। बाबाने, तूर्तास । सांगितले सर्वांस । याचा तुम्हाला त्रास । होणार नाही किंचित।।८।। बाबाने केलेली भविष्यवाणी । असत्य नाही ठरली अजुनी।

अनुभव घेतले अनेकांनी । आजवर असंख्य।।९।। हे गुह्य प्रल्हादरावास । तसेच त्यांच्या आईबाबास । माहीत होते हमखास । पूर्वीपासून।।१०।। पिंपळखुट्यावरून घरास । परत आले गावास। कोर्टाचा मिळाला आदेश। लगेच दुसऱ्या दिवशी।।११।। बघा प्रल्हादरावाच्या जमिनीस । स्थगिती दिली तूर्तास। सिलिंगच्या वाटपास । विद्यमान कोर्टाने।।१२।। आनंद जाहला सर्वांस। धन्यवाद दिले बाबास। परत आले पिंपळखुट्यास । दर्शनास बाबाच्या।।१३।। एकदा प्रल्हादराव राऊत । आपल्या पत्नी समवेत । बाबाच्या आश्रमात । आले दर्शनाशी।।१४।। पावसाळ्याचे होते दिवस । काळेभोर दिसे आकाश । सर्वत्र चारही दिशेस । अंधार झाला सर्वत्र।।१५।। दर्शन घेता बरोबर । बाबा बोलले सत्वर। तुम्ही निघा लवकर । परत जाण्यासाठी।।१६।। बाबांची आज्ञा मानून । प्रल्हादराव आश्रमातून । पाऊस येईल म्हणून । लगोलग निघाले।।१७।। अमरावतीच्या मार्गानं । पत्नीस सोबत घेऊन । काय होईल रस्त्यानं। विचार करू लागले।।१८।। मोटार सायकलचा प्रवास। भीती वाटे प्रल्हादरावास। करू लागले

जयघोष । बाबाच्या नावाचा॥१९॥ बाबा या संकटामधून । आम्हाला वाचवा निर्विघ्न । प्रार्थना करू लागले मनोमन । संत शंकर बाबास॥२०॥ बघा पिंपळखुट्यापासून । पाऊस येत होता मागाहून । पुढे प्रवास निर्विघ्न । करीत होते प्रल्हादराव॥२१॥ पावसाच्या एकाही थेंबाचा । स्पर्शही जाहला नाही त्यांचा। हा एकमेव चमत्कार बाबाचा । सांगतात प्रल्हादराव॥२२॥ दुसऱ्या घटनेचा वृत्तांत । प्रल्हादराव सांगतात । ऐकून घ्यावा निवांत । या अध्यायी॥२३॥ एकदा आश्रमाचे शेतात । चिचपूरच्या शिवारात । काही भक्तमंडळी सोबत । गेले पेरणी करण्यास॥२४॥ शेतामध्ये पोहोचल्यावर । आकाशात काळेभोर॥ ढग दिसू लागले वर । अकस्मात॥२५॥ थोड्या वेळाने मुसळधार । पाऊस नक्कीच येणार । पेरणी नाही होणार । चिंता वाटे सर्वांस॥२६॥ पेरणी व्हावया निर्विघ्न । जयघोष केला अवघ्यानं । संत शंकर बाबाच्या नावानं । मनोभावे तात्काळ॥२७॥ बघा शेताच्या आसपास । पडत होता पाऊस । परी त्याचा किंचितही त्रास । नाही जाहला पेरणीला॥२८॥ ही सर्व लीला समर्थाची । श्री संत शंकर बाबाची । अगाध महिमा

तयाची । आहे या भूमीवर।।२९।। शारीरिक शिक्षकाच्या परीक्षेत । तुम्ही प्रथम क्रमांकात । उत्तीर्ण होणार निश्चित । सांगितले प्रल्हादरावास।।३०।। बाबा जे बोलले । त्यापरीच पुढे घडले । प्रल्हादरावांना आश्चर्य वाटले । या घटनेचे।।३१।। पुढे स्वयम बाबान । संस्थेच्या शाळेत शिक्षक म्हणून । घेतले नियुक्त करून । प्रल्हादरावास तत्क्षणी।।३२।। एकदा अमरावती विद्यापीठाचा । खेळ खेळण्या खेळाडूंचा । चमू घेऊन मुलींचा । गेले प्रल्हादराव।।३३।। खेळ होता कोयमतुरास । परत येण्याच्या वेळेस । अनुभव घडला प्रल्हादरावास । तो ऐकावा या ठायी।।३४।। चेन्नई रेल्वे स्थानकावर । काही मुली अंतरावर । मागे राहिल्या दूर । चालता चालता अकस्मात।।३५।। संपूर्ण रेल्वेस्थानकात । शोध केला अतोनात । काहीच ना पडले हातात । यश किंचितही।।३६।। इतर मुली घाबरून । एकमेकीकडे बघून । करू लागल्या रुदन । त्या प्रसंगी।।३७।। स्वयंम् प्रल्हादराव राऊत । जाहले होते चिंताग्रस्त । काय करावे ह्या प्रसंगात । कळत नव्हते तयांना।।३८।। रेल्वे सुटण्याची वेळ । संपली होती जवळ जवळ । सर्व प्रयत्न जाहलेत निष्फळ ।

प्रल्हादरावांचे।।३९।। आता काय सांगावे लोकास । विद्यापीठाच्या अधिकाऱ्यास । काही सुचेना प्रल्हादरावास । त्या वेळी संकटी।।४०।। मला या संकटातून । वाचवा वाचवा म्हणून । प्रार्थना करीत होते मनोमन । प्रल्हादराव बाबाची ।।४१।। शेवटी निराश होऊन । उरलेल्या मुलींना घेऊन । बसले डब्यात जाऊन । आपल्या स्थानावर।।४२।। तेवढ्यात रेल्वे स्थानकावरून । गाडीने केले प्रस्थान । लगेच थोडी समोर जाऊन । गाडी थांबली अकस्मात।।४३।। बघा एवढ्या वेळात । हरवलेल्या मुली परत । येत होत्या धावत । गाडीच्या दिशेने।।४४।। त्या मुलींना बघून । प्रल्हादराव उतरले डब्यातून । तात्काळ गेले धावून । त्या मुलींजवळ।।४५।। मुलींना घेतले सोबत । बसविले गाडीच्या डब्यात । गाडी धकधक करीत । चालू लागली तत्क्षणी।।४६।। एवढ्या कठीण प्रसंगातून । मला वाचवलं बाबानं । कोण्यापरी तयाचे मी ऋण । फेडू या जन्मात।।४७।। हृदय आले भरून । अश्रू वाहे नयनातून । अवर्णनीय होता तो क्षण । प्रल्हादरावाच्या जीवनात।।४८।। कुचे महाराज अमरावतीचे। प्रचारक वारकरी संप्रदायाचे। परमभक्त ते शंकर बाबाचे। पूर्वाधापासून।।४९।। ते उत्कृष्ट कीर्तनकार । ख्याती त्यांची दूरवर । बाबाला ते परमेश्वर ।

मानतात एकमेव।।५०।। श्रीसंत शंकर बाबांवर । त्यांची श्रद्धा अपार । बाबाला ते शिव अवतार । मानतात साक्षात।।५१।। गुरू नामाचे स्मरण । करतात रात्रंदिन । तेणे लाभले नवजीवन । कुचे महाराजास।।५२।। अनेक दुर्धर व्याधीतून । मला वाचविले बाबानं । बाबा सारखा दयावान । संत दुर्मीळ या जगी।।५३।। यापरी ते आपल्या कीर्तनात । लोकांना सांगतात । संत शंकरबाबा साक्षात । आहे परमदयेचा सागर।।५४।। कुचे महाराजांना अडचणीत । तयांना देऊनी आर्थिक मदत। विंवचेतून केले मुक्त । शंकर बाबाने तात्काळ।।५५।। बाबांचे अनंत उपकार । जाहले आहेत माझ्यावर । ते या जन्मी नाही फिटणार । सांगतात कुचे महाराज।।५६।। शंकर बाबाचे आध्यात्मिक प्रवचन । म्हणजे साक्षात गंगास्नान। अनुभव घेतला कुचे महाराजानं । स्वयम प्रत्यक्षात।।५७।। सन १९७६ सालची। ही घटना आहे पिंपळखुट्याची । बिसनराव मेश्रामच्या मुलीची । ऐकावी ध्यान देऊन।।५८।। अवघे एक - सव्वा वर्षाचे। वय होते त्या मुलीचे । आजारपणामुळे तिचे । जगणे होते कठीण।।५९।। बिशनरावच्या घरची । परिस्थिती होती गरिबीची । त्यामुळे तिला औषधोपराची । उणिव पडली आजारपणात।।६०।। एके दिवशी

रात्रीस । तिची प्रकृती जाहली सिरियस । विचार पडला बिशनरारवास । काय करावे म्हणून।।६१।। पिंपळखुटा दुर्गम गाव । वाहनाची नव्हती सोय । उपचाराविना जात होता जीव । त्या काळात।।६२।। बिशनरावने त्वरित । मुलीला उचलले काखेत । न्यावया उपचाराकरिता दवाखान्यात । अंजनसिंगी गावाला।।६३।। गावापासून थोड्या अंतरावर । घटना घडली गंभीर । मुलीचे संपूर्ण शरीर । जाहले थंडगार।।६४।। बिशनराव गेले घाबरून । मुलगी गेली हातातून । आता काय करावे आपण । गोंधळ जाहला मनात।।६५।। रात्री नऊचा होता प्रहर । सर्वत्र होता अंधकार । त्या वेळी बाबाच्या आश्रमवर । सुरू होते ग्रंथ पारायण।।६६।। स्वयम शंकरबाबा त्या वेळेस । उपस्थित होते पारायणास । बिशनराव त्या मृत मुलीस । घेऊन आले आश्रमात।।६७।। संत शंकरबाबाच्या पायावर । मुलीस ठेविले सत्वर । बिशनराव उभा बाबा समोर । आश्चर्य जाहले उपस्थितास।।६८।। पांडुरंगजी हलमारेनं । विचारिले जवळ येऊन । शब्द निघेना मुखातून । बिशनरावच्या।।६९।। तो प्रसंग बघून । बाबाने घेतले डोळे मिटून । तेवढ्यात

त्या मुलीनं । हालचाल केली शरीराची।।७०।। बाबा म्हणाले बिशनरावला । घेऊनी जावे ह्या मुलीला । पांडुरंगजी हलमारे त्या प्रसंगाला । आहेत साक्षिदार ।।७१।। आज ती मुलगी पिंपळखुट्यास । हल्ली आहे वास्तव्यास । ती संत शंकबाबास । देव मानते साक्षात।।७२।। दामोदर रुद्रकार । पिंपळखुट्याचे राहणार । बाबा त्यांचे शेतावर । काम करायचे पूर्वीला।।७३।। दोघेही वयानं । होते बघा समान । त्यामुळे त्यांचे मैत्रिपूर्ण । संबंध होते आपसात।।७४।। एकदा बाबा शेतामधून । अचानक गेले निघून । रुद्रकार गेले थकून । शोधतांना तयासी।।७५।। शेवटी एका निर्जन स्थानी । हा ध्रुवबाळ ध्यानस्थ बैसुनी। अंगास वेटोळी घालूनी । होता भलामोठा नाग।।७६।। हे दृश्य बघून । रुद्रकार गेले घाबरून । तिथून केले पलायन। तयानी तात्काळ।।७७।। बऱ्याच लांब अंतरावरून । रुद्रकार पाहे कौतुकानं । नेत्र उघडताच बाबानं । नागराज गेले निघून।।७८।। बाबाच्या अधिकाराची जाण । नव्हती मला अज्ञानानं । मी बाबाला माझा नोकर समजून । बोललो त्या वेळी।।७९।। शंकर बाबाच्या रूपानं । प्रत्यक्ष पंढरीच्या पांडुरंगानं । कष्ट केले रात्रंदिन ।

माझ्या सोबत ।।८०।। परी मी ना ओळखले तयास । माझ्या प्रारब्धाचा दोष । रुद्रकार सांगतात लोकास । आपला अनुभव।।८१।। एकदा रुद्रकार सोबत । बाबा गेले शेतात । त्या प्रसंगाचा वृत्तांत । सांगतो आपणास।।८२।। शेतमालकाने दोघांस । शेतातला आंबा उतरविण्यास । सांगितले कामास । नित्याप्रमाणे।।८३।। त्या आंब्याच्या झाडावर । एक भले मोठे वानर। बसून होते मजेशीर । आंबे चोखत आनंदे।।८४।। त्या वानरास बघून । रुद्रकार गेले घाबरून । बाबा म्हणाले हसून । ते हनुमंत आहेत।।८५।। मी चढतो झाडावर । आंबे तोडतो भराभर । तुम्ही ढिगा लावा जमिनीवर । बाबा बोलले रुद्रकारास।।८६।। रुद्रकार बोलले बाबास । झाडावर चढावे सावकाश । वानराकडेही ठेवावे लक्ष । काम करताना।।८७।। बाबा चढताच झाडावर । अद्भुत घडला चमत्कार । ते वानर हळुवार । आले बाबाजवळ।।८८।। तयाने बाबाच्या डोक्यावर । आपला ठेवोनिया कर । निघून गेले सत्वर । इतरत्र दुसऱ्या स्थळी।।८९।। इकडे खाली रुद्रकार । आश्चर्य करू लागले क्षणभर । हा काय असेल प्रकार । विचार करी मनात।।९०।। दामोदर रुद्रकार सोबत । शंकरबाबा

गुरांच्या गोठ्यात। रात्रीला होते जात । झोपावयास नित्याने।।९१।। एके दिवशी रात्रीला । बाबा बोलले रुद्रकाराला । आज उशिरा येणार गोठ्याला । काम आहे महत्त्वाचे।।९२।। त्या दिवशी रात्रभर। बाबा स्वप्नात आले वारंवार। प्रसंग सांगतात रुद्रकार। स्वानुभवाचा।।९३।। डोळे उघडताच स्वप्नामधून । बाबा गुप्त होई समोरून । दुसऱ्या दिवशी रुद्रकारानं । प्रसंग सांगितला बाबास।।९४।। बाबा म्हणाले रुद्रकारास । असे सांगू नको कोणास । तो शब्द पाळला आजमितीस । रुद्रकाराने निष्ठेने।।९५।। एकदा बाबा रुद्रकारासोबत । इंधन तोडाण्या गेले शेतात। झाडाची फांदी पडली अकस्मात। रुद्रकाराच्या डोक्यावर।।९६।। रुद्रकार रागाच्या भरात। बाबाला शिव्या देण्याच्या तयारीत। एवढ्यात बाबाने रुद्रकाराच्या हातात। प्रसाद दिला सत्वर।।९७।। त्यात चिरंगीचे दाणे साखर। खाऊनी शांत जाहले रुद्रकार। प्रसंग होता गंभीर। सांगतात रुद्रकार।।९८।। हा प्रसाद बाबानं। आणला असेल कुठून। प्रश्न जाहला निर्माण। रुद्रकारासी त्या वेळी।।९९।। एकदा रुद्रकाराचे शेतावर। ज्वारीच्या रासुंड्यावर।

कोंबड्याचा होता पाहुणचार। गावातल्या मित्रमंडळीस॥१००॥ दुसऱ्या दिवशी कामावर। बाबा गेले शेतावर। शेतामधल्या झाडावर। कोंबडा देत होता बांग॥१०१॥ तो कोंबडा बघून। बाबा म्हणाले हसून। हा रात्रीचा कोंबडा आहे म्हणून। सांगितले रुद्रकारास॥१०२॥ रुद्रकाराने ह्या सर्व आठवणी। आजवरी ठेविल्या जपुनी। प्रसंगी दिल्या उकलुनी। ग्रंथ कर्त्याजवळ॥१०३॥ श्री दामोदर रुद्रकार। म्हणजे बाबाच्या अनुभवाचे भंडार। ऐसे कित्येक अनुभव थोर। आहेत त्यांचेजवळ॥१०४॥ एकदा रुद्रकाराचे शेतात। ज्वारी होते पेरत। बाबा स्वयम तिफण। हाकलीत होते त्यावेळी॥१०५॥ वाकडी हाकली तिफण। म्हणून रुद्रकार जाहले क्रोधायमान। बाबाचे दुखविले अंत:करण। त्याप्रसंगी अज्ञाने॥१०६॥ रुद्रकाराचे शब्द ऐकून। बाबाने रुद्रावतार केला धारण। सर्व गेले घाबरून। त्या समयास॥१०७॥ बाबा म्हणाले रुद्रकारास। काही शब्द ना बोलावा आम्हास। रुद्रकाराने ओळखले प्रसंगास। आले घरी निघून॥१०८॥ पुढे त्या शेतात। पीक उगवले सरळरेषेत। रुद्रकार पडले आश्चर्यात। याचा कर्ता कोण

म्हणून॥१०९॥ त्या वर्षी रुद्रकारास। ज्वारीचे पीक भरघोस। जाहले त्या शेतात। चमत्कार दाखविला बाबाने॥११०॥ आज रुद्रकाराचा संपूर्ण परिवार। शंकर बाबाला आपला परमेश्वर। जीवनाचा एकमेव आधार। मानतात॥१११॥ पूर्वाश्रमीच्या पुण्यकर्माचा संचय। या जन्मी जाहला भाग्योदय। जीवन बनले आनंदमय। शंकरबाबा कृपेने रुद्रकारचे॥११२॥ इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। अठरावा अध्याय समाप्त॥११३॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय॥

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय एकोणीस

श्री गुरूदेवायनम:

सौ. हेमलता डहाके सावरीची। परिस्थिती अत्यंत गरिबीची। तिला आवड होती परमार्थाची। विशेष करून॥१॥ घराशेजारी पेटोलपंपावर। एका लहानशा दुकानावर। हेमलता बसायची त्यावर। दररोज नेमाने॥२॥ गोपीचंद मेश्राम बाबाचे। परमभक्त पूर्वीचे। ते प्रसाद आणायचे। पिंपळखुट्यावरून॥३॥ त्या प्रसादाचे दोन दाणे। हेमलतासी प्रेमाने। देत होते नेमाने। गोपीचंदजी॥४॥ हेमलता मोठ्या श्रद्धेनं। त्या प्रसादाचे सेवनं। करीत होती आनंदानं। आत्यंतिक भक्तीने॥५॥ त्या प्रसादाचा अनुभव। हेमलता सांगते एकमेव। चित्त देऊनी ऐकावं। श्रोते सज्जनहो॥६॥ जुना व्यवसाय बंद करून। सुरू केला दुजा नवीन। तो ठरला लाभदायी एकूण। बरे उत्पन्न वाढले॥७॥ पूर्वीपेक्षा दोन पैसे जास्त। पडू लागले पदरात। सुधार जाहला

परिस्थितीत। दिवसे न् दिवस।।८।। तिला वाटे मनोमन। पिंपळखुट्याशी जाऊन। बाबाचे घ्यावे दर्शन। प्रत्यक्षात आनंदे।।९।। जेव्हा इच्छा होई दर्शनाची। तयारी करावी पिंपळखुट्याची। भेट घ्यावी बाबाची। आनंदाने न्हाऊन।।१०।। शंकर बाबाच्या आशीर्वादान। आपण आहो सुखानं। याची होती जाण। हेमलतास तये वेळी।।११।। पुढे मुलीचे लग्न झाले। जावई मुलीचे वाद जाहले। न विचारताच बाबा म्हणाले। ठीक होईल सर्व काही।।१२।। तेव्हापासून जावई मुलीचे। वाद मिटले कायमचे। अनंत उपकार बाबाचे। आहेत माझ्या परिवारावर।।१३।। हेमलताचा संपूर्ण परिवार। प्रेम करतो बाबावर। बाबाला ते शिवअवतार। मानतात एकमेव।।१४।। देवकी बाई लेंडे सावरीची। बाबावर अपार श्रद्धा तिची। महिमा सांगते ती अनुभवाची। बाबा विषयीच्या।।१५।। शंकरबाबा आमुचा देव। आम्ही भक्त एकमेव। नित्य देतात अनुभव। ते आपल्या भक्तांस।।१६।। एका ठायी बसून। करतात भक्तांचे रक्षण। विघ्नहर्ता संकटमोचन। साक्षात ते।।१८।। एकदा रेल्वे स्टेशनवर। मुले भुकेने व्याकूळ।

दोन महिला येऊनी सत्वर। डबा दिला भोजनास।।१८।। देवकी बाई करी विचार। हा बाबाचा होय चमत्कार। काळजी घेतात निरंतर। ते आपल्या भक्तांची।।१९।। आपल्या भक्ताच्या पाठीशी। बाबा उभे अहर्निशी। यापरी अनुभव देवकीशी। आला त्या वेळी।।२०।। एकदा तिच्या मुलास। पोटदुखीचा जाहला त्रास। बाबाने देऊनी अंगाऱ्यास। बरे केले कायमचे।।२१।। यापरी ती कायमची। वारकरी बनली पिंपळखुट्याची। गोडी लागली संतसंगतीची। तिला जीवनात।।२२।। शरद ठक्कर कोंदीचे। आहेत जिल्हा भंडाऱ्याचे। वीस वर्षांपासून त्यांचे। संबंध आहेत बाबा सोबत।।२३।। बाबा तुमची कृपा निरंतर। अशीच अशीच राहू दे आमच्यावर। प्रार्थना करतात वारंवार। संत शंकर बाबाशी।।२४।। शंकर बाबा आत्मज्ञानी। काय मागावे तया कडोनी। न मागताच देतात लुटोनी। आपल्या इच्छेनुसार।।२५।। तयांच्या आशीर्वादानं। आम्हाला कळले जीवन। ते गमावू नये विनाकारण। शिकविले बाबान।।२६।। शोभा बाई शेलोकार। पेवढा गावची राहणार। तिच्या अनुभवाचा सार।

सांगतो घ्यावा ऐकून॥२७॥ थोरल्या भावाचा अपघात। जाहला अकस्मात। शोभा सापडली संकटात। चहुबाजुनी॥२८॥ आई वडिलांचे वृद्धपण। शोभा अगदी होती लहान। प्रसंग होता अति कठीण। काय करावे सुचेना॥२९॥ आईवडिलांनी घेतला निर्णय। आता आत्महत्ये शिवाय। दुसरा नाही उपाय। या जगात॥३०॥ कर्ता मुलगा गेल्यावर। आपणास कोण सांभाळणार। या परी अनेक विचार। होते मनात॥३१॥ ही वार्ता कळली बाबाला। तयांना समज दिला। नका करू आत्महत्या। आश्रमात या माझ्याकडे॥३२॥ तिथे राहा झोपडी बांधून। आम्ही काळजी घेतो संपूर्ण। तुमच्या मुलीचेही शिक्षण। होईल त्याठायी॥३३॥ शोभा सांगते गहिवरून। माझ्या आईवडिलांचे प्राण। वाचविले शंकर बाबानं। धन्य उपकार तयाचे॥३४॥ माझे लग्नही बाबानं। करून दिले थाटानं। आज बाबाच्या कृपेनं। आहो आनंदात॥३५॥ बाबासारखा संत महान। मी नाही पाहिला अजून। शोभा सांगते अश्रू गाळून। आजही लोकास॥३६॥ हीन दीन अनाथासी। धरूनिया हृदयाशी। उद्धरले अनेकांसी। संत

शंकर बाबाने।।३७।। दामा शंकर घरजारे। परसोडीचे राहणारे। तया गृही संतसेवेचे वारे। वाहते पूर्वीपासून।।३८।। आजोबा, वडील पूर्वीचे। सेवक होते राष्ट्रसंताचे। तसेच स्वामी सीतारामजीचे। त्या काळात।।३९।। त्या पूर्व पुण्याईनं। जाहले शंकर बाबाचे दर्शन। देह झाला पावन। माथा ठेविला चरणावर।।४० ।। एकदा दामाजीने बाबाला। आपल्या जन्मगावी येण्याला। सहज म्हणून आग्रह केला। होकार दिला तात्काळ।।४१।। तुमच्या वडिलांच्या काळात। आमचे गुरुदेव राष्ट्रसंत। तुमच्या घरी होते येत। आम्ही येणार निश्चित।।४२।। तुकडोजी, लहानुजी, सत्यदेवावर। शंकर बाबाची श्रद्धा अपार। ते मालक आम्ही आहो नोकर। सांगतात भक्तांस।।४३।। दामाजीच्या जीवनात। दुर्घटना घडली अकस्मात। पत्नी वारली एक महिन्यात। विवाहानंतर लगेच।।४४।। बघा भक्त दामाजीवर। दु:खाचा कोसळला डोंगर। बाबाने दिला धीर। घाबरू नका म्हणून।।४५।। जे झाले त्याला विसरा। आम्ही सांगतो तसे करा। बाबाने दिला इशारा। दामाजीस त्या क्षणी।।४६।। बाबाच्या आज्ञेप्रमाणे। दुसरा

विवाह केला दामाजीने। जीवनात नाही पडले उणे। आजमितीस कधीही।।४७।। महेश कांबळे परसोडीचे। सद्भक्त ते शंकर बाबाचे। बाबाला ते उच्चकोटीचे। मानतात महात्मा।।४८।। बाबा माउलीच्या रूपात। प्रकटले पिंपळखुट्यास। लेकरापरी आले सांभाळीत। आपल्या भक्तांस।।४९।। सागर आणि संत। 'स' अक्षरानी दोहोची सुरुवात। संयम, सहनशीलता दोघात। आहे भरपूर।।५०।। बाबा घरी परसोडीस। आले दोन-चार वेळेस। लाभ जाहला सर्वांस। तयांच्या दर्शनाचा।।५१।। आम्ही बाबाला आयुष्यभर। मुळीच नाही सोडणार। यापरी केला निर्धार। कांबळे परिवाराने।।५२।। बाळासाहेब गावंडेचा। अपघात जाहला तयांचा। भरोसा नव्हता वाचण्याचा। त्यांचा त्या अपघातामधून।।५३।। ते गेले होते कोमात। डॉक्टरांनीही टेकविले हात। परिवार जाहला चिंतित। काय करावे म्हणूनी।।५४।। ऑपरेशन झाल्यावर। हा रुग्ण आयुष्यभर। ना बोलणार ना चालणार। कायम स्वरूपी।।५५।। यात बाबाचा विचार। घ्यावया आले आश्रमावर। बाबा बोलले सत्वर। डॉक्टरांना करूद्या काम।।५६।। प्रथम होऊ द्या

ऑपरेशन। नंतर बघू आपण। अंगारा जा घेऊन। रुग्णासाठी॥५७॥ ऑपरेशन झाले कठीण। सात तास मोजून। इतर करीत होते नामस्मरण। शंकर बाबाचे॥५८॥ चार महिने सतत। बाळासाहेब होते रुग्णालयात। हळूहळू प्रकृतीत। दिसू लागला सुधार॥५९॥ डॉक्टर जाहले आश्चर्यचकित। आम्हाला शाश्वती नव्हती वाटत। कोण्यातरी महात्म्याचा यात। आहे चमत्कार॥६०॥ हे होय पिंपळखुट्याचे। शंकर बाबा नाव तयांचे। कैवारी आहेत रंजल्या-गांजल्याचे। ते एकमेव॥६१॥ सुटी होताच रुग्णालयातून। रुग्णाला गाडीत टाकून। घ्यावया बाबाचे दर्शन। आणले पिंपळखुट्यास॥६२॥ बाबा बोलले वचन। चिंतेचे नाही कारण। येत राहावे अधूनमधून। आश्रमात नित्याने॥६३॥ श्रीकृष्ण रायकर नावाचे। राहणारे ते अमरावतीचे। श्रद्धावंत भक्त ते बाबाचे। फार पूर्वीपासून॥६४॥ ते वीज महामंडळात। ड्रायव्हर म्हणून कार्यरत। होते बघा यवतमाळात। आपल्या कर्तव्यावर॥६५॥ एके दिवशी रायकराला। कॅश घेऊन पुसदला। जाण्याविषयी आदेश दिला। अधिकाऱ्याने

तात्काळ।।६६।। अधिकाऱ्याच्या आदेशावरून। थैलीमध्ये कॅश भरून। पुसदकडे केले प्रस्थान। रायकरने तात्काळ।।६७।। एसटीचा होता प्रवास। गाडीने गाठले दिग्रस। रायकर उतरले लघुशंकेस। शेजाऱ्याला सांगून।।६८।। शेजाऱ्याशी झाले विस्मरण। गाडी गेली निघून। घाम वाहे अंगामधून। सुचेना काही रायकरास।।६९।। अठ्ठेचाळीस हजार रुपये थैलीत। कार्यालयीन कागदपत्रही त्यात। धडकी भरली छातीत। रायकराच्या त्या वेळी।।७०।। आता नोकरीवरून निलंबित। होणार मी निश्चित। बद्नामी ही होईल लोकांत। काय करावे ना कळे।।७१।। यापरी अनेक विचार। येऊ लागले वारंवार। स्तब्ध जाहले सर्व शरीर। रायकराचे त्याक्षणी।।७२।। एवढ्यात रायकरा समोर। एक व्यक्ती दुचाकीवर। येऊनी उभा राहिला सत्वर। अकस्मात तेथेची।।७३।। तो व्यक्ती होता अपरिचित। तयाने रायकराकडून समस्त। समस्या ऐकुनी घेतली क्षणात। तात्काळ।।७४।। तयाने रायकरला सत्वर। बसविले आपल्या गाडीवर। प्रसंग होता गंभीर। सांगतात रायकर।।७५।। पुसद अलीकडे एक किलोमीटर। एसटी अडविली रस्त्यावर। प्रवासी घाबरले भयंकर। तो प्रसंग पाहुनी।।७६।। रायकर चढले एसटीत।

कॅश, कागदपत्र सर्व व्यवस्थित। होते बघा थैलीत। अगदी सुरक्षित।।७७।। त्या प्रसंगाचे वर्णन। रायकर सांगतात गहिवरून। मला साक्षात शंकर बाबानं। मदत केली या संकटात।।७८।। इ.स. १९७४ साली। अद्भुत घटना घडली। रायकरच्या घरी चोरी झाली। ऐकावे सविस्तर।।७९।। त्या वेळी रायकर पिंपळखुट्यास। रामनवमीच्या उत्सवास। श्री संत शंकरबाबाच्या दर्शनास। आले होते परिवारासह।।८०।। हीच संधी साधून। चोरट्यानी घरात घुसून। चोरी करण्याचा केला प्रयत्न। परी तो जाहला असफल।।८१।। शेजाऱ्यांनी एकत्र मिळून। एका चोरट्यास पकडून। केले पोलिसाच्या स्वाधीन। चौकीमध्ये तात्काळ।।८२।। काशीनाथजी काळेनी। रायकरच्या मित्रानी। वार्ता कळविली फोनवरूनी। रायकरास त्वरेने।।८३।। रायकराने आपल्या मुलास। पाठविले अमरावतीस। काय घडले बघण्यास। जाऊन ये तात्काळ।।८४।। मुलाने येताच तत्क्षणी। कपाट बघितले उघडोनी। सर्व पैसे, दागिने आपल्या स्थानी। होते सुरक्षित।।८५।। हा सर्व चमत्कार बघून। शब्द निघाले मुलाचे मुखातून। ते शब्द करावे श्रवण। चित्त लावुनी।।८६।। पिंपळखुट्याच्या पांडुरंगानं। आम्हाला वाचविले

संकटातून। कोण्यापरी चुकवावे ऋण। कळेनासे जाहले।।८७।। दुसऱ्या दिवशी काशीनाथजी काळेनी। वार्ता कळविली येऊनी। बाबा हसले खूप जोरानी। आपल्याच मस्तीत।।८८।। या परी दयावंत। पिंपळखुट्याचा हा संत। कोणी पहावा तयाचा अंत। तो सर्वज्ञ सत्पुरुष।।८९।। सुभाषराव देशमुख अमरावतीचे। परमभक्त ते बाबाचे। अनुभव ऐकावे तयांचे। बाबाविषयी।।९०।। तयांच्या धर्मपत्नीला। दुर्धर आजार जडला तिला। खूप उपचार केला। तरी आराम होईना।।९१।। बघा तिच्या पाठीत। त्रास होता अतोनात। खाली वाकता नव्हते येत। किंचितही तिजला।।९२।। ती झोप घेईना रात्रभर। तिच्या व्यथा पाहुनी भयंकर। कुंटुंबातील सर्व सान-थोर। दु:खी व्हायचे मनात।।९३।। हळूहळू सर्व अंगात। दुखणे पसरले अल्पकाळात। भरोसा नव्हता वाटत। पुढे तिच्या जगण्याचा।।९४।। पोटात नव्हते अन्न। शरीर जाहले क्षीण। पायात नव्हते उरले त्राण। उभे राहण्या इतकेही।।९५।। अन्नाकडे बघुनी। उलट्या करी क्षणोक्षणी। निदान न कळे डॉक्टराकडुनी। तिच्या आजाराचे।।९६।। दोन महिने पर्यंत। मुलगा आणि सून सतत। राबत होते तिच्या सेवेत। अहोरात्र तिजसाठी।।९७।।

सुभाषराव सांगतात। त्या कठीण प्रसंगात। काय करावे नव्हते सुचत। झालो आम्ही हतबल॥९८॥ दोन महिन्यांनंतर। पत्नीला घेऊनी सत्वर। सुभाषराव आले आश्रमावर। पिंपळखुटा क्षेत्री॥९९॥ बाबा त्या वेळी आपल्या आसनावर। बसुनी होते भक्तमंडळी समोर। स्नेहाने केला नमस्कार। उभ्यानेच बाबाला॥१००॥ बाबाने स्नेहाच्या हातावर। पेढ्याचा प्रसाद दिला सत्वर। अंगारा दिला त्यानंतर। घरी पाण्यामधूनी घ्यावयास॥१०१॥ पुढच्या गुरुवारी तिला। पुन्हा घेऊन यावे आश्रमाला। दोन-चार वेळा उच्चार केला। बाबाने त्या वेळी॥१०२॥ पुढे बाबाची आज्ञा घेऊन। सुभाषराव आले निघून। पिंपळखुटा आश्रमावरून। स्वगृही अमरावतीस॥१०३॥ अंगाऱ्याचे सेवन केले। स्नेहाला बरे वाटले। थोडे फार अन्न गेले। उतार पडला खूपसा॥१०४॥ दुसऱ्या वेळी बाबानं। दोन पुड्या अंगारा देऊन। स्नेहाला व्याधीपासून। मुक्त केले तात्काळ॥१०५॥ मरणाच्या दारातून। माझ्या पत्नीला शंकरबाबानं। परत दिले आणून। सुभाषराव सांगती॥१०६॥ श्री संत शंकर बाबावर। सुभाषरावाची श्रद्धा आहे पुरेपूर। ते बाबाना परमेश्वर। मानतात एकमेव॥१०७॥

आमच्या संकटात धावून। करतात आमचे रक्षण। बाबा म्हणजे आमचे जीवन। समजतो आम्ही।।१०८।। ज्यापरी मत्स्य पाण्याविन। जगू ना शके एकही क्षण। त्यापरी बाबाच्या कृपेविण। जाणावे सर्वची व्यर्थ।।१०९।। बाबा ईश्वरीय अवतार। बाबा करुणेचा सागर। भक्तांचा वाहतात भार। सदैव आपल्या शिरावरी।।११०।। श्री संत शंकर बाबा समान। सद्गुरू लाभले महान। आम्ही स्वत:ला भाग्यवान। समजतो एकमात्र।।१११।। बाबांचे अनंत उपकार। जाहले आहेत आमच्यावर। जीव जरी ठेविला पायावर। तरी ते फिटमार नाहीत।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। एकोणिसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय विसावा

या अध्यायी वर्णन । भागीरथी आईचे दर्शन । ते वाचता, ऐकता पावन । होईल जीवन आपले।।१।। या भूमीवर । आईचे महत्त्व थोर । या जगाचा जगदीश्वर । आईविना पोरका।।२।। 'मातृदेवो भव' । यापरी केला आईचा गौरव। सर्व प्राणिमात्रांशी एकमेव । आईचाच आधार।।३।। नऊ महिने नऊ दिवस । ती आपल्या गर्भास । सांभाळते उदरास । आई तिचे नाव।।४।। पुढे माझा हा लेक । मला 'आई' म्हणुनी मारील हाक । याहुनी काही अधिक । न मागे ती देवास।।५।। आई पुत्राचा आधार । आईविणा पुत्र निराधार । यासाठी ती आयुष्यभर । कष्ट सोसते जिवापाड।।६।। आई पुत्राचा शृंगार । आई सर्व तीर्थांचा सार । स्वर्गही ठेंगणा आईसमोर । निश्चितची जाणावे।।७।। आईचे अनंत उपकार । आहेत या जगावर । तिच्यासारखी उदार । दुर्मीळ या जगी।।८।। अवघी लोक लाज सोडुन । उघडे करुनी आपले वक्षस्थान। दूध पाजते पोटभरून । ती

आपल्या बाळास।।९।। स्वत: दु:ख भोगून । ती बाळाला ठेवते सुखानं । एवढे मोठे उदारपण । न दिसे इतरत्र कोठेही।।१०।। बाळपणी मलमूत्राची घाण । ती स्वच्छ करते आनंदानं । आपले आईचे कर्तव्य समजून । किळस ना केली कधीही।।११।। आई शब्द येता कानावर । सर्व काम सारूनी दूर । धावुनी येते घराबाहेर । पुत्र प्रेमा खातीर।।१२।। बाळ कितीही रडू द्या ना । आईने हलविताची पाळणा । झोपी जातो बाळराणा । तात्काळची सुखाने।।१३।। हा चमत्कार आईचे ठायी। त्या कारणे ती ठरली आई । प्रेमाचा अखंड झरा तिच्या हृदयी । वाहतो सर्वकाळ।।१४।। आई शब्दाचे वर्णन । करणे आहे कठीण । कोटी कोटी करावे नमन । तयेच्या चरणी।।१५।। चर्म काढुनी देहाचे । जोडे जरी शिवले त्याचे । पायी ठेवता मातेचे । तरी उपकार फिटेना।।१६।। आई म्हणजे पवित्र प्रेम । आई म्हणजे निष्काम कर्म। आईचा एकची धर्म । माणूस बनविणे मुलास।।१७।। या जगी प्रत्येक मनुष्याचा। आई प्रथम गुरू होय त्याचा । यापरी महिमा सांगितला आईचा । सर्व ग्रंथी आदरे।।१८।। तुकडोजीची मंगुळाआई । लहानुजीची

भीमाई। सत्यदेव बाबाची तुळसाबाई। पावल्या आई पदास।।१९।। तयांच्या उदरातुनी। जन्म घेतला संतांनी। संतमाता म्हणुनी। जाहल्या कीर्तिमान।।२०।। या विसाव्या अध्यायात। वीसची ओव्या त्यात। आई शब्दाचे महिमामृत। केले वर्णन।।२१।। जाऊनी बसावे चारचौघात। भाषणे द्यावी लोकात। लोभासाठी विश्वासघात। करू नये कधीही।।२२।। दानधर्म करावा तीर्थात। चर्चा करावी विद्वाना सोबत। सेवेसाठी शोधावा अनाथ। गरजवंत नित्यनेमे।।२३।। निर्वाहासाठी घ्यावी मेहनत। भविष्यासाठी करावी बचत। इमानदारिने वागावे सतत। माणूस बनून।।२४।। अभ्यास करावा एकांतात। चालत राहावे जीवनात। विसावा घ्यावा निवांत। आईच्या कुशीत।।२५।। हाच तो विसावा अध्याय। श्रोतेहो जाणावा एकमेव। हाती लागेल पुण्याची ठेव। वाचताना आपणासी।।२६।। बघा भागीरथी नावाची। ती आई शंकरबाबाची। घटना आहे तिरुपती बालाजीची। ऐकुनी घ्यावी निवांत।।२७।। हातामधला हात। सुटून गेला अकस्मात। आई हरवली गर्दीत। यात्रेकरूंच्या।।२८।। त्या दिवशी रात्रीला। सर्वांनी शोधले तिला। थांगपत्ता नाही लागला। कोणासही

तिचा।।२९।। संत शंकरबाबा समवेत। सर्व मंडळी पडले चिंतेत। काय करावे नव्हते सुचत। कोणासही तये वेळी।।३०।। सकाळी बाबाने आपला विचार । व्यक्त केला सर्व मंडळींसमोर । पुढचा प्रवास नाही थांबणार। कोणत्याही परिस्थितीत।।३१।। या यात्रेची जबाबदारी । सर्वस्वी आहे आम्हावरी । कितीही संकट आले तरी । पूर्ण करू आम्ही त्यास।।३२।। बाबाच्या ह्या निर्णयावर । कोण काय बोलणार । सर्वांनी दिला होकार । त्या प्रसंगास।।३३।। पुढे बाबांनी आपल्या इच्छेनुसार। व्यक्ती निवडले चार । तयांना सोपविला कार्यभार । आईला शोधण्याचा।।३४।। त्यात अनिल जगताप, मोहोड सर । प्रल्हाद राऊत, रामभाऊ शिवणकर। ते बाबाचे कट्टर सेवादार । पूर्वीपासूनचे।।३५।। तयांना बाबाने दिला आदेश। तुम्ही इथे राहावे सहा दिवस । आई ना मिळाल्यास । परत यावे आश्रमात।।३६।। लगेच बाबा तिरुपतीवरून । सर्व यात्रेकरूंना घेऊन। आले रामेश्वरला निघून । तात्काळ त्वरेने।।३७।। रामेश्वरी घेऊनी दर्शन । तातडीने गाठले कोल्हापूर तीर्थस्थान। प्रसंग घडला अद्भुतपूर्ण। बाबा सोबत।।३८।। माता भवानीच्या मंदिरात। बाबा उभे दर्शनी रांगेत। एवढ्यात एक बालिका धावत। आली

बाबाजवळ।।३९।। तिने बाबाच्या हातात । चार आणे दिले साक्षात । लगेच निघून गेली परत । त्या स्थळावरून।।४०।। बाबा समजायचे ते समजले । सहकार्यांनी हे सर्व बघितले ।परी याचे गुपित नाही कळले । बाबा व्यतिरिक्त कोणासही। । ४१।। इथून चार दिवसांत । भागीरथी आई पिंपळखुट्यात । येणार आहे निश्चित । संकेत मिळाला बाबास।।४२।। ती बालिका नव्हे साधारण । ती होय कोल्हापूरची शक्ती महान। तिने साक्षात दिले दर्शन । संत शंकर बाबास।।४३।। इकडे सहा दिवस उलटूनही। आईचा शोध लागला नाही। सर्व परत आले स्वगृही । पिंपळखुट्यास त्वरित।।४४।। पुढे कोल्हापूरहून बाबानं । पंढरपूरकडे केले प्रस्थान। विठ्ठलाचे घ्यावया दर्शन । यात्रेकरू सहित।।४५।। पंढरपूरच्या बडव्यानं। बाबाकडे बघून। आपण आहात भाग्यवान । केले संभाषण यापरी।।४६।। यावर बाबा म्हणाले । आम्ही भाग्यवान कसले। आम्ही तर आमच्या आईला गमावले । तिरुपतीच्या यात्रेत।।४७।। आता आई भागीरथीच्या चरणी । नतमस्तक होऊनी । एकच मागतो मागणी । ग्रंथ रसाळ व्हावयासी।।४८।। तूच शारदा आणि सरस्वती । तू साक्षात भगवती । नावही तुझे भागीरथी । मधुर किती

वाटते।।४९।। अक्षराचेही नव्हते ज्ञान। भाषाही येत नव्हती मराठी-विण। तुझे कोणी केले असेल रक्षण। तूच जाणे।।।५०।। तुझ्या शक्तीचा अंत । कळला नाही आजपर्यंत। कशी राहिली तू जिवंत । या भयंकर संकटातून।।५१।। आठ दिवसांपर्यंत । ती सारखी होती चालत । अन्नाचा कण नव्हता पोटात । आई भागीरथीच्या।।५२।। एके दिवशी रात्रीला । माता भागीरथीला । अकस्मात एक महिला । भेटली मार्गात।।५३।। त्या महिलेने भागीरथीला । नेले तिथल्या मंदिराला। तेथे नैवेद्य होता ठेविला । मूर्तिसमोर।।५४।। तू आठ दिवसांपासून । घेतले नाही अन्न । निवांत कर भोजन । या नैवद्याचे।।५५।। उरलेले अन्न । देऊ नको फेकून । सोबत नेई बांधून । पुढच्या प्रवासाला।।५६।। यापरी महिलेने सांगितले । त्यापरी भागीरथीने केले । हे नवल घडले । भागीरथी सोबत।।५७।। एवढ्यात मंदिरासमोरून । वाघ गेला डरकाळी देऊन । तो पाहिला भागीरथी आईनं । प्रत्यक्षात दृष्टीने।।५८।। ह्या घटनेचा वृत्तांत । बालिकेने कळविला कोल्हापुरात। चार आणे देऊनी हातात । संत शंकरबाबास।।५९।। मग ही बालिका कोण । ती तुळजापूरची अंबा जाण । तीच करित होती रक्षण। आई

भागीरथीचे।।६०।। त्यानंतरही भागीरथी आई । खल्लार गावी येई । इथली घटना ऐकून घेई । ध्यान देऊन संपूर्ण।।६१।। हे गाव आहे विदर्भात। अमरावती जिल्ह्यात। तालुका दर्यापुरात। दुर्गम मार्गावर।।६२।। इतक्या लांब अंतरावरून। ती कोणत्या वाहनात बसून । आली असेल हे समजणं । कठीण आहे श्रोते हो।।६३।। हे आहे कल्पनेच्या बाहेर । एवढा माझाही नाही अधिकार। म्हणुनी त्रिवार करतो जयजयकार । आई भागीरथीच्या नावाने।।६४।। खल्लार गावच्या जंगलात । एक गुराखी होता गुरे चारत। त्याला एक म्हातारी फिरत । दिसली त्या रानात।।६५।। देविदास मेश्राम त्याचे नाव । खल्लार होय त्याचे गाव । गुरे राखण्याचा मुख्य व्यवसाय । होता तयाचा।।६६।। ही भटकलेली म्हातारी समजून। त्याने चौकशी केली जाऊन। सर्व माहिती घेतली विचारून। म्हातारीला सत्वर।।६७।। मी आहे कोळी समाजाची । आई संत शंकर बाबाची । राहणारी पिंपळखुट्याची । भागीरथी माझे नाव।।६८।। यापरी गुराखी देविदासला । आई भागीरथीने पत्ता सांगितला। विनंती केली पोचविण्याला । पिंपळखुट्यास लवकरी।।६९।। देविदासने विचार केला । आपण या म्हातारीला ।

पोहचवून द्यावे गावाला। कोळी समाजाच्या घरी।।७०।। रानामध्ये गुरे सोडून । देविदास म्हातारीला घेऊन । गावात आला निघून । अति लगबगीने।। ७१।। भीमराव श्रीनाथ नावाचा । गृहस्थ होता कोळी समाजाचा। मित्र तो देविदासचा। गावातला।।७२।। मग त्या देविदासानं । म्हातारीला घेऊन । केले भीमरावच्या स्वाधीन । गावी पोचवा म्हणूनिया।।७३।। भीमरावला पूर्वीपासून । समाजाबद्दल होता स्वाभिमान। त्याने म्हातारीचा केला सन्मान । आपली आई समजून।।७४।। पाय धुवायला पाणी देऊन । घरात बसविले आदरानं। आग्रह केला घ्यावया भोजन। माता भागीरथीस।।७५।। यावर भागीरथी आई बोलली । मी पोटभरून जेवली । भाकरी शिल्लक आहे उरलेली । माझ्या जवळ।।७६।। ती तू करावी सेवन । उरलेली द्यावी दवडिला ठेवून । आईचे बोल ऐकून । भाकरी खाल्ली भीमरावने।।७७।। भाकरी नव्हती साधारण । दिली होती अन्नपूर्णा मातेनं। साक्षात दर्शन देऊन । आई भागीरथीस।।७८।। कितीही खाल्ली तरी। कधीही न संपणारी। यापरी या भाकरीची थोरी । सांगावी तेवढी कमी।।७९।। भीमराव ठरला भाग्यवान । या भाकरीला खाऊन। संत मातेचेही घडले दर्शन । सहजपणे तयास।।८०।।

भीमराव ती भाकरी खाऊन। तृप्त जाहला मनोमन। शेतात गेला निघून। चारा आणावया गायीस।।८१।। इकडे भागीरथी आईने। भीमरावचे धोतर धुवून। ठेविले कडक वाळवून। बाहेर उन्हामधे।।८२।। घरदार आंगण। स्वच्छ केले झाडून। दारावरती बसून। वाट पाहे देविदासची।।८३।। सायंकाळी भीमराव पत्नी सोबत। शेतामधून आला परत। जाहला आश्चर्यचकित। पाहुनी आपल्या घरास।।८४।। म्हातारी घराची पहारेदार। पूर्वी मानायचे लोक थोर। ती बसून असली दारावर। चोरी ना व्हायची घरात।।८५।। ही परंपरा होती पूर्वीची। आता गरज संपली म्हातारीची। व्यवस्था लावती कायमची। तिची वृद्धाश्रमात।।८६।। विरंगुळा म्हणुनी मी हे लिहिले। परी वाचकांनी यातले। मर्म पाहिजे जाणले। आपल्या बुद्धी सामर्थ्याने।।८७।। भागीरथीचा पाहुनी व्यवहार। पती-पत्नीला वाटला आदर। दोन दिवस केला पाहुणचार। तयांनी भागीरथीस।।८८।। दोन दिवस सन्मान करून। बघा ह्या भीमरावानं। भागीरथीला दिले पोहोचवून। पिंपळखुट्यास।।८९।। आई परत आली। वार्ता सर्वत्र पसरली। कोणी

म्हणे कशी आली। एकटी एवढ्या दुरून।।९०।। कोणी म्हणती ती संत माता । तिच्या हाती सर्व सत्ता । तिने दाखवली या जगता। सर्व लोकास।।९१।। उठली बैसली आपल्यात । राहिली सदा सोबत। परी कळू ना दिले गुपीत । कधी कोणासही।।९२।। या घडलेल्या प्रसंगाचे । कौतुक होते ऐकण्याचे। प्रयत्न केले विचारण्याचे । ती सांगेना कोणासही।।९३।। तिने अल्प शब्दात । बाबाजवळ सांगितला वृत्तांत । तोच या आध्यायात । लिहिला सविस्तर।।९४।। पुढे तिला झाला आजार । यातून ती नाही जगणार । डॉक्टर बोलले सत्वर । संत शंकर बाबास।।९५।। शंकर बाबाने त्या समयास । प्रार्थना केली आपल्या गुरुदेवास । श्री संत लहानुजी नाथास । तात्काळ आईच्या चिंतेने।।९६।। माझ्या आईला माझेजवळ । पाच वर्षे केवळ । राहू द्यावे अधिक काळ । ऋण फेडावया तियेचे।।९७।। तिची सेवा माझ्या हातून । घडली नाही परिपूर्ण । यासाठी तिला द्यावे जीवनदान । या प्रसंगी।।९८।। आपल्या शिष्याची प्रार्थना ऐकून । कृपा केली श्रीगुरुदेवानं। श्री संत लहानुजी नाथानं । संत श्री शंकर बाबावर।।९९।। सर्व नाड्या

सुरळित। चालू झाल्या पूर्ववत। चैतन्य आले शरीरात। आश्चर्य वाटले सर्वांस।।१००।। गुरू शिष्याचे हे नातं । अद्भुत या युगात । चर्चा जाहली लोकांत । या विषयाची।।१०१।। संपूर्ण पाच वर्षापर्यंत । आई होती हयात । बाबाही होते पुरवीत । लक्ष तिच्यावर।।१०२।। पांच वर्षाच्या अंतिम दिनास । देवाने बोलविले भागीरथी मातेस। १९९७ साल महिना मार्गशीर्ष । केवढे आश्चर्य म्हणावे।।१०३।। अखंड आयुष्याचा प्रवास। विसावा घ्यावया निजधामास। माता भागीरथी मिळाली सागरास । कायमस्वरूपी।।१०४।। तिने आपल्या उदरातून । संताला जन्म देऊन। जगी जाहली कीर्तिमान । संत माता म्हणुनिया।।१०५।। आकाशी चंद्रसूर्य जोवरी । माता भागीरथीची कीर्ती तोवरी। अखंड नांदेल या भूवरी । संत मातेच्या रूपाने।।१०६।। हे भाग्य प्राप्त ना होय इतरांशी । ते प्राप्त जाहले भागीरथीशी। उद्धरिले सात पिढ्यांशी । तिने आपल्या पुण्याईने।।१०७।। संत असो वा मनुष्य साधारण । मातृविरहाचे दु:ख समान । हा निसर्ग नियम जाण । प्रत्येक प्राणीमात्राशी।।१०८।। देह हा जाणार ।

आत्मतत्त्व आहे अमर । याचा न व्हावा विसर। कधी काळी।।१०९।। मानव जीवनाचे कल्याण । जरी व्हावे वाटे मनोमन। श्रद्धाभावे जावे शरण । संत महात्म्याशी।।११०।। कलीयुगी संत अवतार । थोर तयांचा अधिकार। ते साक्षात परमेश्वर । प्रकट जाहले भूमिवर।।१११।। सोडुनी राग, द्वेष, अभिमान । तयांच्या चरणी व्हावे लीन । उपाय नाही या वाचून । दुजा कोणताही।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । विसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्रश्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय एकविसावा

रमेशभाऊ काठोळे । तयांचे अनुभवची वेगळे । दोन्ही कर्ण करूनी मोकळे । ऐकुनी घ्यावे निवांत।।१।। देवधर्म साधू संतांवर । तयाची श्रद्धा नव्हती तिळभर। नित्य मास, मदिरा आहार । दिनचर्या तयाची।।२।। व्यवसाय मंडप डेकोरेशनचा । त्यामुळे सहवास घडला बाबाचा । संशय मिटला नाही मनाचा । किंचितही तयाचा।।३।। तर्क-वितर्क आपल्या मनाचे । ते बाबाला विचारायचे । बाबा ते ऐकून घ्यायचे । निमूटपणे बोलणे।।४।। रमेशभाऊच्या मनातला। बाबानं भाव ओळखून घेतला। त्याचा अल्पसा प्रभाव दिसला । रमेशभाऊवर हळूहळू।।५।। एकदा रमेशभाऊ पिंपळखुट्यास । आले निमंत्रण देण्यास । श्रीसंत शंकर बाबास । बहिणीच्या विवाहाचे।।६।। विवाह पत्रिका ठेवताच हातात । बाबा बोलले हसत । पत्रिका ठेवावी लागेल सुरक्षित। आम्हाला जपून।।७।। विवाहाच्या निश्चित तारखेला । बाबा पोहचले अमरावतीला। रमेशभाऊने

आदर सत्कार केला। आपल्या परीने बाबाचा॥८॥ शेजाऱ्याच्या निवासस्थानी। बाबाची व्यवस्था केली जाऊनी। कारण श्रद्धा नव्हती अजुनी। रमेशभाऊची बाबावर॥९॥ हे सर्व काही बाबानं। क्षणात घेतलं ओळखून। त्वरितची विचारला प्रश्न। बाबाने रमेशभाऊस॥१०॥ आम्ही तुम्हाला कधीपासून। जाहलो आहे प्रसन्न। बाबाचे हे शब्द ऐकून। रमेशभाऊ झाले चकित॥११॥ 'श्री शंकरबाबा प्रसन्न'। ही अक्षरे पेंटरकडून। लिहून घेतली होती रमेशभाऊनं। लग्नमंडपात स्टेजवर॥१२॥ हे सर्व इथे बसून। कोण्यापरी ओळखले बाबानं। परी श्रद्धा नव्हती अजून। रमेशभाऊची बाबावर॥१३॥ पुढे लग्नाची वरात। पोहोचली नाही लग्नमंडपात। धडकी भरली मनात। रमेशभाऊच्या॥१४॥ बाबा म्हणाले रमेशभाऊला। वर गृही वाद जाहला। त्याकारणे वरात येण्याला। होणार आहे उशीर॥१५॥ अवघ्या एक तासात। वरात येणार आहे निश्चित। हे शंकरबाबाचे भाकित। सत्यची ठरले अखेर॥१६॥ बाबाने स्वयम वधुवरास। शुभ आशीर्वाद दिला तयांस। आश्चर्य पाहुणे मंडळीस। वाटले त्या

प्रसंगी।।१७।। तो महिना होता जून। सर्वत्र पावसाचे वातावरण। ढग होते पाण्याने भरून। दिवसभर आकाशी।।१८।। सर्व कार्यक्रम आटोपल्यानंतर। पाऊस पडला मुसळधार। लोक म्हणाले हा चमत्कार। घडविला शंकर बाबाने।।१९।। एकदा आश्रमाच्या परिसरात। बाबा होते फिरत। रमेशभाऊ होते सोबत। बाबाच्या त्याप्रसंगी।।२०।। रमेशभाऊच्या मनात। वेगळेच होते शिजत। बाबाने ओळखले क्षणात। वेळ न लावता।।२१।। बाबाने रमेशभाऊस। सहज केला उपदेश। तुमचा आमचा सहवास। आहे जन्मोजन्मीचा।।२२।। एवढे स्पष्ट सांगून। दुर्लक्ष केले रमेशभाऊन। दारूचे वाढले व्यसन। कायम स्वरूपी। २३।। धन आणि अज्ञान। दोहोंचे होताची मीलन। समजावे जाहले पतन। मानवाचे नक्कीच।।२४।। दारूच्या व्यसनामुळ। घरामध्ये वाढला तणाव। पत्नीने घेतला निर्णय। आत्महत्या करण्याचा।।२५।। एके दिवशी पत्नीने। स्वत:ला घेतले जाळून। शेजाऱ्यांनी मदत करून। भरती केले रुग्णालयी।।२६।। रमेशभाऊ त्या समयास। रामनवमीच्या

उत्सवास । आले होते पिंपळखुट्यास । मंडप डेकोरेशन घेऊन।।२७।। परत येताच अमरावतीस । घटना कळली रमेशभाऊस। रमेशभाऊ त्या वेळेस। होते दारूच्या नशेत।।२८।। आता पत्नी निश्चित जाणार । आपणही जाऊनी रुळावर। आत्महत्या करावी हा विचार । आला मनात रमेशभाऊच्या।।२९।। रमेशभाऊचा हा विचार । आला भावाच्या कानावर। तयाने रमेशभाऊला रात्रभर । डांबून ठेवले घरात।।३०।। दुसऱ्या दिवशी त्वरित । रमेशभाऊ पोहचले रुग्णालयात । पश्चात्ताप होता मनात । पत्नीच्या अपघाताचा।।३१।। आपल्या दारूच्या त्रासान । पत्नीने घेतले जाळून । याला दोषी स्वत: आपण। आहोत एकमात्र।।३२।। नाना तऱ्हेचे विचार । येत होते डोळ्यासमोर । तेणे जाहले मन अस्थिर। रमेश भाऊचे।।३३।। एवढ्यात एक महिला जळलेली। रुग्णालयात मृत्यू पावली। ती डोळ्याने पाहिली। प्रत्यक्षात रमेशभाऊने।।३४।। आता आपल्या पत्नीचा। भरोसा नाही जगण्याचा। तोल सुटला मनाचा। रमेशभाऊच्या।।३५।। तयांनी शंकरबाबाला उद्देशून । मुखातून सोडले शब्दबाण । ते

घ्यावेत ऐकून । शांत चित्ताने।।३६।। जर का माझी पत्नी । वाचली नाही यातुनी । सर्व देव धर्म गुंडाळुनी। ठेवीन खिशात।।३७।। ही प्रार्थना की अवहेलना । सांगणे कठीण या क्षणा। परी पुढे घडलेली घटना । सत्यची जाणावी।।३८।। बघा चार दिवसांनंतर । पत्नी आली शुद्धीवर । आश्चर्य करू लागले डॉक्टर । रुग्णालयातील।।३९।। नव्वद टक्के जळालेला रुग्ण । वाचलेला पाहिला ना अजून। चर्चा पसरली चहुबाजू । सर्वत्र परिसरात।।४०।। या अद्भुत प्रसंगापासून । परमभक्त रमेशभाऊनं। घट्ट धरियले चरण । श्री संत शंकर बाबाचे।। ४१।। उठता बसता रात्रंदिन । शंकर बाबाचे नामस्मरण । सर्वस्व केले अर्पण । तया ठायी।।४२।। मला वाल्ह्याचा वाल्मीक बनवून । जीवन केले पावन । पत्नीसही दिले जीवनदान । संत शंकर बाबाने।।४३।। मी तयांचे उपकार । कदापी नाही विसरणार । यापरी केला निर्धार । रमेशभाऊने आयुष्यात।।४४।। राजाभाऊ देशमुख अमरावतीचे । परमभक्त ते बाबांचे । अनुभव ऐकावे तयांचे । निवांत पणाने।।४५।। तयांचा संपूर्ण परिवार । प्रेम करतो बाबांवर। बाबाला ते परमेश्वर ।

मानतात साक्षात।।४६।। पंचवीस वर्षापासून । तयांनी बाबाचे चरण । घट्ट ठेविले धरून । कायमस्वरूपी।।४७।। तयांना बाबाचे साक्षात्कार । घडले बघा वारंवार। त्यामुळे तयांची बाबावर । श्रद्धा जडली अपार।।४८।। एकदा राजाभाऊनं । कर्ज घेतले सावकाराकडून । ते वाढले दामदुपटीनं । राजाभाऊ चिंतेत।।४९।। या कर्जाची परतफेड । करणे आहे अवघड । बघा या राजाभाऊपुढं । समस्या जाहली निर्माण।।५०।। राजाभाऊच्या नावानं। एक प्लॉट होता घेऊन। तो ठेविला गहाण। सावकाराकडे।।५१।। सावकाराच्या मनात । बेइमानी शिरली क्षणात। त्याने केला विश्वासघात । राजाभाऊ सोबत।।५२।। बघा त्या सावकाराने । तो प्लॉट आपल्या नावाने । करून घेतला मुजोरीने । राजाभाऊ कडून।।५३।। एवढे करूनही सावकाराचे । समाधान नाही जाहले त्याचे। पुन्हा पैसे जास्तीचे । मागू लागला राजाभाऊस।।५४।। हा व्यवहार घरच्या लोकास। माहीत नव्हता कोणास। सावकार देव होता खास। राजाभाऊस त्या वेळी।।५५।। शेवटी राजाभाऊनं । पिंपळखुट्याला येऊन । सर्व प्रकार

केला कथन । संत शंकरबाबा जवळ।।५६।। संत शंकर बाबानं । स्वत: जवळचे पैसे देऊन । मुक्त केले सावकारी पाशातून । राजाभाऊस तात्काळ।।५७।। पुढे राजाभाऊच्या वडिलानं । थोडे थोडे करून । बाबाचे चुकविले ऋण । काळजीपूर्वक।।५८।। ऐसा संत महान । नाही देखिला अजून । राजाभाऊ सांगतात । आवर्जून इतरांस।।५९।। अनिल भाऊ देशमुख। ते बाबाचे सेवक। तयांच्या अनुभवांचा उल्लेख। होत आहे या ठायी।।६०।। घरी होती जमीनदारी । धंदा होता सावकारी । त्यात दारूचे व्यसन भारी । जडले वडिलांस।।६१।। दारूच्या व्यसनापायी । संपत्ती गेली सर्वही । परी दारूच्या व्यसनात जराही । जाहला नाही सुधार।।६२।। शेवटचा उपाय म्हणून । बघा त्या अनिलभाऊनं । घ्यावया बाबाचे दर्शन । वडिलास आणले पिंपळखुट्यास।।६३।। बाबाने पाहता क्षणी । सांगितली भविष्यवाणी । आजपासून चवदा दिवसांनी । हे जाणार निश्चित।।६४।। आता या अंतिम क्षणास । सेवा करावी रात्रंदिवस। बाबाने सांगितले सर्वास । अनिल भाऊ सहित।।६५।। बाबाची भविष्यवाणी। अचूक ठरली सर्व

बाजूंनी। साहेबराव गेले देह सोडूनी । वार्ता पसरली सर्वत्र।।६६।। तेव्हापासून अनिल भाऊची। तयांच्या संपूर्ण परिवाराची । श्रद्धा जुळली कायमची । श्री संत शंकर बाबावर।।६७।। सुधाकरराव बान्ते नावाचे । ते श्रद्धावंत भक्त बाबाचे। अनुभव ऐकावे तयांचे । बाबा विषयीचे।।६८।। बान्ते साहेब व्यवसायानं । बांधकाम आर्किटेक्चर म्हणून। उद्योग करतात पूर्वीपासून । एकमात्र।।६९।। कित्येक बांधकाम अपूर्ण । जी सोडून दिली ठेकेदारानं । पूर्ण केली बान्ते साहेबानं । बाबाच्या आश्रमाची।।७०।। तेव्हापासून बाबासोबत। बान्ते साहेबाचं नातं। जुळून आहे सतत। अति श्रद्धाभावाने।।७१।। प्रथम प्रसूतीच्या समयास । पत्नीला जाहला त्रास । शस्त्रक्रिया करूनी बाळास । काढले बाहेर।।७२।। बाळ होते अति अशक्त । डॉक्टरांनी त्वरित । भरती केले अतिदक्षतेत । पुढील उपचारासाठी।।७३।। मुलीला घरी आणून । उपचार केला डॉक्टराकडून । परी नाही समाधान। चिंता लागली शेवटी।।७४।। बाबा अकस्मात नागपुरास । आले बान्ते साहेबाच्या गृहास । त्या वेळी बघितले मुलीस । बाबाने

तात्काळ।।७५।। पुढे चार महिन्यानं । बाबांचे पुन्हा जाहले आगमन । प्रसंग घ्यावा ऐकून । त्या वेळी श्रोते हो।।७६।। मुलगी सारखी होती रडत। काही केल्या नव्हती थांबत । बाबाने लावताच हात । गप्प जाहली एकाएकी।।७७।। मुलीला जन्मापासून । कमी दिसत होते डोळ्यानं । माता-पिता दोघेही जण । दु:खी होते मनात।।७८।। मुलगी अभ्यासात हुशार । तिचा मेडिकलसाठी लागला नंबर । परी नेत्रदृष्टी कमजोर । त्यामुळे जाहली वंचित।।७९।। ती नेटच्या परीक्षेत । पाचशे अठराव्या क्रमांकात। उत्तीर्ण झाली प्रत्यक्षात । संपूर्ण भारतामधून।।८०।। मुलगी ऋतुजा बुद्धिवान । परी तिच्या नशिबानं । तिची साथ दिली सोडून । कायमस्वरूपी।।८१।। एकाला दिले भाग्य थोर । दुसऱ्याला संघर्ष दिला आयुष्यभर । हा विधात्याचा व्यवहार । वाटे आगळा वेगळाची।।८२।। व्हायचे ते नक्कीच होणार । कदापिही नाही चुकणार । बाबाचे चरण नाही सोडणार । निर्धार बान्ते साहेबांचा।।८३।। इंगळे वकील अमरावतीचे । श्रद्धावान भक्त बाबाचे । अनुभव ऐकावे तयांचे । या

अध्यायात।।८४।। घरची परिस्थित हलाखीची । चिंता वडिलाच्या आजाराची । त्यात स्वत:च्या शिक्षणाची । भर पडली अधिक।।८५।। परी बाबाचा कृपा कर । सतत होता शिरावर । तयांचा घेऊनी आधार । म्हणुनी आलो इथवरी।।८६।। हे शब्द होय कृतज्ञतेचे। निष्ठावंत इंगळे साहेबांचे । परमभक्त शंकरबाबाचे । भाविक सहजन हो।।८७।। एकोणवीसशे पंच्याण्णव सालास । गडगडेच्या मुलाच्या लग्नास । बाबा आले अमरावतीस । त्या लग्नप्रसंगास।।८८।। बघा त्या प्रसंगास । इंगळे साहेबाने वडिलास । नेले बाबाच्या दर्शनास । अगत्याने श्रद्धेने।।८९।। तो होय प्रथम क्षण। सद्गुरूचे जाहले दर्शन । त्या प्रसंगाचे स्मरण । अजूनही इंगळे साहेबास।।९०।। बाबाने वडिलांसोबत । चर्चा केली मनसोक्त। तो प्रसंग होता अद्भुत । सांगतात इंगळे साहेब।।९१।। तुम्ही आपल्या प्रकृतीची । काळजी घ्यावी नित्याची । पुढे आवश्यकता आहे तुमची । तुमच्या परिवारास।।९२।। मुलीचे आहे लग्न । मुलाचेही आहे शिक्षण। ही सर्व जबाबदारी पूर्ण । करावयाची आपणास।।९३।। यापरी मोलाचे संभाषण। केले वडिलांसवे बाबानं । ते

समजणे होते कठीण । आम्हा सर्वांशी।।९४।। पुढे त्याचा अनुभव आला । बहिणीचाही विवाह झाला । इंगळे साहेबही कामधंद्याला । लागले वकिलीच्या।।९५।। कनिष्ठ बंधूलाही सरकारी। तात्काळ मिळाली नोकरी । ही किमया सारी । होय बाबाची।।९६।। मध्यंतरी आईचा अपघात। जाहला होता अकस्मात । मार लागला मेंदूत । प्रसंग होता कठीण।।९७।। नागपूरच्या रुग्णालयात । तिला भरती केले त्वरित। पूज्य बाबाचा वरदहस्त । होता तिच्या शिरावर।।९८।। ती पंधरा दिवसांत । स्वस्थ जाहली रुग्णालयात। घरी आणले परत । तिला तात्काळ।।९९।। तळहाताच्या फोडासमान । आम्हाला वागविलं बाबानं। वेळोवेळी केले मार्गदर्शन। आमच्या कठीण प्रसंगास।।१००।। एकदा बाबा मध्यंतरी । आले इंगळे साहेबांच्या घरी। वडिलांस बोलले सत्वरी । ते घ्यावे ऐकून।।१०१।। पिकले पान गळणार । हा निसर्गाचा व्यवहार । तो नाही टळणार । कदापिही निश्चित।।१०२।। आता चिंता द्या सोडून । एकमेव करावे चिंतन । आत्मोद्धाराचे साधन । आपल्या करावे जवळ।।१०३।।

आपणास कायमची । गरज नाही औषधाची। तयारी करावी जाण्याची । आपल्या निजधामास।।१०४।। यापरी संत शंकर बाबानी । संकेत दिले सांगुनी। त्यापरीच घडले कालांतरानी । निश्चितची जाहले।।१०५।। १२ मार्च २००२ ला । शुभ दिवशी महाशिवरात्रीला । वडिलांना स्वर्गवास जाहला । बाबांच्या वचनानुसार।।१०६।। आम्ही सर्व तेव्हापासून। बाबाच्या आशीर्वादानं । जगत आहो सुखानं । सांगतात इंगळे साहेब।।१०७।। घार हिंडते आकाशी । लक्ष तिचे पिलापाशी। यापरी आम्हा सर्वांसी । सांभाळिले बाबानी।।१०८।। तोच जिव्हाळा अजूनही । कायम बाबाच्या हृदयी। अनुभव ठायी ठायी। आम्हासी तात्काळ।।१०९।। बाबाने सर्व काही। दिले न मागताही। इच्छा अनिच्छा कोणतीही। उरली नाही मनात।।११०।। आता एक इच्छा प्रांजळ । हा देह झिजावा सकळ। अहोरात्र सदासर्वकाळ । सद्‌गुरूच्या सेवेत।।१११।। ऐशापरी केला निर्धार । इंगळे साहेबांनी आयुष्यभर । शंकर बाबांना ईश्वरावतार। मानतात साक्षात।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित ।

संत शंकरबाबा चरणी समर्पित । एकविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय बाविसावा

गोपालसेठ अटारा घाटंजीचे । सद्गृहस्थ सात्त्विक प्रवृत्तीचे। तयांना वेड संतसेवेचे । पूर्वीपासून।।१।। तयांना संत शंकरबाबांचे । अनुभव आले वेळोवेळीचे । त्या वेळीच्या प्रसंगाचे। वर्णन ऐकावे आपण।।२।। १९९८ सालापासून । श्री. जगताप साहेबानं । नाते दिले जुळवून । संत शंकरबाबा सोबत।।३।। बघा दारूच्या व्यसानानं । परिस्थिती गेली ढासळून । दारूविना मिळेना चैन । गोपाल सेठला त्याकाळी।।४।। जगताप साहेबा सोबत। पिंपलखुट्याच्या आश्रमात। गोपाल सेठ यायचे नियमित। बाबाच्या दर्शनास।।५।। चमत्कार जाहला अकस्मात । गोपाल सेठने क्षणात । दारू पासुनी घेतली फारकत । केवढे आश्चर्य म्हणावे।।६।। तेव्हापासूनी शंकर बाबावर । गोपाल सेठची श्रद्धा अपार । दृढ जडली निरंतर । कायमस्वरूपी।।७।। नित्य स्मरण शंकर बाबाचे । वारकरी बनले पिंपळखुट्याचे । जीवन बदलले गोपाल सेठचे । श्रद्धेमुळे

तात्काळ।।८।। नेहमी दर्शनासी यावे । आश्रमात मुक्कामी राहावे । बाबाने सांगितले ते ऐकावे। गोपाल सेठनी।।९।। जैसे परीस स्पर्शता लोहास। सुवर्ण बनवी तयास । तैसे शंकर बाबाने भक्तास । बनविले त्यापरी।।१०।। यापरी अनेक व्यसनाधीन । तयांना दारूच्या व्यसनापासून। मुक्त केले शंकर बाबानं । आपल्या कृपाप्रसादे।।११।। प्रसंग आहे एकदाचा । पिंपळखुटा क्षेत्राचा । यज्ञकुंडाच्या बांधकामाचा । निवांत करावा श्रवण।।१२।। बघा त्या बांधाकामास । ग्रेनाईटची आवश्यकता होती त्यास । बाबाने सांगितले सर्वास । हे काम करील गोपालसेठ।।१३।। त्या वेळी गोपालसेठची । परिस्थिती होती हलाखीची । आज्ञा मोडावी बाबांची । तेही नाही उचित।।१४।। यापरी गोपालसेठची । दुविधा जाहली मनाची । पूर्तता करावया गुरू आज्ञेची । लागले तयारीस।।१५।। काही मदत जगताप साहेबाकडून। काही जमविली इतरांकडून। बाबाची इच्छा केली पूर्ण । गोपाल सेठने तात्काळ।।१६।। पुढे काही दिवसानं । शंकर बाबाच्या कृपेनं। हळूहळू घडले परिवर्तन । आर्थिक परिस्थितीचे।।१७।। श्रद्धारूपी बीज

पेरता। उपासनेचे जल सिंचता। सुखसमृद्धीची अंकुरे तत्त्वता । उगवती निश्चित।।१८।। त्यापरी गोपालसेठच्या जीवनात । परिवर्तन घडले अकस्मात। व्यवसाय चालू लागला सुरळित। बाबाच्या आशीर्वादाने।।१९।। पुढे मुला मुलीचे लग्न । पार पडले निर्विघ्न । कोणत्याही प्रकारची अडचण । भासली नाही जराही।।२०।। दिवसाचे चोवीस तास । त्यात अर्धा अंधार अर्धा प्रकाश । तैसाची आहे मनुष्याचा प्रवास । सुखदु:खाच्या भोवऱ्यात।।२१।। विवाहानंतर गोपालसेठच्या मुलास । पोटात होऊ लागला त्रास। त्वरित दाखविले डॉक्टरास । रुग्णालयात नेऊनी।।२२।। या मुलाचे लिव्हर । कायमचे झाले बेकार । डॉक्टरांनी सांगितले सत्वर । गोपाल सेठला।।२३।। बघा या मुलाची । शक्यता नव्हती जगण्याची । चिंता वाढली गोपालसेठची । काय करावे कळेना।।२४।। मुलगा वाचणार नाही म्हणून । डॉक्टरांनी सांगितले आवर्जून। काय फायदा इतरत्र नेऊन । निश्चय केला गोपालसेठनी।।२५।। आता आपला एकची डॉक्टर । पिंपळखुट्याचा संतवर। तेच करतील उपचार। आपल्या मुलाचा।।२६।। यापरी केला

निर्धार । मुलास आणले सत्वर। पिंपळखुट्याच्या आश्रमावर । श्री संत शंकर बाबा जवळ।।२७।। बाबाने पाहता क्षणी । शब्द फेकला मुखाातूनी। याला त्वरित जावे घेवोनि । नागपूरला डॉ. सुभेदारांकडे।।२८।। अंगारा दिला खावयास । संजीवनी बुटी म्हणती त्यास । अनुभव आले अनेकांस । अंगाऱ्याचे बाबाच्या।।२९।। उपचार केले डॉ. सुभेदारांनी । सोबत होती बुटी संजीवनी । मुलगा बरा झाला आठवड्यानी । हे सामर्थ्य बाबाचे।।३०।। दवा मे मिल गयी दुवा । लाभला संतकृपेचा ठेवा। गोपालसेठला लागला लळा । संत श्री शंकर बाबाचा।।३१।। एका संकटाचे निवारण । होताची दुसऱ्याचे आगमन। प्रसंग होता कठीण । गोपाळसेठच्या जीवनात।।३२।। मुलीच्या गर्भाशयात । मासाचा गोळा होता आत। तिला त्रास अतोनात। त्यापासुनी होतसे।।३३।। डॉक्टरांनी सांगितले ऑपरेशन। ते करावे बाबाला विचारून। बाबाच आपले भगवान । आहेत या प्रसंगी।।३४।। बाबाने ऑपरेशन करण्याला । त्वरितची होकार दिला। आम्ही आहो सोबतीला । ठीक होईल सर्व काही।।३५।। गोपालसेठला वाटला

धीर। सर्व काही बाबाच करणार। याप्रसंगी तयाचाच आधार। आपणास एकमेव॥३६॥ बाबाच्या आशीर्वादानं । सुखरूप जाहले ऑपरेशन । मुलगी बरळली बेडवरून । 'बाबा कुठे आहेत'॥३७॥ आताच तर ते इथे । माझ्याजवळ उभे होते । मुलगी सांगत होती सकळाते । उपस्थितांना आश्चर्य॥३८॥ आपल्या मुलीचे शब्द ऐकून । गोपालसेठने केले बाबाचे स्मरण। शंकरबाबा साक्षात संकटमोचन । आहेत या जगी॥३९॥ पुढे मोठी आपत्ती आली । मुलीची स्मरणशक्ती हरवली। वेड्यापरी ती वागू लागली। काय करावे सुचेना॥४०॥ हा भूतबाधेचा प्रकार । याचा कोण्यापरी करावा उपचार। यापरी निरंतर विचार । करू लागले गोपालसेठ॥४१॥ या घटनेच्या दरम्यान । गोपालसेठच्या मुलीनं। पाच वेळा केला प्रयत्न। आत्महत्या करण्याचा॥४२॥ गोपालसेठ गेले घाबरून । करू लागले नामस्मरण । संत शंकर बाबाचे मनोमन । अहोरात्र॥४३॥ एके दिवशी निवांत । मुलगी झोपली होती शांत । मध्येच किंचाळली अकस्मात । बाबा बाबा म्हणूनी॥४४॥ काय करावे नव्हते सुचत । मन जाहले अशांत ।

सर्व परिवार चिंतेत । होता त्या समयास।।४५।। ती सांगू लागली साक्षात । म्हणे बाबा आले माझ्या स्वप्नात। तयांनी माझ्या डोक्यात । थाप मारली जोरात।।४६।। बघा त्या दिवसापासून । तिची स्मरणशक्ती आली परतून। तिला मिळाले नवजीवन। कृपाप्रसादे बाबाच्या।।४७।। एवढ्या भयंकर संकटातून । मला वाचविले बाबानं । कोण्यापरी तयांचे मी ऋण । फेडू या जन्मात।।४८।। माझा जीव जरी सत्वर । अर्पण केला चरणावर । तरी बाबांचे उपकार । फिटणार नाही कदापीही।।४९।। श्रीसंत शंकर बाबाचा कृपा कर । निश्चितची होता माझ्या शिरावर। हे मी कधीही नाही विसरणार । बोल गोपाल सेठचे।।५०।। आता एका संतसेवकाचे । वर्णन ऐकावे तयांचे । ते नातेवाईक शंकरबाबाचे । शिदोडीचे राहणारे।।५१।। रामभाऊ दादा हे नाव । सर्वांना परिचित आहे एकमेव। शांत, सरळ स्वभाव । सान थोरांचे आदरस्थान।।५२।। बघा बाबाच्या इच्छेनुसार । तयांनी त्यागिले घरदार । तेव्हापासून ते आजवर । आहेत बाबांच्या सेवेत।।५३।। प्रतिकूल परिस्थितीतही । बाबांच्या सेवेत किंचितही । खंड पडू दिला

नाही । रामभाऊ दादाने।।५४।। जमा होते पूर्वसंचित । तरीच लाभली संताची संगत। जीवन बदलले समस्त। रामभाऊ दादाचे।।५५।। राम सेवक हनुमान। जगी जाहला पावन । सेवेचे महत्त्व अति महान । घ्यावे समजोनी।।५६।। त्या परीच रामभाऊ दादानं । जीवनाच केल सोनं । सेवा केली इमानदारीनं। संत शंकर बाबाची।।५७।। विरोधकांचा जाहला त्रास । तोही साहिला अनेक दिवस। ढळू ना दिले संयमास । बाबांच्या आज्ञेनुसार।।५८।। बघा बाबा त्या समयास । सहज बोलती रामभाऊ दादास । हे सर्व विरोधक आपणास । शरण येतील भविष्यात।।५९।। पुढे तैसेची घडले । बाबाचे वचन सत्य ठरले । रामभाऊ दादाने ते अनुभवले । प्रत्यक्षात ते वेळी।।६०।। बाबाच्या सेवेत राहून। बघितली अनेक तीर्थस्थानं । अनेक साधुसंताचे दर्शन । घडले रामभाऊ दादास ।।६१।। संत लहानुजी बाबा टाकरखेडचे । सत्यदेव बाबा भारवाडीचे । भाग्य लाभले सेवा करण्याचे । अति जवळून।।६२।। बाबांचा प्रथम सेवक म्हणून । लोक देती मान सन्मान। परी त्याचा तिळमात्रही अभिमान । नाही केला

आयुष्यात।।६३।। एकदा कमलाआजी सोबत । भांडण झाले आश्रमात । त्या रागाच्या भरात । रामाभाऊ दादा गेले निघून।।६४।। स्वामी सीतारामदास मंडला निवासी। रामभाऊ दादा त्या दिवशी । रात्रीला होते मुक्कामासी । आश्रमात तयांच्या।।६५।। त्या दिवशी रात्रीला । झोपेमध्ये दृष्टांत जाहला । प्रत्यक्षात रामभाऊ दादाला । नीट घ्यावा ऐकुनी।।६६।। तुम्ही आम्हाला सोडून । अकस्मात गेले निघून । त्वरित यावे परतून । पिंपळखुट्यास।।६७।। सकाळी उठल्यावर । रामभाऊदादा करी विचार । आता निघून जावे सत्वर । आपल्या गावी परत।।६८।। हा आदेश नव्हे इतरांचा । तो होय संत शंकर बाबाचा। पिंपळखुटा निवासी श्री गुरुदेवाचा । साक्षात परब्रह्म।।६९।। जरी आपण इथून । नाही गेलो परतून। बाबांचा होईल अवमान । आपल्याकडून निश्चित।।७०।। रामभाऊ दादा तिथून । लगेच निघाले परतून। बाबा ध्यान लावून । बैसले होते आश्रमात।।७१।। त्या वेळी बाबांच्या व्यतिरिक्त । कोणीही नव्हते आश्रमात । रामभाऊ दादा जोडुनी दोन्ही हात । उभे बाबासमोर।।७२।। बाबाने त्या क्षणी । शब्द फेकला

श्रीमुखातुनी । आम्हाला हा सोडुनी । जातो म्हणतो बाहेरी।।७३।। दुसरे दिवशी अकस्मात । काही भक्तमंडळी सोबत। श्री सत्यदेवबाबा आश्रमात। आले भारवाडीवरून।।७४।। रामभाऊ दादास उद्देशून । सत्यदेवबाबा बोलले वचन। ते करावे श्रवण । वाचक वृंदहो।।७५।। भोकन्या आमच्यावाल्याले सोडून । इकडे तिकडे जात पळून। रामभाऊ दादा तेव्हापासून। जाहले स्थिर आश्रमात।।७६।। संत वचनाचे पालन । म्हणजे जीवनाचे कल्याण। अनुभव घेतला रामभाऊ दादानं । आपल्या आयुष्यात।।७७।। पुढे रामभाऊ दादाला । अर्धांगवायूचा विकार जडला । चिंता वाटे सर्वाला। तयांच्या प्रकृतीची।।७८।। बघा त्या आजारामधून । रामभाऊ दादाचं जगणं । एकमात्र होत कठीण । निश्चितची।।७९।। तयांना काहीच नव्हते भान। हा कोण याचेही नव्हते स्मरण। बोलताही येईना वाचेन । प्रसंग होता कठीण।।८०।। एवढ्या दुर्धर आजारातून । श्री संत शंकरबाबानं । रामभाऊ दादास दिले जीवनदान। केवढे आश्चर्य म्हणावे।।८१।। देवादिकाहुनी थोर । आहे संताचा अधिकार । यमराजाही घेई माघार ।

तयांच्या शब्दाने।।८२।। शंकर बाबा माझा देव । शंकर बाबा माझे सर्वस्व। समजतो मी एकमेव । सांगतात रामभाऊ दादा।।८३।। आता बाबाच्या एका परमभक्ताचे । पी. यू. देशमुख साहेबाचे। अनुभव ऐकून घ्यावे तयांचे। ध्यान देऊनी सावध।।८४।। तयांचा वकिलीचा व्यवसाय। आध्यात्म हा आवडीचा विषय । शांत सरळ स्वभाव । वागणेही प्रेमाचे।।८५।। १९८८ सालापासून । ॲड. अनिल देशमुखाच्या माध्यमातून। पिंपळखुट्याला येणं-जाणं। सुरू झाले त्या काळी।।८६।। त्यापूर्व काळात। आश्रमाच्या जागेबाबत। वाद होता गावकऱ्यांसोबत। अतिक्रमणा विषयी।।८७।। काही विरोधी गावकऱ्यांनी। कोर्टात केस दिला लावुनी। अकारण त्रास दिला विरोधकानी । संत शंकरबाबास।।८८।। आश्रमाच्या वतीनं । हा केस लढावा आपण। आग्रह केला जगताप साहेबानं । पी. यु. साहेबास।।८९।। लगेच काही दिवसांनी। निकाल दिला कोर्टानी। आश्रमाच्या बाजूनी । विरोधक जाहले हतबल।।९०।। या घटनेपासून । संत शंकरबाबा आदरानं । देऊ लागले मानसन्मान । पी. यू. साहेबास।।९१।। पी. यु. साहेबांना त्या

काळात। बाबाचे अनुभव आलेत। परिवर्तन घडले आहार विहारात। अप्रत्यक्ष पणाने।।९२।। मनाचे मिटले भ्रमिष्टपण। शंका कुशंका अज्ञान। तरणोपाय नाही अध्यात्माविण। उद्धरावया जीवन आपले।।९३।। यापरी दृढ विश्वास। जाहला पी. यू. साहेबास। तेव्हापासून धरिले चरणास। संत शंकरबाबाच्या तयानी।।९४।। संत शंकर बाबाचा ध्यास। लागला पी. यु. साहेबास। येऊ लागले दर्शनास। अमरावतीहून पिंपळखुट्यास।।९५।। कधी संपूर्ण रात्रभर। बाबा बोलत होते अध्यात्मावर। एक-एक शब्दाचा विचार। करीत पी. यु. साहेब।।९६।। आता भंडाऱ्याचा प्रवास। कसा घडला पी. यु. साहेबास। काय अनुभव आले तयास। नीट घ्यावेत ऐकून।।९७।। बघा रामनवमीच्या उत्सवास। ताटवे आणावया मंडपास। जाणे होते भंडाऱ्यास। नियोजित ठरल्याप्रमाणे।।९८।। अचानक पी. यु. साहेबाला। सुमंतरावाने आग्रह केला। सोबत यावयासी भंडाऱ्याला। ताटवे घेण्यास।।९९।। एक-दोन दिवसांत। नक्कीच येऊ परत। पी. यु. साहेबाने त्वरित। होकार दिला तयास।।१००।। काही भक्त मंडळी बरोबर।

बाबा होते भंडारा दौऱ्यावर। त्या दिवशी भंडारा रोडवर । होते मुक्कामास।।१०१।। त्याठायी सर्वजण । रात्रीला होते मुक्कमानं । सकाळी रामभाऊ दादाला सोबत घेऊन । ताटवे घेतले विकत।।१०२।। दुसरे दिवशी मांडशीला। बाबा जाणार होते मुक्कामाला । तिथे रामभाऊ दादाला। पोहचविणे होते आवश्यक।।१०३।। बाबाचे दर्शन घेऊन । सर्व जाऊ अमरावतीस परतून । विचार केला एकमतान । सर्वांनी।।१०४।। त्या रात्री पी. यु. साहेबांनी । बाबाची ऐकली अमृतवाणी । इच्छा होईना जावे येथुनी । इतरत्र कुठेही।।१०५।। एकिकडे बाबांचा सहवास । ना वाटे सोडावा मनास । दुसरीकडे पी. यु. साहेबास । चिंता वाटे कोर्टाच्या कामाची।।१०६।। बाबा बोलले तयास । आपण आले देवाच्या कार्यास। देव मदत करील तुम्हास। निश्चितची।।१०७।। बाबा जे शब्द बोलले । शेवटी तेच सत्य झाले। दोन वकील मृत्यू पावले । अमरावतीच्या कोर्टाचे।।१०८।। त्यामुळे तब्बल अकरा दिवस । कोर्ट बंद होता त्या समयास। आश्चर्य वाटले पी. यु. साहेबास। श्रद्धा वाढली अधिक बाबा विषयी।।१०९।। यापरी अकरा दिवस। बाबांचा

लाभला सहवास। बघा पी. यु. साहेबास । भाग्य म्हणावे पूर्वजन्माचे ।।११०।। बाबा सोबत केले भारत भ्रमण । पाहिली अनेक तीर्थस्थानं । जीवन केले पावन । त्या योगे आपले।।१११।। प्रत्येक कार्यामाजी यश । मिळत आहे हमखास । लागला अध्यात्माचा ध्यास। दिवस आणि रात्र।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । बाविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय तेविसावा

विजयराव देशमुख अमरावतीचे। काका म्हणून ते सर्वांचे। परिचित आहे सान-थोरांचे पिंपळखुटा आश्रमात॥१॥ १९८२ सालापासून। विजयरावाचे येणं जाणं। सुरू आहे अजून। नित्यनेमाने बाबाजवळ॥२॥ बाहेर गावच्या प्रवासाची। संपूर्ण जबाबदारी सांभाळण्याची। आज्ञा होती बाबाची। विजयरावास॥३॥ पुणे, मुंबई, दिल्ली, राजस्थान। भक्त जोडले थोर सान। विश्वमंदिर केले निर्माण। तयांच्या सहकार्याने॥४॥ ते बाबांचे होते 'भक्तजोडो' अभियान। सर्वांना कळले उशिरानं। संतची जाणे संताची खूण। आपण आहोत अज्ञानी॥५॥ सर्व साधूसंत देव। एका ठायी आणला मेळ। ते पिंपळखुटा क्षेत्र अभिनव। विदर्भात॥६॥ बघा ह्या विश्वमंदिरात। जे देवदेवता साधुसंत। ते नित्यनिवासी सदोदित। आहेत त्याठायी॥७॥ हे शब्द जाणा मोलाचे। ते होय शंकरबाबाचे। पिंपळखुट्याच्या महाराजाचे। सांगतात विजयराव॥८॥ १९९४ पासून।

यज्ञाचे मुख्य यजमान । यापरी प्राप्त जाहला सन्मान । विजयरावासी।।९।। बाबांच्या आज्ञेवरून । विजयराव नित्यनियमानं । यज्ञाचे करती आयोजन । रामनवमी उत्सवास।।१०।। श्री संत शंकर बाबावर । विजयरावांची श्रद्धा अपार । बाबांच्या दर्शनाशी ते निरंतर । येतात अमरावतीवरून।।११।। जयपूर, राजस्थानास । अत्री नावाच्या मूर्तिकारास । मूर्ती दिली बनविण्यास । संत लहानुजी नाथाची।।१२।। बघा ती मूर्ती विश्वमंदिरात । बसविण्याचे ठरलं होतं । यापरी सांगतात । विजयराव सर्वांसी।।१३।। अत्री मूर्तिकार ख्याती प्राप्त । परी मूर्ती नाही बनली मनपसंत । बाबाने व्यक्त केली खंत । तात्काळ तये वेळी।।१४।। मूर्तीचे डोळे वाटे विकृत । पाहतांना आले ध्यानात । बाबा बोलले त्वरित । मूर्तिकारास।।१५।। ही विकृती द्यावी काढून । तरीच मूर्ती दिसेल छान । आमचेही होईल समाधान । कायमस्वरूपी।।१६।। बघा त्या मूर्तिकाराने । प्रयत्न केले आपल्या परीने । शेवटी आला तो शरण । बाबाच्या चरणी।।१७।। बाबा मी माझ्याकडून । प्रयत्न केले इमानदारीनं । परी मज ते वाटते कठीण । सत्यची

सांगतो।।१८।। तयाने आयुधे संपूर्ण । बाबा चरणी केली अर्पण । प्रार्थना केली हात जोडून । विनम्र भावे बाबाशी।।१९।। मी गेलो समजून । तुम्ही संत आहात महान । माझी कसोटी घेतली आपण । या प्रसंगी।।२०।। आता माझ्या सामोरी । आपण बैसावे आसनावरी । मी प्रयत्न करितो सर्वतोपरी । आपणास साक्षी ठेवोनी।।२१।। तयाची विनंती ऐकून । बाबा जाहले मौन । मूर्तिकाराने घेतले ओळखून । क्षणातची बाबाला।।२२।। हळुवार पडला फरक। मूर्ती दिसू लागली सुरेख। सर्वांना जाहले कौतुक। त्या प्रसंगाचे।।२३।। माझ्या गुरुदेवाच्या नेत्रात । सूर्यासम तेज झळकत । बाबा होते सांगत । उपस्थितास।।२४।। त्या नेत्राकडे बघण्याची। हिंमत नव्हती कोणाची। यापरी त्या नेत्राची । महिमा होती अद्भुत।।२५।। बघा त्या प्रसंगापासून । विजयरावाचे जुळले मन । ते आजही आहे टिकून । शंकर बाबाच्या चरणाजवळ।।२६।। यापरी अनेक अनुभव । सांगतात विजयराव। शंकर बाबांना ते गुरुदेव। समजतात एकमेव।।२७।। पुरुषोत्तमराव चव्हाण नागपूरचे । परमभक्त बाबांचे। ते विश्वस्तही राहिले संस्थेचे ।

पूर्व काळात निष्ठेने।।२८।। तयांच्या उपस्थितीत । एक घटना घडली आश्रमात । ती ऐकुनी घ्यावी निवांत । चित्त देवोनिया।।२९।। बघा त्या विश्वमंदिरात । आंधळा विणेकरी नियमित । विणा होता वाजवीत । दैनंदिन भक्तीने।।३०।। बाबाने त्या विणेकऱ्यास । मदत म्हणुनी एका मुलास । जबाबदारी दिली त्यास । मदत करावया तयाची।।३१।। मंगेश फेंडर नावाचा । विद्यार्थी होता शाळेचा । तो नेहमी मदत करायचा । आंधळ्या विणेकऱ्याची।।३२।। अति अल्पावधीत । मैत्री जुळली दोघांत । चर्चा रंगली आश्रमात । या घटनेची।।३३।। एके दिवशी आश्रमातून । दोघांनीही केले पलायन । वार्ता पसरली चहुबाजूनं । सुरू झाली शोधाशोध।।३४।। प्रकाशराव वडस्कर । महादेवराव शिवणकर । होते चव्हाण साहेबाबरोबर । शोधावया मुलास।।३५।। अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर । वर्धा, भंडारा, नागपूर । इत्यादी शोधिली शहरं । शोध नाही लागला।।३६।। सर्वत्र चिंतेचे वातावरण । आश्रमात जाहले निर्माण । त्यात विरोधकही तोल सोडून । बोलू लागले नानापरी।।३७।। साडेआठ महिन्यांनंतर । बाबा बोलले सत्वर । त्वरित निघून

जावे लवकर । क्षेत्र वृंदावनासी।।३८।। बऱ्याच दिवसांपासून । ते दोघेही मिळून । राहती नावं बदलून । निश्चये त्या स्थळासी।।३९।। मुलगा तुमच्या बरोबर । येण्यास देईल नकार । तरी सांभाळुनी करा व्यवहार । त्याचे सोबत।।४०।। तो देश, वेष गेला विसरून । तयाला ओळखणे होईल कठीण । यापरी संकेत दिले बाबानं । सर्व शोधकरी मंडळींस।।४१।। बाबांचे सर्व संकेत । सत्य ठरले तंतोतंत । मुलगा आणला आश्रमात । क्षेत्र वृंदावनाहून।।४२।। साठेआठ महिनेपर्यंत । बाबा अगदी होते शांत । बाबाच होते जाणत । याची सगळी हकिगत।।४३।। तो आंधळा विणेकरी त्या काळात । श्री क्षेत्र वृंदावनात । भरती होता रुग्णालयात । उपचार करावया नेत्राचा।। ४४।। त्याठायी तयाचे । ऑपरेशन जाहले नेत्राचे । आश्चर्य ऐकावे त्या प्रसंगाचे । श्रोते जनहो।। ४५।। दृष्टी दिली आंधळ्यास । मुलगा मिळाला आई बापास । दृष्टांत दाखविला विरोधकास । संत शंकर बाबाने।। ४६।। त्या आंधळ्याचे कल्याण । होणार होते बाबाकडून । मुलगा निमित्तासी कारण । ठरला त्या प्रसंगासी।। ४७।। कुसुमबाई चौधरी । कवाडगव्हाणची

राहणारी । सुख समृद्धी घरीदारी । परी होता संघर्ष।। ४८।। टीबीचा होता आजार । घरच्यांनी काढले घराबाहेर । बाबाने दिला आधार । आपल्या आश्रमात।। ४९।। चाळीस वर्षांपासून । आपले घरदार सोडून । राहते बाबांच्या आश्रयान । पिंपळखुट्यास श्रद्धेने।।५०।। आश्रमी करावे सडा-संमार्जन । नंतर जावे शेतात निघून । तिथे करावे निदंण । सहकारी महिला समवेत।।५१।। हा नित्यक्रम दैनंदिन । चुकू न दिला कुसुमबाईनं । दररोज घ्यावे दर्शन । सद्‌गुरू शंकर बाबाचे।। ५२।। कधी बाबा समोर बसून । आपल्या व्यथा सांगून । मोकळे करी आपले मन । दोष देई नशिबास।। ५३।। कधी बाबा तिच्यावर । रागावत होते फार । कधी देत होते मार । आपल्या जवळील काठीचा।।५४।। त्या काठीचा मार । बैसला असेल पाठीवर । समजावा तयाचा उद्धार । जाहला तात्काळ।। ५५।। त्या काठीचे अनुभव। अनेकांशी आले एकमेव। त्या कारणे घेती धाव। भक्त पिंपळखुट्याशी।। ५६।। देव सर्वांचे भाग्य ठरविती। म्हणोनी देवास भाग्यविधाता मानतो । परी संत भाग्याला बदलविती । केवढे आश्चर्य म्हणावे।।५७।। ऐसा संताचा

अधिकार । कलियुगी आहे थोर। करावया मानवमात्रांचा उद्धार । या जगी भक्त हो।।५८।। संत शंकर बाबाने सत्वर । कृपा केली कुसुमबाईवर । काढले संकंटातुनी बाहेर । पाहुनी श्रद्धेस तियेच्या।।५९।। बघा सत्यदेव बाबानं । कुसुमबाईच्या हातचे भोजन । अनेकदा केले सेवेन । पिंपळखुटा आश्रमात।।६०।। शंकरबाबाने देऊनी अभय। कुसुमबाईला केले निर्भय । जीवन ंपरमार्थमय । घडविले तात्काळ।।६१।। चारूलता देशमुख । वृत्तीने अति साित्त्वक । तिला अनुभव आहेत अनेक । श्री संत शंकर बाबाचे।।६२।। बऱ्याच दिवसांपासून । तिला वाटे मनोमन । गुरू करावा आपण । जीवन सार्थकी लावाया।।६३।। परी गुरू मानावे कोणास । याचे ज्ञान नाही आपणास। जाऊनी विचारावे बाबास । विचार केला मनात।।६४।। बघा अमरावतीहून । घ्यावया बाबाचे दर्शन। त्वरित आली निघून। पिंपळखुट्यास तत्क्षणी।।६५।। बाबा सद्गुरूधामात । बसुनी होते शांत । साष्टांग घातला दंडवत । तिने बाबाच्या चरणी।।६६।। चारूलता म्हणाली बाबास । गुरू करावे वाटते आपणास । त्याकारणे भेटीस । आली मी

तात्काळ॥६७॥ बाबा हसुनी बोलले यावर । तुम्ही आमच्या चरणावर । माथा ठेविला सत्वर । आम्ही गुरू आपले॥६८॥ श्री संत शंकर बाबानं। माझा शिष्य म्हणून । स्वीकार केला तयान । भाग्यवान मी या जन्मी॥६९॥ यापरी हर्ष जाहला । चारूलता ताईला। कशी पोहोचली ती घराला। कळलेच नाही॥७०॥ त्या आनंदाच्या भरात। चारूलताच्या आले मनात। गुरुदक्षिणा करावी अर्पित। आपल्या श्रीगुरुदेवासी॥७१॥ चारूलता दुसरे दिवशी । गुरुपूजेचे साहित्य घ्यावयासी । गेली बाजारासी । आपल्या पती सोबत॥७२॥ रस्त्यामध्ये अकस्मात । वाहनासी घडला अपघात । चारूलता बेशुद्ध अवस्थेत। खाली पडली जमिनीवर॥७३॥ बेशुद्ध अवस्थेत। जे घडले अद्भुत। चारूलता सांगते वृत्तांत । त्या घटनेचा सविस्तर॥७४॥ तिला बेशुद्ध अवस्थेत । पिंपळखुट्याच्या आश्रमात । तात्काळ बाबा होते दिसत । औदुंबर वृक्षास्थळी॥७५॥ स्वयंम बाबा समोर । बसली होती सत्वर । एवढ्यात तिच्या अंगावर । जल शिंपले कोणीतरी॥७६॥ चारूलता भानावर आली। बाबा आहे कुठे म्हणाली। पतीस सांगू लागली। दर्शन झाले

बाबाचे।।७७।। पती बोलले तिजसी । प्रथम जाऊ घरासी। तिथे सांगतो घटनेसी। तुला सर्व काही।।७८।। यापरी बोलुनी समजाविले । तिला घरासी आणले । तिथेही बाबा कुठे गेले । विचारत होती सारखी।।७९।। बाबा उंच आकाशात । उडतांना दिसत आहेत । यापरी होती सांगत । चारूलता सर्वांसी।।८०।। यापरी चारूलताचं बोलणं । सर्वांनी घेतले ओळखून । स्मृती गेली हरवून । म्हणू लागले सर्वही।।८१।। काही वेळानंतर । चारूलता आली शुद्धीवर । मला घडला साक्षात्कार । बाबाच्या स्वानुभूतीचा प्रत्यक्षात।।८२।। मला माझ्या सद्गुरूनं। एवढ्या मोठ्या दुर्घटनेतून। मज दिले जीवनदान। धन्य लीला तयांची।।८३।। दुसऱ्या दिवशी पिंपळखुट्यास। चारूलता आली दर्शनास । बाबा होते सद्गुरूधामास। काही भक्तमंडळी सोबत।।८४।। चारूलताला पाहता क्षणी। बाबा बोलले सत्यवाणी। काल तुमच्या मार्गावरूनी । प्रवास केला आम्ही।।८५।। न लागताही क्षण । चारूलता गेली समजून । बाबा असावे कोण । प्रश्न जाहला मनात।।८६।। माय माउली समान। बाबा आपल्या भक्ताचे रक्षण। करतात वेळी अवेळी धावून। संकट

काळी।।८७।। याचा प्रत्यक्ष अनुभव । चारूलताशी आला एकमेव । बाबा म्हणजे साक्षात भूदेव। आहेत या जगीचे।।८८।। मला माझ्या गुरुदेवानं । प्रत्यक्षात दिले जीवनदान । कोण्यापरी फेडू मी ऋण । कळेना चारूलतास।।८९।। हा जीव जरी सत्वर । काढुनी ठेविला चरणावर । तरी बाबांचे उपकार । फिटणार नाही जन्मात।।९०।। मी आहे भाग्यवान । मला संत शंकर बाबा समान । सद्गुरू लाभले योगा-योगानं । हे बोल होय चारूलताचे।।९१।। तयांच्या चरणाची सेवा । सदा घडो या जीवा । मागणे मागते वेळो वेळा । चारूलता आपल्या गुरुदेवासी।।९२।। हा देह जाणार निश्चिती । जोवरी देह तोवरी धनसंपत्ती । गुरूकृपा मात्र येई संगती । शेवटी जीवाच्या।।९३।। म्हणोनी सद्गुरूचे गुणवर्णन । नित्य करावे रात्रंदिन । करावया जीवनाचे कल्याण । साधन जगी एक ते।।९४।। एवढे ठेविले ध्यानात । तरी जीव होईल उन्नत । यासाठी धरावी संगत । संत महात्म्यांची।।९५।। दीपक जावरकर । अमरावतीचे राहणार । तयांचे अनुभव सविस्तर । घ्यावेत ऐकुनी।।९६।। तयांची धाकुटी बहीण । आजारी दीर्घकाळापासून ।

तिला दिले जीवनदान । श्री संत शंकर बाबाने।।९७।। मोठमोठे वैद्य, डॉक्टर । तयांनी केला उपचार । ठीक ना होई आजार । काही केल्या।।९८।। देव-धर्म घरचे-दारचे । पूजन केले सर्वांचे । धागेदोरे मांत्रिकांचे । गळ्यामध्ये घातले।।९९।। एका ज्योतिष्यानी । तिची कुंडली पाहुनी । मृत्युयोग आहे म्हणुनी । सांगितले भविष्य।।१००।। शेवटी निराश होऊन । उपचार करणे दिले सोडून । आता होईल नशिबानं । ते पाहावे।।१०१।। यापरी सर्व परिवाराने । निर्णय घेतला एकमताने । उपाय नव्हता त्याविणे । दुजा कोणताही।।१०२।। एवढ्यात एका मित्रानी । सल्ला सांगितला येऊनी। म्हणाला हिला जा घेऊनी । पिंपळखुट्यास।।१०३।। शंकरबाबा अधिकारी संत । तयांची कीर्ती आहे परिसरात । लोकांना तयांचे अनुभव येतात । बहू ऐकले मी।।१०४।। शेंडे नावाचा एकभक्त । देतो तुमच्या सोबत । तो तुम्हास करील मदत । सर्व प्रकारे।।१०५।। मित्राच्या सांगण्यावरून । दीपकराव अमरावतीहून । बहिणीला आले घेऊन । पिंपळखुट्यास।।१०६।। पिंपळखुटा आश्रमात । घटना घडली अद्‌भुत । ऐकावी देऊनिया चित्त । सावकाश।।१०७।। दीपकरावाची बहीण । बाबाचे घेताना दर्शन । पडली चक्कर येऊन। अकस्मात

तेथेची।।१०८।। बाबाने तिच्या अंगावर । जल शिंपडले सत्वर । लगेच आली शुद्धीवर । बोलू लागली तात्काळ।।१०९।। तिला यमाच्या दारातून । परत आणले बाबानं । जोतिष्य, वैद्यकीय विज्ञान । कुचकामी तयापुढे।।११०।। माझी परवानगी घेतल्याबिगर। यमही तुला स्पर्श नाही करणार। यापरी आशीर्वाद दिला सत्वर । तिला बाबाने तात्काळ।।१११।। संत शंकरबाबाच्या कृपेन। दीपकरावची बहीण । राहत आहे सुखानं । आपल्या कुटुंबासोबत।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित । तेविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय चोविसावा

मागील अध्यायी आपण । ऐकले बाबाच्या अनुभूतीचे विवेचन । कैसे दिले जीवदान । दीपकरावाच्या बहिणीस।।१।। आता दीपक जावरकरांचा । अनुभव ऐकावा स्वत:चा । अधिकार कळेल बाबाचा । त्या योगे आपणास।।२।। एकदा पिंपळखुट्यावरून । बाबाचे दर्शन घेऊन। परत निघाले वाहनानं । दीपकराव अमरावतीस।।३।। त्यादिवशी अकस्मात । अमरावती विद्यापीठ मार्गात। वाहनास घडला अपघात । दीपकरावांच्या।।४।। पोलिसांनी मृत समजून । भरती केले रुग्णालयी नेऊन। प्रसंग होता अति कठीण । महाभयंकर।।५।। दीपक- रावांच्या नाका-तोंडातून । रक्त वाहत होते त्यातून । अशक्य होतं जगणं । त्याप्रसंगी तयांचे।।६।। डॉक्टर सावदेकर अमरावतीचे । तयांनी उपचार करण्याचे । ठरविले दीपकरावाचे । तात्काळ तये वेळी।।७।। ही घटना तूर्तास । कळविली बाबास । बाबा म्हणाले दीपकरावास । काहीच नाही होणार।।८।। ते ज्या परिस्थितीत ।

पिंपळखुट्याहून गेले परत । त्या परीच ते पूर्ववत । येतील आपल्या घरास।।९।। अंगारा संजीवनी खावयास । बाबाने पाठविला दीपकरावास । आश्चर्य वाटले सर्वास । इतरासहित।।१०।। बघा या रुग्णाची । शाश्वती नव्हती जगण्याची । यावर कोण्यातरी संताची । कृपादृष्टी असावी।।११।। रुग्णालयातील डॉक्टर । जे करीत होते उपचार । तयांनीही दिला होकार । तात्काळ सर्वांना।।१२।। कृपादृष्टी ती शंकरबाबांची । पिंपळखुट्याच्या करुणाकरांची । भक्तवत्सल, विघ्नहर्त्याची । भक्तीप्रेमा खातीर।।१३।। दीपकराव भक्त श्रद्धावान । बाबाला ते साक्षात भगवान । किंबहुना आपला जीवप्राण । समजतात एकमेव।।१४।। एवढ्या भयंकर संकटातून । वाचविले बाबानं । मला दिले जीवनदान । सांगतात दीपकराव।।१५।। पुढे दीपकरावाच्या आईस । पोटात जाहला त्रास । डॉक्टरांनी सांगितले शस्त्रक्रियेस । तात्काळ करावी।।१६।। रक्तप्रवाह एका ठायी । गोठला होता सर्वही। रुग्ण जगणार की नाही । शंका वाटते आम्हास।।१७।। यापरी डॉक्टरानी । सर्वांना सांगितले बजावुनी । इकडे दीपकरावाने येऊनी । वार्ता

कळविली बाबास।।१८।। बाबा बोलले दीपकरावासी । काय हवे आपणासी । दीपकराव म्हणे माझ्या आईसी । वाचवा या संकटातुनी।।१९।। तिला आमच्या सोबत। सहा-सात वर्षे पर्यंत । निर्विघ्न ठेवावे हयात । प्रार्थना ऐकावी आमची।।२०।। आपण आहात कृपावंत । कोण पाहील आपला अंत । आमचा पुरवावा हेत । यावे धावुनी सत्वर।।२१।। बाबा तथास्तु म्हणाले । दीपकरावास परत पाठविले। सर्वांना आश्चर्य वाटले। त्या प्रसंगाचे।।२२।। शस्त्रक्रिया निर्विघ्न जाहली । बाबाने सर्व आपत्ती टाळली। पुढे ती सात वर्षे जगली । बाबाच्या वचनानुसार।।२३।। दीपकराव भक्त पुण्यवान । तयाला शंकरबाबा समान । संत भेटले महान । कल्याण जाहले जीवनाचे।।२४।। दृढभाव श्रद्धा भक्तीविण। न मिळे संतकृपादान। ना होय जीवनाचे कल्याण। असू द्यावे ध्यानात।।२५।। दत्तात्रय लगड पुण्याचे। तयांना वेड अध्यात्माचे। साधूसंताच्या दर्शनाचे। एकमात्र।।२६।। एकदा ते अकस्मात। पुणेकरी भक्तमंडळी सोबत। पिंपळखुटा क्षेत्र विदर्भात । आले बाबाच्या दर्शना।।२७।। बाबांचा अधिकार बघून ।

तृप्त जाहले मनोमन। सद्‌गुरू मिळाले परिपूर्ण । आपणासाठी साक्षात।।२८।। ऐसा दृढ विश्वास । त्याक्षणी जाहला दत्तात्रयास । हेची तारतील आपणास । या जन्मी निश्चितची।।२९।। बाबांचा 'ज्ञानामृत' ग्रंथ वाचून। दत्तात्रय गेले भारावून । तेव्हापासून बाबांचे चरण । घट्ट धरिले तयांनी।।३०।। बाबांची प्रवचने ऐकून । जीवनात घडले परिवर्तन । संशय गेले निघून । मनातले तात्काळ।।३१।। तेव्हापासून पिंपळखुट्याला । सुरुवात येण्याजाण्याला । संत शंकर बाबांच्या दर्शनाला। दत्तात्रयाची।।३२।। आत्मसुखाचा अनुभव । दत्तात्रयाने अनुभवला एकमेव । बाबाला ते साक्षात ज्ञानदेव । समजतात एकमात्र।।३३।। बाबाने माझे जीवन । प्रत्यक्षात बनविले नंदनवन । दत्तात्रय अति श्रद्धेनं । सांगतात इतरांसी।।३४।। लक्ष्मणराव मुरकुटे पुण्याचे । तयांना साधुसंतांच्या दर्शनाचे। वेड पूर्वीपासूनचे । एकमेव तयांना।।३५।। गोपाळराव बोडके नावाचे । राहणारे ते पुण्याचे । ते भक्त शंकर बाबाचे । होय पूर्वीचे।।३६।। तयांनी मित्र लक्ष्मणरावास । अनुभव ब्रह्म ग्रंथ दिला वाचावयास । पुढे घडले ते सावकाश । घ्यावे

ऐकून।।३७।। हा ग्रंथ स्वयम बाबाने । लिहिला स्वानुभवाने । तो वाचला अति श्रद्धेने । जिज्ञासू लक्ष्मणरावानी।।३८।। करीत असता ग्रंथाध्यायन । मनी इच्छा जाहली निर्माण । एकदा तरी घ्यावे दर्शन । संत शंकर बाबांचे।।३९।। नंदूसेठ कोकरे पुण्याचे । ते परमभक्त शंकर बाबाचे । ते होते परिचयाचे । लक्ष्मणरावाच्या।।४०।। तयांना आपला विचार । सांगितला सविस्तर। मिळुनी आले सत्वर । क्षेत्र पिंपळखुट्यास।। ४१।। चार दिवस मुक्कामाला । लक्ष्मणराव होते पिंपळखुट्याला । स्वर्गीचा आनंद उपभोगला । तयांनी बाबासवे।।४२।। ढाकणे महाराज आळंदीचे । ते प्रचारक वारकरी संप्रदायाचे । भागवत कथा हरिकीर्तनाचे । करतात प्रबोधन।।४३।। एकदा बाबाच्या आश्रमाला । क्षेत्र पिंपळखुट्याला । भागवत करण्याचा योग आला । ढाकणे महराजास।।४४।। ते बाबांचे प्रथमदर्शन । भाग्याने लाभले चरण । चित्ती जाहले समाधान। सांगतात ढाकणे महाराज।।४५।। बाबाने आपला समजून । मजसी केले पावन । प्रेम दिले भरभरून । माय माउलीच्या परी।।४६।। एकदा बाबा आळंदीस । होते बघा मुक्कामास । त्या

वेळीच्या प्रसंगास । घ्यावे ऐकुनी निवांत।।४७।। साधूची झोपडी वाऱ्यानं । कधीही जाऊ शकते उडून । दिली पाहिजे सावरून । आपल्या परिवाराने।।४८।। यापरी बाबाने भाष्य केले । उपस्थितांना नाही कळले । बाबाने समजावून सांगितले । सर्वांसी तेधवा।।४९।। ढाकणे महाराजांच्या झोपडीला । बांधून द्यावे लागते आपणाला। मदत करावी कार्याला । तन-मन-धनाची।।५०।। बाबाचा शब्द झेलला । आपल्यापरी सहयोग दिला । सुंदर बांधून दिले इमारतीला । ढाकणे महाराजांच्या।।५१।। नंदूसेठ चव्हाण, वाल्हेकर । बाबांची भक्तमंडळी दानशूर। दादासाहेब चव्हाण आदी इतर । दांगटमामा सहित।।५२।। बघा या दानशूरांनी । आपले योगदान देऊनी। वास्तू दिली बांधूनी। गुरूच्या आज्ञेवरून।।५३।। आपल्या स्वत:साठी जगणे । ही मानवाची लक्षणे। इतरांसाठी सतत झिजणे । ही लक्षणे संतांची।।५४।। शंकर बाबा अधिकारी संत । न लगे तयांचा अंत । स्वानुभवाने सांगतात । भक्त ढाकणे महाराज।।५५।। मोहनसेठ पांगुळ मनमाडचे । नातेवाईक नंदूसेठ कोकरेचे । तयांनी बाबांच्या दर्शनाचे । योग आणलेत

जुळवून।।५६।। त्या वेळी मोहनरावानं । आपल्या आईच्या नावानं । एक गाय दिली दान । पिंपळखुट्याच्या गोशाळेत।।५७।। मोहनरावाच्या मुलीच्या लग्नात । बाबा होते उपस्थित। प्रसंग आहे ध्यानात । मोहनरावाच्या अजूनही।।५८।। एकदा बाबाने मोहनरावास । आश्रमात दाखविली म्हैस । ती दिवसातून तीन वेळेस। दूध द्यायची।।५९।। ह्या प्रसंगाचे गुपित । कळले नाही आजपर्यंत। स्वयम मोहनराव सांगतात । अनेकांजवळ।।६०।। संताची लीला संतची जाणतो । आपण अज्ञानी ठरतो । वेळ आल्यावरी अर्थ कळतो । त्याचा निश्चितची।।६१।। सुनिल सेठ बोडके पुण्याचे । ते मेहूणे नंदूसेठचे । दर्शन घडविले बाबाचे । सुनिल सेठला त्यानीच।।६२।। त्यानंतर सुनिल सेठचे । प्रसंग वाढले येण्याजाण्याचे । शंकरबाबाच्या दर्शनाचे । क्षेत्र पिंपळखुट्यास।।६३।। सुनिल सेठच्या पुतणीला । पतीने टाकून दिले तिला । ती येऊन माहेराला । होती राहत एकटी।।६४।। तिचा पुनर्विवाह करण्याचा । विचार मनी सुनिल सेठचा । सल्ला घ्यावया बाबाचा । ते आले बाबा जवळ।।६५।। बाबाने सुनिल सेठला ।

आपला विचार सांगितला । ती परत जाईल जुन्याच घराला । आपल्या पतीकडे।।६६।। आठ वर्षांनंतर । तिच्या पतीने सत्वर । तिचा केला स्वीकार । अकस्मात न कळे।।६७।। बाबाने केलेली भविष्यवाणी । सत्य ठरली त्याक्षणी । आश्चर्य व्यक्त केले सर्वांनी । सुनिल सेठ सहित।।६८।। संताचा शब्द कधीही । असत्य होत नाही । याचा अनुभव सर्वांसही । आला त्याप्रसंगी।।६९।। सुनिल सेठच्या द्वितीय पुत्राचा । विवाह ठरला करावयाचा । त्यासाठी मुलगी शोधण्याचा । प्रयत्न सुरू जाहला।।७०।। एका मुलीचा फोटो आणून । दाखविला सुनिल सेठनं । बाबाने तो फोटो बघून । होकार दिला तात्काळ।।७१।। त्या मुलीला बाजूला ठेवून । दुसऱ्या बघण्याचा प्रयत्न । चालविला सुनिल सेठनं । परी विवाह जुळेना।।७२।। शेवटी तीन वर्षांनंतर । पहिल्याच मुलीबरोबर। विवाह जाहला अखेर । केवढे आश्चर्य म्हणावे।।७३।। सिद्ध संताचे बोल । मानावेत अनमोल। सुटू न द्यावा संयमाचा तोल। आपला कदापीही।।७४।। याचा प्रत्यक्ष अनुभव। सुनिलसेठला एकमेव । वाढला आदरभाव । बाबाविषयी

मनात।।७५।। पहिली पत्नी आजारपणात। मृत्यू पावली अकस्मात। पुनर्विवाह केला त्वरित । बाबांच्या परवानगीने।।७६।। तीस एक मूल जाहले। नामकरण बाबानेच केले । सच्चिदानंद नाव सांगितले। बाबाने तयाचे।।७७।। अनेक आपदा जीवनात । निघून गेल्या क्षणात । सामर्थ्य बाबाच्या नामस्मरणात । सुनिलसेठ सांगती।।७८।। शेखर वाल्हेकर । ते पुण्याचे राहणार । त्यांची बाबावर । श्रद्धा नव्हती मुळीच।।७९।। बारा वर्षेपर्यंत । तयांच्या डोक्यात । संशय होता घोळत । बाबा विषयी।।८०।। बघा तयाच्या पत्नीला । समस्या होती गर्भधारणेला। चिंता वाटे सर्वांला । काय करावे म्हणून।।८१।। एकदा बाबा पुण्याला । आले होते मुक्कामाला । त्या वेळी ह्या घटनेला । सांगितले बाबास।।८२।। बाबाने दोघाही उभयतांस। बोलावुनी सांगितले तयास । पुन्हा ह्या वेळेस । घडणार आहे पूर्ववत।।८३।। बाबा जे काही वदले । त्यापरीच घडले। तात्काळ निघुनी आले । पिंपळखुट्यास दोघेही।।८४।। नंदूसेठ कोकरे त्यावेळेला । होते तयांच्या सोबतीला । पुढे ह्या घटनेला । ऐकावे चित्त

देऊनी।।८५।। बाबाने उभयतांना मंत्र देऊन । सांगितले करावया अनुष्ठान । सव्वा मास अवधी संपूर्ण । दिला उभयतांस।।८६।। उभयतांनी ते सर्व केले। नवमासानी ते फळा आले। उदरी कन्यारत्न जन्मले । बाबाच्या आशीर्वादाने।।८७।। पुढे तीन कन्येनंतर । उभयतांच्या इच्छेनुसार । चवथे पुत्ररत्न सुंदर । जन्मा आले परिवारात।।८८।। आनंद जाहला सर्वांस । धन्यवाद दिला बाबास। तेव्हापासून जडला विश्वास । शेखर वाल्हेकरांचा बाबावर।।८९।। आता ते तनमन धनासहित । सर्व प्रकारे झाले समर्पित। अहोरात्र बाबांच्या चिंतनात। राहतात एकमेव।।९०।। दत्तात्रय वनशिव पुण्याचे । श्रद्धावंत भक्त ते बाबाचे । स्वभावाने ते धार्मिक प्रवृत्तीचे । आहेत एकमात्र।।९१।। एकदा बाबा पुण्यास। होते बघा मुक्कामास । तयांनी विनंती केली बाबास । घरी येण्याबाबत।।९२।। बऱ्याच दिवसापासून । इच्छा होती मनोमन । आपल्या घरी यावे बाबानं । भक्त वनशिवची।।९३।। बाबाने घेतले ओळखून । होकार दिला येतो म्हणून । आपल्या भक्ताची इच्छा पूर्ण । केली

बाबानी।।९४।। वनशिवास आनंद झाला । घरी तयारी करू लागला । एवढ्यात बाबाने प्रवेश केला । वनशिवच्या अंगणी।।९५।। बाबा गाडीतून उतरले । आजूबाजूला बघितले । हे घरसुद्धा उंच होईल म्हणाले । उपस्थितास।।९६।। आजूबाजूला त्या परिसरात । उंच इमारती होत्या डौलात । वनशिव पडक्या घरात । होता राहत आनंदे।।९७।। संताचा शब्द ना जाय खाली । अचानक व्यवस्था झाली । गावची जमीन विकली गेली । पैसा मिळाला भरपूर।।९८।। त्या पैशाने नंतर । पक्के बांधले घर । बाबाचे वचन पुरेपूर । सत्य जाहले।।९९।। नऱ्हेगावाच्या परिसरात । चर्चा रंगली जोरात । पूर्वी एक अधिकारी संत । येऊनी गेले याठायी।।१००।। शंकरबाबा तयाचे नाव । तयांचा भक्त वनशिव। तयाला रंकाचा राव । बनविले तयांनी।।१०१।। थोर तयांचा अधिकार । करुणा दयेचा अवतार । ज्ञानरूपी रत्नाचे भंडार । शंकरबाबा एकमेव।।१०२।। जिथे लागले तयाचे चरण। ती भूमी जाहली पावन । यापरी अनेक उदाहरण। सांगता येईल या ठायी।।१०३।। तयांच्या पवित्र

नामाचे स्मरण । जो करतो रात्रंदिन । गृही सुख समाधान। नांदते सर्वकाळ।।१०४।। ऐकता तयांची वाणी । अनेक गेले उद्धरुनी । संकटी जातो धावुनी । तो आपल्या भक्ताच्या।।१०५।। वनशिवच्या भावाची पत्नी । वार्डातून आली निवडूनी। बाबाच्या आशीर्वादानी । सरपंच झाली गावाची।।१०६।। संत काय देई कोणास । नाही काळ वेळ तयास। ऐसा संत कृपेचा इतिहास। चालू आहे अखंडित।।१०७।। आपल्या भक्ताचा मानसन्मान । लोकामध्ये दिला वाढवून । श्री संत शंकर बाबानं । प्रत्यक्षात कृतीने।।१०८।। बाबा स्वप्नात येऊन । वनशिवला करती सावधान । संकटी येती धावून । तात्काळ तये वेळी।।१०९।। वनशिव भक्त श्रद्धावान । बाबाला ते भगवान। मानतात मनातून । श्रद्धेने भक्तिभावे।।११०।। कधी ते पुण्यावरून । बाबाचे घ्याया दर्शन। तात्काळ येती निघून । क्षेत्र पिंपळखुट्यास।।१११।। यापरी संत भक्ताचं नातं । टिकून आहे आजपर्यंत । नम्रपणे सांगतात । वनशिव लोकांजवळ।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । चोविसावा

अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय पंचविसावा

कुमार गुंडा पवार तासगावचे । ते दोन हजार दोन पासूनचे । परमभक्त बाबांचे । श्रद्धावान अतिशय॥१॥ २००३च्या गुरुपौर्णिमेला । परमभक्त कुमारला । वेगळाच अनुभव आला । सद्गुरू शंकर बाबाचा॥२॥ त्या दिवशी आश्रमावर। भक्तांची गर्दी भरपूर । रांग लागली दूरवर । महिला पुरुषांची॥३॥ रांगेमध्ये एकेक करून । दर्शनार्थी घेती दर्शन । भक्त कुमार मोठ्या कौतुकानं । बघत होते हे सारे॥४॥ एक पेढा घेवोनी हातात । बाबा सारखे होते बघत । तो पेढा मात्र कोणासही । नव्हते देत॥५॥ दर्शनार्थी दर्शन घेऊन । बैसले जागी येऊन। कुमार होते लक्ष ठेवून । ह्या सर्व घटनेवर॥६॥ कुमार उभे त्याच रांगेत । दर्शन घेताची अकस्मात । पेढा दिला तयाच्या हातात। बाबाने तात्काळ॥७॥ भक्त कुमार ठरले भाग्यवान । बघा त्या प्रसंगापासून । उन्नती होऊ लागली चहुबाजूनं। तयाच्या घर-गृहस्थीत॥८॥ त्यापूर्वी तयांच्या मार्गात । अडचणी

येत होत्या बहुत । यश ना येई हातात । काही केल्या॥९॥ सर्व अडथळे मार्गातले । बाबाने तात्काळ दूर केले । अचानकची भाग्य उघडले । बाबाच्या आशीर्वादाने॥१०॥ दुसऱ्या गुरुपौर्णिमेस । पादुका मागितल्या बाबास । त्याही दिल्या तयास । बाबानी प्रेमपूर्वक॥११॥ बाबाने आपल्या भक्तास । वांछित पुरविले तयास । भक्त जोडला तासगावास । दूरदेशी सत्वर॥१२॥ चंद्रकांत खोपडे मुंबईचे । १९९३ सालपासूनचे । ते भक्त आहेत बाबाचे । निष्ठावंत नित्य ते॥१३॥ भैयासाहेब निचल नावाचे । ते मित्र खोपडे साहेबांचे । दोघेही मिळून संघटनेचे । कार्य करतात मुंबईत॥१४॥ भैयासाहेब पिंपळखुट्याचे । वारकरी होते पूर्वीचे । नेहमी दर्शनाला यायचे । संत शंकर बाबाच्या॥१५॥ तयांनी खोपडे साहेबास । आग्रह केला येण्यास । श्री क्षेत्र पिंपळखुट्यास । बाबाच्या दर्शनासी॥१६॥ आपल्या मित्राच्या शब्दाला । खोपडे साहेबानी मान दिला । दोघेही मिळूनी दर्शनाला । आले पिंपळखुट्यास॥१७॥ खोपडे साहेब प्रथम दर्शनी । आकर्षित जाहले तत्क्षणी । बाबांचे व्यक्तिमत्त्व बघुनी । भक्तिभावे

तात्काळ।।१८।। आपले काही मनोगत । बाबाजवळ केले व्यक्त। आशीर्वाद मागितला हसत । तयांनी बाबास।।१९।। पुढे येणाऱ्या बँकेच्या निवडणुकीत। दिग्गज नेत्याच्या विरोधात। निवडून आले प्रत्यक्षात । खोपडे साहेब।।२०।। लोक आश्चर्य चकित जाहले । खोपडे साहेबाने ओळखले। हे काम बाबाचे होय म्हणाले । एकमेव।।२१।। माझे सद्गुरू आहेत दयावान । भक्तासाठी येई धावून । तयाच्या कीर्तीचे गुणगान। वाखाणती भक्त।।२२।। बघा बाबाच्या आशीर्वादानं। तीन वेळा आले निवडून । अध्यपक्षाचा बहुमान। प्राप्त जाहला तयास।।२३।। संत कृपेचे दान । ज्यासी लाभले तो भाग्यवान । तयाला हा दयाघन । उणे पडू ना देई काही।।२४।। संत काय ना करी । कळते अनुभव आल्यावरी । विश्वास पाहिजे अंतरी । सात्विक श्रद्धेचा।।२५।। अमरावतीचे हेमंत वानखेडे । ते कसे आले बाबाकडे। ऐकुनिया घ्यावे थोडे । वाचक मित्र हो।।२६।। बऱ्याच दिवसापासून । तयांची पत्नी मानसी आजारानं। होती बघा झपाटून । सुचेना काही तयास।।२७।। आधीच संकटे मुक्कामानं । दारात होती बसून ।

त्यात आणखी नवीन । आले बा सोबतीस।।२८।। बहुत केले उपचार । शोधिले मांत्रिक, वैद्य, डॉक्टर। आराम ना कणभर । तयांच्या पत्नीस।।२९।। पत्नीला तिच्या प्रसूती काळात। धोका होईल निश्चित। चार वेळा केला गर्भपात। डॉक्टरांच्या निर्णयानुसार।।३०।। पत्नी पाचव्यांदा असता गरोदर। भेट जाहली नितीन राऊत बरोबर। तयांनी सांगितले सत्वर । हेमंतरावासी।।३१।। हिला न्यावे पिंपळखुट्यास । संत शंकर बाबांच्या दर्शनास । अनेकांच्या दु:खाचा नाश । केला तयांनी।।३२।। यापरी तयाची कीर्ती । ती साक्षात दयेची मूर्ती । लोक तयांची आरती । गात अति श्रद्धेने।।३३।। नितीन राऊत अकोल्याचे । ते संत शंकर बाबाचे। परमभक्त होय पूर्वीचे । हेमंतरावचे गुरुबंधू।।३४।। तयांच्या आग्रहावरून । सोबत पत्नीला घेऊन। तात्काळची आले निघून । क्षेत्र पिंपळखुट्यास।।३५।। दोघाही उभयतानं । बाबाचे घेताची दर्शन । बाबाने आपल्या श्रीमुखातून । शब्दबाण सोडला।।३६।। बघा यावेळी आपणास । पुत्र प्राप्ती हमखास। करू नका गर्भाचा नाश । गर्भपात करोनिया।।३७।। यापुढे तुम्हाला

बघून । विघ्ने जातील पळून । ऐसे दिले आशीर्वचन । उभयतास त्यावेळी।।३८।। पुढे नऊ मास नऊ महिन्यानंतर । बाळ जन्माला आले सुंदर । तेव्हापासून बाबाला परमेश्वर । मानतात साक्षात।।३९।। श्री संत शंकर बाबानं। दया केली भरभरून। माझे बदलविले जीवन । सांगतात हेमंतराव।।४०।। बालकरामजी भोगे नागपूरचे । उमा शंकर झाडे मित्र तयाचे। ते संत शंकर बाबाचे। भक्त होय पूर्वीचे।।४१।। तयांच्या आग्रहावरून। १९८२ साली प्रथम दर्शन। घडले योगा-योगानं। बालक रामजीचे।।४२।। मध्यंतरी सौ. चंद्रभागाबाईला । बालकरामजीच्या पत्नीला । दुर्धर आजार जडला । चिंता वाटे सर्वांस।।४३।। तिचे संपूर्ण शरीर । जाहले अति कमजोर । उभे राहता येईना बरोबर । तिला त्या काळात।।४४।। असह्य वेदना शरीरात । त्यामुळे ती जाहली अशक्त। उपचार केले बहुत। ते ठरले निष्फळ।।४५।। शेवटचा उपाय म्हणून । तिला नेले गाडीतून । घ्यावया बाबाचे दर्शन । क्षेत्र पिंपळखुट्यास।।४६।। तिला पाहता बरोबर। बाबा बोलले सत्वर। हिला पाच वर्षांनंतर। आराम होईल

पूर्णत:।।४७।। बाबाने तिच्या अंगावर। अंगारा शिंपडला सत्वर। अकस्मात तिला थोडेफार। बरं वाटू लागले।।४८।। ह्या चंद्रभागाबाईला। नागपूरहून पिंपळखुट्याला। गाठोडे बांधून आणले तिला। गाडीमध्ये टाकून।।४९।। एवढ्या कठीण परिस्थितीत। बाबाने तिला अकस्मात। पिंपळखुट्यावरून अंजनसिंगी पर्यंत। आदेश दिला चालण्यास।।५०।। हे ऐकून सर्व उपस्थित। जाहले आश्चर्य-चकित। कशी जाईल चालत। चार किलोमीटर।।५१।। हिला उभेही राहणं। आहे अति कठीण। उपस्थित आपल्या परीनं। करीत होते विचार।।५२।। संताची महिमा संतची जाणे। तयांची भाषा समजणे। त्याठायी आम्ही ठेंगणे। आहो निश्चितची।।५३।। बघा ती उठत-बसत। अंजनसिंगी गावापर्यंत। सहज गेली चालत। केवढे आश्चर्य म्हणावे।।५४।। बाबाच्या वचनानुसार। ठीक पाच वर्षांनंतर। चंद्रभागाबाई सत्वर। स्वस्थ जाहली।।५५।। माझ्या बाबाने माझ्यावर। अनंत केले उपकार। ते मी नाही विसरणार। कदापिही।।५६।। त्या क्षणापासून। सर्व भोगे परिवारानं। धरियले बाबाचे चरण। कायम स्वरूपी

आजवरी।।५७।। एकदा परिवार मिळून । घ्यावया बाबाचे दर्शन । निघाले नागपुराहून । श्री क्षेत्र पिंपळखुट्यास।।५८।। रस्त्यामध्ये तळेगाव घाटात। वाहनासी जाहला अपघात । त्या प्रसंगाचे शब्दात । सांगणे आहे कठीण।।५९।। अपघात एवढा होता भीषण। त्यात प्रवाशांचे प्राण । वाचणे होते कठीण । एकमात्र।।६०।। परी सद्गुरूचा हस्त शिरावर । असता विघ्ने पळती दूर । तैसाची घडला चमत्कार । त्याप्रसंगी।।६१।। एवढ्या भयंकर संकटातून । सुखरूप होते सर्वजण । बघणारे मोठ्या कौतुकानं । बोलती एकमेकास।।६२।। देव तारी त्याला कोण मारी । वार्ता पसरली यापरी । पाच दहा मैलावरी। मित्रहो या दुर्घटनेची।।६३।। दुसऱ्या गाडीमध्ये बसवून । सर्वांना आणले तिथून । बाबाचे घ्यावया दर्शन । क्षेत्र पिंपळखुट्यास।।६४।। प्रत्यक्षदर्शी होते सांगत । बाबा त्या वेळी आश्रमात । कोणा सोबतही नव्हते बोलत । तिळमात्र।।६५।। याचा अर्थ आहे गहन । तो घ्यावा समजून । भोगे परिवाराचे रक्षण । बाबाने केले तात्काळ।।६६।। आपल्या सद्गुरूचे आपल्यावर । जाहले अनंत उपकार । मनोमन केला विचार । अवघ्याही परिवारानं।।६७।। तयांनी आपल्या मालकीचे । पाच हजार

चौरस फुटाचे। राहते घर दुर्गा कॉलनीचे । दान दिले बाबास।।६८।। तिथे बाबांचा भव्य आश्रम । निर्माण होईल सद्‌गुरू धाम । हे स्थळ बनेल पावन परम । पुढे भविष्यात।।६९।। इथे स्वयम बाबा येऊन । राहिले अनेकदा मुक्कामान। तयांच्या पवित्र पदस्पर्शान । ही भूमी जाहली पावन।।७०।। बाबांच्या उपकाराचे ऋण । चुकविले भोगे परिवारान । सत्कार्यासी लावले धन । आपल्या कमाईचे।।७१।। मधुकर गिऱ्हे नागपूरचे । तयांच्या पोटात गुप्तीचे । चार घाव मारले जोराचे । एका इसमाने।।७२।। मधुकरराव खाली पडले । सर्व कपडे रक्तांनी माखले । मुलगा तुषारनी उचलून नेले । तयांना रुग्णालयात।।७३।। प्रसंग होता गंभीर । सुरू जाहलेत उपचार । डॉक्टर बोलले सत्वर । वाचणे कठीण या रुग्णाचे।।७४।। घाव आहेत खोलवर । रक्तही वाहते भरपूर । सर्व जाहले चिंतातूर । काय करावे म्हणुनी।।७५।। श्रीमती शेवंताबाई राऊत। गिऱ्हेची सासूबाई नात्यानं । राहत होती आश्रमात । श्रीह्लक्षेत्र पिंपळखुट्यास।।७६।। तिला फोनवरून । वार्ता कळविली त्वरेन । अपघात झाला म्हणून आपण सांगा

बाबांसी।।७७।। तिच्याशी बाबा बोलले । मी सर्व बघतो म्हणाले । अंगारा देऊनी पाठविले । तिला नागपुरासी।।७८।। इकडे रात्री रुग्णालयात । शस्त्रक्रिया जाहली समाप्त । रुग्णास अतिदक्षता विभागात । आणले तात्काळ।।७९।। त्या दिवशी रात्रीला । अकस्मात मधुकर रावाला । स्वप्नदृष्टांत जाहला । तो घ्यावा ऐकून।।८०।। शंकर भोयर नावाचा । तो परिचित मधुकर रावाचा । कर्मचारी होता कार्यालयाचा । चपराशी पदावर।।८१।। तो त्या रात्री रुग्णालयात । आला मधुकररावाच्या स्वप्नात। म्हणे घाबरू नका किंचित । बोलला मधुकररावास।।८२।। मी ह्या रुग्णालयात । पूर्ण वेळ सतत । आहे तुमच्या सोबत । काळजी घ्यावया आपली।।८३।। तो नित्य नियमानं । रात्रीला जमिनीवर बाजूनं । दिसत होता झोपून । मधुकर रावास स्वप्नात।।८४।। पाच-सहा दिवस निरंतर । मधुकरराव आपल्या बेडवर । पडून होते सत्वर । बेशुद्ध अवस्थेत।।८५।। बघा त्या समयास । मधुकरराव कोणास । ओळखत नव्हते तूर्तास । तेथे सर्व अनोळखी।।८६।। परि स्वप्नातला शंकर भोयर । त्याचा न पडावा विसर । हे आश्चर्य मानावे खरोखर । एकमेव ना कळे।।८७।। ठीक चवदा दिवसानं । सुटी जाहली

रुग्णालयातून । शंकरला घेतले बोलावून । घरी भेटावयास॥८८॥ घडलेल्या स्वप्न दृष्टांतास । अवगत केले तयास । तो म्हणाला मधुकररावास । तो मी नव्हेची॥८९॥ मी त्या काळात । माझ्या परिवारासमवेत। घरीच होतो राहत। रात्रीचे समयी॥९०॥ तो नव्हता शंकर भोयर । ते होय शंकरबाबा योगेश्वर। तयानीच दाखविला चमत्कार । आपल्या योग बलाने॥९१॥ शंकरबाबाने कृपा केली । सर्वांना याची खात्री पटली । श्रद्धा भक्ती वाढली । बाबाविषयी मनात॥९२॥ बघा त्या प्रसंगातून । मधुकररावाचं जगणं । होता बघा कठीण। मान्य केले डॉक्टरांनी॥९३॥ संत कृपा असता शिरावर । नाना विघ्ने पळती दूर । प्रत्यक्षात दाविला साक्षात्कार । शंकर बाबाने तात्काळ॥९४॥ बाबाचे घेताची दर्शन । अश्रू आवरेना नयनातून । शब्दही निघेना मुखातून । मधुकराच्या त्याक्षणी॥९५॥ बाबा स्वयम वदले । आम्ही यमासवे युद्ध केले । आपणासी ओढुनी आणले । मृत्यूच्या दारातून॥९६॥ हा प्रसंग अनेकांनी । अनुभवला त्याक्षणी । जयजयकार केला गर्जुनी । श्री संत शंकर बाबाचा॥९७॥ बाबासाहेब शिंदे तासगावचे । ते भक्त संत शंकरबाबाचे । प्रतिश शिंदे पुत्र तयांचे । अनुभव ऐकावा

तयाचा।।९८।। प्रथम दर्शनी बाळ जन्मले । परी ते नाही जगले । सर्वांना नैराश्य आले । शिंदे परिवारात।।९९।। पुढे काही दिवसानं । प्रतिश आला निघून । घ्यावया बाबाचे दर्शन । क्षेत्र पिंपळखुट्यास।।१००।। तयाने घडलेल्या घटनेस । सांगितले बाबास । शंकर बाबाने तयास । अंगारा दिला तात्काळ।।१०१।। त्या अंगाऱ्याचा चमत्कार । घडला एक वर्षानंतर। बाळ जन्मा आले सत्वर । शिंदे परिवारात।।१०२।। आनंद जाहला सर्वांस । आजी आजोबा नातेवाईकास । पात्र ठरला बाबाच्या दयेस । भक्त प्रतिश।।१०३।। वासुदेवराव देशमुख नागपूरचे । १९८३ साला पासूनचे । भक्त ते शंकर बाबाचे । पूर्वाधाचे।।१०४।। घरची आर्थिक परिस्थिती । तशी फार बरी नव्हती । मनाला शांती नव्हती । त्यामुळे कायमची।।१०५।। बघा त्या काळात । वासुदेवराव नियमित। दर्शनासी होते येत । पिंपळखुट्यासी बाबाच्या।।१०६।। एकदा बांते साहेबा सोबत । वासुदेवराव आश्रमात । मुक्कामी होते राहत। बांधकाम बघावया।।१०७।। अचानक त्यावेळेस । मुलगा जाहला सिरियस । घटना सांगितली बाबास । काय करावे

सुचेना।।१०८।। बाबा म्हणे वासुदेवरावास । आपण बघावे बांधकामास। मी सांभाळतो आपल्या मुलास । चिंता न करावी काही।।१०९।। लगेच अर्ध्या तासानंतर । निरोप आला आश्रमावर। मुलाची प्रकृती धोक्याबाहेर। आहे म्हणुनी।।११०।। एक शुभ्रवस्त्रधारी पुरुष। भेटावया आला मुलास। त्याच क्षणी तयास। जाहला आराम।।१११।। या घटनेचे साक्षीदार । शिरीष चौधरी आणि इतर । हा होय बाबाचा चमत्कार । खात्री पटली सर्वांस।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । पंचविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय सव्विसावा

मागील अध्यायी आपण । ऐकले वासुदेवरावाचे जीवन। कैसे लाभले कृपादान । तयासी सद्गुरूचे।।१।। वासुदेवरावच्या मुलाची । प्रकृती स्वस्थ झाली त्याची । दारूही सोडविली कायमची । तयाची शंकर बाबाने।।२।। एकदा वासुदेवरावाची कन्या बाली । अत्यंत आजारी जाहली । गाडीमध्ये टाकून आणली । आश्रमात त्वरित।।३।। बघा त्या प्रसंगाला । बाबाने तिला । एक दिले सफरचंद खावयाला । प्रसाद म्हणूनी मायेने।।४।। त्या सफरचंदाचा प्रभाव । प्रत्यक्षात आला अनुभव । कन्येचा वाचला जीव । वासुदेवरावाच्या।।५।। संत सेवेचे फळ । निश्चितची मिळते आलिया वेळ। गुरूकृपेचे असता पाठबळ । विघ्नेही नाश पावती।।६।। याचा प्रत्यक्ष अनुभव । घेतला वासुदेवरावांनी एकमेव । समर्पित केला जीवभाव । बाबाच्या चरणी।।७।। तीन कि.मी. पिंपळखुट्यावरून । जाळीच्या मारुतीचे स्थान। तिथे संत शंकर बाबानं । उपासना

केली पूर्वीस।।८।। त्याठायी दर वर्षी रामनवमीला । सहकार्य करावया उत्सवाला । एकमेव सांगितले वासुदेवरावला । बाबानी सत्वर।।९।। बाबाच्या आज्ञेचे पालन। ते अखंड नित्यनेमान। करीत आहेत अजून । वासुदेवराव।।१०।। मी जोवरी आहे जिवंत । तोवरी ही सेवा अखंडित। करीन तनमन धनासहित। संकल्प केला तयांनी।।११।। संकटाची लावली वाट । केला परिस्थितीचा कायापालट । व्यवसाय चालती नीट । बाबाच्या कृपाप्रसादे।।१२।। पूर्व परिस्थिती साधारण । आता सुख- समृद्धी समाधान। मिळत आहे बाबाच्या कृपेन । सांगतात वासुदेवराव।।१३।। श्री. विकासराव पांडकर । पुणे येथे राहणार । परिवहन अधिकारी पदावर । जिल्हा अमरावती विदर्भात।।१४।। वासुदेवराव पांडे नावाचे । ते सहकारी कार्यालयाचे । मित्र ते पांडकर साहेबांचे । त्या काळात।।१५।। वासुदेवराव धार्मिक प्रवृत्तीचे । बाबासोबत तयांचे । नाते गुरू भक्ताचे । होते पूर्वीपासून।।१६।। तयांनी पांडकर साहेबास। आग्रह केला येण्यास। शंकर बाबांच्या दर्शनास। मित्र प्रेमाखातिर।।१७।। बघा त्या वेळेस। बाबा होते

अमरावतीस । गडमारेच्या घरी मुक्कामास । भक्तमंडळी सहीत।।१८।। तिथे पांडकर साहेबान । बाबाचे घेतले दर्शन । प्रसन्न जाहले मनोमन । बघूनिया बाबास।।१९।। त्यानंतर नियमित । पाच-सहा दिवस सतत । दर्शन घेतले मनसोक्त । बाबाचे तयांनी।।२०।। पुढे बाबा अमरावतीहून । वसुधाताईच्या आग्रहावरून । रिद्धपूरला आले निघून । तात्काळ त्या वेळी।।२१।। त्या दिवशी कार्यालयातून । घरी आले परतून । बेचैन जाहले मन । पांडकर साहेबांचे।।२२।। बाबा आहेत रिद्धपूरला । आपण जावे दर्शनाला । ऐसा मनासी निश्चय केला । गेले निघुनि त्या ठायी।।२३।। बाबा पांडकराकडे बघून । खूप हसले जोरानं । म्हणाले आताच केली आठवण । आम्ही तुमची।।२४।। तुम्ही नक्कीच येणार । हे बाबाचे शब्द ऐकता बरोबर । भक्त पप्पा, जगताप, इतर । जाहले आश्चर्यचकित।।२५।। आपण बाबाच्या स्मरणात । आहो बघा निश्चित । याचा असावा संकेत । बाबाचा आपणास।।२६।। यापरी विचार केला मनात । बाबाच्या प्रेमाची ज्योत । जगविली आपल्या हृदयात । भक्त पांडकर साहेबानी।।२७।। हळूहळू

बाबा सोबत । अति अल्प वेळात । अति घनिष्ठ जुळलं नातं । पांडकर साहेबाचे।।२८।। आता बाबाच्या दर्शनाविना । करमत नव्हते तयांना । समर्पित झाले सद्गुरू चरणा । क्षेत्र पिंपळखुट्यासी।।२९।। प्रसंग आहे एकदाचा । श्री क्षेत्र पिंपळखुट्याचा । लाईन मधल्या दर्शनाचा । घ्यावा ऐकून।।३०।। बाबा समोर प्रसाद ठेवून । पांडकर बैसले दूर जाऊन । एवढ्यात शंकर बाबानं । प्रसाद दिला ढकलून।।३१।। बाबा आपल्याच तंद्रीत । काहीतरी होते पुटपुटत । काय असावा संकेत । कोण जाणे।।३२।। बघा त्या समयास । अमरावती वरून पुण्यास । प्रयत्न चालू होते बदलीस । पांडकर साहेबांचे।।३३।। परी घटना घडली विपरीत । बदली झाली स्थगित । त्या वेळी कळले गुपित । प्रसाद ढकलण्याचे।।३४।। त्या प्रसंगाचे स्मरण । त्वरितची दिले करून । सुमंतराव अन् जगताप साहेबानं । पांडकर साहेबासी।।३५।। एकदा बाबा मुक्कामास । होते बघा नाशिकास । पांडकर साहेबाच्या गृहास । भक्त मंडळी सोबत।।३६।। दोन मुली नंतर । एक पुत्र व्हावा सत्वर । प्रार्थना केली जोडुनी कर । बाबासी तयांनी।।३७।। मुली

हे परक्याचे धन । विवाह झालिया जातिल निघून । मग म्हातारपणी आमचे रक्षण । कोण करील॥३८॥ याची चिंता आम्हासी । वाटते सांगतो तुम्हासी । पांडकर बोलले बाबासी । निर्भय होऊनी॥३९॥ यावर बाबा म्हणाले । आपले मनोगत कळले । परी याआधी नाही विचारले । आपण आम्हासी॥४०॥ मग कोण्यापरी आपणास । आशीर्वाद द्यावा तुम्हास । हे ऐकून उपस्थितास । आश्चर्य वाटले॥४१॥ त्या वेळी बाबाने तूर्तास । एक फळ आणावयास । सांगितले रामभाऊ दादास । आपल्या गाडीमधून॥४२॥ ते फळ दिले खावयास । पांडकर साहेबाच्या पत्नीस। मनोरथ जाईल पूर्णत्वास । दिधला आशीर्वाद॥४३॥ बाबाचे हे वचन । सत्य जाहले परिपूर्ण । घरी जन्मले पुत्ररत्न । सोहम नाव त्याचे॥४४॥ कळाला बाबाचा अधिकार । समर्पित झाले चरणावर । सेवा करतात निरंतर । तन-मन धनासहित॥४५॥ ययाती सरोदे मुंबईचे । मामेभाऊ ते पांडकर साहेबाचे । तयांच्या बिकट समस्येचे । निराकरण केले बाबाने॥४६॥ आठ वर्षे झाली विवाहाला । तरी संतती नव्हती तयाला । बहुत केले

उपचाराला । शेवटी भेटले बाबासी।।४७।। येथे समस्या वाटते कठीण । पत्नीच्या भाग्यात आहे संतान । परी पतीचे भाग्य हीन । बाबा बोलले पांडकरास।।४८।। बाबाचे ऐकुनी वचन । अवघे जाहले शोकमग्न । बाबाने घेतले नेत्र मिटवून । त्या प्रसंगी।।४९।। संत मुळातची दयावान । रंजल्या गांजल्यासी घेती उचलून । प्रसंगी भाग्यासही देती बदलून । ऐसा अधिकार तयांचा।।५०।। दुसरे दिवशी ब्राह्ममुहूर्ताला । बाबाने बोलाविले उभयताला । तथास्तु बोलले आशीर्वाद दिला । तयांना तात्काळ।।५१।। बाबा पांडकरासी म्हणाले । ययाती नातेवाईक आपले । त्यामुळे करावे लागले । हे कार्य आम्हासी।।५२।। संत हे कृपावंत । तयांचा पाहू नये अंत । ते साक्षातची भगवंत । या भूमीवर।।५३।। आशीर्वाद फळासी आला । ययाती घरी बाळ जन्मला । सर्वांना आनंद झाला । बाळाच्या जन्माचा।।५४।। यापरी भक्त ययातीचे । मनोरथ पुरविले तयाचे । शक्य करूनी दाखविले अशक्याचे । संत शंकर बाबाने।।५५।। तयाचे नाव आर्यन । मुळातची तो बुद्धिमान । तो बाबाचा प्रासादिक जाण । एकमात्र निश्चित।।५६।। संतोष

भाऊ पोकळे नावाचे । राहणारे ते पुण्याचे । परमभक्त ते बाबाचे । १९९९ पासून।।५७।। सिद्धेश्वर चव्हाण पुण्याचे । ते नातेवाईक तयाचे । योग आले प्रथम दर्शनाचे । बाबाचे तयांना।।५८।। तेव्हापासून पिंपळखुट्याशी । वारी सुरू झाली नित्याची । घटना ऐकावी एकदाची । भाविक सुजनहो।।५९।। एकदा रामनवमी उत्सवासी । पिंपळखुटा क्षेत्रासी । स्वप्न पडले संतोष भाऊसी । मध्यरात्रीला।।६०।। स्वप्नात आले भूत । तेणे जाहले भयभीत । संतोषभाऊ निद्रेत । त्या समयास।।६१।। त्याप्रसंगी संतोषभाऊनं । बाबाचे करताची स्मरण । बाबाने प्रत्यक्ष येऊन । हाकलून दिले भूतासी।।६२।। ऐसे सद्गुरू महान । मिळणे आहे कठीण । जे स्वप्नातही करती रक्षण । आपल्या भक्ताचे।।६३।। एकदा सिद्धी नावाची । कन्या संतोष भाऊची । नजर चुकवून आईची । निघून गेली घराबाहेर।।६४।। नक्कीच आपल्या कन्येचे । अपहरण केले असावे तिचे । यापरी अनेक प्रकारचे । विचार येती मनात।।६५।। त्यासमयी तिचे वय । होते सहा वर्षाचे केवळ । शोधू लागले सकळ । तिला आपल्यापरी।।६६।। तीन कि.मि. अंतरावर । संतोषभाऊच्या बहिणीचे घर । तिथे सापडली अखेर । कन्या सिद्धी सुखरूप।।६७।।

सर्वांना बरे वाटले । विपरीत होणारे टळले । सिद्धीने जे सांगितले । ते द्यावे ऐकून।।६८।। ती रस्त्याने होती चालत । कुठे जाते नव्हते कळत । सारखी होती रडत । त्यावेळी दुःखाने।।६९।। एका अपरिचित व्यक्तीनं । आपल्या गाडीवर बसवून । सुखरूप दिले पोहचवून । तिला आत्याच्या घरी।।७०।। तो व्यक्ती असावा कोण । ते निश्चितची शंकरबाबा जाण । विश्वास जाहला परिपूर्ण । संतोष भाऊचा।।७१।। दुसऱ्या घटनेचा वृत्तांत । ऐकुनी घ्यावा निवांत । पुन्हा सापडले संकटात । संतोषभाऊ तात्काळ।।७२।। हिच सिद्धी नावाची । कन्या संतोषभाऊची । त्या वेळी ती अकरा वर्षांची । होती अंदाजे।।७३।। अकस्मात घरी तिला । सर्पदंश झाला । त्या संकटातूनही सिद्धीला । वाचविले बाबांनी।।७४।। ही घटना बाबाला । सांगितली पिंपळखुट्याला । बाबाने संतोषभाऊला । तीन-चार तुकडे दिले विटांचे।।७५।। जिथे साप गेला निघून । तिथे तुकडे द्यावे झाकून । पुन्हा सापाचे दर्शन । होणार नाही कधीही।।७६।। बाबाच्या आज्ञेवरून । बघा संतोष भाऊन । विटाचे तुकडे दिले टाकून । त्या ठिकाणी।।७७।। बघा तेव्हापासून । नागराज गेले निघून । संतोष भाऊच्या घरातून । कायमचे निश्चित।।७८।।

धन्य बाबाचा अधिकार । या जगी आहे थोर । सर्व प्राणी मात्रांवर । सत्ता आहे तयाची।।७९।। जेवढे जीवजंतू या भूमीवर । चालतात आमच्या इच्छेनुसार । परी मनुष्य मात्र सत्वर । वागतो इच्छे विरुद्ध।।८०।। तया अंगी भरला स्वार्थ । कैसा घडेल परमार्थ । तेणे जाहला अनर्थ । या जगी।।८१।। यापरी केला उपदेश । बाबाने त्या समयास । भक्त संतोष भाऊस । तात्काळ तये वेळी।।८२।। संतोषभाऊच्या नातेवाइकास । पोटाचा होता त्रास । खूप केले उपचारास । आराम काही होईना।।८३।। बघा बाबाने तयास । अंगारा दिला खावयास । आराम झाला हमखास । तयाला तात्काळ।।८४।। बघा या अंगाऱ्यानं । अनेकासी मिळाले जीवनदान । कोणी मुक्त झाला व्याधीतून । तात्काळ।।८५।। कोणाचे सुटले व्यसन । अंगाऱ्याचे करिता सेवन । अंगारा मानावा संजीवन । एकमात्र।।८६।। चार मुली आल्या जन्मास । एक पुत्र व्हावा इच्छा मनात । आशीर्वाद मागितला बाबास । बाबा म्हणाले तथास्तु।।८७।। सन २०१५ साली । पुत्ररत्नाची प्राप्ती झाली । बाबाने इच्छा पूर्ण केली । आपल्या भक्ताची।।८८।। संत हे मुळातची उदार । करावया जडजीवांचा उद्धार । प्रसंगी येती

भूमीवर ।साधावया कार्य आपले।।८९।। पुत्रजन्माचा जल्लोष । आनंद झाला सर्वांस । नाव ठेवले यश । बाळाचे मोठ्या प्रेमाने।।९१।। भक्तराज गांवडे अकोल्याचे । आहेत धार्मिक प्रवृत्तीचे । तयांना वेड संत दर्शनाचे । पूर्वीपासून।।९१।। संत गजानन शेगावाचे । पुंडलिक महाराज मूर्तिजापूरचे । संत मुंगसाजी धामणगावचे । वैदर्भीय संत थोर।।९२।। भक्तराज त्या क्षेत्राचे । वारकरी होय नित्याचे । पुढे शंकरबाबाच्या दर्शनाचे । योग आले अकस्मात।।९३।। रुक्मिणी नगर अमरावतीस । बेनोडकराचे गृहास । बाबा होते मुक्कामास । त्यावेळी तेथेची।।९४।। भक्तराज गावडेला । रामभाऊ दादाने त्यावेळेला । दर्शन घडविले तयाला । सद्‌गुरू शंकर बाबाचे।।९५।। मनी दर्शनाची तळमळ । बाबाने बोलवुनी जवळ । दर्शन दिले तात्काळ । भक्तराज जाहले आनंदित।।९६।। ओळखला बाबाचा अधिकार । श्रद्धा जडली बाबावर । बुडत्याला मिळाला आधार । जाहले ऐसे।।९७।। प्रथमदर्शनी बाबानं । संत पुंडलिक बाबाचे निर्वाण । अचूक संकेत देऊन । सांगितले भक्तराजास।।९८।। सुभाष नावाच्या बंधूस । संकटातून वाचविले तयास । याचाही संकेत भक्तराजास । दिला बाबाने।।९९।। यापरी

अनेक अनुभव । भक्तराजला आले एकमेव । दृढ जाहला भाव । बाबाच्या चरणी॥१००॥ वेळी अवेळी येऊन । संकटकाळी बाबानं । प्रत्यक्षात केले रक्षण । भक्तराजाचे॥१०१॥ श्री क्षेत्र धामणगाव देव । ते मुंगसाजीचे समाधी स्थळ । त्या ठायी शंकरबाबाने तात्काळ । दर्शन दिले भक्तराजास॥१०२॥ पुढे ग्रामसेवकाच्या मुलाखतीचे । पत्र आले कार्यालयाचे । सहकार्य मिळेना कोणाचे । निराशा जाहली मनास॥१०३॥ वडिलाचे निधनानंतर । नातेवाईक गेले दूर । कोणी देईना आधार । त्या प्रसंगी॥१०४॥ प्रसंग होता कठीण । आपल्या परी केले प्रयत्न । सोबतीला होती बहीण । तयाची संगती॥१०५॥ वशिलेबाजी आणि धन । हे नोकरी मिळविण्याचे साधन । भक्तराज या चिंतेन । जाहला व्याकूळ॥१०६॥ आता या संकटातून । एका शंकरबाबा वीण । तारणारा नाही कोण । इतर दुजा निश्चितची॥१०७॥ यापरी केला विचार । याचा सर्व कार्यभार । सोपवुनी दिला बाबावर । भक्तराजाने॥१०८॥ शंकरबाबा सर्वज्ञ सत्पुरुष । तयांनी आपल्या ह्या भक्तास । धीर दिला त्या समयास । स्वप्नामधे जाऊनी॥१०९॥ बघा त्या भक्तराजाची । निराशा मिटवली कायमची ।

नोकरी मिळाली ग्रामसेवकाची । बाबाच्या आशीर्वादाने।।११०।। हृदयी होता दृढभाव । अतूट श्रद्धा एकमेव । पैलतीरा लावली नाव । सद्गुरू शंकर बाबाने।।१११।। अनाथांचा नाथ । शंकरबाबा साक्षात । साठविला आपल्या हृदयात । भक्तराजाने।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । सविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

नश्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय सत्ताविसावा

आता या अध्यायात । बाबाचे एक परमभक्त । पप्पा नावाने ओळखतात । तयांना सर्व लोक।।१।। अगदी सुरुवातीपासून । ते बाबासवे आहेत जुळून । बाबाही तया मान-सन्मान । करतात अगत्याने।।२।। अमरावतीवरून पिंपळखुट्यास । अधून मधून यावे दर्शनास । ऐकावे बाबाच्या अमृतवाणीस । सुमंतरावानी।।३।। हा उपक्रम नित्य नियमानं । अखंड सुरू आहे अजून । यासी एकच कारण । श्रद्धा होय।।४।। घरात होते राजकारण । त्यामुळे मद्यपानाचे व्यसन । लागले संगती गुण । सुमंतरावास।।५।। एकदा मेळघाटच्या प्रवासात । सुमंतराव होते बाबा सोबत । त्या प्रसंगाचा वृत्तांत । सांगतो आपणास।।६।। बाबा बोलले तयास । तुम्ही आपल्या व्यसनास । अर्पण करावे नर्मदेस । याच क्षणी।।७।। बाबाची आज्ञा झाली । नर्मदेत जाऊन प्रतिज्ञा केली । माता नर्मदा ठरली । साक्षी या घटनेची।।८ ।। यापूर्वीही बाबानं । अनेकांचे व्यसन । सोडविले सहज

बोलून । धन्य लीला बाबाची।।९।। पुढे एक वर्षानंतर । जगताप साहेबांचे शेतावर । वनभोजनाचा सुंदर । कार्यक्रम त्याठायी।।१०।। शंकरबाबा त्या कार्यक्रमात । स्वयम होते उपस्थित । बाबा म्हणाले अकस्मात । सुमंतरावासी।।११।। आज आपल्या प्रतिज्ञेला । एक वर्षाचा अवधी झाला । आश्चर्याचा धक्का दिला । बाबाने सुमंतरावास।।१२।। बाबाच्या अधिकाराचे वर्णन । येथे करावे कोण्या शब्दानं । शेवटी जावे शरण । तयाचे चरणी।।१३।। हाच मार्ग वाटे उत्तम । मनी विचार केला ठाम । कायमचा ठोकला रामराम । निषिद्ध आहारास।।१४।। बाबाचा कळला अधिकार । बाबा साक्षातची ईश्वर । दर्शन यावे बसावे दूर । नियम ठरविला तयांनी।।१५।। संतासवे वागावे जपून । व्यर्थ न करावे संभाषण । याचे काटेकोर पालन । करतात सुमंतराव।।१६।। तयांच्या संपूर्ण परिवारावर । बाबाची कृपा अपार । परिवारातील सान थोर । वारकरी बनले पिंपळखुट्याचे।।१७।। शंकरबाबा तयांचा देव । क्षेत्र पिंपळखुटा माहेर एकमेव । समर्पित झाले सुमंतराव । बाबा चरणी तात्काळ।।१८।। करजगावच्या

शेतातला । प्रसंग ऐकावा तिथला । सत्यदेव बाबाचे पुण्यतिथीला । बाबा होते मुक्कामास॥१९॥ मागील दोन वर्षांपासून । या उत्सवाचे आयोजन । करीत होते आनंदानं । स्वयम सुमंतराव॥२०॥ बघा तीन-चार दिवसांपासून । मुसळधार पावसानं । कहर केला होता चहुबाजूनं । त्या प्रसंगी॥२१॥ चिंता वाटे सुमंतरावास । हा काय करील पाऊस । बाधा होईल उत्सवास । निश्चितची॥२२॥ बघा त्या पावसात । बाबाला बसवुनी गाडीत । निघाले जावया शेतात । अमरावती वरून॥२३॥ शेतामध्ये पोहचल्यावर । आश्चर्य वाटले सत्वर । हा होय बाबांचा साक्षात्कार । ओळखले सुमंतरावानी॥२४॥ सर्व काही सुरळित । चालू होते उत्सवात । करजगावच्या शेतात । त्या समयी॥२५॥ तीनशे-चारशे बाबाचे भक्त । उत्सवास होते उपस्थित । उत्सवाचा आनंद होते लुटत । त्या प्रसंगी॥२६॥ शेतामध्ये उघड्यावर । महाप्रसाद होता तयार । अचंबित जाहले क्षणभर । सुमंतराव त्या वेळी॥२७॥ त्या दिवशी शेताच्या आसपास । थेंबभरही नव्हता पाऊस । बाधा न आली उत्सवास । कशाचीही॥२८॥ याचे मूळ

कारण । सांगतो तुम्हा घ्यावे ऐकून । त्याठायी होते विराजमान । संत शंकरबाबा त्रिकालज्ञानी ।।२९।। तयाची या निसर्गावर । सत्ता आहे भरपूर । याचा अनुभव थोर । आला अनेकांसी ।।३०।। उत्सव होता सत्यदेवाचा । शंकरबाबाच्या गुरूदेवाचा । तिथे आपत्ती येण्याचा । प्रश्नची नाही ।।३१।। सुमंतरावांना बोलावून । हळूच सांगितलं बाबानं । लवकर द्यावा उरकून । इथला कार्यक्रम ।।३२।। जाणे आहे आपणास । उद्याच्या कार्यक्रमास । बेनाडकराच्या गृहास । मोर्शीला सत्वर ।।३३।। बाबा हा गुप्त संकेत । सुमंतरावांसी होते सांगत । पुढे काही तरी विपरीत । घडणार याठायी ।।३४।। लगेच पंधरा मिनिटांनी । आभाळ आले भरोनी । धो-धो करून पावसानी । केली सुरुवात ।।३५।। ऊन, वारा, पावसात । भक्तांच्या सुखदु:खात । हा भागिरथी सूत । जातो धावुनी निश्चितची ।।३६।। ही घटना होय पूर्वीची । एकोणवीसशे सत्याऐंशी सालाची । व्यवस्था नव्हती वाहनाची । पिंपळखुट्याला येण्यास ।।३७।। भाड्याचे वाहन करून । यावे लागे अमरावती वरून । बाबाचे घ्यावया दर्शन । पिंपळखुट्यास

तये वेळी।।३८।। एकदा बाबा होते मुक्कामास । गडमडे साहेबाकडे अमरावतीस । सुमंतराव पोहचले दर्शनास । त्या ठिकाणी।।३९।। दर्शन घेताच बाबा म्हणाले । टॅक्सीने येणे नाही चांगले। आता वाहन पाहिजे आपले। स्वत:चे आपणास।।४०।। हे सांगावयासी आपणास। उशीर जाहला आम्हास। परत जावे अमरावतीस। याच क्षणी।।४१।। घरी पोहोचल्या बरोबर । अद्भुत घडला चमत्कार । कोलते नावाचे बँक-मॅनेजर । अचानक हजर होते घरी।।४२।। ते होते अपरिचित । तयांचे केले स्वागत । तयांनी सांगितले त्वरित । येण्याचे कारण।।४३।। आपल्यासाठी नवीन कार । नोंदली आहे सत्वर । दिवस लागतील तीन-चार । आलो सांगावयासी आपणास।।४४।। ही गोड बातमी ऐकून। सुमंतराव जाहले सुन्न। बाबाचे केले स्मरण। मनोमन तयानी।।४५।। किरकोळ आल्या अडचणी । परी त्या बाबाच्या कृपेनी । दूर झाल्या त्या क्षणी । नवल वाटे सुमंतरावास।।४६।। हे कसे काय घडले । कोणी योग आणले । सर्व कळेनासे झाले । त्या प्रसंगी।।४७।। संत वचनाची महती । कळली सुमंतरावाप्रती ।

तात्काळ दाखविली प्रचिती । संत शंकरबाबाने।।४८।। आम्हास न कळे आजचे । संत सांगतात तीनही काळाचे । वर्तमान, भूत, भविष्याचे । एका ठायी बसुनी।।४९।। म्हणोनीच ते संत ठरले । जगी वंदनीय झाले । राव-रंक पुजू लागले । नित्यनेमे तयासी।।५०।। नवीन गाडी घरी आली । येण्या-जाण्याची सोय झाली । बाबाची वाणी सिद्ध जाहली । एकमात्र निश्चित।।५१।। एकदा सुमंतराव पिंपळखुट्याला । आले बघा दर्शनाला । बाबाने आदेश दिला । बद्रिनाथला येण्यासी।।५२।। त्या वेळी बाबाची । बद्रिनाथला जाण्याची । तयारी होती पूर्वीची । नियोजित प्रमाणे।।५३।। सुमंतराव पडले विचारात । निवडणूक होती डोक्यात । तयांना नव्हते सुचत । काय करावे ते।।५४।। बाबापुढे समस्या मांडली । बाबाने ती मान्य केली । मुंबईची तयारी केली । अर्ज भराया निवडणुकीचा।।५५।। मुंबईला पोहोचल्यावर । वार्ता आली कानावर । ही निवडणूक पुढे होणार । तीन वर्षांनंतर।।५६।। ही बातमी ऐकून । सुमंतराव जाहले खिन्न । आपण बाबाचे वचन । केले दुर्लक्षित।।५७।। यात आपलाच आहे दोष । आपण असमर्थ ठरलो

समजण्यास । सद्गुरू शंकर बाबाच्या संकेतास । न कळले आपणा।।५८।। त्याच क्षणी सुमंतरावानं । प्रतिज्ञा केली मनोमन । बाबाच्या आज्ञेचे उल्लंघन । करणार नाही भविष्यात।।५९।। पप्पा हे नाव नवीन । ठेवले अति प्रेमानं । श्री संत शंकर बाबानं । सुमंतरावाचे।।६०।। तेव्हापासून आश्रमात। सान थोरांसहित। पप्पा नावाने ओळखतात। तयांना आदराने।।६१।। एवढा मोठा सन्मान। प्राप्त जाहला परमभाग्यानं । संत शंकर बाबांच्या कृपेन । भक्त सुमंतरावास।।६२।। वैभव लोखंडे अमरावतीचे । श्रद्धावान भक्त ते बाबाचे । शंकर बाबा इष्ट दैवत तयाचे । एकमेव लाभले।।६३।। क्षेत्र पिंपळखुटा माहेरघर । शंकर बाबाला ते परमेश्वर । समर्पित जाहले चरणावर । तनमन धनासहित।।६४।। शंकरबाबा एकदा तरी । यावेत आपल्या घरी । इच्छा होती यापरी । तयाच्या मनात।।६५।। एकदा अमरावतीस । गडमडे साहेबांच्या गृहास । वैभव गेले दर्शनास । संत शंकर बाबाच्या।।६६।। वैभवला पाहता बरोबर । बाबा बोलले सत्वर। आज आम्ही येणार। आपल्या घरी।।६७।। आनंद जाहला तयास । बाबाने स्वयम आपणास । कबूल केले येण्यास । आपल्या गृही।।६८।। काही

भक्त मंडळी सोबत । शंकर बाबा पायी चालत । पोहचले काही क्षणात । तयांच्या गृही।।६९।। त्या क्षणाचे स्मरण । वैभवला आहे अजून । हृदय येते भरून । सांगताना तयाचे।।७०।। जसा विदुरा घरी गोपाळकृष्ण । कण्या खाऊनी जाहले प्रसन्न । त्यापरीच वाटे मनोमन । भक्त वैभवास।।७१।। बाबाच्या चरणाचा स्पर्श । जाहला आपल्या गृहास । हर्ष पावला मनास । सर्वतोपरी।।७२।। शंकर बाबा दयेचे सागर । तयांची कृपादृष्टी जयावर । त्याचा निश्चितची उद्धार । होतो तात्काळ।।७३।। याचा साक्षात अनुभव । वैभवला आला एकमेव । उदरनिर्वाहाची लागली सोय । बाबाच्या कृपेने।।७४।। नोकरी मिळाली शासनाची । चिंता मिटली भविष्याची । संतकृपेच्या गोड फळाची । प्रचिती येऊ लागली।।७५।। वडिलास दुर्धर आजारातून । जीवनदान दिले बाबानं । चरणपादुका देऊन । इच्छा पुरविली तयाची।।७६।। शंकरबाबाच्या आशीर्वादानं । सर्व प्रकारे सुखसमाधान । भोगत आहे आनंदानं । भक्त वैभव।।७७।। त्या मोरेश्वर कडूचे । कोण्यापरी तयाचे । जीवन बदलविले कायमचे । संत शंकर बाबाने।।७८।। परिस्थिती हलाखीची । होती बघा तयाची । चिंता होती

उदरनिर्वाहाची । मार्ग कसा काढावा।।७९।। पुरुषोत्तम चव्हाण नावाचे । ते भक्त शंकरबाबाचे । आते भाऊ होय तयांचे । नागपूर निवासी।।८०।। तयांनी घरी बोलावून । बाबाचे घडविले दर्शन । वर्तमान केले कथन । कडू साहेबानी बाबाजवळ।।८१।। अश्रू वाहे नयना मधून । पोटात नव्हता अन्नाचा कण । अंगावर वस्त्र होते जीर्ण । त्या प्रसंगी तयाच्या।।८२।। एक कोटी कर्जाचा भार । प्रत्यक्षात होता डोक्यावर । पैसे मागण्या सावकार । त्रास देती तयास।।८३।। प्रसंग होता गंभीर । बाबाने तयाला दिला धीर । घाबरू नका तिळभर । मी आहे पाठीशी।।८४।। जिथे सद्गुरू उभे पाठीशी । तिथे भय नाही भक्तासी । विघ्ने जाती लयासी । तात्काळ निश्चित।।८५।। ऐसा अनुभव कडू साहेबास । आला त्या समयास । घट्ट धरियले चरणास । तयानी शंकर बाबाचे।।८६।। शंकर बाबाने कृपा केली । हळूहळू ग्रहदशा पालटली । मनाला ओढ लागली । बाबाच्या दर्शनाची।।८७।। अधून मधून पिंपळखुट्यास । बाबाच्या दर्शनास । सोबत घेऊनी परिवारास । येत होते कडू साहेब।।८८।। बाबा कडूला म्हणाले । आम्ही सर्व ग्रह खांबाशी बांधले । यापुढे ते काही आपले । बिघडवणार नाहीत।।८९।। संत मायमाउली साक्षात ।

कोणी दु:खी राहू नये जगात । त्या साठी ते सदोदित । स्वयम कष्टी होय।।९०।। दु:ख बघुनी बालकाचे । अंत:करण हेलावले मातेचे । त्यापरी संत आणि सेवकाचे । नाते अति जवळचे।।९१।। एकदा कडूच्या गाडीला । गंभीर अपघात जाहला । बाबाने वाचविले त्यावेळेला । प्रत्यक्षात सर्वांना।।९२।। बघा त्या गाडीत । चाळीस प्रवासी होते जात । गाडी पलटी झाली मार्गात । हाहाकार सर्वत्र।।९३।। त्या गाडीचे मालक । स्वयम कडू होते चालक । घटना घडली अचानक । तयांच्या हातून।।९४।। अपघात होता भयंकर । बघणारे होते बोलत । एकही प्रवासी जिवंत । नसेल या गाडीत।।९५।। परी शंकरबाबाचा कृपा कर । होता कडूच्या शिरावर । सर्व प्रवासी धोक्याबाहेर । होते सुखरूप।।९६।। एवढ्या कठीण प्रसंगातून । बाबाने आपले रक्षण । अश्रू वाहे नेत्रातून । कडू साहेबाच्या।।९७।। आश्चर्य जाहले लोकास । कडू सांगती तयास । याचा सूत्रधार पिंपळखुट्यास । शंकरबाबा नाव तयांचे।।९८।। कडू साहेबाच्या संपत्तीचा । वाद चालू होता पूर्वीचा । निर्णय लागेना कोर्टाचा । अनेक वर्षंपासून।।९९।। त्या प्रसंगापासून । घरात शिरले दरिद्रीनारायण । कधी वाटे जावे निघून । दूरदेशी कुठेही।।१००।। कधी

संपवावे जीवन। विचार येई मनोमन। परी परिवाराकडे पाहून। विचार त्यागिला तात्काळ।।१०१।। पुढे वर्ष-मास-दिवस। निघून गेले सर्रास। निकालाची तारीख जवळपास। जाहली होती निश्चित।।१०२।। त्यात विरोधकांनी केले प्रयास। केसला विलंब करण्यास। अर्ज केला स्टे मिळविण्यास। तये वेळी तात्काळ।।१०३।। कडू आले पिंपळखुट्यास। बाबाला करावया विचारपूस। बाबा प्रसन्न होऊनी त्यावेळेस। बोलले कडूशी।।१०४।। या केसचा निकाल। तुमच्या बाजूने लागेल। विरोधक कितीही करतील। स्टे न मिळे तयास।।१०५।। कडू पिंपळखुट्यावरून। घरी आले परतून। करू लागले चिंतन। संत शंकरबाबाचे।।१०६।। आता भय ना उरले मनात। सर्व कार्यभार बाबाच्या कोर्टात। सोपवुनी जाहले निवांत। सेवक कडू साहेब।।१०७।। पुढे बाबाची सत्य वाणी। सत्य ठरली त्या क्षणी। निकाल दिला कोर्टानी। कडू साहेबाच्या बाजूने।।१०८।। एवढ्या दिवसांचा संघर्ष। संपुष्टात आला क्षणात। साष्टांग दंडवत घातले बाबास। कडू साहेबाने तत्क्षणी।।१०९।। सर्व मालमत्ता परत। आली कडूच्या हातात। आनंद जाहला परिवारात। पत्नी मुला सहित।।११०।। कृषी महाविद्यालयाचे

अध्यक्ष । बनविले कडू साहेबास । बहुमान दिला तयास । सर्वतोपरी बाबाने।।१११।। संत कृपेचे धन । जयासी लाभले योगायोगानं । तो जगी म्हणावा भाग्यवान । एकमेव निश्चित।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । सत्ताविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय अठ्ठाविसावा

बबनराव चव्हाण । तयांचे पुण्यासी राहणं । तयांना संत दर्शनाचे आकर्षण । आहे मुळातची॥१॥ प्रथमदर्शनी पिंपळखुट्यास । आले बाबाच्या दर्शनास । प्रसन्न जाहले त्यावेळेस । बाबाचा आश्रम बघून॥२॥ इथल्या मातीचा प्रभाव । वेगळाच आला अनुभव । चव्हाण साहेबाला एकमेव । ही कृपा बाबाची॥३॥ त्या वेळी कमला आजीचा । उत्सव होता पुण्यतिथीचा । प्रसंग होता आनंदाचा । पिंपळखुटा आश्रमात॥४॥ दिवसभर भजन कीर्तन । ऐकले ध्यान देऊन । मन गेले भारावून । चव्हाण साहेबाचे त्या वेळी॥५॥ बाबाची अमृतवाणी ऐकून । चित्ती पावले समाधान । आतुरता जाहली निर्माण । बाबा विषयी मनात॥६॥ नंतर दोन-तीनदा मध्यंतरी । चव्हाण साहेबांची स्वारी । दर्शन घ्यावया सत्वरी । आली पिंपळखुट्यास॥७॥ घटना आहे एकदाची । पुण्यावरून येण्याची । घ्यावया बाबाच्या दर्शनाची ।

पिंपळखुट्यासी।।८।। मुरकुटे, कदम, कोकरे साहेब । प्रवासी होते गाडीत । चहापाणी घ्यावया मार्गात । गाडी थांबवली त्याठायी।।९।। कलप्पा नावाचे । तेही भक्त बाबाचे । चालक होते गाडीचे । त्यावेळी तेथेची।।१०।। तयाशी जाहले विस्मरण । गाडीची चावी चुकून । गाडीच्या आत गेली राहून । पुढे समस्या जाहली।।११।। गाडीचे दरवाजे अकस्मात । काही केल्या नव्हते उघडत । अवघे पडले चिंतेत । काय होणार म्हणून।।१२।। वर्तमान समस्या बघून । भक्त चव्हाण साहेबानं । सुरू केले नामस्मरण । श्री संत शंकर बाबाचे।।१३।। बाबा आपल्या दर्शनास । येत आहो पिंपळखुट्यास । करू नका आम्हा निराश । सोडवा या संकटातून।।१४।। क्षणात घडला चमत्कार । एक व्यक्ती आला समोर । तयाने उघडून दिले दार । गाडीचे तात्काळ।।१५।। चिंता वाटे सर्वास । कोण्यापरी जावे पिंपळखुट्यास । बाबांच्या दर्शनास । या स्थळावरून।।१६।। याची सर्व चिंता बाबास । होती त्या समयास । ते साक्षात सर्वज्ञ सत्पुरुष । एकमात्र निश्चयी।।१७।। इथे दूरदेशी रानावर । त्याठायी मिळावा फिटर । हा बाबांचा होय

चमत्कार । निश्चितची वाटे सर्वास॥१८॥ शंकर बाबा साक्षात माउली । तयाच्या कृपेची सावली । भाग्याने जयासी लाभली । तो जाहला भयमुक्त॥१९॥ पुढचा प्रवास सुखानं । पार पाडला आनंदानं । बाबाचे घडले दर्शन । संतोष जाहला मनी॥२०॥ मार्गात घडलेल्या प्रसंगास । सांगू लागले इतरांस । बाबाने आम्हा सर्वास । मदत केली संकटात॥२१॥ पुण्यावरून पिंपळखुट्याास । सातशे कि. मीटरचा प्रवास । तिथून यावे संत दर्शनास । केवढे आश्चर्य॥२२॥ परि तेही पाहिजे भाग्यात । भाग्याविना नव्हे ते प्राप्त । दुर्लभ जाणावी संताची संगत । एकमात्र निश्चित॥२३॥ आता व्हावे सावधान । बंधू भगिनी श्रोतेजन । अनुभव करावया श्रवण । गार्गी मोरेताईचा॥२४॥ १९९६ साली । बाबाची प्रथम भेट झाली । तेव्हापासून ती बनली । वारकरी पिंपळखुट्याची॥२५॥ पतीला घेऊनी सोबत । नित्य यावे आश्रमात । दर्शन घेऊनी बसावे रांगेत । नित्यक्रम तियेचा॥२६॥ एके दिवशी मोरे ताईनं । मोठी हिंमत करून । बाबासवे केले संभाषण । ते घ्यावे ऐकून॥२७॥ सोळा सोमवारच्या व्रतास । करावे

वाटले मनास । आपण यावे उद्यापनास । माझ्या घरी।।२८।। जर का बाबा आपण । आले नाहीतर व्रताचे उद्यापन । करणार नाही निश्चय परिपूर्ण । केला आहे मी।।२९।। ती बाबाला वारंवार । विचारत होती बरोबर । बाबाही देत होते होकार । येतो म्हणून।।३०।। दिवसामागून दिवस । निघून गेले दोन मास । बाबा नाही आले उद्यापनास । ती जाहली निराश।।३१।। बाबा आपल्या कसोटीला । बघत आहे विचार केला । चालू ठेविले व्रताला । पूर्ववत निष्ठेने।।३२।। तिने बाबाला विचारावं । बाबाने तिला हो म्हणावं । यापरी संत आणि भक्ताचा एकमेव । उपक्रम चालला।।३३।। परी भक्त मोरेबाईनं । हिंमत हारली नाही अजून । तिला वाटे मनोमन । बाबा अवश्य येणार।।३४।। पुढे उगवला शुभदिन । एकवीस सोमवार जाहले पूर्ण । त्या दिवशी झाले आगमन । बाबाचे तया गृही।।३५।। आनंदाला नव्हता पार । घरी आले साक्षात शिवशंकर । दिवसही होता सोमवार । अमृतयोग जाणावा।।३६।। मनी असता दृढ विश्वास । काहीच अशक्य नाही तयास । अनुभव आला मोरे ताईस । तात्काळ त्या

वेळी।।३७।। मोरेताई आनंदानं । त्याप्रसंगी गेली भारावून । आनंदाश्रू वाहे नेत्रातून । जणू गंगा यमुनेचा महापूर।।३८।। श्रद्धारूपी घेऊनी जल । स्वच्छ केले चरण कमल । भावनारूपी सुंगधित फूल । अर्पण केले सद्गुरूसी।।३९।। भक्तीरूपी चंदन । कपाळी लावले लेपन । हृदयरूपी आसन । दिले बसावयास।।४०।। आत्मरूपी नंदादीप । ठेविला सद्गुरू समीप । वैराग्याचा मंगल धूप । जाळिला तत्क्षणी।।४१।। यापरी केले पूजन । सहपरिवार मोरे ताईनं । दोन दिवस मुक्कामानं । बाबा होते त्या ठायी।।४२।। होमहवन ज्या स्थळास । ती खोली तीन दिवस । सांगितली बंद ठेवण्यास । मोरेताईस बाबाने।।४३।। तीन दिवसांनंतर । खोली उघडली सत्वर । पूजेची सामग्री करूनी एकत्र । शिरवून दिली धामनदीत।।४४।। दुसरे दिवशी अकस्मात । मोरे ताईच्या आले ध्यानात । दोन मूर्ती नव्हत्या देव्हाऱ्यात । चिंता जाहली तियेस।।४५।। एक शिवलिंग, दुजा गणपती । मूर्तीवर तिची जिवापाड प्रीती । शोधू लागली अवती भोवती । संपूर्ण घरात।।४६।। मूर्ती नव्हत्या घरात । निराश जाहली मनात । काय करावे नव्हते सुचत ।

त्याप्रसंगी तियेला।।४७।। मूर्ती नक्कीच धामनदीत । विसर्जित केल्या निर्माल्या सोबत । चर्चा केली पुत्रासोबत । त्वरित पोहोचली नदीवर।।४८।। जिथे निर्माल्य होते शिरविले । मुलाने ते स्थळ दाखविले । तिथे अथांग जल व्यापले । होते नदीपात्रात।।४९।। एवढ्या खोल पाण्यात । मूर्ती सापडणे दुरापास्त । विचार केला मनात । एकमेव त्याक्षणी।।५०।। बाबाचा फोटो घेऊनी हातात । ढसाढसा होती रडत । बाबाला होती आळवीत । अति दु:ख मनोमनी।।५१।। तिच्या दु:खी मनाच्या वेदना । तीच जाणे कोणासी कळेना । हा तिच्या भावनेचा विषय जाणा । या ठायी मित्रहो।।५२।। माझ्या या संकटात । माझे सद्गुरू निश्चित । धावूनी येतील त्वरित । मला आहे विश्वास।।५३।। रात्रीच्या समयी उठून। मोरेताई येत होती निघून। धामनदीच्या तीरी बसून। धावा करी शंकर बाबाचा।।५४।। बाबा तुम्ही आहात दयावंत । पाहू नका माझा अंत । माझा पुरवावा हेत । ह्या कठीण प्रसंगास।।५५।। अनेकांच्या संकटात । धावुनी गेले केले मुक्त । मी तुमची दीन अनाथ भक्त । नका करू अव्हेर।।५६।। यापरी आठ दिवस । होऊन गेले या

घटनेस । परी सोडले नाही साहस । तिळभर॥५७॥ एके दिवशी नदीवर । बसली असता खडकावर । एक तरुण आला समोर । अचानक तेथेची॥५८॥ तो तरुण मोरेताईस । करीत होता विचारपूस । का आहात तुम्ही निराश । सांगावे मज सत्वर॥५९॥ त्या प्रसंगी मोरे ताईनं । संपूर्ण घटना दिली सांगून । हे ऐकून तो तरुण । बोलला मोरे ताईस॥६०॥ उद्या इथेच याच वेळेस । परत यावे सांगतो तुम्हास । मूर्ती आणून देतो ठेवा विश्वास । तुम्ही माझ्यावर॥६१॥ एवढे बोलून तो तरुण । अदृश्य झाला तिथून । मोरे ताई आली निघून । आपल्या गृहास॥६२॥ अनेक तर्कवितर्क मनात । निर्माण होई क्षणात । रात्र जागवली विचारात । मोरे ताईने॥६३॥ दुसऱ्या दिवशी सकाळी । अगदी ठरलेल्या वेळी । परत गेली मोरे ताई । धामनदीवर॥६४॥ त्याठायी पोहोचल्यावर । ती निराश झाली क्षणभर । तो तरुण नव्हता हजर । ठरल्याप्रमाणे त्या ठायी॥६५॥ चार-पाच मुले इतर । पोहत होती पाण्यावर । पुन्हा तर्कविर्तक मनावर । राज्य करू लागले॥६६॥ एवढ्यात तो कालचा तरुण । हाताची

मूठ बांधून । उभा राहिला येऊन । मोरे ताईच्या समोर।।६७।। या तरुणाच्या मुठीत । काही तरी दडले आहे निश्चित । ऐसे होते वाटत । मोरे ताईस।।६८।। लगेच त्या तरुणानं । आपल्या मुठीतून । दोन मूर्ती काढून । दिल्या मोरे ताईच्या हातात।।६९।। हा सर्व प्रकार बघून । ती जाहली सुन्न । रडू लागली जोर-जोरानं । बाबा-बाबा म्हणून।।७०।। तिने त्या तरुणास । नाव विचारले तयास । तरुण म्हणाला मोरे ताईस । काय पडले नावात।।७१।। जेवढी नावे या विश्वात । ती सर्व माझीच आहेत । एवढे बोलून तो त्वरित । निघून गेला सत्वर।।७२।। पुढे दूर अंतरावर जावून । अदृश्य जाहला तो तरुण । हा सर्व प्रकार मोरेताईनं । अनुभवला प्रत्यक्षात।।७३।। तिला एका क्षणात । आपली चूक आली ध्यानात । तो तरुण शंकरबाबा निश्चित । खात्री पटली तियेस।।७४।। साक्षात करुणेचा अवतार । माझे शंकर बाबा करुणाकर । धावुनी आले सत्वर । माझ्या संकटात।।७५।। परी मी ना ओळखले तयास । हा माझ्या भाग्याचा दोष । आले तरुणाचा घेऊनी वेष । मला टाकले भ्रांतीत।।७६।। जशी इंद्रायणीच्या

डोहातून । तुकोबाची गाथा पाडुरंगानं । काढुनी दिली निर्विघ्न । पूर्ववत राहिली।।७७।। त्यापरीच संत शंकर बाबानं । धामनदीच्या जलातून । मूर्ती दिल्या आणून । भक्त मोरे ताईस।।७८।। हा नव्हे अन्य प्रकार । नव्हे नव्हे चमत्कार । हा होय शुद्ध अधिकार । संतत्वाचा निश्चित।।७९।। शंकर बाबा संत अधिकारी । रंजल्या गांजल्यांचे कैवारी । मोरे ताईच्या येऊनी घरी । पुरविला मनोरथ।।८०।। धामनदीच्या डोहातून । स्वयं साक्षात येऊन । मूर्ती दिल्या बाहेर काढून । मोरे ताईस।।८१।। बुलढाण्याच्या महाविद्यालयात । तिचा पुत्र होता शिकत । नावं तयाचे अमित । भक्त तोही बाबाचा।।८२।। एकदा रात्रीच्या समयास । मित्रासोबत गेला फिरावयास । पौर्णिमेचा होता तो दिवस । सांगतो अमित।।८३।। चंद्राच्या शीतल प्रकाशात । चांदण्या होत्या लुललुकत । वरती निळ्या आकाशात । अति मजेशीर।।८४।। अशा प्रसन्न वातावरणात । घरा मागच्या मैदानात । सर्व मित्र गप्पा मारीत । होते रेल्वे रूळावर।।८५।। रात्रीच्या मोकळ्या हवेत । काही होते झोपेच्या गुंगीत । एवढ्यात रेल्वेगाडी अकस्मात । येत होती त्या रूळावरून।।८६।। सर्व गेले घाबरून । पळू लागले

जीव मुठीत घेऊन । प्रसंग होता कठीण । सांगतो अमित।।८८।। प्रसंगाचे गांभीर्य ओळखून । संत शंकरबाबाचे स्मरण । करू लागला मनोमन । भक्त अमित तत्काळ।।८९।। बाबा या हो धावून । आमचे वाचवा प्राण । एवढ्यात रेल्वे रूळावरून । गाडी गेली निघून।।९०।। सर्व मित्र सुरक्षित । पाहुनी समाधान पावे अमित । नमस्कार केला जोडुनी हात । संत शंकर बाबास।।९१।। माझ्या शंकर बाबानं । मला घेतले वर उचलून । गाडी जाताच दिले ठेवून । हळुच जमिनीवर।।९२।। यापरी आपला स्वानुभव । अमितने सांगितला एकमेव । संत कृपेचा प्रभाव । अनुभवला प्रत्यक्षात।।९३।। दोन हजार पंधरा सालात । ऋषिकेशला गंगा प्रवाहात । नाव उलटली अकस्मात । समस्या जाहली गंभीर।।९४।। बघा त्या नावेत । स्वयम अमित होता त्यात । गंगा मायेच्या जल प्रवाहात । वाहू लागला प्रत्यक्षात।।९५।। आता मृत्यूशिवाय दुसरं । काही ना दिसे डोळ्यासमोर । आपण निश्चितची वाहून जाणार । वाटे अमितला त्या समयी।।९६।। देव तारी त्याला कोण मारी । तिथे यमराजही सत्वरी । परतुनी जातो माघारी । प्रत्यक्षात निश्चित।।९७।। यापरीच साक्षात । घडले अमितच्या जीवनात ।

एका नावाड्याची अकस्मात । दृष्टी पडली अमितवर॥९८॥ बघा त्या नावाड्यानं । आपली नौका आडवी करून। दोर फेकला अमितच्या दिशेनं। आधारास तात्काळ॥९९॥ त्या दोराच्या आधारानं । अमितला काढले पाण्यामधून । तयाचे वाचविले प्राण । नावाड्याने त्या वेळी॥१००॥ अमितने त्या नावाड्याचे । आभार मानले तयाचे । हे कर्तव्यची आहे आमचे । नावाडी वदला सत्वर॥१०१॥ एवढ्या भीषण संकटातून । तुझे वाचणे होते कठीण । येथे कोण्यातरी सत्पुरुषानं । कृपा केली तुझ्यावर॥१०२॥ आजवरी या स्थळावर । आमच्या नजरे-समोर । अपघात जाहले भरपूर । परी वाचला नाही कोणी॥१०३॥ तू आहेस भाग्यवान । तुला मिळाले जीवनदान । कवण्यादेशी तुझं राहणं । कोण सद्गुरू तुझा॥१०४॥ विदर्भ होय माझा देश । तिथे क्षेत्र पिंपळखुट्यास । संत शंकरबाबा सतपुरुष । होय सद्गुरू माझे॥१०५॥ तयांचे करताची स्मरण । ते येतात धावून । सोडवतात संकटामधून । निर्विघ्न आपल्या भक्तास॥१०६॥ यापरी तयांची कीर्ती । पसरली आहे दूरवरती । दूरदुरून भक्त येती । तयाच्या दर्शनासी॥१०७॥ तो रंजल्या गांजल्यासी । प्रेमे धरतो हदयासी । धावुनी

जातो संकटासी । निश्चितची।।१०८।। तया नाही भेदभाव । असो रंक अथवा राव । अनेकांसी आला अनुभव । सांगतो आपणास।।१०९।। ते आमचे इष्ट दैवत । तयांचे आम्ही आहोत भक्त । तयांचे चरणी समर्पित । जाहलो आम्ही।।११०।। जशी घार हिंडते आकाशी । परी लक्ष तिचे पिलापासी । त्या परीच ते आम्हा सर्वासी । सांभाळतात एकमेव।।१११।। पुढे घरी परत आल्यावर । घटना सांगितली सत्वर । सर्वांनी केला जयजयकार । संत शंकर बाबाचा।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । अठ्ठाविसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय एकोणतिसावा

आता या अध्यायात । जयेश नावाचा बाबाचा भक्त । कसा वाचला अपघातात । करावे श्रवण।।१।। दोन हजार अठरा सालची । घटना आहे तयाची । तयारी होती जाण्याची । बंगलोरला, कामानिमित्य।।२।। सोबत एका मित्राला घेऊन । जयेश निघाला घरून । बाबाच्या फोटोसी करूनी वंदन । आज्ञा मागितली जाण्यास।।३।। जयेशचा हा दैनंदिन । उपक्रम होता नित्यनेमानं । घराबाहेर जाण्यापूर्वी वंदन । करावे बाबाच्या फोटोस।।४।। यासी न म्हणावी अंधश्रद्धा । ही समजावी शुद्धश्रद्धा । थोरांचा आदर असावा सर्वदा । मूळ हेतू त्यामागे।।५।। शास्त्रे नवविधा भक्ती सांगितली । वंदन भक्ती होय त्यातली । जयाने ती आचरिली । तो उद्धरला या जगी।।६।। वंदन करिता सान-थोरास । होतो अंहकाराचा नाश । नम्रता येई अंगास । निश्चितची तयाने।।७।। बघा त्या महापुरात । विशाल वृक्ष जाती वाहत । परी लव्हाळे मात्र सुरक्षित । राहती एकमेव।।८।।

यासी मूळ कारण। ऐकावे ध्यान देऊन। ते विनम्र होऊन। शरण जाती जल देवतेस॥९॥ विद्युत केंद्र एका ठायी। दिवे लागती अनेक गृही। त्यापरीच संत महात्मेही। कृपा करतात या जगी॥१०॥ अगदी चार-पाच किलोमीटर। बंगलोर होते दूर। त्याआधी एका पुलावर। गाडीचा जाहला अपघात॥११॥ गाडी झाली चकणाचूर। चारही चाके तिची वर। कोण्यापरी निघावे बाहेर। कळेना त्याप्रसंगी॥१२॥ बाबा जरी आहेत आश्रमात। तरी ते आपल्या संकटात। धावुनी येणार निश्चित। जयेशला होता विश्वास॥१३॥ एवढ्यात त्या मार्गावरून। एक प्रवासी वाहन। गाडीचा अपघात पाहून। थांबले त्वरित॥१४॥ प्रसंगाचे गांभीर्य ओळखून। तयांनी मदत केली धावून। परिचय दिला दाखवून। खऱ्या माणुसकीचा॥१५॥ संकटी टाकतो दानव। संकटातून सोडवतो तो देव। जयेशला आला अनुभव। या गोष्टींचा तात्काळ॥१६॥ गाडीतून बाहेर आल्यावर। गाडीवर गेली नजर। आपण कसे आलो बाहेर। आश्चर्य वाटे जयेशला॥१७॥ ज्यांनी काढले

गाडीबाहेर । तेही बोलले सत्वर । तुम्ही भाग्यवान खरोखर । सत्यची सांगतो॥१८॥ तुमच्या पाठीशी कोणीतरी । संत महात्मा आहे अधिकारी । तयांनी येऊनी सत्वरी । वाचविले आपणास॥१९॥ हे शब्द ऐकून । अश्रू वाहे नेत्रातून । शंकरबाबाचे हे ऋण । केव्हा परत करीन॥२०॥ श्री संत शंकर बाबावर । जयेशची श्रद्धा भरपूर । बाबाविना एकही क्षणभर । राहवेना तयास॥२१॥ काही काळ बाबाच्या सहवासात । वेळ गेला सेवा शुश्रूषा करण्यात । वैराग्य भाव आला मनात । जयेशच्या तात्काळ॥२२॥ कासया पडावे मोहपाशात । जीवनभर राहावे अविवाहित । यापरी ठरविला बेत । जयेशने आपल्या मनी॥२३॥ यासाठी तयाच्या आईचा । विरोध होता कायमचा । नेहमी प्रसंग येई भांडणाचा । आईसोबत तयाचा॥२४॥ अशातच एके दिवशी । भांडण जाहले आईसी । तयारी केली यावयासी । पिंपळखुट्यास॥२५॥ आईने आग्रह धरला । मलाही न्यावे सोबतीला । तुझ्यासोबत पिंपळखुट्याला । दर्शन घ्याया बाबाचे॥२६॥ जयेश आपल्या आईसोबत । पोहोचला सद्गुरू धामात । बाबा बसुनी होते आत । आपल्या

आसनावर।।२७।। दर्शन घेऊनी बैसले । बाबा जोराने हसले । भांडण करुनी आले । दोघही मायलेक।।२८।। घरी झालेल्या भांडणातला । प्रत्येक शब्द सांगितला । बाबाने त्या वेळेला । जयेशच्या आईस।।२९।। जयेश आमचा अर्जुन । त्याच दुखवू नका मन । आम्ही सर्व घेतो बघून । चिंता करू नका तयाची।।३०।। पुढे मातृप्रेमाखातर । बाबांचाही राखला आदर । विवाह करण्यासी दिला होकार । जयेशने तात्काळ।।३१।। सौ. प्रिया जवंजाळ अमरावतीची । ती स्नुषा जवंजाळ साहेबाची । तिला अनुभूती जाहली बाबाची । तिच्या प्रसूती काळात।।३२।। बघा तिच्या प्रसूतीस । शिल्लक होते काही दिवस । सासू सुनंदाबाईने पिंपळखुट्यास । तिला आणले दर्शनास।।३३।। अगदी मोकळ्या मनानं । दोघीनीही घेतले दर्शन । त्वरितची सुनंदाताईनं । घटना कळविली बाबास।।३४।। बाबा बोलले सत्वर । आपणासी झाला उशीर । हे ऐकून प्रिया अस्थिर । जाहली मनात।।३५।। लगेच बाबाने प्रियास । सांगितले नमस्कार करण्यास । पाठोपाठ दोन-चार वेळेस । दोन-दोन मिनिटांचे अंतराने।।३६।। याचे रहस्य सौ. प्रियाला ।

तसेच सासू सुनंदाताईला । कळले नाही त्या वेळेला । ते बाबालाच माहीत।।३७।। लगेच बाबाने प्रियाला । सांगितले खाली बसायला । एक सफरचंद दिले खायला । तिला प्रसाद रूपाने।।३८।। सेवक धीरजला बोलावून । औषधी घेतली मागून । पिण्याकरिता दिली बाबानं । सौ. प्रिया ताईस।।३९।। बाबा म्हणाले प्रियास । आता चिंता करू नकोस । सोडू नको साहस । मी आहे पाठीशी।।४०।। पिंपळखुट्याहून अमरावतीला । प्रिया परत आली रात्रीला । दुसऱ्या दिवशी प्रकृती तपासण्याला । गेली डॉक्टरकडे।।४१।। सर्व काही आहे व्यवस्थित । डॉक्टर होते सांगत । प्रिया आली परत । आपल्या घरी।।४२।। दुसऱ्या दिवशी घटना घडली । अचानक प्रियाची प्रकृती बिघडली । सर्वत्र धावपळ सुरू झाली । परिवाराची तत्क्षणी।।४३।। प्रियाताईच्या पाठीत । भयंकर होते दुखत । वेदनांमुळे होती विव्हळत । ती त्या समयी।।४४।। दुसरे दिवशी पाठीवर । चट्टे झाले तयार । बारीक-बारीक फोड त्यावर । दिसू लागले।।४५।। त्वरित नेले रुग्णालयात । हा प्रकार नागीण आजारात । येतो असे मांडले मत ।

डॉक्टरांनी तेथेची।।४६।। त्याआधी महिला डॉक्टरला। दाखववावे हिला। डॉक्टरनी सल्ला दिला। प्रियाच्या परिवारास।।४७।। सोनोग्राफीच्या अहवालात। फक्त पाच टक्के पाणी शरिरात। शिल्लक आहे होती सांगत। महिला डॉक्टर।।४८।। रुग्ण आहे गरोदर। प्रसूती करणे आहे जरूर। परी ऑपरेशन विना समस्या दूर। होणार नाही।।४९।। या घटनेचा सर्व समाचार। कळविला बाबाला सत्वर। बाबा म्हणाले यावर। डॉक्टर म्हणतात तसे करावे।।५०।। प्रसंग होता गंभीर। सर्वांनी दिला होकार। ऑपरेशन करावया सत्वर। तात्काळ तेथेची।।५१।। ऑपरेशन जाहले निर्विघ्न। बाळ जन्मले उदरातून। सुनंदाताईस झाले स्मरण। श्री संत शंकर बाबाचे।।५२।। घाबरू नको मी आहे म्हणाले। ते आज अनुभवा आले। कोटी कोटी आभार मानले। सर्वांनी बाबाचे।।५३।। रुग्ण नक्कीच भाग्यवान। याला कोण्यातरी महात्म्यानं। अवश्यची दिले जीवनदान। डॉक्टर बोलले तात्काळ।।५४।। दुसरे दिवशी रात्रीला। स्वप्न पडले प्रियाला। तिच्या भोवती आजूबाजूला। बाबा होते उपस्थित।।५५।। संत कृपेची

थोरवी। कोण्या शब्दाने वर्णावी। सांगावी तेवढी कमी पडावी। ती आहे अवर्णनीय॥५६॥ साक्षात येऊन बाबानं। मला तारले संकटातून। यापरी मोठ्या कौतुकानं। प्रिया सांगते लोकांस॥५७॥ प्रियाला तिच्या श्रद्धेचे फळ। मिळाले बघा तात्काळ। कारण तिची श्रद्धा अटळ। आहे बाबावर॥५८॥ वाया न जाई संतसेवा। ऐसे आले अनुभवा। मनी संतोष पावली प्रिया। त्या प्रसंगी॥५९॥ भाऊरावजी रोहणकर नावाचे। राहणारे ते राळेगावचे। ते अगदी पूर्वीपासूनचे। भक्त होय बाबाचे॥६०॥ विश्वनाथजी ठाकरे। धामणगावचे राहणारे। दिवाणजी नावाने सारे। ओळखत होते तयांना॥६१॥ तयांनी आपले उभय जीवन। बाबाला केले अर्पण। सेवा केली मनोमन। तयांनी बाबाची॥६२॥ नातेवाईक भाऊरावजीचे। त्यामुळे तयांचे। येणे-जाणे होते नेहमीचे। पिंपळखुट्यास॥६३॥ धार्मिकतेचे संस्कार। पूर्वीच होते तयार। वारकरी बनले सत्वर। भाऊरावजी पिंपळखुट्याचे॥६४॥ बघा संदीप नावाचा। मुलगा भाऊरावजीचा। अपघात झाला त्याचा। भयंकर॥६५॥ तयाला तूर्त

नागपुरास । भरती केले उपचारास । मुलगा होता सिरियस । चिंता वाटे सर्वांसी।।६६।। भाऊरावजी नागपूरवरून । आले पिंपळखुट्याला निघून । बाबाचे घेतले दर्शन । घटना सांगितली तात्काळ।।६७।। बाबाने भाऊरावजीला । हाती अंगारा दिला । म्हणाले पाजून द्यावा त्याला । बरा होईल तो।।६८।। बाबाने सांगितल्याप्रमाणं । तीर्थ अंगारा दिला पाजून । करू लागले नामस्मरण । संत शंकर बाबाचे।।६९।। हळुवार संदीपच्या प्रकृतीत। सुधार होऊ लागला प्रत्यक्षात। अश्रू आले डोळ्यात। सांगताना भाऊरावजीच्या।।७०।। उपस्थित डॉक्टर । तेही बोलले सत्वर । हा नक्कीच होय चमत्कार । अधिकारी संताचा।।७१।। ते संत होय पिंपळखुट्याचे । शंकरबाबा नाव तयांचे । शिष्य होय लहानुजी बाबाचे । कृपा करतात भक्तावर।।७२।। तयांचा महिमा आहे थोर । साक्षात भगवंताचा अवतार । पूजतात नारी-नर । श्रद्धेने तयास।।७३।। भाऊरावजीच्या विनंतीवरून। शंकरबाबाचे पिंपळखुट्यावरून। राळेगावी झाले आगमन । पाच वर्षे सतत।।७४।। वासुदेवराव तोटे राळेगावचे । ते मित्र भाऊरावजीचे ।

ते परमभक्त शंकर बाबांचे । १९९५ सालापासून।।७५।। तयाच्या थोरल्या बंधूस । आजारामुळे होता त्रास । अनेकांकडून केले उपचारास । तरी आराम मिळेना।।७६।। जवळ होते जे धन । सर्व उपचारात गेले निघून । आता काय करावे हा प्रश्न । उपस्थित जाहला परिवारास।।७७।। शेवटी वासुदेवरावने तयास । आणले पिंपळखुट्याास । शंकर बाबाच्या दर्शनास । नाइलाजाने सत्वर।।७८।। त्या वेळी जुन्या निवासस्थानात । बाबा होते राहत । तिथे दर्शनार्थी रांगेत । बसायचे बाबासमोर।।७९।। मग प्रत्येकासी अनुक्रमानं । बाबा देत असे दर्शन । करीत होते संभाषण । प्रसादा सवे तात्काळ।।८०।। बघा त्या काळात । अनेक दर्शनार्थी श्रद्धावंत । मनोभावे जाहलेत तृप्त । समर्थाचा अधिकार जाणावा।।८१।। कोणी म्हणती शंकरबाबा आत्मज्ञानी । न विचारता सांगती भविष्यवाणी । यापरी चर्चा करिती अजूनी । दर्शनार्थी आपसात।।८२।। मित्रहो कृपाप्रसाद गुरुदेवाचा । श्री समर्थ लहानुजी बाबाचा । अधिकार ओळखला शिष्याचा । वरदान दिले शंकरबाबास।।८३।। है क्या कोयी लेनेवाला । लहानुजी बोलले

टाकरखेडला । हा प्रसंग बघितला । प्रत्यक्षात अनेकांनी।।८४।। इथे मोठा व्यापारी आला । तो सर्व माल इथला । लुटून नेतो पिंपळखुट्याला । शंकरबाबा आज।।८५।। आता सविस्तर घ्यावे ऐकून । लहानुजी बाबा भिंतीकडे बघून । भविष्यवाणी देत होते सांगून । ते आपल्या भक्तांची।।८६।। ही ख्याती दूरवर । पसरली होती चौफेर । हजारो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार । आहेत या घटनेचे।।८७।। तीच आपली कला । अर्पण केली शिष्याला । श्री संत शंकर बाबाला । सद्गुरू लहानुजीने।।८८।। कला एकची पद्धती भिन्न । एक भिंतीकडे बघून । दुजा करी संभाषण । प्रसादासवे भक्तांसी।।८९।। आता येऊ मूळ मुद्द्यावर । वासुदेवराव तोटेचा अनुभव थोर । श्रवण करावा सविस्तर । वाचक मित्रहो।।९०।। वासुदेवरावच्या प्रसादास । बाबाने करिताच स्पर्श । विश्वास ना वाटे तयास । बाबाकडे बघुनी।।९१।। कोण्यातरी व्याधीनं । बाबा आहेत बैचेन । जणू एखादया भयानक आजारान । आक्रमण केले बाबावर।।९२।। पुढे एक-एक करून । दर्शनार्थी घेत होते दर्शन । अर्धा तास-गेला निघून । बाबा जाहले पूर्ववत।।९३।। हा

चमत्कार प्रत्यक्षात। वासुदेवाने बघितला आश्रमात। तेव्हाच ओळखले मनात। आपले विघ्न पळाले॥९४॥ आपल्या बंधूचा आजार। बाबाने घेतला आपल्यावर। रोगमुक्त केले सत्वर। बाबानी रोग्यासी तात्काळ॥९५॥ तीर्थ अंगारा घेऊन। घरी आले परतून। चमत्कार घडला नवीन। सांगतो तुम्हास॥९६॥ त्याच दिवशी मध्यरात्रीला। प्रकृतीमध्ये बिघाड पडला। सारे म्हणती मृत जाहला। रुग्ण आपला निश्चित॥९७॥ वासुदेवराव म्हणे सर्वास। माझा बाबावर आहे विश्वास। काहीच नाही होणार बंधूस। निश्चितची सांगतो॥९८॥ अशक्य ते शक्य करती। यापरी जयाची कीर्ती। ते शंकर बाबा माझ्याप्रती। कसे विसरणार॥९९॥ अनेकांचे टाळले विघ्न। कित्येकांसी दिले जीवनदान। मग मलाच परका समजून। करतील काय दुजाभाव॥१००॥ ऐसे कदापिही घडणार नाही। ही आहे माझी ग्वाही। कर्ता करविता सर्व काही। याप्रसंगी माझे ते॥१०१॥ अशा प्रकारे रात्र उलटली। रुग्णाच्या शरीरात चेतना आली। सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली। हे दृश्य बघून॥१०२॥ म्हणती संत

शंकर बाबानं । रोग्यास दिले जीवनदान । ऐसा संत महान । दुर्मीळ आहे आज।।१०३।। बघा या घटनेपासून । वासुदेवरावचे बंधू आनंदानं । जगले बाबाच्या कृपेने । केवढे आश्चर्य म्हणावे।।१०४।। जयाच्या शिरी संताचा वरदहस्त । तो म्हणावा भाग्यवंत । पाहू नये संताचा अंत । चुकूनही कोणीही।।१०५।। चंदनापरी झिजती । मोबदला काहीच ना घेती । ही संतांची मूळ निती । भक्तांसाठी सदैव।।१०६।। जन कल्याणासाठी । स्वयम होऊनी कष्टी । धावोनी जाती संकटी । तात्काळ भक्तांच्या।।१०७।। जगी सर्व सुखी राहावे । दु:ख कोणासही ना व्हावे । संत तयासिच म्हणावे । येर काय कामाचे।।१०८।। सद्गुरू लहानुजी बाबानं । जे धन दिले मौल्यवान । ते शंकर बाबा आनंदानं । वाटत आहे पिंपळखुट्यास।।१०९।। तिथे नाही भेदा-भेद । नाही राव रंकाचा वाद । धर्म-पंथाचा नाही खेद । तया ठायी।।११०।। शंकरबाबा ज्ञानगंगा साक्षात । दुथडी वाहते पिंपळखुट्यात । तृप्त जाहले अनेक भक्त । स्नान करिता त्या जलामाजी।।१११।। कोणी बनले कवी, लेखक । कोणी कीर्तनकार, गायक । कोणी

उत्कृष्ट मृदंगवादक । कोणी भाषण देती सुंदर।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । एकोणतिसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

# अध्याय तिसावा

श्री गुरुदेवाय नमः

एक भक्त दानशूर । पुण्याचे राहणार । तयांचे अनुभव सविस्तर । घ्यावेत ऐकून।।१।। नंदूसेठ चव्हाण । तयाचे नामाभिधान । आर्थिकदृष्ट्या संपन्न । आहेत सर्वतोपरी।।२।। लोकामाजी मानसन्मान । याचे एकची कारण । श्रीमंतीचा नाही अभिमान । जराही तयासी।।३।। प्रपंच व्यवहार सांभाळून । परमार्थातही योगदान । करतात अति उत्साहानं । सर्वतोपरी।।४।। श्री संत शंकरबाबांवर । तयाची श्रद्धा आहे अपार । शंकरबाबाही तयाचा आदर । करतात मनापासून।।५।। श्री. नंदूसेठ चव्हाण । आमच्या आश्रमाचे प्राण । या शब्दांनी केला सन्मान । स्वयम् शंकर बाबाने तयांचा।। ६।। जे कार्य अपूर्ण म्हणुनि । सोडुनि दिले अनेकांनी । ते दाखविले पूर्ण करूनी । या संतभक्ताने तात्काळ।।७।। त्यासी कारण एकमेव । जिद्द, श्रद्धा, सेवाभाव । त्याग, प्रयत्नाचा

प्रभाव । समर्पण आदी।।८।। जगी अनेक श्रीमंत । परी परमार्थापासून वंचित । स्वतःसाठी आहेत जगत । पशुपक्ष्यासमान।।९।। तैसे नाही नंदूसेठचे । जगणे तयाचे माणुसकीचे । कार्य करतात साधुसंतांचे । हनुमंता समान ।।१०।। आता ऐका सविस्तर । श्री क्षेत्र पंढरपूर।। तिथे आश्रम बांधला सुंदर । श्री संत शंकरबाबांचा।।११।। भविष्यात बाबाचे भक्त । तिथे विश्रांती घेतील निवांत।। या परी विचार केला मनांत । पुणेकरी भक्त मंडळींनी।।१२।। ऐसी इच्छा बाबांसमोर । पुणेकरी भक्त मंडळींनी सविस्तर । कथन केली सत्वर । तात्काळ तेथेची।।१३।। बाबा म्हणाले सत्वर । श्री क्षेत्र कौंडण्यापूर।। ते रुक्मिणी मातेचे माहेर । आहे विदर्भात।।१४।। पंढरपूर पवित्र भूमीवर । आश्रम होत असेल तयार।। निश्चितची आनंद होणार । त्याचा आम्हास।।१५।। याविषयी आमचे मत । आम्ही कसे करावे व्यक्त । आम्हासी वाटेना उचित । बाबा बोलले सत्वर।।१६।। बाबांच्या बोलण्याचा संकेत । सर्व पुणेकरी भक्त । समजून गेले त्वरित । त्या प्रसंगी।।१७।। पुढे सर्वांनी मिळून । निर्णय घेतला एकमतानं । बाबांचे आशीर्वाद

घेऊन । आरंभ केला कार्यास।।१८।। आता ऐका सविस्तर । या अध्यायाचा सार । कोण्यापरी झाला तयार । आश्रम पंढरपुरात।।१९।। किती विघ्न आले मार्गात । कोणापरी निवारिले क्षणात । संत शंकरबाबाने साक्षात । नंदूसेठ सांगती।।२०।। राजू गुंड पाटलाकडून । शंभर गुंठे जमीन। विकत घेतली पुणेकरांनी । श्रीक्षेत्र पंढरपुरी।।२१।। दादासाहेब चव्हाण वाल्हेकर । नंदूसेठ, चव्हाण, मिंडे, पांडकर । ही सर्व मंडळी दानशूर। संत शंकर बाबाची।।२२।। पुढील सर्व कार्यभार । त्यांनी सोपविला नंदुशेठवर । बांधकामाचा अनुभव थोर । पूर्वीचा तयापाशी।।२३।। पुढे एकामागे एक । संकटे येऊ लागली अनेक । परी नंदू शेठने आपला विवेक । ढळू दिला नाही।।२४।। प्रथमदर्शनी नंदुशेठन । पुणेकरी भक्तांच्या सहकार्यान । संपूर्ण जागेला केले कुंपण । कायमस्वरूपी।।२५।। पुढे गुरुपौर्णिमेस । श्रीक्षेत्र पिंपळखुट्यास । सूचना केली सर्व भक्तांस । पंढरपूर आश्रमा बाबत।।२६।। या आश्रमाचे निर्माण । व्हावे लोकवर्गणीतून । यापरि ठरले एकमताने । या प्रसंगी।।२७।। लगेच फक्त मंडळीकडून । दोन कोटी रुपयाचे

योगदान । जमा झाले न लागला क्षण । ही कृपा बाबांची।।२८।। पुन्हा चार-पाच महिन्यांनंतर । एक कोटी बारा लाख धन । प्राप्त झाले भक्तमंडळीकडून । याच कार्यासाठी।।२९।। हा सर्व पैसा बाबांना । केला नंदू सेठच्या स्वाधीन । काम करावे आपल्या पद्धतीन । परवाना दिला नंदू शेठला।।३०।। सर्वांना सोबत घेऊन । आश्रमाचा आराखडा बनवून । त्वरित दिला पाठवून । मंजुरीसाठी पालिकेत।।३१।। एक वर्ष लोटून गेले । मंजुरीचे पत्र नाही आले । परी प्रयत्न नाही सोडले । भक्त नंदूशेठने।।३२।। श्री नाझरकर साहेब आयुक्त । ते नवे होते बाबाचे भक्त । त्यांनी केली मदत । मंजुरी आणली तात्काळ।।३३।। त्यानंतर तिथले काही जन । नंदू सेठला सांगती येऊन । ही नदीकाठची आहे जमीन । धोका होईल इमारतीस।।३४।। बांधकामापूर्वी या जमिनीची । तपासणी करणे आवश्यकची । त्याशिवाय इथल्या इमारतीची । निश्चिती नाही।।३५।। या सर्व प्रकारापासून । नंदू सेठ होते अनभिज्ञ । त्यामुळे गेले गोंधळून । त्या समयास।।३६।। शोधाशोध करून । मिळवली टेस्टिंग मशीन । तिच्याद्वारे जमीन तपासून । घेतली नंदू

सेठने।।३७।। बघा त्या जमिनीवर । इमारत बांधणे सोयीस्कर । मुळीच नाही होणार । तपासणी अंती कळले।।३८।। त्याकरिता या जमिनीवर । पायलिंग करावी लागणार । त्या विण मजबूत नाही होणार । इमारत या ठायी।।३९।। हे कार्य होते अवघड । खर्चाच्या दृष्टीनेही होते जड । आता बाबाच सोडवेल हे कोडं । सोपविले बाबांवर।।४०।। पायलिंग मशिन नव्हती पंढरपुरास । ती होती मुंबई पुण्यास । एक सुटली दुसरी समस्या दारास । यापरी जाहले ।।४१।। नंदूशेठ भक्त निष्ठावान । बाबावर तयांची श्रद्धा पूर्ण । जे कार्य दिलं बाबांनं । ते पूर्ण केले आजवरी।।४२।। ज्या इतर सेवकांनी । काम सोडून दिले अर्ध्यातुनी । ते नंदूशेठ चव्हाणांनी । दाखविले पूर्ण करून।।४३।। भंडारा सावरी आश्रमाचे । तसेच पिंपळखुटा विश्वमंदिराचे । उदाहरण सांगता येईल तयाचे । कल्पना याची सर्वास।।४४।। यासी एकची कारण । जिद्द निष्ठा समर्पण । त्याग सेवेचे आभूषण । तया अंगी निश्चित।।४५।। पायलिंग मशिनच्या शोधात । नंदू सेठ होते भटकत । यश नाही आले हातात । काही केल्या।।४६।। हे कार्य होय बाबाचे । आपण निमित्तमात्र

त्याचे । भक्ताची कसोटी पाहण्याचे । कार्य शेवटी संताचे।।४७।। आपण न सोडावा धीर । सर्व काही बाबाचं करणार । यापरी केला विचार । नंदूसेठने आपल्या मनात।।४८।। संत आणि भक्ताचा हा खेळ । चालला काही काळ । शांत केला गोंधळ । नंदू शेठच्या डोक्यातला।।४९।। प्रदीपजी थोरात नावाचे । राहणार ते वाळव्याचे । ठेकेदार होते या कामाचे । त्याप्रसंगी तेथेची।।५०।। एके दिवशी अकस्मात । घटना घडली अद्भुत । त्याचा सविस्तर वृत्तांत । सांगतो आपणास।।५१।। बघा थोरात साहेबांन । नंदूसेठला केला फोन । नंदू सेठ जाहले मौन। एकाएकी।।५२।। थोरात साहेब म्हणाले तयासि । पायलिंग मशिन आहे पंढरपुरासी । यासाठी विचारतो आपणासी । काय करावे म्हणूनी।।५३।। ही शंकर बाबाची किमया । साक्षात पांडुरंगाने केली दया । आपली मदत करावया । आले ते धावून।।५४।। यापरी बोलले हृदय दाटून । नंदूसेठ फोनवरून । थोरात साहेबांनी घेतली समजून । भाषा तयांची।।५५।। पायलिंगचे काम दिवस-रात्र । चार महिने गेले त्यात । पैसाही लागला अतोनात । पुढे आली

पंचाईत।।५६।। नंदू सेठ बाबाला भेटले । सर्व सविस्तर निवेदन केले । यावर बाबा म्हणाले । आम्ही आहो तुमच्या पाठीशी।।५७।। हे कार्य तुमच्याकडून । आम्हाला वाटले व्हावे पूर्ण । आपणासही लाभेल समाधान । या पवित्र कार्याचे।।५८।। पुढे काही भक्त मंडळीकडून । जसे मिळाले योगदान । ते सर्व पैसे घेऊन । महादेव देती थोरात साहेबास।।५९।। एक-दोन वेळा महिन्यातून । नंदू सेठ पुण्यावरून । आश्रमाचे बांधकाम पाहून । परत यायचे।।६०।। हा कार्यक्रम सतत । दोन वर्षे पर्यंत । चालला बघा अखंडित । नंदूशेठचा।।६१।। काही भक्त मंडळी पुण्यावरून । आश्रम बघायला आवर्जून । येत होते अधूनमधून । क्षेत्र पंढरपुरास।।६२।। त्यामध्ये बाळासाहेब दांगट, श्री. वाल्हेकर । मिंडे साहेब आणि श्री. पानकर । संतोष भाऊ पोकळे, रामदास दांगट इतर । नंदू सेठ कोकरे सहित।।६३।। अमरावतीचे बाबांचे परमभक्त । सर्वश्री पी. यु. साहेब, जगताप, पप्पा सहित । या सर्वांची आर्थिक मदत । लाभली आश्रमास।।६४।। श्रीक्षेत्र पंढरपूरच्या पवित्र भूमीवर । संत शंकर बाबांचा आश्रम सुंदर । निर्माण झाला

भाग्य थोर । विदर्भाचे निश्चित।।६५।। विदर्भाच्या अनेक साधू संतांनं । पंढरपूरला आश्रम बांधून । सुविधा दिली करून । यात्रेकरूंस।।६६।। त्यात प्रथम क्रमांकावर । गाडगेबाबांचे नाव अग्रेसर । शंकर बाबाने घातली भर । त्यावर आपल्या नावाची।।६७।। तयांच्या नावाचा जयजयकार । जोवरी सूर्य-चंद्र आकाशावर । निश्चितची होत राहील तोवर । या भूवरी निरंतर।।६८।। श्री. अनिल जगताप नावाचे । राहणार अमरावतीचे । ते परम भक्त शंकर बाबाचे । एकनिष्ठ भक्त ते।।६९।। तयांना संतसंगाची । आवड होती पूर्वीपासूनची । सद्गुरू भेटले अकस्मातची । शंकर बाबाच्या रूपाने।।७०।। भास्करराव देशमुखाचे गृहास । अंबापुरी अमरावतीस । प्रथम दर्शन घडले जगताप साहेबास । योगायोग म्हणावा।।७१।। तेव्हापासून आजपर्यंत । जगताप साहेब अखंडित । संत शंकर बाबाच्या सेवेत । आहेत टिकून।।७२।। एवढ्या दीर्घ काळात । त्यांना अनेक अनुभव आलेत । ते सर्वही या अध्यायात । लिहिणे आहे अशक्य।।७३।। ते शंकर बाबाला साक्षात । पांडुरंगाचा अवतार मानतात । यापरी श्रद्धावान भक्त । म्हणावा

दुर्मीळ।।७४।। येणाऱ्या दुष्ट कालचक्रापासून । सज्जनांचे करावया रक्षण । सद्‌गुरू शंकर बाबाच्या रूपानं । अवतार जाहला भूमीवर।।७५।। आपत्ती आल्या भक्तावर । झेलून घेती स्वतःवर । ऐसे कित्येक प्रसंग आजवर । अनुभवले जगताप साहेबांनी।।७६।। तेणे श्रद्धा जाहली घट्ट । संदेह पावलेत नष्ट । भक्त बनले एकनिष्ठ । ते शंकर बाबाचे।।७७।। तन, मन, धनासहित । सेवा करतात सतत । पिंपळखुटा आश्रमात । नित्यनेमाने।।७८।। बाबाच्या सहवासात राहून । परमार्थमय बनले जीवन । आध्यात्मिक वाचन, भाषण । झाले वृद्धिंगत।।७९।। एक-दोन भीषण अपघातातून । बाबाने वाचविले निर्विघ्न । ते ऐकावे चित्त देऊन । सावकाश भक्तहो।।८०।। एकदा चांदसूरा गोशाळेत । मस्तावलेला सांड अकस्मात । अंगावर आला धावत । जगताप साहेबांच्या।।८१।। बघा त्या सांडानं । जोरदार धडक मारून । सात-आठ फुटांवर फेकून । दिले तात्काळ।।८२।। हे कसे घडले । अगदी कळेनासे झाले । बेशुद्ध होऊन पडले । जमिनीवर जगताप साहेब।।८३।। त्या बेशुद्ध अवस्थेत । जे देखिले साक्षात ।

जगताप साहेब स्वयम् सांगतात। घ्यावे ऐकून॥८४॥ एका शुभ्रवस्त्रधारी पुरुषांनं। सांडासी त्या स्थळावरून। तात्काळ दिले हाकलून। त्या वेळी तेथुनी॥८५॥ तिथून हलविले दवाखान्यात। फ्रॅक्चर निघाले पायात। जीव वाचला हेची बहुत। उपकार झाले बाबाचे॥८६॥ बाबा ना येती धावून। माझे निश्चितची होते मरण। मला वाचविले संकटातून। बाबाने साक्षात॥८७॥ जगताप साहेबांनी केला विचार। नागपूरला जाऊन करावा उपचार। तिथे परिचित होते डॉक्टर। ते हाडाचे स्पेशालिस्ट॥८८॥ प्रथम पिंपळखुट्यास जावून। बाबाचे घ्यावे दर्शन। नंतर जावे निघून। नागपुरास त्वरेने॥८९॥ लगेच ते अमरावतीवरून। पिंपळखुंट्यासी आले निघून। बाबाचे घेतले दर्शन। चित्ती समाधान पावले॥९०॥ त्या वेळी बाबासमोर। दर्शनार्थी होते तीन-चार। बाबा बोलले सत्वर। ते घ्यावे ऐकून॥९१॥ तसे फ्रॅक्चर जुळत नसते काय। बस एवढेच वदले सद्गुरुराय। या सिद्धवाणीचा प्रत्यय। आला जगताप साहेबांस॥९२॥ तिथून ते नागपूरला गेले। एक्सरे आदी सर्व काढले। त्यात फॅक्चर नाही दिसले।

किंचितही पायास।।९३।। जगताप साहेबा सहित । सर्वची जाहले चकित । बाबाचा शब्द संकेत । आठवला तात्काळ।।९४।। माझ्या गुरुमाऊलीचा अधिकार । या जगी आहे थोर । मज घडविला साक्षात्कार । अनंत उपकार तियेचे।।९५।। अशक्य ते शक्य करून । दाखवले तयानं । ते साक्षात ईश्वरी अवतार जाण । या जगीचे।।९६।। सद्गुरूच्या चरणरूपी भूमीवर । कर्मरूपी बीज पेरले सत्वर । श्रद्धा रूपी जल सिंचले निरंतर । जगताप साहेबांनी।।९७।। श्रद्धा आणि समर्पण । संत कृपेचे मुख्य आधार दोन । त्याचे काटेकोर पालन । केले जगताप साहेबांनी।।९८।। तयाठायी अनुभवाचे भांडार । त्या सर्वांचा केल्यासी विस्तार । स्वतंत्र ग्रंथाची होईल तयार । या ठायी।।९९।। एक सेवाभावी तरुण तडफदार । बाबांचा मुख्य सेवादार । वागणे तयाचे धीर-गंभीर । नाव धीरज तयाचे।।१००।। पूर्व पुण्याई वाचून । न लाभे संताचे चरण । धीरज म्हणावा भाग्यवान । एकमात्र  निश्चित।।१०१।। तो शंकर बाबांचे आश्रमात । शिकत होता शाळेत । सेवाभावी वृत्ती उपजत । होती तया अंगी।।१०२।। अनेक आले अन् गेले ।

आपल्या गुणकर्माने नाही टिकले। धीरजने मात्र जीवन घडविले। बाबाच्या सेवेत राहून॥१०३॥ कधीही बाबाच्या सेवेत। कुचराई केली ना त्यात। स्वयम् बाबाही साक्षात। प्रसन्न तयाचे सेवेवर॥१०४॥ कधीही कोण्या दर्शन। दुखविले नाही कोणास। त्यामुळे दर्शनार्थीही तयास। सन्मान देती मनापासून॥१०५॥ मी बाबाचा सेवक। यावरी अविवेक। केला नाही उद्रेक। तयाने कधीही॥१०६॥ सदा प्रसन्नता चेहऱ्यावर। मृदु वचन अति गंभीर। हे दोन सद्गुण थोर। तया जवळी॥१०७॥ एकदा मध्यरात्रीला। बाबाने सांगितले धीरजला। हाकलून द्यावे गायीला। आश्रमाच्या बाजूच्या शेतामधून॥१०८॥ धीरजला वाटत होती भीती। तयाने आश्रमातून घेतले सोबती। सर्व शोधू लागले शेताप्रती। परी गाय ना दिसली कोणासी॥१०९॥ धीरज बोलला सोबत्यास। चला परत आश्रमास। हाकलून दिले गायीस। शेताच्या बाहेर॥११०॥ सोबती म्हणाले धीरजला। गाय ना दिसली आम्हाला। बाबांचा अधिकार कळला। धीरजला तेव्हापासून॥१११॥ मिटले मनाचे संशय। आता एका

बाबाशिवाय। आपणास नाही तरणोपाय। निश्चय केला तयाने।।११२।। इतिश्री चरणामृत ग्रंथ। संतदास विरचित। संत शंकरबाबा चरणी समर्पित। तिसावा अध्याय समाप्त।।११३।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,
मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन
श्री समर्थ सद्गुरू शंकरबाबा महाराज की जय।

# अध्याय एकतिसावा

श्री गुरुदेवाय नम:

हा अध्याय एकतिसावा । ग्रंथाचा समारोप जाणावा । अथवा पूर्णविराम समजावा । परिश्रमाचा।।१।। ग्रामगीताचार्य बेलुरकर दादांचा । तसेच आचार्य अत्रे महाराजांचा । सहवास लाभला अल्प काळाचा । तळेगावी आश्रमात।।२।। तिथे ग्रामगीता ग्रंथाचे वाचन । भरपूर जाहले दैनंदिन । मनी इच्छा जाहली उत्पन्न । आपणही लिहावं काहीतरी।।३।। परी कधी वाटे मनास । लिहिता येईल का आपणास । यात गेले बहू दिवस । हिमंत काही होईना।।४।। बेलुरकरदादा विद्वान । तयांनी माझे अंतर्मन । क्षणात घेतले ओळखून । तात्काळ त्याक्षणी।।५।। एके दिवशी अकस्मात । ते मजला बोलले प्रत्यक्षात । काही तरी जा लिहीत । ऊर्जा मिळाली तेव्हापासून।।६।। ग्रामगीतेवर आधारित । ग्रामगीता रहस्य ग्रंथ । प्रथमची लिहिला भीतभीत । नोकरी

सांभाळून।।७।। एक जानेवारी दोन हजार दोन। लहानुजी मंदिर स्थापना दिन। लहानुजी नगर वर्धा स्थान। त्या पावन पर्वावर।।८।। त्या ग्रंथाचे प्रकाशन। स्वयम् श्री संत शंकर बाबानं। केले बघा योगायोगानं। भक्तांच्या उपस्थितीत।।९।। त्या नंतर काही संतांचे। लघुचरित्र लिहिले तयांचे। वेदना नावाच्या कविता संग्रहाचे। जाहले लेखन।।१०।। भजने लिहिली गाडगे बाबावर। त्याची ध्वनिफित केली तयार। ती लोकांना आवडली फार। श्रवण करताची।।११।। मनात आले ते अवश्य केले। मागे वळून नाही पाहिले। परी हितसंबंध आड आले। पुढे जाण्यास।।१२।। शेवटी मनाशी ठरवले। शंकर बाबावरती पाहिजे लिहिले। मी माझे मनोगत व्यक्त केले। स्वयम् बाबाजवळ।।१३।। बाबाने त्वरितची दिला होकार। पुढे घडला चमत्कार। तोही सांगतो सविस्तर। आपणासी या वेळी।।१४।। पुणेकरी मंडळीचा। बाबाच्या काही भक्तांचा। विचार चालू होता तयांचा। बाबाच्या ग्रंथ निर्मितीचा।।१५।। तयांनी या संदर्भात। चर्चा केली माझ्या सोबत। मीही होकार दिला त्वरित। सर्वासी तात्काळ।।१६।। इ. सन

दोन हजार सात । रामनवमीच्या उत्सवात । सर्व बाबाचे भक्त । होते उपस्थित पिंपळखुट्यास।।१७।। त्यात मिंडे साहेब, पांडकर । नंदूसेठ चव्हाण, वाल्हेकर । नंदूसेठ कोकरे आणि इतर । दांगट मामा, जाधवा सहित।।१८।। हे सर्व बाबाचे परमभक्त । सर्वांचा होता मनोरथ । बाबाचा चरित्र ग्रंथ । करावा निर्माण।।१९।। जशी दुधामाजी पडावी साखर । त्यापरीच जाहले अखेर । माझ्याकडे सोपविला कार्यभार । ग्रंथ लिहिण्याचा तयांनी।।२०।। प्रथमदर्शनी गेलो पुण्यास । भक्तांची माहिती गोळा करण्यास । आठ दिवस मुक्कामास । होतो त्याठायी।।२१।। तिथे एका प्रतिष्ठित भक्तानं । आपल्या घरी बोलावून । मला विचारला प्रश्न । तात्काळ न कळे।।२२।। ते मला म्हणाले । हे आपणासी कोणी सांगितले । मी ते ऐकून घेतले । शांतपणे।।२३।। त्याप्रसंगी योगायोगानं । कोकरे, नंदूसेठ चव्हाण । उपस्थित होते प्रत्यक्षरूपानं । त्याठायी उभयता।।२४।। तेव्हाच नंदूसेठ म्हणाले मला । निश्चितची या ग्रंथाला । पुढे विघ्न येणार लिहिण्याला । भविष्यात वाटते।।२५।। नंदूसेठ चव्हाण जे बोलले । पुढे

त्यापरीच घडले। नानापरी विघ्न आणले। विघ्न संतोषी लोकांनी।।२६।। काही अंहकारी लोकानं । माझा प्रत्यक्ष केला अवमान । हा काय लिहितो म्हणून । अप-प्रचार सर्वत्र।।२७।। ह्या लोकांचा माझ्यावर । विश्वास नव्हता तिळभर । प्रसिद्धी पावलेला ग्रंथकार । पाहिजे होता तयांना।।२८।। बाबाच्या काही बालमित्रांची । माहिती गोळा करून तयांची। सुंदर शब्दरचना त्याची। केली ओवीबद्ध।।२९।। एक अध्याय लिहिल्यावर । वाचून दाखविला बाबासमोर । काही भक्तमंडळी इतर । होती उपस्थित त्याठायी।।३०।। अशाप्रकारे एकूण चार । अध्याय लिहुनी सुंदर । ठेविले बाबाजवळ सत्वर । तयाच्या आज्ञेवरून।।३१।। ते साहित्य बाबाच्या खोलीतून । कोण्यातरी अज्ञात व्यक्तीनं । नेले बघा चोरून । जाणीव पूर्वक।।३२।। जाहलो अति निराश । विरोधकाचा आपणास । अजूनही होत आहे त्रास । कळेनासे झाले।।३३।। आता आपण एकची करावे । या कार्यापासून दूर राहावे । जे होईल ते डोळ्यानी पाहावे । यापरी घेतला निर्णय।।३४।। यात गेले बहू दिवस। गेलो नाही पिंपळखुट्यास। सत्य सांगतो

आपणास । वाचक जनहो॥३५॥ हे बाबाला कसे कळले । मी सांगू शकत नाही त्यातले । परी बाबाने मला बोलावले । श्री क्षेत्र टाकरखेड्यास॥३६॥ तिथे बाबा जे काही वदले । ते मी नम्रपणे ऐकले । पुन्हा पूर्ववत सुरू झाले । कार्य लिहिण्याचे॥३७॥ मी ग्रंथकर्ता नाही विद्वान । नाही पात्रता, नाही ज्ञान । एकमात्र निमित्तासी कारण । आहे या ठिकाणी॥३८॥ शंकरबाबाला साक्षी ठेवून । प्रार्थना केली मनोमन । हे कार्य होऊ द्या निर्विघ्न । आशीर्वाद मागीतला॥३९॥ बाबा माझे मार्गदर्शक । मी केवळ लेखक । ते मालक मी सेवक । तयाचा एकमेव॥४०॥ जशी माता बालकासी । चालविते हात धरूनी तयासी । त्यापरीच बाबाने मजसी । सांभाळिले सर्वकाळ॥४१॥ मग मी माझे म्हणून । कसा होऊ कृतघ्न । तयाचे तयासी केले अर्पण । सर्वभावे याठायी॥४२॥ सबकुछ है तेरा । कुछ नही मेरा । प्रत्येक अध्यायी एकशे तेरा । ओवी संख्या ग्रंथात॥४३॥ तेरा अंकाचे महत्त्व थोर । तेरा म्हणताच दंभ अहंकार । तात्काळ पळूनी जातो दूर । क्षणातची निश्चित॥४४॥ एकुण ओव्या तीन हजार पाचशे पाच । त्याची

बेरीजही तेराच । वैशिष्ट जाणावे या ग्रंथाचं । एकमेव हेच की।।४५।। एकतीस अध्याय एकूण । या ग्रंथामाजी विराजमान । तयाचे बदलविता स्थान । तेरा अंक होतो तयार।।४६।। हा ग्रंथ पूर्ण होण्यास । तेराची वर्षे लागले सर्रास । तेही सांगतो आपणास । आवर्जून।।४७।। इतर कोणत्याही ग्रंथाची । नक्कल नाही केली कोणाची । ही सर्व कृपा शंकर बाबाची । या ठायी निश्चित।।४८।। ते काय नाही करणार । कोणी सांगावे सत्वर । मी अनुभवले वारंवार । सांगतो आपणास।।४९।। जेव्हा लिहिताना येई अडचण । मी तयाना जाई शरण । शब्द देई सुचवून । ते मजला तात्काळ।।५०।। बाबा माझ्या अवतीभोवती । फिरत आहे ऐसी प्रचिती । अनेकदा मला जाणवत होती । त्या काळात निरंतर।।५१।। जितके शब्द या ग्रंथात । तितके श्वास नामस्मरणात । खर्च जाहले अकस्मात । वेळही गेला सत्कार्यात।।५२।। तयाच्या कृपेचा आविष्कार । ठेवितो आपल्या समोर । सेवन करावा पोटभर । सांगतो हा दास आपणासी।।५३।। या ग्रंथाचे प्रथम पारायण । श्री क्षेत्र पंढरपूर पवित्र स्थान । मंदिराच्या गाभाऱ्यात बसून । जाहले

विठ्ठल मूर्ती समोर।।५४।। तसेच श्री क्षेत्र आळंदीला । विठ्ठल महाराजाचे आश्रमाला । परायणाचा योग आला। अचानक न कळे।।५५।। श्री क्षेत्र पिंपळखुट्यास । रामनवमीच्या उत्सवास । वाचून दाखविले ग्रंथास । उपस्थितांसमोर।।५६।। ग्रंथ रचना आवडली सर्वांस । माझ्या विषयी आत्मविश्वास । निर्माण जाहला प्रत्येकास । ही लीला शंकर बाबाची।।५७।। कधी शंकरबाबा अकस्मात । भक्तासमोर होते बोलत । ग्रंथाच्या बाबतीत । ते ऐकले बहुतेकांनी।।५८।। याचा प्रभाव लोकांवर । निश्चितची पडला खरोखर। साहित्य देऊ लागले भराभर। ग्रंथ निर्मितीस।।५९।। मग माझाही आत्मविश्वास । वृद्धिंगत जाहला त्या समयास । लिहू लागलो रात्रंदिवस । घरी बसून निवांत।।६०।। ग्रंथ नेला पूर्णत्वास । संतोष जाहला मनास । धन्यवाद दिले बाबास । दोन्ही कर जोडून।।६१।। मी अज्ञानी पामर । नाही ज्ञानाचा आधार । या जन्माचा केला उद्धार। माझा बाबाने तात्काळ।।६२।। ज्यापरी माउली ज्ञानेश्वरानं। रेड्याच्या मुखातून । वेद घेतले वदवून । तोच प्रकार या ठायी।।६३।। मीही त्या रेडयासमान ।

असता बुद्धिहीन । मला ग्रंथलेखक बनवून । वाढविला सन्मान । लोकांत।।६४।। हे काय कमी मोलाचे । कार्य मानावे बाबाचे । प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलीचे । रूप ते या जगी।।६५।। चंद्र, सूर्य आहेत जोवरी । बाबाची कीर्ती तोवरी । हा ग्रंथ सांगेल लोकांतरी । परिचय तयांचा।।६६।। ग्रंथ निर्मितीचे मूळ कारण । आपणास सांगितले समजावून । त्यापेक्षाही सोपे करून । सांगतो तुम्हास।।६७।। या जगी देवादिकांचे । तसेच साधुसंत महात्म्यांचे । इतिहास लिहिले गेले तयांचे । तेणेची ओळखती तयासी।।६८।। बघा संत येशू ख्रिस्त । जाहले विदेशात । तयांचे भक्त भारतात । यासी कारण इतिहास।।६९।। इतिहास सांगुनी लोकांस । आकर्षित केले तयास । जागृत केले श्रद्धेस । अंतरंगात शिरूनी।।७०।। संत चरित्र पाहिजे वाचले । जे मानव कल्याणार्थ झिजले । अनेक सन्मार्गासी लाविले । उपदेश देऊनी।।७१।। जे स्वत:साठी जगले । ते मानव ठरले । जे इतरांसाठी संपले । ते संबोधिले संत महात्मे।।७२।। ते शरीराने जरी गेले । तरी कर्मानी इथे उरले । घरोघरी पुजू लागले । श्रद्धेने लोक तयासी।।७३।।

शंकरबाबा संत थोर। नाथ संप्रदायाचे वारसदार। लीला दाखवी अपार। क्षेत्र पिंपळखुट्यासी।।७४।। त्या लीला करूनी एकत्र। ओव्या बनविल्या सुंदर। ठेविल्या आपल्या समोर। तयांच्याची कृपेनी।।७५।। तया नाव दिले चरणामृत। वाचता होईल मन शांत। पिंपळखुट्याचा भगवंत। दर्शन देईल साक्षात।।७६।। एक अध्याय जरी दैनंदिन। वाचला नित्यनियमानं। निश्चितची होईल कल्याण। जीवनाचे आपल्या।।७७।। हा ग्रंथ वाचता एकांती। मनाची मिटेल भ्रांती। सत् संगाची होईल प्राप्ती। त्या योगे आपणास।।७८।। शंकरबाबा संत अधिकारी। करुणाकर दु:ख निवारी। रंजल्या गांजल्याचे कैवारी। साक्षात गुरुमूर्ती।।७९।। तव लीलेचा महाकाला। एका ठायी गोळा केला। लाभ व्हावा सर्वाला। तव कृपेचा।।८०।। शंकरबाबाचे हे चरणामृत। पवित्र, पावन, समस्त। वाचन, श्रवण करता श्रद्धायुक्त। स्थिरता लाभेल मनास।।८१।। बुद्धीचा होईल विकास। सत्त्वगुण येतील अंगास। दृढता येईल चित्तास। नाश पावेल अहंकार।।८२।। षड्रिपू होतील कमजोर। जीवन बनेल सात्त्विक सुंदर।

लोक करतील आदर । उठता बसता सर्वकाळ।।८३।। हा भागीरथी नंदन । आहे अति दयावान । संकटी जातो धावून । आपल्या भक्ताचिया।।८४।। कोणी संकटातून वाचले । कोणाचे कार्य सिद्ध जाहले । कोणाचे भाग्य पालटले । कृपा प्रसादे तयाच्या।।८५।। मग पुजू लागले घरोघरी । सान थोर नर-नारी । पिंपळखुट्याचा हा श्रीहरी । संत शंकर बाबा।।८६।। कोणासी आशीर्वाद देऊन । तयाची इच्छा केली पूर्ण । दिले राजसत्तेचे आसन । बसावया तात्काळ।।८७।। कोणाचे भाग्य बदलवून । बहाल केली सुखसमृद्धी चैन । जीवन बनविले नंदनवन । तयाचे शंकर बाबानी।।८८।। कोणासी दिले जीवनदान । भयंकर दुर्धर व्याधीतून । कित्येकासी अपघातामधून । वाचविले तात्काळ।।८९।। कीर्ती पसरली दूरवर । दर्शनासी येती सान-थोर । आबालवृद्ध नारी-नर । क्षेत्र पिंपळखुट्यास।।९०।। दीन अनाथांचा हा कैवारी । उभा वसिष्ठेच्या तीरी । गुरुकृपेची घेवोनी शिदोरी । श्री संत लहानुजीची।।९१।। ती शिदोरी अनंत अविनाशी । अर्पण केली आपल्या शिष्यासी । लहानुजी बाबाने टाकरखेड्यासी । संत शंकर

बाबास॥९२॥ है क्या कोई लेनेवाला । लहानुजी म्हणे व्यापारी आला । हा प्रसंग अनेकांनी बघितला । श्री क्षेत्र टाकरखेड्यास॥९३॥ तेच गुरुकृपेचे धन । शंकर बाबा उदार मनानं । वाटत आहे रात्रंदिन । गरजवंतास निश्चयी॥९४॥ कोणासी मिळाले भरपूर । कोणासी अल्प थोडे फार । यासी संता घरचा व्यवहार । जाणावा एकमेव॥९५॥ जेवढी जमा खात्यावर । तेवढेच आपणास मिळणार । समजून घ्यावे सत्वर । न लावता उशीर॥९६॥ यासाठी सत्कर्म करावे जीवनात । पुण्य जोडावे पदरात । मगची मागावे आपले इच्छित । साधू संताशी॥९७॥ जमा नसता खात्यावर । मागणे मागावे अतोनात । कैसा देईल साधू संत । विचारा आपल्या मनास॥९८॥ इथेच चुकलो आपण । काय करता बुद्धी असून । आता तरी घ्या समजून । सांगतो संतदास आपणास॥९९॥ शंकरबाबा संत अधिकारी । तयाची करा सेवा चाकरी । पुण्य जोडा आपल्या पदरी । करा जीवन पावन॥१००॥ आता या हो सकलनजन । एका ठायी बैसून । श्रद्धाभावे करूया स्मरण । सद्गुरू शंकर बाबाचे॥१०१॥ अवघे जाऊ या

शरण । वंदू तयाचे चरण । तोच नेईल तारून । भवसागरातून आपणासी॥१०२॥ बाबा तुम्ही सर्व शक्तिमान । सर्व गुण ज्ञान संपन्न । आम्हासी द्यावे दान । तुमच्या कृपा प्रसादाचे॥१०३॥ तुम्हीच आमची मायमाउली । आम्ही लेकरं रंजली, गांजली । सदा असू द्या कृपेची सावली । शिरावरी आमच्या॥१०४॥ नका देऊ धन-मान सन्मान । नका देऊ महालमाडी सुवर्ण । चित्ती राहू द्या समाधान । सदा सर्वकाळ॥१०५॥ हेची मागणे तुमच्या चरणी । तुमचा सत्संग घडो क्षणोक्षणी । देह लागू द्या सत्कारणी । परमार्थ सेवेत॥१०६॥ तुमच्या नाम चिंतनात । या देहाचा होवो अंत । शेवटचा श्वास जावा सुखात । यातना विरहित॥१०७॥ आमची ऐकावी प्रार्थना । माता भागीरथी नंदना । भक्तवत्सला दयाघना । आनंद स्वरूपा दीनानाथा॥१०८॥ संकटमोचन भक्त भूषणा । सद्‌गुरू समर्था दिव्य लोचना । मंगलदायका प्रसन्न वदना । बुद्धिदायका नमितो तुजला॥१०९॥ प्रपंचरूपी भव डोही । आम्ही बुडालो सर्वही । धावूनी या लवलाही । वाचवा-वाचवा आम्हासी॥११०॥ ऐशा बिकट समयास । तुमच्या विना

आम्हास । दुजा कोणी नाही वाचविण्यास । समर्थ या जगी।।१११।। तुमच्या सामर्थ्याचे वर्णन । करावे कोणत्या शब्दानं । आम्ही पडलो अज्ञानी जन । सत्यची सांगतो।।११२।। आता सर्वभावे उदार होऊन । आम्हासी घ्यावे सांभाळून । माय-माउली समान । आपल्या विशाल हृदयात।।११३।। तुमच्या ठायी आमचा विश्वास । नका दूर लोटू आम्हास । हेची मागणे मागतो तुम्हास । विनम्र होऊन आपल्या चरणी।।११४।। इतिश्री चरणामृत ग्रंथ । संतदास विरचित । संत शंकरबाबा चरणी समर्पित । एकतिसावा अध्याय समाप्त।।११५।।

।। सद्‌गुरुनाथ महाराज की जय।।

श्री समर्थ सद्‌गुरू लहानुजी, सत्यदेव बाबा कृपांकित पिंपळखुटा निवासी,

मंगलदायी, विघ्नविनाशी, भक्तभूषण, भागीरथी नंदन

श्री समर्थ सद्‌गुरू शंकरबाबा महाराज की जय ।

## ।। परमहंस श्री संत शंकर महाराजांची आरती ।।

पंचप्राण ओवाळीता । नुरले द्वैत भाव चित्ता ।। अखंड ध्यास तुझा । कोणी न होय परता ।।१।।
ध्यानी ध्याता साक्षी माझा । तूची देही विदेही ।। नादबिंदू जागवोनीया। तुज अंतरंग पाही ।।२।।
चिन्मय रूप तुझे । ध्यानी दर्शन दावीले ।। जागविले मजलागी । दावी कृपेची पाऊले ।।३।।
अनुभवी गुरू माझा । मज एकांताशी बोले ।। अंतरंगी पाही आता । स्वानंदाची पाऊले ।।४।।
सोहं मंत्र जागविता। अनुभव सिद्ध झाले।। गुरू शिष्य एक भेटी । जीव शिव ऐक्य झाले ।।५।।
साक्षात्कार तयापुढे । ध्यानी मनी आदीरूपा । ज्योतीची निजज्योती । साक्ष साक्षी ब्रह्मरूपा ।।६।।
अनुभवी गुरु ऐसा। जगी जागवे स्वरूपा।। दास म्हणे याची छंदे । चुकवी चौऱ्यांशीच्या खेपा ।।७।।
आरती शंकर बाबा । दिव्य स्वरुपाची शोभा।।दीपविले नवखंड । प्रकाशली सारी आभा ।।धृ.।।
आरती शंकर बाबा । .........

## आरती *(चाल– आरती सप्रेम जय जय विठ्ठल रखुमाई)*

आरती ओवाळू शंकरबाबा चरणी| गंध अक्षदा नंदादीप आणा उजळोनी ||धृ.|| आरती ओवाळू.....
आरतीची वेळा झाली उठा सत्वर | आळस निद्रा विकार सारे काढा बाहेर ||
निजह्रदयाचे आसन सुंदर, ठेवा सजवोनी ||१|| आरती ओवाळू.....
उभे राहू एका ठायी अवघे नरनारी |श्रद्धाभावे गावू आरती सद्गुरू दरबारी ||
भागिरथीचा बाळ लाडका पाहूया नयनी ||२|| आरती ओवाळू.....
एकरूप होऊ सारे नाचू आनंदे | एकमेका देऊ टाळी भक्तिच्या छंदे ||
विणा-चिपळ्या टाळ-मृदंग वाजे गर्जुनी ||३|| आरती ओवाळू.....
पंचप्राण देऊ आहुती आरती अंती | ज्ञानामृत प्रसाद वाटू प्रत्येका हाती ||
संतदास म्हणे याहो अवघे मिळोनी....||४|| आरती ओवाळू....

*शब्दरचना – बाबाराव गेडाम (संतदास)*